# १

## केमाल पाशा आणि आधुनिक तुर्कस्तान

**घटक रचना**

१.०. उद्दिष्ट्ये

१.१. प्रस्तावना

१.२. मुस्ताफा केमाल पाशा आणि आधुनिक सुधारणा

    १.२.१. मुस्ताफा केमाल पाशाचा जीवनवृत्तांत

    १.२.२. केमाल पाशाचा उदय

    १.२.३. केमाल पाशाचे अंतर्गत धोरण

    १.२.४ केमाल पाशाचे परराष्ट्रीय धोरण

१.३. सारांश

१.४ प्रश्न

१.५ संदर्भ

### १.०. उद्दिष्ट्ये

या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थांस

- केमाल पाशाचा जीवनवृत्तांत समजावून देणे.
- केमाल पाशाच्या उदयास जबाबदार घटकांचा अभ्यास करणे.
- अंतर्गत धोरणाच्या कोणकोणत्या सुधारणा केल्या याची माहिती मिळवणे.
- केमाल पाशाचे परराष्ट्रीय धोरण समजावून घेणे.

### १.१. प्रस्तावना

पहिल्या महायुद्धाच्या वेळी तुर्कस्थानने जर्मनीच्या बाजूने युद्धात प्रवेश केला. परंतु तुर्कस्थानचा प्रभाव झाल्याने दोस्त राष्ट्रांनी तह लादला. त्या तला केमाल पाशाने विरोध करून दोस्तांबरोबर युद्ध केले. या युद्धात दोस्त राष्ट्रांचा पराभव झाला. त्यामुळे केमाल पाशाचा तुर्कस्थानच्या राजकारणात उदय झाला. केमाल पाशाने तुर्कस्थानच्या सुधारणा करताना अनेक कायदे करून सक्तीच्या सुधारणा केल्या. त्यामुळे त्याला कल्याणकारी हुकुमशहा असे म्हणतात.

## १.२. मुस्ताफा केमाला पाशा आणि आधुनिक सुधारणा

एकेकाळी तुर्की साम्राज्य बलाढ्य साम्राज्य असून आशिया, आफ्रिका व पूर्व युरोपवर तुर्कांची सत्ता होती; परंतु १८ व्या शतकात मोडकळीस आली. पहिल्या जागतिक महायुद्धात तुर्कस्थानने दोस्तांच्या बाजूने युद्धात उडी मारली. ३ मार्च १९१८ रोजी रशियाने शरणागती पत्करून जर्मनीने ब्रेस्टलिटोव्हॉस्कचातह लादला. त्यामुळे इ.स. १८७७ पासूनचा रशियाच्या ताब्यातील सर्व प्रदेश तुर्काला परत मिळाला, पण हा आनंद दीर्घकाळ लाभला नाही. जर्मनीने ३० ऑक्टोबर १९१८ रोजी शरणागती पत्करली. मुद्रोस येथे जर्मनीने शस्त्रबंदी करार केला. दोस्तांनी तुर्की साम्राज्याचा जास्तीत जास्त प्रदेश मिळवण्याचा प्रयत्न केला. या वेली युरोपियन देशांनी युरोपचा रुग्ण म्हणून तुर्कस्थानची हेटाळणी केली. इंग्लंड - रशियाच्या मतभेदामुळे तुर्कस्थानच्या साम्राज्याला जीवदान मिळाले. याच वेली राष्ट्रवादाने तुर्कस्थानला वाचवण्यासाठी आंदोलन सुरु केले. याचे नेतृत्व केमाल पाशाने केले. त्यामुळे तुर्कस्थान जिवंत राहून सुधारणा करून प्रगती केली.

### १.२.१. मुस्ताफा केमाल पाशाचे जीवनवृत्तांत :

ग्रीसमधील सालोनिक गावी कस्टम अधिकारी याच्या कुटुंबात इ.स.१८८१ ला केमालचा जन्म झाला. त्याला लष्करी पेशाची आवड असल्याने कॉन्स्टँटीनोपल येथील हर्दिये स्टाफ या लष्करी महाविद्यालयात दाखल झाला. गणितातील प्रगती पाहून शिक्षकांनी ‘केमाल’ ही पदवी दिली. इ.स. १९०६ मध्ये तुर्कस्थानच्या सैन्यात कॅप्टन म्हणून नोकरीत रुजू झाला. इ.स. १९०८ मध्ये तुर्की सुलतानाविरुद्ध तरुणांनी क्रांती केली. टी तरुण तुर्क क्रांती या नावाने ओळखली जाते. या क्रांतीशी समंध होता. जागतिक महायुद्धात जर्मनीच्या बाजूने युद्धात भाग घेण्यास विरोध केला. तरी पण उतरावे लागले. केमालला खरी प्रसिद्धी गॅलिपोलीच्या युद्धात मिळाली. त्याने इंग्रजांचा जबर पराभव केला. इंग्रजांच्या महत्वाकांक्षावर पाणी फिरवले; परंतु पुढे पराभवाचे चिन्ह दिसताना सुलतानाला लष्करी संबंधाचा अहवाल पाठवला. त्यात तुर्कस्थानचे सैन्य जर्मन अधिकाऱ्याच्या ताब्यात देऊ नये. विखुरलेल्या तुर्की साम्राज्यातून सैन्य काढून घेऊन ते फक्त तुर्की प्रदेशाच्या रक्षणासाठी ठेवावा. यापुढे तुर्की साम्राज्याच्या रक्षणासाठी तुर्की सैन्याचे रक्त सांडू नये, असे सांगितले.



### १.२.२. केमाल पाशाचा उदय :

#### १) राष्ट्रीय आंदोलन -

तुर्कस्थानचा ३० ऑक्टोबर १९१८ पराभव होऊन साम्राज्य नष्ट होऊन पारतंत्र्यात जाईल, अशा बातम्या येऊ लागल्या. तुर्कस्थानमध्ये इंग्लंड-रशिया स्पर्धक होते; परंतु रशियाचा पराभव झाल्याने इंग्लंड फक्त एकटेच राहिले. इंग्लंडने आपला स्वार्थ साधण्यासाठी ग्रीसला चिथावणी दिली. त्यामुळे ग्रीसने तुक्स्र्थानवर आक्रमण केले. तुर्कस्थानमध्ये राष्ट्रवादी शक्ती उदयास येऊन त्याचे नेतृत्व केमालाने केले. तुर्कस्थानमध्ये तीव्र आंदोलन सुरु करण्यासाठी उद्देश ठरवले ते -

१) सुलतान व इतर भ्रष्ट अधिकारी यांना बडतर्फ करणे.

२) परकीय आक्रमकांना व ग्रीकांना तुर्कामधून फेटाळून लावणे.

३) तुर्कस्थानच्या स्वातंत्र्याला विरोध करण्याऱ्या स्वकीय व परकीय यांचे उच्चाटन करणे.

#### २) दोस्तांचा हस्तक्षेप - ११ मार्च १९२० -

राष्ट्रीय आंदोलनाचा सर्व तुर्कस्थानमध्ये जोर वाढला. त्यामुळे सुलतान घाबरला. त्याने क्रांतीविरोधी असलेल्या फारिंद पाशाचे मंत्रीमंडळ बडतर्फ करून देशाला सार्वत्रिक निवडणुका घेतल्या. या वेली राष्ट्रवाद्यांना बहुमत मिळाले. त्याने सरकार बनवले. या नव्या सरकारने योजना घेतल्या. १९२० मध्ये प्रसिद्ध केल्या. ती राष्ट्रीय करार नावाने ओळखला जातो. तो पुढीलप्रमाणे.

१) शस्त्रसंबंधी रेषेच्या दक्षिणेकडील अरब प्रदेशात तुर्कस्थानने स्वयंनियंत्रणाचा अधिकार द्यावा.

२) व्यापारी बोटीसाठी डार्डनेल्स व बास्कोरच्या सामुद्रधुन्या खुल्या करण्यात याव्यात.

३) युद्धोत्तर काळात युरोपमध्ये अल्पसंख्याकांना जे अधिकार आहेत, तसे तुर्कस्थानमध्ये तुर्केतरांना असावेत.

४) तुर्की सुलतानांबरोबर यापूर्वी परकीयांनी जे करार केले आहेत, ते रद्द समजण्यात यावेत.

५) राष्ट्रीय कर्जाची योग्य हप्त्यात परतफेड करण्यात यावी.

थोडक्यात रस्त्रावाद्यांनी सुलतानाची सत्ता नियंत्रित केली. त्यामुळे सुलतानाने लिबरल पक्षाशी दोस्तांनी हातमिळवणी करून राष्ट्रवाद्यांवर हल्ला चढवला. १९ मार्च १९२० दोस्त व राष्ट्रवाडी यांच्यात धरपकड झाली.

**३) अंकारा येथे हंगामी सरकारची स्थापना - इ.स. १९२० -**

दोस्तांच्या हस्तक्षेपामुळे सुलतानाने पार्लमेंट बरखास्त करून फारिंद पाशाला पंतप्रधान नेमले. पण केमालने ॲनॉटोनियातील जनतेला निवडणुकीचे आवाहन देऊन निवडणूक लढवली. नवे राष्ट्रीय सरकार निर्माण करून केमाल प्रमुख बनला. सुलतानाने अंकारावर सैन्य पाठवले. पण केमालने त्याचा पराभव केला.

**४) सेव्हर्सचा तह - १० ऑगस्ट १९२० -**

पहिल्या महायुद्धात दोस्तांनी पराभूत राष्टांवर परिस शांतता परिषदेत जे तह लादले त्यापैकी सिव्हीयर्सचा १० ऑगस्ट १९२० ला तुर्कस्थानवर लादला.

१) कॉन्स्टॅटीनोपल तुर्कस्थानकडे ठेवण्यात आले.

२) डार्डानेस व बास्फोरस या दोन्ही खाड्या सर्व राष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी खुल्या असाव्यात.

३) दोन्ही खाड्या भोवतालचा प्रदेश निर्लष्करी बनवावा.

४) सिरीया, पॅलेस्टाईन, मोसोपोटेमिया हे प्रदेश तुर्कस्थानकडून घेऊन राष्ट्रसंघाकडे विश्वस्त म्हणून सोपवावेत.

५) मॅसिडेनिया, स्मार्नासह थ्रेस, आशिया मायनर, डाडेकनीज बेटे ग्रीसला देण्यात यावीत.

६) इजिप्त व अरबस्थानला स्वातंत्र्य देण्यात यावे.

७) तुर्कस्थानची अर्थव्यवस्था, गृहव्यवस्था, न्यायव्यवस्था या विभागावर दोस्त राष्ट्रांचे नियंत्रण राहील.

तुर्की साम्राज्य नष्ट करणारा, तुर्कस्थानचे स्वातंत्र्य हिरावून घेणारा व तुर्कस्थानला दोस्तांच्या नियंत्रणाखाली ठेवणारा तह सुलतानाने स्वीकारल्याने जनतेचे पित्त खवळले. राष्ट्रवाद्यांनी तहाविरुद्ध व सुलतानाविरुद्ध तीव्र प्रतिक्रिया केली. केमाल पाशाने सर्व एकत्र करून दोस्तांचा तह फेटाळून लावण्याचा प्रयत्न केला. या वेली ग्रीक-इटली यांचा केमालने पराभव केला. त्यामुळे रशियाने केमालशी मैत्रीकरार केला.

**५) ग्रीस तुर्कस्थान युद्ध - १० जुलै १९२१ ते ९ स. १९२२ -**

सेव्हरेसच्या तहाने ग्रीकाला प्रचंड लाभ होणार होता. इंग्लंडच्या पाठींब्यावर ग्रीसने तुर्की साम्राज्यावर चढाई केली. तुर्की प्रदेश आपल्या फौजांनी व्यापण्यास सुरुवात केली. केमाल पाशाने २० दिवस प्रखर लढा देऊन ग्रीकांचा पराभव केला. ग्रीकांना तुर्कस्थानमधून हुसकावून लावले. ग्रीकांना माघार घेताना प्रचंड उद्ध्वस्त केले. अनेक शहरे जाळली. त्यामुळे अनेक तुर्की निर्वासित बनले. अखेर इ.स. १९२२ ग्रीक फौजा

बाहेर गेल्या. या कामगिरीबद्दल केमालला मार्शल व गाझी असे दोन किताब राष्ट्रीय सभेने दिले.

**६) मुदानिया करार - १३ ऑगस्ट १९२२ -**

केमाल पाशाने आर्मेनियाचा पराभव केला. ग्रीकांना पिटाळून लावले. फ्रान्स इटालीने माघार घेतली. रशियाने केमालबरोबर दोस्ती केली. आता फक्त तुर्की इंग्लंडच्या फौजा शिल्लक होत्या. इंग्लंड-तुर्क परस्परांवर आक्रमक तयारीत होते. मात्र केमालचा विजय पाहून इंग्लंडच्या सेनाधिकारी जनरल चार्ल्स हॅरिंग्टन याने १३ ऑगस्ट १९२२ मध्ये मुदानियाचा करार केमालबरोबर केला.

**७) सुलतानशाहीचे विसर्जन - १७ नोव्हेंबर १९२२ -**

केमालच्या विजयामुळे मुदानियाचा करार केला. त्यामुळे सेव्हरेसच्या तहाला केमालने विरोध केल्याने त्यात सुधारणा करण्यासाठी स्वीत्झर्लंडमधील लॉसुने येथे परिषद भरवली. या वेली दोस्तांनी सुलतानाला व केमाल पाशाला निमंत्रण दिले. सुलतानाला निमंत्रण देणे अंकारा येथील राष्ट्रीय सभेने नामंजूर केले. कारण विश्वासघात करणाऱ्या सुलतानाचे स्वातंत्र्य व सार्वभौमत्व केव्हाच नष्ट झाले आहे आणि मोहम्मद सहावा सुलतान याला पदभ्रष्ट करण्यात यावे. त्याच दिवशी तो १७ नोव्हेंबर १९२२ ला प्राणभयाने मलय नावाच्या ब्रिटीश युद्धनौकेतून पळून गेला. नवनिर्वाचित खलिफा युवराज अब्दुल मजिद याने राष्ट्रीय सभेचे सार्वभौमत्व मान्य करून सुलतानाला पदावरून दूर केले.

**८) लॉसेनचा तह - २४ जुलै १९२३ -**

लॉसाने दोस्तांची लॉसेनची शांतता परिषद २७ नोव्हेंबर १९२२ ला सुरु केली. सेव्हरेस तहातील कलमे रद्द करून नवीन तह ४ फेब्रुवारी ते २३ एप्रिल १९२३ या काळात परिषदेचे कामकाज करून २४ जुलै १९२३ सर्वसहमत होऊन लॉसेनच्या तहावर सही केली.

१) ग्रीसला सेव्हरेस तहाप्रमाणे मिळालेल्या पूर्व वेस, कॉन्स्टॅटीनोपल व ॲड्रीयानोपल या प्रदेशावर पाणी सोडावे लागले.

२) इजिप्त, सुदान, सायप्रस, सिरिया, मोसोपोटेमिया व अरेबिया या प्रदेशावरील हक्क तुर्कस्थानने सोडून द्यावे.

३) तुर्कस्थानने परदेशी नागरीकांबद्दल न्यायालयीन सुधारणा करण्याचे मान्य केले.

४) जकातीतील परकीय नियंत्रणे रद्द करण्यात आली.

५) तुर्कस्थानच्या लष्करी, नाविक आणि हवाई दलावरील सर्व निर्बंध काढून टाकण्यात आले.

६) सामुद्रधुन्यांच्या प्रदेशातील निर्लष्करी टापूत तुर्कने मान्य केले.

७) तुर्कला सार्वभौम राष्ट्राचा दर्जा देण्यात आला.

८) मुस्लिमेतर जनतेचे ऑटोमन साम्राज्याच्या काळात असलेले खास हक्क रद्द करण्यात आले.

**९) प्रजासत्ताकाची निर्मिती - २९ ऑक्टोबर १९२३ -**

केमाल पाशाने यापूर्वीच सुलतानपद रद्द केले. तरी पण प्रजासत्ताकच्या अनेक अडथळे होते.

१) प्रजासत्ताक निर्मितीस जनतेची मानसिक यतयारी अद्यापि झालेली नव्हती.

२) खलिफा पद अद्यापि अस्तित्वात होते,

३) घटनात्मक चौकटीत बंधुं राष्ट्रप्रमुख म्हणून ठेवावे असा काही जणांचा मानस होता.

४) सनातनी व स्थितिवाद पक्षाचा खालिफापद कायम ठेवण्याबद्दल आग्रह दिला. प्रजासत्ताकाला त्याचा सक्त विरोध होता.

केमाल पाशाने प्रागतिक आणि स्थितिवाद गंभीर मतभेद संघर्षात होऊ नये यासाठी अत्यंत कौशल्याने व नाजूकपणे परिस्थिती हाताळली. घटनादुरुस्ती करण्याची सूचना केल्याने बहुमताने प्रजासत्ताक राष्ट्र २९ ऑक्टोबर १९२३ रोजी निर्माण केले.

**१०) खलिफापदाचे विसर्जन - ३ मार्च १९२४ -**

१७ नोव्हेंबर सुलतानशाही नष्ट होऊन प्रजासत्ताक राजवट सुरु केले. जनतेला खालीफातील आकर्षण होता. जनता आपल्या धर्मनिष्ठेपासून दूर जायला तयार नव्हती. नव्या घटनेत प्रजासत्ताकाचा धर्म म्हणून इस्लाम धर्माची अधिकृत नोंद केली. केमालने प्रगती पक्ष उचलून धरला. केमाल पाशाला अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करून लोकमत तयार करून ताबडतोब राष्ट्रीय सभा बोलावून खालीफापद विसर्जित करण्यासंबंधी आव्हान केले. ३ मार्च १९२४ रोजी राष्ट्रीय सभेत खालीफापदाचे विसर्जन केले. त्यानुसार ठराव केला.

१) ऑटोमन राजघराण्यास तुर्कस्थानमधून हद्दपार करणे.

२) खलिफापद धर्म संस्थेचे कार्यालय यांचे विसर्जन करणे.

३) धार्मिक कॉलेजसहित, सर्व शैक्षणिक आणि तांत्रिक संस्था शिक्षण खात्याच्या अमलाखाली आणणे, विधेयक मंजूर केले त्या रात्री खलिफा अब्दुल मजीद देशत्याग केला. तुर्कस्थानला धर्माच्या एकतेचे केंद्र म्हणून स्थान नाही.

**आपली प्रगती तपासा :**

प्र. १. केमाल पाशाचा उदय थोडक्यात सांगा.

### १.२.३ केमाल पाशाचे अंतर्गत धोरण :

**१) आधुनिकीकरणासाठी केमालचे धोरण :**

केमाल पाशाने परकीय आक्रमणाचा नि:पात करून सुलतान व खलिफा पद नष्ट केले आणि प्रजासत्ताक स्थापन केले. या सर्व गोष्टी तुर्की सैन्याच्या साहाय्याने केले. तुर्कस्थानच्या आधुनिकीकरणासाठी व सुधारण्यासाठी केमालने आपली आधुनिकीकरणाची तीन उदिष्टे जाहीर केली.

अ) जुलमाचे प्रतिक असलेले सुलतानपद व खलिफापद रद्द करणे.

ब) राज्यकारभारावर धर्माचे वर्चस्व नष्ट करून धर्मनिरपेक्ष रास्त्र  तयार करणे.

क) पाश्चिमात्य धर्तीवर तुर्की समाजाची पुनर्रचना घडून येणे.

ही उदिष्टे साध्य करण्यासाठी पीपल्स परतीची स्थापना करून स्वत:चे तत्वज्ञान मांडले. पाशाने सहसुत्री कार्यक्रम राबवून तत्त्वांचा उदघोष केला आणि पक्षाने त्याचा स्वीकार केला. नवीन राज्याघातानेत अंतर्भाव ५ फेब्रुवारी १९३७ केला. टी सहा तत्त्वे केमालाची षटपदी नावाने प्रसिद्ध आहेत.

१) प्रजासत्ताकवाद　　२) राष्ट्रवाद

३) लोकतंत्रवाद　　४) उत्क्रांतीवाद

५) धर्मनिरपेक्षता　　६) शासकीय नियंत्रण

**२) धार्मिक सुधारणा :**

केमाल पाशाने सर्वच क्षेत्रात सुधारणा घडवून आणल्या. मात्र त्याच्या धार्मिक सुधारणा महत्वाच्या मानल्या जातात. कारण या सुधारणा अन्य सुधारणांचा पाया बनला. सर्सामान्यांवर धर्माचा पाडगा होता. सर्वसामान्य लोक अंधश्रद्धाळू होते, त्यांच्यावर इस्लाम संस्कृतीचा पगडा होता. त्यातून जनतेला बाहेर काढणे अतिशय अवघड होते. त्याने सुलतानपद नष्ट करून धर्मनिरपेक्ष शासन संस्थेची घोषणा केली. याशिवाय अन्य सुधारणा केल्या.

१) धर्मासंबंधीचे सर्व कायदे १९२५ मध्ये रद्द केले.

२) धर्मप्रचारासाठी तुर्कस्थानातील शाळा बंद केल्या.

३) धर्म ही व्यक्तीची खाजगी बाब असून शासन कोणत्याही व्यक्तीला स्वातंत्र्य असेल असे जाहीर केले.

४) इस्लाम धर्माचा शरिमनचा कायदा रद्द केला व पाश्चात्य धर्तीवर दिवाणी, फौजदारी आणि व्यापारी दंडसंहिता नव्याने तयार केली.

स्वीस, जर्मन, इटालियन, धर्तीवर नव्या कायदेसंहितामुळे कुटुंबपद्धती, वारसा हक्क आणि विवाह पद्धतीया इस्लामी धर्माचा प्रभाव कमी झाला. नवी समाजरचना उभारण्यास या कायदेसंहितांचा उपयोग झाला. धार्मिक प्रभाव नष्ट करण्याच्या दृष्टीने केमालने उपाययोजना फलदायी ठरल्या.

**३) शैक्षणिक सुधारणा :**

केमाल पाशा पाश्चात्यकरणाचा कट्टर पुरस्कर्ता असल्याने शिक्षण पद्धतीत सुधारणा केल्या. शिक्षणातून माणूस बदलतो. जुनी शिक्षण पद्धती सर्वस्वी धर्माधिष्ठता होती. शिक्षणाचे कार्य उलेमा नावाच्या धर्मगुरुमार्फत चालत होते. केमालने सर्व बदल केले.

१) केमालने धर्मसंस्थेतील चालवणाऱ्या सर्व जुने मदरसे, शाळा बंद करून सरकरी नियंत्रणाखाली व सरकारी साहाय्यावर नवीन शाळा, महाविद्यालये सुरु केली.

२) प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले.

३) शिक्षण संस्थांतून दिले जाणारे धार्मिक शिक्षण बंद करून विज्ञाननिष्ठ पाश्चात्य शिक्षण सुरु केले.

४) अवघड, वेडीवाकडी तुर्की लिपी रद्द करून लॅटिन लिपीचा स्वीकार केला.

५) कुराणाचे पुनर्लेखन तुर्की भाषेत करून ते भाषांतर मशिदीमध्ये वाचण्यास सक्ती केली.

६) तुर्की भाषेला सर्वत्र प्राधान्य केले.

७) माध्यमिक, तांत्रिक शाळांची संख्या वाढवली. प्रत्येक गावी शाळा व मोठ्या लोकांकरिता रेडीओची सोय केली.

८) पारंपारिक अभिवादनाचा प्रयोग बंद केला. ऐवजी मिया स्वाभिमानी हो, काम कर, धैर्यशील हो, असा ज्वाज्वल्य राष्ट्राभिमानी ज्योत पेटवणारा अभिवादनाचा प्रयोग केला.

**४) सामाजिक सुधारणा :**

केमालने प्रागतिक आणि आधुनिक तुर्कस्थानचा आदर्श प्राप्तीसाठीच सामाजिक सुधारणा केल्या. तुर्कस्थानातील समाज परंपरागत रुढीप्रिय, सनातनी, जुन्या अंधश्रद्धांना चिकटून राहणारा होता. धर्माचा प्रभाव मोठा असल्याने विकासात अडथळा होता. केमालने विरोधाला न जुमानता सामाजिक परिवर्तनाला हात घातला.

अ) **वेशाभूषांतील बदल -** तुर्की पद्धतीचा गबाळा, वेन्धळा पोशाख टाकून स्त्री पुरुष पाश्चात्य पद्धतीचा वेशभूषा स्वीकारण्यास सक्ती केली. गोंड्याची टोपी टाकून हॅट वापरण्याची सक्ती केली.

**ब) स्त्रीची सुधारणा -** इस्लामी जगतातील सर्वसाधारण स्त्री अत्यंत मागासलेल्या अनेक बंधनांनी जोखडलेल्या, दयनीय स्थिती होत्या. शिक्षणाचा अधिकार नव्हता. स्त्री मुक्त केल्याशिवाय प्रगती होणार नाही म्हणून केमाल पाशाने सर्वप्रथम बुरखा पद्धत, बहुभार्या पद्धत, तलाख पद्धत यांचे कायद्याने उच्चाटन केले व नोंदणी विवाह सक्तीचा केला. १९३४ मध्ये मतदानाचा हक्क देऊन पुरुषाबरोबर समाजात स्थान दिले.

**क) राष्ट्रवादातून संस्कृतीची जोपासना -** केमाल पाशाने सुधारणा करताना राष्ट्रवादावर भर दिला. शुक्रवारची सुटी रद्द करून रविवार जाहीर केली. नागरिकांची आडनावे द्यावीत आग्रह केला. केमालने स्वत: अतातुर्क (राष्ट्रपिता) नामाभिधान धारण केले. इस्लामी वर्षगणना रद्द करून ख्रिश्चन कॅलेंडर लागू केले. मुस्लिमांचे धार्मिक उत्सव नवीन पंचागानुसार साजरे केले. इस्तंबुलहूल  राजधानी अंकारा येथे आणली. प्राचीन संस्कृतीच्या अभ्यासाला उत्तेजन देऊन राष्ट्राभिमानाला पूरक शोध लावले.

**५) आर्थिक सुधारणा :**

**अ) शेती सुधारणा -** पहिल्या महायुद्धानंतर आर्थिक संकट तुर्कस्थानवर कोसळले. चलनवाढ, बेकारी, उत्पादन घात इ. घटना घडल्या. लॉसेनच्या तहामुळे राष्ट्रीय अस्मिता जिवंत ठेवून शेती सुधारणावर प्रथम भर दिला. शेतकऱ्यांना कर्जे दिली. शेतीमालाचे भाव निश्चित केले. आदर्श शेती फार्म शासकीय मार्गदर्शनाखाली सुरु करून त्यातून बी-बियाणे खाते यांचे वाटप केले.

**ब) औद्योगिकीकरण -** १९३० च्या जागतिक आर्थिक मंदीच्या लोळ्यातून तुर्कस्थानला केमाल पाशाने वाचवले. देशभर स्टेट बँकांचे जाले विणले. उद्योगधंदे, खान उद्योग आणि सार्वजनिक सेवा पुरविणाऱ्या संस्थांचा विकास घडवला. सुटी कापड गिरण्यांची यंत्रसामुग्री रशियाकडून घेतले. त्यासाठी ८० लाख डॉलरचे कर्जेही घेतले. स्थानिक उद्योगधंद्याला संरक्षण दिले. नननेस व्यापार व्यवहाराचे विकास सुरु केला. तुटीचे अंदाजपत्रक करण्याची पद्धती रद्द करून नवीन करपद्धतीचा वापर केला.

**६) राजकीय सुधारणा :**

अज्ञान अंध:करत चाचपडत असलेया आणि पहिल्या महायुद्धाच्या राखेतून जिवंत तुर्कस्थान झाला तो केमाल पाशाच्या कर्तुत्वामुळे त्याच्यामुळे तुर्कचा पुनर्जन्म झाला.

**अ) प्रशासकीय सुधारणा -** राजकीयदृष्ट्या आधुनिक तुर्कस्थान गणला गेला. प्रशासकीय सुधारणा पाश्चिमात्त्यांच्या धर्तीवर केल्या. सुलतानाच्या काळातील भ्रष्ट, किडलेली शासकीय यंत्रणा आमुलाग्र बदल करून शासनास योग्य शिस्तीची आणले. अधिकारपदावर नियुक्त करून दफ्तर दिरंगाई टाळण्याचा प्रयत्न केला.

**ब) प्रजासत्ताकाची राजवट स्थिरस्थावर करण्याचा प्रयत्न -** नगरपालिकांच्या निवडणुकीत स्त्रियांना मतदानाचा अधिकार दिला. प्रजासत्ताकांची घोषणा करून प्रजेला राजकीय हक्क दिले आणि प्रजासत्ताकाची राजवट स्थिर केली. इ.स.१९३० मध्ये मुक्त

प्रजासत्ताक पक्ष स्थापन करून नगरपालिकेची निवडणूक लढवली. त्यात २५ टक्के जागा स्त्रियांना प्रथमच दिल्या; परंतु राज्याराज्यात संघर्ष झाल्याने मुक्त प्रजासत्ताक पक्ष विसर्जित केला.

**क) राज्यघटनेमध्ये दुरुस्ती -** ६ डिसेंबर १९३४ राज्यघटनेमध्ये दुरुस्ती केली. २३ वर्षांवरील सर्व स्त्री-पुरुषांना मतदानाचा हक्क दिला. ३१ वर्षांवरील स्त्री-पुरुषांना राष्ट्रीय सभेच्या निवडणुकीस उमेदवारीचा हक्क दिला. अध्यक्षपदाची निवडणूक अप्रत्यक्षपणे घेणे. प्रतिनिधींकडून अध्यक्षाची निवड होते. इ.स. १९३५ मध्ये राष्ट्रीय सत्तेवर प्रथमच निवडणूक आल्या.

केमालने आधुनिक तुर्कची उभारणी केली म्हणून राष्ट्रीय सभेने अतातुर्क असा गौरव केला. केमालने एखाद्या पित्याने आपल्या बालकाचे संगोपन करावे. त्याप्रमाणे देशाचा विकास साधला. युरोपचा रुग्ण म्हणून हेटाळणी केली जाणाऱ्या तुर्कला केमालने आपल्या रामबाण औषधाने टणटणीट केले. त्याने परकीय आक्रमणाचा नि:पात करून तुर्कस्थानला स्वाभिमानी बनवले. एक परंपरागत, अप्रगत, मागासलेला, मध्ययुगात वावरत असलेल्या राष्ट्राला नवीन संजीवनी देऊन त्याला आधुनिक बनवले. अशा तुर्कस्थानचा प्रेरक केमाल पाशा १० नोव्हेंबर १९३८ मध्ये मरण पावला.

**आपली प्रगती तपासा:**

प्र. १. केमाल पाशाचे अंतर्गत धोरण सांगा.

**१.२.४. केमाल पाशाचे परराष्ट्रीय धोरण :**

**१) तुर्कस्थान-इराक सीमा प्रश्न -** या सीमा प्रश्नाचा निकाल लावण्यासाठी १९ मे १९२४ मध्ये इस्तंबूलमध्ये परिषद घेतली. पण निर्णय झाला नाही. राष्ट्रसंघाने १६ डिसेंबर १९२५ रोजी मोझूल प्रांत इराणकडे द्यावा असे सांगितले, पण त्याला तुर्कस्थानने नकार दिला. इ.स. १९२६ मध्ये ब्रिटन, तुर्क, इराणची एकत्र बैठक अंकारा होऊन समझोता झाला. मोझूल प्रांत इराणला, परंतु तेलावर १० टक्के रॉयल्टी तुर्कस्थानला द्यावी.

**२) तुर्कस्थान-रशिया मैत्री करार (१० डिसेंबर १९२५) -** लॉसेन परिषदेपासून रशियाचे संबंध दुरावलेले होते. १० डिसेंबर १९२५ रोजी रशियाशी मैत्री करार व अनाक्रमनणाचा तह करून अंतर्गत सुधारणेसाठी शांतता निर्माण करा.

**३) तुर्कस्थान-ग्रीस संबंध -** दोन्ही राष्ट्रांचे संबंध युद्ध होईपर्यंत बिघडलेले होते. ग्रीसच्या पराभवानंतर संबंध सुधारण्यास प्रारंभ झाला. ॲनाटोलिया प्रांतातील प्रांतातील तुर्की लोकसंख्येची अदलाबदल करण्यास मान्यता दिल्याने या दोन्ही राष्ट्रांत मैत्रीचा तह झाला.

**४) बाल्कन राष्ट्र परिषदेचा सहवास -** इ.स. १९३१ च्या ऑक्टोबरमध्ये इस्तंबूलमध्ये परिषद भरली होती. यामध्ये अल्बानिया, बल्गेरिया, ग्रीस, युगोस्लाव्हिया, रुमानिया, तुर्कस्थान यांचे १५० प्रतिनिधी होते. जुलै १९३२ मध्ये राष्ट्रसंघाचे सभासदत्व तुर्कस्थानला. इंग्लंड-फ्रान्सचे संबंध सुधारले. केमालाच्या नेतृत्वाखाली बाल्कन करार ९ फेब्रुवारी १९३४, नोव्हेंबर १९३५ मध्ये रशियाशी मैत्री करार झाला.

**५) आशिया करार (९ जुलै १९३७) -** इराण, अफगाणिस्तानशी घनिष्ठ मैत्रीच्या उद्देशाने त्याच्याशी अनाक्रमणाचा आशिया करार केला. तुर्कस्थानच्या प्रतिनिधींनी सादाबाद येथे ९ जुलै १९३७ ला या करारावर सही केली.

**६) ब्रिटीशांशी मैत्री -** इंग्लंडबरोबर १९३६ मध्ये जास्त जवळीकीचे संबंध प्रस्थापित केले. भूमध्य समुद्रविभागात ब्रिटनचा इटलीशी संघर्ष घडल्यास तुर्कांची मदत मिळावी, ह्या हेतूने मॉट्रीयल्स येथे दोन्ही राष्ट्रांची बैठक होऊन सामुद्रधुन्यासंदर्भात लॉसेन करार झाला.

**७) फ्रान्सशी संबंध -** फ्रान्सशी जवळचे संबंध निर्माण करून ३ जुलै १९३८ रोजी फ्रान्सशी करार केला. करारानुसार तुर्की संस्कृतीशी निकटचे संबंध तयार झाले. सिरियातील अलेक्झांडेटा जिल्ह्यास स्वायत्तता देण्यात आली. त्याचे नाव ह्ताय असे ठेवले. फ्रान्सने ह्ताय जिल्हा तुर्कस्थानमध्ये सामील करण्याची समती दिली.

**आपली प्रगती तपासा :**

प्र.१. केमाल पाशाचे परराष्ट्रीय धोरणाचा आढावा घ्या.

## १.३. सारांश

पहिल्या महायुद्धानंतर युरोपच्या राजकारणात अनेक घटना घडल्या. त्यातूनच हुकुमशाहीचा उदय झाला. तुर्कस्थानमध्ये कल्याणकारी हुकुमशाही केमाल पाशाची उदयास आली. त्याच्या नेतृत्वाखाली तुर्कस्थानमध्ये सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक विकास झाला.

## १.४ प्रश्न :

प्र.१. केमाल पाशाच्या उदयाची कारणे सांगा ?

प्र.२.आधुनिक तुर्कस्थानच्या निर्मांता या नात्याने केमाल पाशाच्या कार्याचा आढावा घ्या.

munotes.in

## १.५ संदर्भ

१) डॉ. अनिल कठारे -विसाव्या शतकातील जगाचा इतिहास

२) डॉ. अनिल कठारे- आधुनिक जगाचा इतिहास

३) पी.जि.जोशी - आधुनिक जगाचा इतिहास

४) डॉ.सुमन वैद्य, डॉ. शांता कोठेकर- विसाव्या शतकातील जग (१९१४-१९४५) भाग-१

५) डॉ.सुमन वैद्य, डॉ. शांता कोठेकर- विसाव्या शतकातील जग (१९४६- २०००) भाग-२

६) डॉ. अनिरुद्ध , प्रा. गजानन भिडे-आधुनिक जगाचा इतिहास

७) जैन हुकूमचंद आणि कृष्णा माथुर- आधुनिक जगाचा इतिहास

८) कदम य.न. - विसाव्या शतकातील जगाचा इतिहास

९) कुलकर्णी अ.र. आणि देशपांडे-आधुनिक जगाचा इतिहास- भाग-1 & २

१०) साकुरे विजयानंद, अनिल कठारे-जागतिक इतिहासातील स्थित्यंतरे

११) उदगावकर म.न. आणि गणेश राउत- आधुनिक जग

❖❖❖❖

munotes.in

# २

# रेझाशहा पेहलवी आणि इराणमधील सुधारणा

**घटक रचना**

२.० उद्दिष्ट्ये

२.१. प्रस्तावना

२.२. रेझाशहा पेहलवीचे चरित्र

२.३. रेझाशहाच्या इराणमधील सुधारणा

२.४. सारांश

२.५. प्रश्न

२.६ संदर्भ

## २ .०. उद्दिष्ट्ये

या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थांस

- रेझाशहाचा जीवनवृत्तांत समजावून देणे.
- रेझाशहाने कोणकोणत्या सुधारणा केल्या याची माहिती मिळवणे.

## २.१. प्रस्तावना

इराणमधील एका सामान्य कुटुंबात जन्मलेल्या रेझाखानने परंपरावादी, मागासलेल्या इराणचे रुपांतर आधुनिक इराणमध्ये केले. अशिक्षित असूनही व जागतिक राजकारणाची फारशी माहिती नसतानाही इराणच्या राजकारणात स्वतःचा ठसा उमटवला. पर्शियन सैन्यात शिपाई म्हणून काम करताना त्याचे लष्करी कर्तुत्व पाहून ब्रिटिशांनी त्याची कोसॅक डिव्हीजन च्या प्रमुखपदी नियुक्ती केली. वेगवेगळ्या युद्धात महत्वाची भूमिका बजावली. पर्शियाच्या शहाचा विश्वास संपादन केला. १९२१ मध्ये झियाउद्दीन सरहकार बरखास्त करून नवीन मंत्रिमंडळ सत्तेवर आणले. त्याच्या कामगिरीमुळे १९२५ मध्ये पर्शियाचे राजपद, शहापद बहाल करण्यात आले. 'शहा' ही त्याला दिलेली पदवी होती. कट्टर इस्लामी राष्ट्रात धार्मिक सहिष्णुता निर्माण करण्याचे महत्वाचे काम त्याने केले. १९२६ ते १९४४ या काळात त्याने विविध क्षेत्रातबदल घडवून आणले. इतर राष्ट्रांबरोबर मैत्रीचे परराष्ट्रीय सबंध प्रस्थापित केले आणि इराणचे आधुनिकीकरण केले. इराणच्या बदलामध्ये रेझाखानने जि भूमिका बजावली तिचा थोडक्यात आढावा घ्या.

munotes.in

## २.२. रेझाशहा पेहलवीचे चरित्र

रेझाखानचा जन्म १६ मार्च १८७८ रोजी झाला. एक अध शिपाई म्हणून २० वर्षे त्याने पर्शियन सैन्यात काढली. २१ फेब्रुवारी १९२१ रोजी त्याने झियाउद्दीन या सुधारकच्या मदतीने पर्शियातील दुबळे सरकार उलथून टाकले. झियाउद्दीनच्या नवीन सरकार मध्ये तो युद्ध मंत्री होता. पण त्या दोघांत मतभेद झाल्याने २५ मी १९२१ मध्ये रेझाखानचा अंकुश असणारे मंत्रिमंडळ सत्तेवर आले. त्याने पर्शियाच्या शहाला (अहमदखनला) परदेशात पाठवले. व सर्वसत्ता आपल्या हाती घेतली. १५ डिसेंबर १९२५ रोजी नव्या घटनासमितीने रेझाखानला शहा रेझाखान पेहलव अशी उपाधी दिली. व२५ एप्रिल १९२६ रोजी त्याचा राज्याभिषेक सोहळा पार पाडला. त्यानंतर त्याने इराणच्या सर्वच क्षेत्रात बदल घडवून आणले.

## २.३ रेझाशहाच्या इराणमधील सुधारणा

**१) प्रशासकीय सुधारणा :**

देशाची अर्थव्यवस्था सुधारण्याची १९२२ मध्ये अर्थखात्याच्या प्रमुख पदी डॉ. ऑर्थर या अमेरिकन अर्थतज्ञाची नेमणूक केली. सिनेट असेम्ब्ली हे द्विवगृही कायदेशीर मंडळ व इराणच्या राजाकडे सर्व सत्ता १९०६ घटनेनी दिली होती. पण १९२६ नंतर सभागृहातील सर्व सभासद रेझाशहाचे समर्थक असल्याने त्याने सिनेटची बैठक कधी बोलावालीच नाही. पंतप्रधानांची नियुक्ती तो स्वत: करत. पंतप्रधान व त्याचे मंत्रीमंडळ रेझाशहाला व्यक्तिगतरित्या जबाबदार असत. तरीही या सर्वांच्या मनात व प्रशासकीय अधिकाऱ्यांमध्ये रेझाखानने स्वत:बद्दल आत्मीयता निर्माण केल्याने त्याला त्यांचा कधीही विरोध झाला नाही.

**२) आर्थिक सुधारणा :**

आर्थिक सुधारणा करण्यासाठी परकीय तज्ञांची मदत त्याने घेतली. कस्टम खात्यात बेल्जींअम तज्ञ, अर्थखात्यात अमेरिकन तज्ञ, शिक्षण खात्यात फ्रेंच तज्ञ नियुक्त केले. देशाला कायम स्वरुपात महसूली उतपन्न मिळत राहण्याची तरतूद केली. जमातीचे अधिक आपल्या ताब्यात घेतले. इस्पिरीयल बँक ऑफ इराण कडून चलन व्यवहाराचे हक्क काढून घेतले. रियल हे नवे चलन व्यवहारात आणले. इराणमधील ॲग्लो-पर्शियल ऑईल कंपनीशी रॉयल्टीज जुना करार रद्द करून जास्त रकमेची रॉयल्टी देणारा नवा करार केला. उद्योगधंदे, कारखाने इ. राष्ट्रीयीकरण केले. परकीय व्यापारातून मिळणारा नफा नवे उद्योगधंदे सुरु करण्यासाठी वापरला. साखर्निर्मिती, तंबाखू, कापड, सिगरेट इ. वस्तुन्च्यक़ उत्पादनास चालना मिळाली. औद्योगिकीकरणाचा वेग वाढल्याने इराण आधुनिक बनला.

**३) दळणवळणाच्या साधनांचा विकास :**

अर्थव्यवस्थेस गती देण्यासाठी वाहतूक दळणवळणाकडे रेझाशहाने लक्ष पुरवले. पर्शियासारख्या डोंगराळ भागात हजारो मैलाचे नवे रस्ते बांधण्यात आले. ट्रान्स इराणीयन रेल्वेमार्ग हा रेल्वेमार्ग ८३५ मैल लांबीचा असून तो समुद्रसपाटीपासून सुरु होऊन ९ हजार फूट उंचीवर जाऊन परत समुद्रसपाटीवर येतो. या मार्गावर २२४ बोगदे बांधावे लागले. यामुळे उत्तर व दक्षिण प्रांतातील दळणवळण वाढलेच तर उत्तर इराणमधील भटक्या टोळ्यांवर नियंत्रण ठेवणे ही शक्य झाले. त्याने हवाई वाहतूकही उभारली.

**४) शेतीविषयक सुधारणा :**

इराण हा शेतीप्रधान देश असल्याने रेझाशहाने शेतीसुधारणे लक्ष दिले. कृषीविद्यालये व आदर्श कृषी फार्म उघडून कृषी उत्पादनासाठी नवनवे प्रयोग केले. शेतकऱ्यांना सुधारित बी-बियाणे व आधुनिक कृषीयंत्रे पुरवण्यात येऊन त्याबद्दलचे मार्गदर्शन व आवश्यक तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्यात आले. कृषीक्षेत्राला कर्जपुरवठा करण्यासाठी बांका उघडण्यात आल्या. शेतकऱ्यांना सवलतीच्या दराने कर्जे दिली. भटक्या जमातींना स्थिर करून कृषी व्यवसाय करण्यास मदत केल्याने भटक्या जमातींना देशाला असलेला धोका टळतो.

**५) लष्करी सुधारणा :**

देशातील अंतर्गत शांतता व सुव्यवस्था टिकवण्यासाठी परकीयांचे यांचे वर्चस्व नष्ट करणे, देशाची प्रतिष्ठा पुन्हा मिळवणे यासाठी लष्कराची आवश्यकता असल्याचे त्याने ४० हजार प्रशिक्षित व राष्ट्रनिष्ठ लष्कराची उभारणी केली. त्यासाठी कारखानदार व उद्योजकांकडून पैसा उभारला. आधुनिक शस्त्रांस्त्रांसाठी व सैनिकांना प्रशिक्षण देण्यासाठी टेल कंपन्यांकडून मिळणाऱ्या रॉयल्टीचा वापर केला. पोलिसदल कार्यक्षम करून समाजात शांतता व सुव्यवस्था निर्माण केली.

**६) धार्मिक सुधारणा :**

समाजकारण व राजकारणावर असलेला धर्माचा प्रभाव कमी करण्यासाठी रेझाशहाने मजलीस मध्ये पाश्चात्यधर्तीवर कायदे केले. कुराणावर आधारित न्यायदान बंद करून फ्रेंच न्यायपद्धतीचा स्वीकार मुल्ला मौलवींकडून न्यायविषयक, शिक्षण, विवाहविषयक हक्क काढून घेतले . सार्वजनिक शिक्षणसंस्थातूनधार्मिक शिक्षण देण्यास बंदी घातली. धार्मिक संस्थांच्या मालमत्ता जप्त करून धर्मगुरूंना सरकारतर्फे वेतन देण्यात येते. मोहरमच्च खुर्च्या ठेवण्याची व्यवस्था केली. या सुधारणांमुळे धार्मिक कट्टरता कमी झाली.

munotes.in

**७) सामाजिक सुधारणा** :

रेझाशहाने १९३५ मध्ये पर्शियाचे नाव बदलून 'इराण' ठेवले. सामाजिक प्रगतीसाठी त्याने स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. बालविवाह बुराखापाद्धात रद्द केली. मुलामुलींच्या विवाहाची वयोमर्यादा निश्चित केली. स्त्रियांना पाश्चात्य पोषाख वापरण्यास उत्तेजन दिले. मुलींसाठी शाळा उघडल्या. धर्माचे महत्व कमी केले. २९२५-४० या काळात अनेक शहरातील रस्ते रुंद तर काही नव्याने बांधले. व्यापारी शासकीय इमारती बांधल्या, सार्वजनिक रुग्णालये स्थापन केली. नॅशनल बँक ऑफ इराणकडे देशाची चलनव्यवस्था सोपवली.

**८) शैक्षणिक सुधारणा :**

इराणला आधुनिक बनवण्यासाठी रेझाशाहने सार्वजनिक शिक्षण संस्थांत दिले जाणारे धार्मिक शिक्षण बंद केले. प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले. पाश्चात्यधर्तीवर शाळा कॉलेजची स्थापना केली. पर्शियन अकादमीची स्थापना करून अरबी शब्दाऐवजी फारसी शब्द वापरण्याचा नियम केला. १९३५ मध्ये तेहरान विद्यापीठाची स्थापना केली. त्यातून शेतकी, वाणिज्य विज्ञान परकीय भाषा या वेगवेगळ्या विद्याशाखांचा अभ्यास सुरु केला. परकीय अध्यापकांची नेमणूक केली. शिक्षण संस्थांमध्ये जर्मन प्राध्यापक नेमले. मुलींसाठी शाळा उघडल्या. यामुळे साक्षरतेचे जे प्रमाण १९२१ मध्ये १ टक्का होते, ते १९४१ पर्यंत ४० टक्के वाढले.

**९) इराणमधील तेलउद्योगाचा विकास :**

इराणमध्ये तेलाचा सर्वात मोठा व महत्वाचा उद्योग होता. हा उद्योग ॲंग्लो-पर्शियन ऑईल कंपनीच्या ताब्यात होता. या कंपनीला टेल काढण्याची व शुद्ध करण्याची सवलत दिली होती. या बदल्यात इराण सरकारला कंपनीकडून फायद्याचा १६ टक्के भाग मिळणार होता. १९१४ मध्ये कंपनीची ५५ टक्के भाग भांडवल ब्रिटिशांनी खरेदी केले. त्यामुळे त्यांना पहिल्या महायुद्धात तेलाची कमतरता भासली नाही. नंतर तेलाच्या नफ्यावरून इराण सरकर व कंपनीत मतभेद झाल्याने तडजोड म्हणून कंपनीने १० लाख डॉलर्स दिले. १९३२ मध्ये कंपनीच्या सवलतींमध्ये कपात करूनही तेलावर इराणसरकारचे नियंत्रण प्रस्थापित झाले नाही.

**आपली प्रगती तपासा:**

१) रेझाशहाने इराणमध्ये कोणत्या सुधारणा केल्या होत्या?

## २.४. सारांश

अनेकदा इतिहासकार रेझाशहा व केमालपाशा यांच्या चरित्र व कामगिरीत साम्य असल्याचे म्हणतात. पण त्या दोघांच्या ध्येयधोरणात मोठा फरक होता. रेझाशहाने कोणताही राजकीय पक्ष स्थापन न करता सल्लागारांच्या मदतीने कारभार गेला. परंपरावादी इराणमध्ये लष्करी अधिकारशाही निर्माण करून अनेक सुधारणा करून

इराणला आधुनिक बनवले. पण आपल्या कारकीर्दीच्या उत्तरार्धात तो जुलमी बनला. लोभाने अमाप संपत्ती जमवली. इराणमधील बड्या जमीनदारांमध्ये त्याचा पहिला क्रमांक होता. त्यामुळे जनतेचा त्याला विरोध झाला. दुसऱ्या महायुद्धात जरी इराणने तटस्थता जाहीर केली असली तरी इराण जर्मनीच्या बाजूने कधीही वळू शकतो, या भीतीने रशिया - ब्रिटनने संयुक्तपणे इराणवर आक्रमण केले व रेझाशहाला १६ सप्टेंबर १९४१ रोजी पदत्याग करण्यास भाग पाडले. त्याला जोहान्सबर्गला नेण्यात आले व तेथेच या महत्वाकांक्षी, आधुनिकवादी, ध्येयवादी नेत्याचा २६ जुलै १९४४ रोजी मृत्यू झाला. रेझाशहा नंतर त्याचा मुलगा महमद रेझा सत्तेवर आला.

## २.५. प्रश्न

१) इराणच्या आधुनिकीकरणातील रेझाशहा पेहलवीच्या कार्याचे मूल्यमापन करा.

## २.६ संदर्भ


१) डॉ. अनिल कठारे -विसाव्या शतकातील जगाचा इतिहास

२) डॉ. अनिल कठारे- आधुनिक जगाचा इतिहास

३) पी.जि.जोशी - आधुनिक जगाचा इतिहास

४) डॉ.सुमन वैद्य, डॉ. शांता कोठेकर- विसाव्या शतकातील जग (१९१४-१९४५) भाग-१

५) डॉ.सुमन वैद्य, डॉ. शांता कोठेकर- विसाव्या शतकातील जग (१९४६- २०००) भाग-२

६) डॉ. अनिरुद्ध , प्रा. गजानन भिडे-आधुनिक जगाचा इतिहास

७) जैन हुकूमचंद आणि कृष्णा माथुर- आधुनिक जगाचा इतिहास

८) कदम य.न. - विसाव्या शतकातील जगाचा इतिहास

९) कुलकर्णी अ.र. आणि देशपांडे-आधुनिक जगाचा इतिहास- भाग-1 & २

१०) साकुरे विजयानंद, अनिल कठारे-जागतिक इतिहासातील स्थित्यंतरे

११) उदगावकर म.न. आणि गणेश राउत- आधुनिक जग


❖❖❖❖

munotes.in

# ३

## इस्त्रायलचा उदय

**घटक रचना**

३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रस्तावना

३.२ इस्त्रायलचा उदय

३.३ इस्त्रायलच्या निर्मितीतील टप्पे

३.४ सामाजिक स्थिती

३.५ सारांश

३.६ प्रश्न

३.७ संदर्भ

### ३.०. उद्दिष्ट्ये

या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थ्यास

- झिऑनिस्ट चळवळी विषयीची माहिती समजण्यास मदत होईल.
- इस्त्रायलच्या निर्मितीतील टप्पे समजून घेता येतील.

### ३.१. प्रस्तावना

१४ मे १९४८ रोजी स्वतंत्र इस्त्रायलची झालेली निर्मिती हे पश्चिम आशियातील एक महत्वाचे वैशिष्ट्य मानले जाते. इ.स.७० मध्ये भटक्या टोळ्यांच्या हल्ल्याने ज्यू लोक युरोपात वेगवेगळ्या देशात विखुरले गेले. पॅलेस्टाईनमधून जवळ जवळ २००० वर्षापूर्वी हाकलण्यात आलेल्या व तेव्हापासून वेगवेगळ्या रस्त्रात विखुरलेल्या 'ज्यू' नी विसाव्या शतकाच्या पूर्वार्धाच्या अखेरीस पॅलेस्टाईनमध्ये ज्यूंचा स्वतंत्र रस्त्रांची केलेली निर्मिती म्हणजे इतिहासातील एक आश्चर्यच मानले पाहिजे. पॅलेस्टाईनमध्ये ज्यूंना स्थायिक करून तेथे त्यांचे स्वतंत्र रास्त्र निर्माण करण्याच्या उद्दिष्टाने जागतिक झिऑनिस्ट संघटनेने केलेय प्रयत्नांना आलेले ते फळ आहे. याची पायाभरणी ही 'झिऑनिस्ट चळवळ' व 'थिओडर हर्झल' च्या ज्यूंचे राज्य या पुस्तकात झाली. त्याचे विविध टप्पे यांचा आढावा घेणे महत्वाचे आहे. हेच आपण थोडक्यात पाहूया.



munotes.in

## ३.२. इस्त्रायलचा उदय

### १) झिऑनिस्ट चळवळ व पार्श्वभूमी

स्वतंत्र इस्त्रायलच्या निर्मितीत झिऑनिस्ट चळवळीचा मोठा वाटा आहे. झिऑन ही पॅलेस्टाईनमधील एक टेकडी असून तेथे ज्यूंचा देवतेचे वास्तव्य असे. ही पवित्र भूमी परत मिळवण्यासाठी इ.स. १०९६-१२७० या काळात धर्मयुद्धे झाली. पुढे हा संघर्ष अनेक काळ चालू राहिला. आपली भूमी परत मिळवण्यासाठी ज्यु लोकांनी जो लढा दिला. जि चळवळ केली त्याला झिऑनिस्ट चळवळ असे म्हणतात. (ज्यूंचे स्वतंत्र रास्त्र निर्माण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर ज्यूंनी जि चळवळ केली त्याला झिऑनिझम असे म्हणतात. पण ही चळवळ काही एका एकी घडून आली नव्हती. त्यांची पार्श्वभूमी अगोदरच तयार झाली होती. त्यामुळे ही पार्श्वभूमी जाणून घेणे महत्वाचे ठरते.

झिऑनिस्ट चळवळ व इस्त्रायलची निर्मितीची पार्श्वभूमी आपल्याला प्राचीन मध्ययुगीन अ आधुनिक असे तीन टप्प्यात पाहता येते. इ.स. ३३४ मध्ये इराण जिंकून ग्रीस संस्कृतीत प्रसार करताना ज्यूंवर प्रचंड अत्याचार केले. पुढे अनेक वेळा अनेक सत्तांनी ज्यूंवर अत्याचार केले. ४थ्या शतकात सॉल नावाच्या ज्यू व्यक्तीने स्वत:ला ग्रीक म्हणवून ज्यूंना येशूचे खूनी ठरवले. त्यामुळे पुढे १६०० वर्षे ज्यूंचा धार्मिक छळ झाला. रशियात १/३ ज्यूंना ठार केले. १/३ हाकलून, १/३ आपल्या समाजात मिसळून घेतले. इंग्लंडचा राजा तिसरा हेन्री, स्पेनमधील कॅथलिक राजा, राणी इमाबेला यांनी ज्यूंवर प्रचंड अत्याचार केले. रशिया, ऑस्ट्रिया, हंगेरीतही त्यांच्या कतली झाल्या.

इ.स. १७९९ मध्ये ज्यूंना पॅलेस्टाईनमध्ये वसाहत करुन द्यावी असा विचार मांडणाऱ्या नेपोलियन नंतर लाबेल मेंकन या फ्रेंचन जर्मन ज्यु मोझेझ हेस याने याचाच पाठपुरावा केला. त्यामुळे १८८२ मध्ये बिलू नावाच्या संघटनेने वसाहतींना सुरुवात केली. 'ज्यु राज' हे पुस्तक लिहिणाऱ्या थिओडर हर्झलच्या नेतृत्वाखाली १८९७ मध्ये झिऑनिस्ट कॉंग्रेसची स्थापना झाली. पुढे याचे नेतृत्व डॉ. वाईझम केले.

## ३.३. इस्त्रायलच्या निर्मितीतील टप्पे

झिऑनिस्ट कॉंग्रेसच्या स्थापनेनंतर खऱ्या अर्थाने इस्त्रायलच्या निर्मितीस सुरुवात झाली. ज्याला मूर्त स्वरूप मात्र १९४८ ला मिळाले. इस्त्रायलच्या निर्मितीतील टप्पे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

### १) पहिल्या महायुद्धाचा कालखंड व बाल्फोर घोषणा :

इ.स. १९१४ मध्ये सुरु झालेल्या पहिल्या महायुद्धाला ज्यूंनी इंग्रजांना आर्थिक मदत केली. यामागे ज्यूंना स्वातंत्र्य मिळेल ही अपेक्षा ज्यूंची होती. या युद्धात ज्यूंचा पाठींबा मिळवण्यासाठी इंग्लंडचे परराष्ट्रमंत्री लॉर्ड बाल्फोर यांनी २ नोव्हेंबर १९१७ रोजी ज्यु जमातीचे नेते लॉर्ड रॉशचाईल्ड यांना एक आश्वासन दिले यालाच बाल्फोर घोषणा म्हणतात. त्यानुसार पॅलेस्टाईनमध्ये राष्ट्रीय निवास स्थापन करण्यास इंग्लंड शासन

अनुकूल आहे. असे जरी जाहीर केले असले तरी दुसऱ्या बाजूला इंग्रजांनी अरबांचा पाठींबा मिळविण्यासाठी अरबांच्या स्वातंत्र्याचेही वाचन दिले. व ज्यूंचा विश्वासघात केला. यामुळे युद्धोत्तर काळात मध्यपूर्वेतील स्थिती स्फोटक बनली.

**२) ब्रिटीश मॅडेट व श्वेतपत्रिका –**

अरब नेता फैझलला पॅलेस्टाईन व सिरिया हे दोन्ही स्वतंत्र हवे होते. युद्धानंतर इंग्रज व फ्रेंचांनी पॅलेस्टाईनवरील वर्चस्व काढून न घेतल्याने अरबांनी चिडून दंगल केली. याचे खापर मात्र ज्यूंवर फोडले. त्यामुळे डॉ. वाईझमनने प्रयत्न करून १० हजार चौ.मैलाच प्रदेश इंग्रजांच्या देखरेखीखाली आणला. प्रदेशावर विश्वस्त प्रदेश म्हणण्यास येऊ लागले व या योजनेला ब्रिटीश मॅडेट म्हणतात. मॅडेट म्हणजे त्या प्रदेशावर प्रत्याक्श्रीत्या नाही तर अप्रत्यक्षरीत्या आपले वर्चस्व असणे. “पण इंग्रजांनी जॉर्डनच्या बाजूचा १९ हजार चौ.की. प्रदेश मॅडेटमधून वगळला. पण डॉ. वाईझमनने विविध देशातील ज्युंकडून देणगी जमा केल्याने १९२० नंतर पॅलेस्टाईनमध्ये जमीन खरेदीचे प्रमाण वाढले. शेती औद्योगिक शैक्षणिक प्रगती केली. मात्र अरबांचा ज्युद्वेष वाढला.

ज्यू व अरबांमधील वाढत्या हिंसाचारामुळे जुलै १९२२ मध्ये इंग्लंडचे पंतप्रधान विस्टन चर्चील यांनी श्वेतपत्रिका प्रसिद्ध केली. त्यानुसार ज्यूंना संपूर्ण पॅलेस्टाईन न देता ज्यूंच्या स्वतंत्र राज्यातील जनता पॅलेस्टाईन म्हणून ओळखली जाईल. पॅलेस्टाईन मधील अधिक संख्येवर अधिक टन पडू नये यासाठी स्थलांतरावर मर्यादा घालण्यात आली.

**३) दुसरे महायुद्धपूर्व कालखंड व ज्युंवरील अत्याचार –**

पहिल्या महायुद्धानंतर जर्मनीतील हिटलरच्या उदयामुळे ज्यूंवर अनेक अत्याचार झाले. त्यांच्यासाठी खास छळछावण्या उभारल्या त्यामुळे पॅलेस्टाईनमधील ज्यूंची संख्या वाढत गेली. अडीच लाख ज्यु जर्मनीतील स्थलांतर केले. या मुले ज्यु-अरब तेढ वाढली. अरबांनी इस्टीकलाल नावाची संघटना स्थापन केली. गँडमुफ्ती हा तिचा नेता होता. या संघटनेला हिटलरने पाठींबा दिला. इंग्लंडमधून ऑर्थर पिलचे शिष्टमंडळाने जि योजना सुचवली टी अरबांनी फेटाळली. तर दुसरीकडे ज्यूंनी हॅगनाह ही संघटना उभारून सेनापती विंगे गनिमी काव्याने अरबांना त्रास दिला. ज्यूंना पॅलेस्टाईनमध्ये आणले.

**४) दुसऱ्या महायुद्धानंतर कालखंडातील झिओनिस्ट चळवळ (१९३९-४५) –**

इ.स. १९३९ मध्ये सुरु झालेल्या दुसऱ्या महायुद्धात ज्यूंनी इंग्रजांना पाठींबा दिला. १९४१ नंतर अमेरिका व रशियाच्या युद्धप्रवेशामुळे जर्मनीचा पराभव होऊ लागला. युद्ध काळात डॉ.वाईझमनल अमेरिकेचा पाठींबा मिळाला. इंग्रजांनी मात्र अरबांना पाठींबा दिला. युद्धानंतर इंग्रज व अरबांशी लढावे लागेल या कल्पनेने ज्यु तरुणांनी अनेक गुप्त संघटना निर्माण केल्या. शस्त्रसाठा वाढवला. १९४५ मध्ये अरबलीगची स्थापना झाली. त्यात सात अरबराष्ट्रांनी भाग घेतला.

### ५) इस्त्रायलच्या निर्मितीतील शेवटचा टप्पा व स्वतंत्र इस्त्रायलची निर्मिती –

दुसऱ्या महायुद्धानंतर इंग्लंडमध्ये हुजूर पक्षाच्या जागी मजूर पक्ष आल्याने ॲटली पंतप्रधान बनले. त्यांनीही स्वतंत्र ज्यु राज्याला विरोध केला. त्यामुळे परिस्थिती स्फोटक बनली. त्यामुळे ज्यूंच्या लढाऊ धोरणात वाढ झाली. अमेरिकेतून (लक्ष डॉलर्सचे युद्धसाहित्य खर्डी केले. ज्यूंना प्रवेशाला परवानागी द्यावी अशी अमेरिकन अध्यक्ष ट्युमन सूचना इंग्लंडमध्ये फेटाळली. हा प्रश्न युनोकडे गेल. युनोने ३ सप्टेंबर १९४७ रोजी फाळणी निर्णय दिला. मात्र अरबांना न आवडल्याने शस्त्रास्त्रात वाढ केली. यामुळे ज्यूंनी ही शस्त्रसाठा वाढवला. मार्च १९४८ मध्ये ज्यूंनी चढाईचे धोरण स्वीकारले. १४ मे १९४८ रोजी दुपारी ४ वाजता तेल अधीवच्या नगरपालिकेत ज्यूंच्या स्वातंत्र्याची घोषणा करण्यात आली. लगेचच अमेरिकेने मान्यता दिली. दुसऱ्या दिवशी रशिया व पोलंडचने मान्यता दिली.

अशाप्रकारे प्रचंड संघर्षातून ज्यूंनी आपल्या स्वतंत्र राष्ट्राची उभारणी केली. जवळ जवळ या स्वातंत्र्याला २००० वर्षाच्या संघर्षाची परंपरा लाभली. व त्याची (संघर्षाची) परिणीती इस्त्रायलच्या निर्मितीत झाली. परंतु आजही अरब व इस्त्रायल संघर्ष संपलेला नाही. अरब व ज्यु संघर्ष हे मध्यपूर्वेच्या राजकारणाचे एक प्रमुख वैशिष्ट्य आहे. डॉ. सुमन वैद्य म्हणतात, “पॅलेस्टाईनमध्ये निर्माण करण्यात आलेले ज्यूंचे स्वतंत्र रास्त्र म्हणजे पाश्चात्यांच्या साम्राज्यवादी डावपेचांना आलेले फळ होते.” अमेरिकेच्या मदतीने स्वतंत्र इस्त्रायलची निर्मिती झाली तेव्हापासून ते आजतागायत अमेरिकेने इस्त्रायलला मदत केली आहे. म्हणून मध्य आशियात बाजूने अरब राष्ट्रे व मध्येच हे एकमेव ज्यु लोकंचे रास्त्र असताना स्वत:चे अस्तित्व इस्त्रायलने टिकवून ठेवले आहे. खरोखरच इस्त्रायलचा हा स्वातंत्र्यदीप नेहमीच प्रज्वलित राहणारा व प्रेरणादायी आहे.

## ३.४. सामाजिक स्थिती

### १) लोकजीवन :

इ.स. १९६७ नंतर इस्त्रायलची लोकसंख्या ९ लाख हजार इतकी होती. या लोकसंख्येत ज्यु, मुस्लीम, ख्रिश्चन ड्रुझ या जमातीचे लोक राहताना दिसतात. इस्त्रायलमध्ये एकूण लहानमोठी २७ शहरे आहेत. यापैकी सहा सर्व मिश्रित व दोन अरब बहुसंख्यांक असणारी असणारी शहरे आहेत. एकूण खेड्यांपैकी ७०९ खेडी ज्यूंची व ९९ खेडी अरबांची होती. जेरुसमेल, तेलाअवीव व हैफा ही तीन प्रमुख शहरे आहेत. इस्त्रायलमधील खेड्यांचे प्रकार वैशिष्ट्यपूर्ण आहेत. सामुदायिक वसाहती असणारी किबटूझ खेडी आहेत. या वसाहतीत सामील होण्यासाठी पहिले वर्ष अस्थायी सभासद म्हणून रहावे लागते. त्याची एक वर्षाची कारकीर्द पाहून त्याला कायमचा सभासद करू घेतले जाते. दररोज ८ ते ९ तास काम करावे लागते. पाच व्यक्तीचे एक नियामक मंडळ अंतर्गत व्यवस्था पाहते. या गटात व्यक्तिगत मालमत्ता करण्याचा हक्क नसतो. सर्व कामे सामुहिक पद्धतीने केली जातात.

१९२१ मध्ये मोशाब नावाची वसाहत म्हणजे मोशाव शितुफी होय. या वसाहतीततील तरुणांनी अमेरिकेतून शेतीचे शिक्षण घेवून खेड्यांची उभारणी केली. जमिनीची वाटणी करताना कुटुंबाच्या पात्रतेचा विचार करण्यात आला. प्रत्येकाने स्वतंत्रपणे शेती करावी, खरेदीविक्री व अवजारे ही सामुहिक मालकीची होती. सर्वांना समान संधी होती. या वसाहतीची संख्या पुढे ३४४ पर्यंत वाढली.

किंबूटझ व मोशाव यांचे मिश्रण असलेली वसाहत म्हणजे मोशाव शितुफी होय. या वसाहतीतील शेती व उद्योगधंदे सामुदायिक मालकीची असतात. परंतु प्रत्येक कुटुंबाला स्वत:चे घर असते. कुटुंबाने आपल्या जबाबदाऱ्या स्वत:च पार पडायच्या असतात. या वसाहती इस्त्रायलमध्ये कमी आहेत.

**१) शिक्षण :**

१९४८ नंतर राष्ट्रीय शिक्षणाला सुरुवात करण्यात आली. सर्वांना समान शिक्षणपद्धतीचे धोरण राबविण्यात आले. 6 वर्षाचे प्राथमिक व 6 वर्षाचे माध्यमिक शिक्षण राबवले गेले. ५ ते १४ वर्षावरील शिक्षण मोफत केले. शैक्षणिक खर्चाचा बोजा शासन व स्थानिक स्वराज्य संस्था उचलतात. शिक्षणाचे मध्यम हिंदू व अरेबिक ठेवण्यात आले. इंग्रजी ही परराष्ट्र व्यवहाराची मुख्य भाषा व फ्रेंच ही दुय्यम भाषा म्हणून शिकवली जाते. शिक्षणास दूरदर्शन संचाचा वापर सुरु केला गेला. शाळांमध्ये ९५ टक्के विद्यार्थ्यांची उपस्थिती आढळून येते. इस्त्रायल सरकारने उच्च शिक्षणावर भर दिलेला आढळतो. उच्च शिक्षणाचा निम्मा खर्च शासन करते. शिक्षकांसाठी प्रशिक्षण महाविद्यालये काढली गेली. शिक्षणाची योजना युरोपियन किंवा अमेरिकन धर्तीवर केलेली आहे. शेती व शरीरश्रम यावर खास भर दिला आहे. सैनिकी शिक्षणही दिले जाते. जगाला अनेक नामवंत विद्वान ज्यु समाजाने दिले. इस्त्रायलमध्ये वाईझमन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, रिहोवात, बारइलान युनिव्हर्सिटी या संस्था शैक्षणिक दर्जा वाढविण्याचे कार्य करतात.

शिक्षण व्यवस्थेत संशोधनाला फार महत्व दिले जाते. डॉ.अल्बर्ट आईनस्टाईन हे ज्यु समाजाचे जगतविख्यात संशोधक आदर्श मानले गेले. इस्त्रायलमधील अनेक संशोधकांनी आतापर्यंत नोबेल पुरस्कार मिळवले आहेत. दरसाल १३५ दशलक्ष केवळ संशोधनासाठी खर्च केले जातात. 'इस्त्रायल अकेडमी ऑफ कर्करोग' ही एक संशोधन संस्था आहे. अणूशक्तीच्या संशोधनासाठी ॲटॉमिक एनर्जी कमिशन आहे. कर्करोग, मानव उत्पन्नीशास्त्र यात महत्वाचे संशोधन केले गेले. वाईझमन सायन्स इन्स्टिट्यूट मध्ये १९७१ मध्ये ११०० तज्ञ काम करीत होते.

**३) धार्मिक जीवन :**

इस्त्रायलच्या स्वातंत्र्यघोषणेत कोणत्याही प्रकारचा वंशभेद व लिंगभेद न करता प्रत्येक नागरिकाला राजकीय, सामाजिक व धार्मिक स्वातंत्र्याचे हक्क देण्याचे आश्वासन दिले गेले. त्यामुळे इस्त्रायलमध्ये कायद्याने पूर्णत: धार्मिक स्वातंत्र्य देण्यात आले आहे. सरकारचे धर्ममंत्रालय सर्व धर्मप्रमुखांशी संबंध ठेवून त्यांच्या अडचणी दूर करण्याचे कार्य करते. धर्म स्थळांची देखभाल, नूतनीकरण, सुरक्षितता यासाठी पुराणवस्तू संग्रहालय

खाते सर्व प्रकारची मदत करीत असते. धर्माप्रमाणे इस्त्रायलमध्ये सणवाराला सुट्टी दिली जाते.

इस्त्रायलची बहुसंख्य जनता ज्यु धर्मीय असून शिक्षणात बायबल व तालमूद या ग्रंथांचा अभ्यास केला जातो.साबांयसारखे सर्व धार्मिक सं उत्साहाने साजरे केले जातात. दू:खीत  भिंत (डेव्हिडच्या देवळाची पश्चिम भिंत), राचेलचे समाधीस्थान, हे ब्रॉनमधील पूर्वजांची थडगी व इतर पवित्र ठिकाणी प्रार्थना करण्यात येतात. झिऑन पर्वतावरील डेव्हिडचे थडगे, इलीजाची गुहा, मेमोनाईडची थडगी, शिमॉन बार योहाय यांची थडगी पवित्रस्थाने आहेत. ज्यु धर्मात काराईट्स व समारिटन्स हे पंथ आढळतात. ज्यु लोक बायबलमधील जुना करार महत्वाचा मानतात.

इस्त्रायलमध्ये सुमारे ७५ हजारच्या आसपास ख्रिश्चन राहतात. जेरुसलेम हे त्याचे पवित्र स्थान आहे. इस्त्रायलमध्ये ४०० च्या वर चर्च व मठ आहेत. इस्त्रायलमध्ये अरब मुस्लिमही पूर्वीपासून मोठ्या प्रमाणात राहतात. राजकीय क्षेत्रात ते सहभागी होतात. हिब्रू बरोबर अरेबिक लिपीचाही सर्वत्र वापर होतो. डोम ऑफ द रॉक व जेरुसलेममधील अल अवसा मशीद त्यांचे प्रमुख प्रार्थनास्थळे आहेत.

इ.स. च्या ११ च्या शतकात ड्रुरुझ लोकं मुस्लीम धर्मातून फुटून बाहेर पाडले होते त्यांना स्वतंत्र धर्मीय म्हणून मान्यता नव्हती. इस्त्रायलने त्यांना स्वतंत्र धर्माचे स्थान कायद्याने देऊन टाकले. त्यांच्या धर्मात सर्व धर्मीयांची तत्त्वे सामावलेली आहेत.

**४) सांस्कृतिक बदल :**

इस्त्रायलमध्ये ३६ विविध वस्तूसंग्रहालये अस८उन बायबलकालीन अवशेषांचे तेथे चांगले जतन झाले आहे. इस्त्रायल राष्ट्रीय संग्रहालय १९६५ मध्ये स्थापन झाले. संगीतकलेचा उत्तेजन देण्यासाठी तेलअलीव व जेरुसलेम येथे संगीत महाविद्यालये असून त्यात १ लाख ८५ हजार प्रेक्षकांची सोय होती. येथे फुटबॉल, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, जलतरण हे विशेष लोकप्रिय खेळ असून त्यासाठी क्रीडांगणे व तलावाच्या सोयी उपलब्ध आहेत. खेळाडूंचा सर्वांगीण विकास होण्यासाठी १९६१ मध्ये क्रीडा शरीर संवर्धने मांडले स्थापली गेली, त्याच्याशी देशातील सहा विख्यात क्रिडासंस्था संलग्न झालेल्या आहेत. अतिशय अल्पकाळात इस्त्रायल हे प्रवाशांचे आकर्षण ठरलेले आहे.

## ३.५ सारांश

झिऑनिस्ट चळवळीचा उदय तसेच त्यातून इस्त्रायलची झालेली निर्मिती व अरबराष्ट्रवादाच्या उदयामध्ये डॉ.यासर अराफत यांच्या भूमिकेची माहिती या प्रकरणामध्ये दिलेली असून अरब-इस्त्रायल संघर्षावर सुद्धा यामध्ये प्रकाश टाकलेला आहे.

## ३.६ प्रश्न

१) इस्त्रायलच्या उदयामधील झिऑनिस्ट चळवळीची भूमिका स्पष्ट करा.

## ३.७ संदर्भ

१) डॉ. अनिल कठारे -विसाव्या शतकातील जगाचा इतिहास

२) डॉ. अनिल कठारे- आधुनिक जगाचा इतिहास

३) पी.जि.जोशी - आधुनिक जगाचा इतिहास

४) डॉ.सुमन वैद्य, डॉ. शांता कोठेकर- विसाव्या शतकातील जग (१९१४-१९४५) भाग-१

५) डॉ.सुमन वैद्य, डॉ. शांता कोठेकर- विसाव्या शतकातील जग (१९४६- २०००) भाग-२

६) डॉ. अनिरुद्ध , प्रा. गजानन भिडे-आधुनिक जगाचा इतिहास

७) जैन हुकूमचंद आणि कृष्णा माथुर- आधुनिक जगाचा इतिहास

८) कदम य.न. - विसाव्या शतकातील जगाचा इतिहास

९) कुलकर्णी अ.र. आणि देशपांडे-आधुनिक जगाचा इतिहास- भाग-1 & २

१०) साकुरे विजयानंद, अनिल कठारे-जागतिक इतिहासातील स्थित्यंतरे

११) उदगावकर म.न. आणि गणेश राउत- आधुनिक जग

❖❖❖❖

munotes.in

# ४

## फॅसिझम

**घटक रचना**


४.०. उद्दिष्ट्ये

४.१. प्रस्तावना

४.२. बेनिटो मुसोलिनीचे जीवन व कार्य

    ४.२.१. मुसोलिनीचा परिचय

    ४.२.२. मुसोलिनीच्या उदयाची कारणे

    ४.२.३. बेनिटो मुसोलिनीचे अंतर्गत धोरण

    ४.२.४. बेनिटो मुसोलिनीचे परराष्ट्रीय धोरण

४.३. सारांश

४.४. प्रश्न

४.५ संदर्भ


### ४.०. उद्दिष्ट्ये

या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थ्यांस

- मुसोलिनीचा परिचय या संदर्भात माहिती प्राप्त करणे.
- मुसोलिनीच्या उदयास जबाबदार असणाऱ्या कारणांचा अभ्यास करणे.
- मुसोलिनीचे अंतर्गत धोरण आणि त्याची भूमिका व कार्य याचा अभ्यास करणे.
- मुसोलिनीच्या परराष्ट्रीय धोरणाची माहिती मिळवणे.

### ४.१. प्रस्तावना

पहिल्या महायुद्धात जर्मनी आणि जर्मन गटाचा पराभव झाला. याचा फायदा घेऊन दोस्त राष्ट्रांनी अन्यायकारक व अपमानकारक तह लादले होते. ते तह जर्मनीने मनापासून स्वीकारले नाहीत. त्यामुळे जर्मनीत असंतोषाचे वातावरण निर्माण झाले. याचा फायदा घेऊन हिटलरने जर्मनीची सूत्रे हाती घेतली. अपमानाचा सूड घेण्यासाठी व स्वत:च्या महत्वाकांक्षेसाठी अनेक संघर्ष केले. यातूनच दुसरे महायुद्ध सुरु झाले. पहिल्या महायुद्धाच्या वेळी इटली दोस्तांच्या बाजूने युद्धात उतरली, परंतु ज्या अपेक्षा होत्या त्या दोस्त राष्ट्राने पूर्ण केल्या नाहीत. त्यामुळे इटलीत दोस्तांच्या बद्दल नाराजी निर्माण

munotes.in

झाली. यातून मुसोलिनीचा उदय झाला. त्याने हिटलरला नेहमीच मदत करणारे धोरण स्वीकारले.

## ४.२. बेनिटो मुसोलिनीचे जीवन व कार्य

लोकशाहीकरिता जग सुरक्षित ठेवले पाहिजे, अशी घोषणा करून 6 एप्रिल १९१७ रोजी अमेरिका युद्धात उतरली. राजाची निरंकुश सत्ता संपुष्टात येऊन लोकशाही निर्माण केली. पण दुर्दैवाने विजय अल्पकालीन ठरला. कारण युरोपात हुकुमशाही शासनाचा उदय झाला. एकाच माणसाच्या हाती सत्ता केंद्रित करून जनतेला सत्तेपासून सर्वस्वी दूर ठेवले. प्रत्येक व्यक्ती राज्याकरिता आहे. राज्याव्यातिरिक्त व्यक्तीला अस्तित्व नव्हते. राज्याकरिता, राज्यात व्यक्तींना जगावे व राज्याबाहेर व्यक्तीचे कोणतेही हितसंबंध असू नयेत, असे हुकुमशहा वाटत असे. इटालीत हुकुमशहा मुसोलिनीचा उदय होऊन इटालीचे इटालीने ऑस्ट्रिया-जर्मनीशी मैत्रीचे संबंध तोडून युद्धात भाग घेतला होता. इ.स. १९१५ लंडन तहानुसार फायदा झालाच नाही. पॅरीस शांतता परिषदेने टीरोळचा प्रदेश इटालीचे समाधान होऊन बड्या राष्ट्रांचा द्वेष वाटू लागला. त्यामुळे इटाली सदैव सूड घेण्यासाठी तयार झाली. त्यातून फॅझिसमचा उदय झाला.



फॅसिस्ट तत्त्वज्ञानाचा आद्यप्रनेता मुसोलिनीचा जन्म उत्तर इटालीतील रोमॅग्नो जिल्ह्यातील पहाडी गावी इ.स. १९८३ मध्ये झाला. वडिलांचा व्यवसाय लोहारकीचा होता. वडिलांची इच्छा शिक्षक व्हावा अशी होती; परंतु वडील समाजवादी असल्याने मुसोलिनीच्या मनावर पकड या विचारांची पडली. शिक्षणासाठी स्वीत्झर्लंडमध्ये असताना क्रांतिकारी विचारांमुळे व कामगार वर्गाला बंडाला चिथावणीमुळे इ.स. १९०६ ला स्वीत्झर्लंड सरकारने हद्दपार केले. इटालीत समाजवादी विचारांचा प्रसार रोमॅग्नो शेतकऱ्यांच्या बंडाला चिथावणी दिल्याने ई.स. १९०८ मध्ये तुरुंगात टाकले. तुरुंगातून सुटकेनंतर ऑस्ट्रियन साम्राज्यातील ड्रेट गावी स्थिर झाला. साम्यवादी विचारांचे वर्तमानपत्र काढले. त्यामुळे सरकारने हद्दपार केले. नंतर इटालीट मिलन येथे समाजवादी पत्रांचा संपादक म्हणून कार्य केले.

पहिल्या महायुद्धाच्या वेळी विचारात आमुलाग्र बदल होवून समाजवादी पक्ष व विचारांचा त्याग केला. इटालीने युद्धात भाग घाय्वा, असा प्रचार केला. त्या वेली सैनिक म्हणून भारती झाला. १९२७ ला लष्करातून निवृत्त झाला. निराशावाद व अस्थिर परिस्थितीचा फायदा घेवून फॅसिस्ट लढवू संघटना २३ मार्च १९१९ रोजी मिलन येथे स्थापन केली. दहशत निर्माण करून देशात वर्चस्व निर्माण केले. मे १९२१ च्या निवडणुकीत ३५ जागा मिळवल्या. ३ मार्च १९२३ रोजी शहराचा ताबा मिळवला आणि ३० ऑक्टोबर १९२२ ल रोमवर चाल करून रक्तदान न करता फॅसिस्ट क्रांती केली व इटालीची सर्व सूत्रे हाती घेतली.

### ४.२.१ मुसोलिनीच्या उदयाची कारणे

### १) पहिल्या महायुद्धाने झालेली प्रचंड हानी :

पहिल्या महायुद्धात इटालीचे अतिशय नुकसान झाले. लीबियान युद्धातून बाहेर पडताच पहिल्या महायुद्धात उडी घेतली. सैन्याची लढण्याची तयारी नव्हती. त्यामुळे सैन्यात बेशिस्त झाली. त्यात वारंवार पराभव होऊन मोठ्या प्रमाणात प्राणहानी झाली. 6 लाख सैनिक ठार झाले. २० लाख जवान जखमी, अनेक शहरे उद्ध्वस्त व बेचिराख झाले. बॉम्बवर्षाव झाल्याने उद्योगधंदे पार उद्ध्वस्त झाले.

### २) आर्थिक विपन्नावस्था :

इटालीच्या अर्थव्यवस्थेत कमालीचा गोंधळ निर्माण झाला. व्यापार, उद्योगधंदे, वाहतूक, दळणवळण अस्थिरता होती. वस्तु टंचाईमुळे बेसुमार किमतीत बाध झाली. तुटीचे अंदाजपत्रक भरण्यासाठी जनतेवर कराचे ओझे लादले. सैनिक बेकार झाले. कारखाने थंडावल्यामुळे कामगार बेकार झाले. राष्ट्रीय कर्ज सहा पतीने वाढले. मध्यम वर्ग, शेतकरी, कामगार वर्गाचे हाल झाले. उदारमतवादी योजलेले उपाय अपुरे पडले. साम्यवाद्यांनी कारखाने ताब्यात घेतले. देशात प्रचंड असंतोष निर्माण झाला.

### ३) दुर्बल शासन :

पॅरिस शांतता परिषदेत इटालीचा अपमान झाला. युद्धाचा परिणाम आर्थिक विपन्नावस्थेत झाला. युद्धानंतर राग व असंतोषाची लाट इटालीत उसळली. उदारमतवादी सरकार कारभार करण्यात अपयशी ठरले. कारण इटालीत लोकशाहीची परंपरा नसताना लोकशाही सरकार अधिकारावर आले होते. त्यामुळे लोकशाही सरकार दुबळे बनले. ते अस्थिर परिस्थितीमुळे मंत्रिमंडळ ढासळले. कारभार करण्यात अपयशी ठरले. कारण इटालीत लोकशाहीची परंपरा नसताना लोकशाही सरकार अधिकारावर आले होते. त्यामुळे लोकशाही सरकार सरकार दुबळे बनले. ते अस्थिर परिस्थितीमुले मंत्रिमंडळ ढासळले. हे सरकार २३ जून १९१५ ते ३१ ऑक्टोबर १९२२ पर्यंत अधिकारावर होते, पण त्यांचा राज्यकारभार भ्रष्टाचाराने बरबटलेला होता. राजकारणावर मूठभर श्रीमंत व भांडवलदारी, वतनदारांचे वर्चस्व होते. त्यात ५० टक्के लोक देशात निरक्षर होते. दुर्बल सरकार काढून बलिष्ठ सरकार यावे ही मागणी होती.

**४) सोशलिस्टांच्या कारवाया :**

लोकशाही, समाजवादी आणि निर्णायकी यांचा पुरस्कार करणारे जे पक्ष त्यांनी क्रांतिकारी नेत्यांचा पुरस्कार करून गोंधळ माजवला होता. साम्यवाद्यांनी देशातील कामगार आणि शेतकऱ्यांना बंडाला प्रोत्साहन दिले. त्यामुळे दंगली, संप, टाळेबंदीची एकच लाट इटालीट निर्माण झाली.

**५) इटालीत अतिरेकी राष्ट्रवादाचा उदय :**

आर्थिक अवस्थेमुळे इटालीट अतिरेकी राष्ट्रवादाच्या विचारांना चालना मिळाली. मॅरीनेटीन व प्रेझोमिनी दोन विचारवंतांनी अतिरेकी राष्ट्रवादाचा पुरस्कार केला. प्रेझोमिनी याने, राजा हाच ईश्वराचा पृथ्वीवरील सर्वश्रेष्ठ अविष्कार असून राज्यापुढे व्यक्तिस्वातंत्र्याला, व्यक्तित्वाला महत्व नाही. रोमन साम्राज्याच्या काळात सर्व जगाला मार्गदर्शनकेले. तसेच करणे इटालीचे परमकर्तव्य आहे. तर मॅरिनेटीनने उदारमतवाद, लोकशाही, शांततावाद यावर हल्ला करून युद्ध व हिंसा याला महत्व देणारे विचार मांडले. त्यामुळे इटालीत राष्ट्रवादाचा उदय झाला.

**६) फॅसिस्ट संघटनेची स्थापना आणि वाटचाल (२३ मार्च १९१९) :**

इटालीतील निराशावाद, अस्थिर परिस्थिती, पॅरिस शांतता परिषदेत दुखावलेला स्वाभिमान इ. घटकांचा विचार करता इटलीत साम्यवादाचा उदय झाला. परंतु तो इटलीला मानवला नाही. मुसोलिनीने आपली महत्त्वाकांक्षापूर्तीसाठी फॅसिस्ट नावाची लढाऊ संघटना २३ मार्च १९१९ रोजी मिलन येथे स्थापन केली. त्याच्या पक्षाची खुण फॅसिस म्हणजे काठ्यांचा जुडगा आणि मध्यभागी कुऱ्हाडीचे पाते असलेले प्रतीक होय. प्राचीन रोमन साम्राज्यात बादशहा किंवा न्यायाधीश यांच्यापुढे धरणे धरण्यात येत असे त्याच्या अनुयायांना काळा गणवेश असे. मुसोलिनीने मार्क्सवादी साम्यवादावर प्रखर टीका केल्या. उद्योगपती, जमीनदार, व्यापारी, कामगार, शेतकरी, मध्यमवर्गीय भांडवलदार ई. लोक सभासद झाले. इ.स. १९०० मध्ये २२ हजार, इ.स. १९२१ मध्ये ५ लाख सभासद संख्या झाली. मुसोलिनीच्या प्रभावी नेतृत्वामुळे फॅसिस्ट पक्ष अत्यंत बलाशाली, लोकप्रिय पक्ष बनला. त्याचे तत्त्वज्ञान लोकांपर्यंत पोहोचले. फॅसिस्ट तत्त्वज्ञान हे स्वतंत्र नसून ती गरजेतून निर्माण झालेली विचारप्रणाली आहे. हे तत्वज्ञान पुढीलप्रमाणे –

१) इटलीला गतकाळाचे वैभव परत मिळविण्यासाठी व महान प्रतिष्ठेसाठी आपल्या ड्युक किंवा महान नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली स्वार्थत्याग व आत्मसमर्प केले पाहिजे.

२) राष्ट्र व्यक्तीपेक्षा मोठे असते. व्यक्तीने राष्ट्रासाठी सर्व प्रकारचा त्याग केला पाहिजे. सर्व बंधने पाळली पाहिजेत. राष्ट्र हेच मुलभूत सत्य व अंतिम मुली आहे. राष्ट्रासाठी जगावे व राष्ट्रासाठी मरावे.

३) राज्यकारभारासाठी कुशल व राजनितीतज्ञ नेत्याची गरज असते.

४) लोकशाहीत राज्ययंत्रणा अकार्यक्षम आणि अयशस्वी होण्याचा धोका असतो. कारण असंख्य स्वार्थी लोकांच्या स्वाधीन राज्य असते, म्हणून लोकशाहीला विरोध.

५) जगातील सर्व कामगारांची सुखदु:खे समान आहेत, असा साम्यवाद सांगतो. त्याला विरोध करण्यासाठी संप करण्याच्या कामगारांच्या हक्कावर बंदी आणली. खाजगी मालमत्तेचे संरक्षण करणे हे ध्येय आहे.

६) उद्योगधंदे, शेतीचा विकास वाढवणे आणि सामर्थ्यशाली व सुसंपन्न राष्ट्र बनविणे.

७) युद्ध हेच सर्व प्रश्न सोडवू शकते. युद्धाशिवाय ईर्षा नाही, इर्षेशिवाय पराक्रम नाही आणि पराक्रमाशिवाय विकास नाही.

८) हिंसेला उत्तर हिंसेनेच डोळे पाहिजे. इ. वैशिष्ट्ये या तत्त्वज्ञानाची आहेत.

९) आर्थिक सामर्थ्य वाढवले तर देशाची प्रतिष्ठा निर्माण होईल.

**७) फॅसिस्ट क्रांती (३० ऑक्टो. १९२२) :**

इटलीत मे १९२१ च्या निवडणुकीत ३५ जागा जिंकल्या. त्यानंतर सर्वत्र दहशत निर्माण केली. २८ ऑक्टोबर १९२२ रोजी मुसोलिनीने काळ्या डगलेवाल्यांना रोमवर चाल करून जाण्याचा आदेश दिला. मिलन येथून सरकारला राजीनामा मागितला. इटलीचा राजा तिसरा व्हिक्टर इमन्युएल्ल याने पंतप्रधान जीओलोटी यांच्याकडून राजीनामा मागितला. ३० ऑक्टोबर १९२२ रोजी रोम शहरात मुसोलिनीने आपली पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतली. कायदेमंडळ ही हातातील बाहुले बनवून मुसोलिनीने आपली हुकुमशाही निर्माण केली.

**आपली प्रगती तपासा :**

प्र.१. मुसोलिनीच्या उदयाची करणे सांगा.

## ४.२.३. बेनिटो मुसोलिनीचे अंतर्गत धोरण

**१) पंचतत्त्वात्मक कार्यक्रम :**

अ) विरोधी पक्षांचा नायनाट करून सर्व सत्ता ड्यूकच्या हाती केंद्रित करणे.

ब) अंतर्गत गोंधळ नाहीसा करून कायदा व सुव्यवस्था स्थापन करणे.

क) देशाची आर्थिक परिस्थिती खंबीर करून संघप्रधान राज्य स्थापन करणे.

ड) धर्मव्यवस्थेशी समन्वय साधून पोपशी सलोख करणे.

इ) इटालियन जनतेमध्ये आत्मविश्वास निर्माण करुन त्यांच्या प्रदेशवाढीच्या आकांक्षा पूर्ण करणे.

munotes.in

**२) इटलीच्या परिवर्तनासाठी /नियंत्रणासाठी उपाय :**

**अ) खास अधिकाराची प्राप्ती :** मुसोलिनी अधिकारावर येताच गोंधळ नाहीसा करण्यासाठी त्याने खास अधिकाराची मागणी केली. राजा, संसद यांच्याशी एकनिष्ठेचा देखावा करून अमर्याद अधिकार प्राप्त केले. नंतर लष्कराच्या मदतीने सर्व शासनयंत्रणा ताब्यात घेतली.

**ब) फॅसिस्ट सैन्य :** शासनाच्या लष्करावर भरवसा नसल्याने फॅसिस्ट सैन्य उभारण्याची परवानगी घेतली. सैन्याच्या मदतीने विरोधकांचा काटा काढला. त्याची जनता व साम्यवादी लोकांच्यात दहशत निर्माण करून हुकुमशाहीला पोषक वातावरण तयार केले आहे.

**क) नवा निवडणूक कायदा (इ.स.स१९२३) :** संसदेच्या पाठिंब्याची खात्री नसल्याने नोव्हेंबर १९२३ मध्ये नवा निवडणूक कायदा मंजूर केला. फॅसिस्ट पक्षाचे जास्तीत जास्त उमेदवार निवडून येतील अशी तरतूद केली. एप्रिल १९२४ च्या निवडणुकीत २/३ जागा प्राप्त केल्या.

**ड) विरोधकांचा नायनाट :** नव्या निवडणूक कायद्यास व फॅसिस्टच्या हिंसाचारास इतर पक्षांकडून विरोध झाला. तो नष्ट करण्यासाठी इ.स. १९२५-२८ या काळात अनेक कायदे मंजूर च्या कायद्याच्या अनेक विरोधकांचा नायनाट केला.

**इ) इ.स.१९२८ चा निवडणूक कायदा :** संसदेवर वर्चस्व करण्यासाठी इ.स.१९२८ च्या कायद्यानुसार फक्त प्रौढ मतदान पद्धतीचा.

**३) कायदा व सुव्यवस्था :**

कायदा व सुव्यवस्था स्थापन करण्याच्या अमिषाने फॅसिस्टांचे बळ वाढवले. त्यासाठी अत्याचार, जुलूम, खून, मारहाण, देहदंड इ. अवलंब केला. अनेक बुद्धिवादी नेत्यांचा छळ केला. परिणामी विरोधक नाममात्र उरले. त्यामुळे देशात सुव्यवस्था स्थापन झाली. शासकीय कार्यक्षमताही वाढली. खर्चात काटकसर केली. लष्कर, आरमार, हवाईदल, बेसुमार वाढ करून लष्करी शिक्षण सक्तीचे केले.

**४) शैक्षणिक सुधारणा :**

मुसोलिनीने शिक्षणाला उत्तेजन देऊन सरकारी शाळांची संख्या वाढली. शिक्षण व्यवस्थेवर कडक नियंत्रण ठेवणे. क्रमिक पुस्तके फॅसिस्ट तत्त्वप्रणालीला पोषक ठेवली. शिक्षकांच्या नेमणुका करताना फॅसिस्टनिष्ठांचा आग्रह धरला. युद्ध हा फॅसिस्ट विचारसरणीचा अविभाज्य भाग असून युद्धप्रियता, राष्ट्रवाद लष्कराचे महात्मे, युद्धनेतृत्व यावर जास्त भर दिला होता. शास्त्रीय संशोधन, शैक्षणिक तत्त्वज्ञान फॅसिस्ट राजवटीला उपयोग होईल, असे ठेवले. यामुळे नवी फॅसिस्ट संस्कृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

### ५) धार्मिक सुधारणा :

इ.स. १८७० पासून पोप व इटालीचे सरकर यांच्यात संबंध खराब झाले होते. कॅथॉलिक जनता फॅसिस्ट राजवटीस पाठींबा देतील, म्हणून पोपशी संबंध सुधारण्याचा मार्ग मुसोलिनीने आखला. राज्य व धर्म संस्था आणून आपले श्रेष्ठत्व वादातीतपणे प्रस्थापित करण्याची मुसोलिनीने मनीशा बाळगली होती आणि हुकुमशाहीत पावित्र्य आणण्यासाठी पोपच्या आशीर्वादाची गरज असल्याने पोपशी तडजोड करून लॅटेरिन तह व धार्मिक करार इ.स.१९२२ केला. त्यानुसार –

**लॅटेरिनचा तह : मुसोलिनी व रोमचा पोप ११ वं पायस.**

१) व्हॅटीकन स्टेटचे स्वतंत्र राज्य व त्यावरील पोपचे सार्वभौमत्व मान्य.

२) पोपनेही मुसोलिनीच्या राजवटीस मान्यता दिली.

३) इटालीतील धर्माधिकाऱ्याची नेमणूक पोपने इटालीच्या सरकारच्या समत्तीने करावी.

४) धर्माधिकार्यांचे वेतन शासनातर्फे करावे.

५) राजसत्ता आणि धर्मसत्ता यांच्यातील संबंध स्पष्ट केले.

६) रोमचा प्रश्न निश्चित तत्त्वावर व कायमचा सुटल्याचे घोषित केले.

**धार्मिक करार इ.स. १९२१ :**

१) इटाली सरकारने पोपला १ कोटी ९० लाख पौंड खंडणी द्यावी.

२) राज्यधर्म म्हणून कॅथॉलिक पंथाला मान्यता द्यावी.

३) इटाली सरकारच्या संमत्तीने बिपशांची नेमणुका कराव्यात.

४) धर्मसंस्थांना मालकीची मालमत्ता ठेवण्यासाठी संमती द्यावी.

### ६) लष्करी सुधारणा :

मुसोलोनीची युद्धावर गाढ श्रद्धा होती. व्यक्तीचे व राष्ट्राचे सर्व गुण युद्धाने उजळून निघतात. त्याने युद्धस्थ राष्ट्र बनविले. राष्ट्राच्या संरक्षणासाठी व्यक्तीने प्राणाचे समर्पण द्यावे. ही राष्ट्रीय भावना प्रखरपणे जनतेत भिनवली होती. जनतेत सर्व लष्करीकारण करून लष्कराची प्रचंड वाढ केली. ज्याप्रमाणे स्त्रीला भिनवली होती. जनतेत सर्व लष्करीकरण करून लष्कराची प्रचंड वाढ केली. ज्याप्रमाणे स्त्रीला मातृत्व आवश्यक आहे. त्याप्रमाणे पुरुषाला व विकसनशील राष्ट्राला युद्ध आवश्यक आहे. ही भावना लोकांच्या मनात बिंबवली होती. लोकसंख्या वाढविण्यासाठी अविवाहीतांवर कर बसवले. विवाहितांना सवलती दिल्या. जास्त मुलांना जन्म देणाऱ्या मातांचा गौरव केला. लष्करी शिक्षण सक्तीचे केले. सैन्य, आरमार, हवाईदल यात प्रचंड वाढ केली. लहानपणापासून युद्धप्रवृत्ती लोकांत निर्माण केली.

**७) आर्थिक सुधारणा :**

**अ) कामगार सुधारणा :** इटालीला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करणे हे परम उद्दिष्ट्ये असल्याने अनेक फायदे केले. एप्रिल १९२६ च्या कायद्यानुसार सर्व मालकवर्गाची व कामगार वर्गाची एक संघटना निर्माण केली. उद्योगाच्या विकासासाठी व कामगारांसाठी श्रमविषयक सनद १९२८ मंजूर केली. त्यानुसार कामगारांचे हक्क सुरक्षित ठेवणे, ८ तासाचा दिवस, आजारपण, अपंगत्व इ.प्रसंगी विश्रांतीचा हक्क दिला. एकूण १३ संघटना निर्माण केल्या. पैकी ६ कामगारांच्या ६ मालकांच्या आणि १ साहित्य, शिक्षण, क्ला यातील संप, टाळेबंदी बेकायदेशीर असून औद्योगिक तंटे लवाद मंडळामार्फत सोडवणे.

**ब) शेती सुधारणा :** इटाली कृषिप्रधान देश असून अर्थव्यवस्थेत कृषीक्षेत्रास महत्व दिले. पडीक जमीन लागवडी व ६४,००० एकर जमीन दलदलींची व खारीची ती लागवडीखाली आणली. उत्तम बी-बियाणे, नवी यांत्रिक कृषी अवजारे, खाते इ. वापरण्यास प्रोत्साहन दिले. पाणीपुरवठा करून उत्पादन वाढवले.  कळावे, पाटबंधारे बांधले, खेड्यातून वीजपुरवठा केला. इ.स. १९३९ पर्यंत १५ टक्के स्वावलंबी इटलीला बनवली. १३० लाख एकर जड जमीन तयार केली आणि लागवडीखाली आणली.

**क) औद्योगिक सुधारणा :** खनिज साधनसंपत्तीबाबत इटाली समृद्ध नव्हता. इ.स. १९३८ पर्यंत लोखंड-पोलादाची आयात ८ लाख ८ हजार टन केली. पेट्रोलियमधील आयात २५ लाख ९९ हजार टनाची केली. कच्चा मालाची आयात, परकीय मालावर जबर आयात कर बसवला. स्वदेशी उद्योगधंद्यांना उत्तेजन व संरक्षण देऊ मोटार निर्मितीसाठी प्रेरणा दिली. फियाट कंपनी मोटारीसंबंधी प्रसिद्ध आहे. रेडिओ, रेऑन निर्यातीपासून परकीय चलन मंदीत आले. त्यामुळे अर्थव्यवस्थेवर सुपरिणाम होण्याऐवजी जास्तच ताण पडला. हा ताण कमी करण्यासाठी पुन्हा युद्ध असे दुष्टचक्र मुसोलिनीच्या वाट्याला आले.

**आपली प्रगती तपासा :**

**प्र. १** मुसोलोनीचे अंतर्गत धोरण स्पष्ट करा.

### ४.२.४. बेनिटो मुसोलिनीचे परराष्ट्रीय धोरण

इटलीला जगातल्या प्रमुख राष्ट्राला मनाचे स्थान मिळवून देणे हे मुसोलिनीच्या विदेशी नीतीचे प्रमुख सूत्र होय. प्राचीन रोमन साम्राज्याचे वैभव मिळवून देण्याचे दिव्य स्वप्न डोळ्यांसमोर ठेवून हे ध्येय साध्य करण्यासाठी साम्राज्यवादी धोरणाचा अवलंब केला. ध्येयपूर्तीसाठीच इतालीला सर्वदृष्टीने शस्त्रसज्ज आणि युद्धादक्ष ठेवणे आवश्यक आहे, असे जाहीर केले. पॅरिस शांतता परिषदेत दोस्तांकडून झालेल्या अपमानाचा बदला घेण्यासाठीच कणखर परराष्ट्रीय धोरण राबवले.

**१) मुसोलिनीच्या परराष्ट्र धोरणाची प्रमुख उद्दिष्ट्ये :**

I. वसाहती काबीज करणे.

II. आक्रमक व प्रभावी परराष्ट्रीय धोरणाद्वारे इटालीला आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा मिळवणे.

III. इटालीला प्राचीन रोमन साम्राज्याचे वैभव व प्रतिष्ठा मिळवून देणे. कच्चा माल, लोकसंख्यासाठी वसाहती मिळवणे ते आद्यकर्तव्य आहे. मुसोलिनी म्हणतो की, आम्ही भूमीसाठी आसुसलेलो आहोत. कारण आम्हास सुबत्ता हवी आहे आणि ती टिकवायची आहे.

**२) लाऊसेन परिषदेन्वये डॉडेकनीज बेटाचा ताबा इ.स. १९२३-२४ :**

इटाली-ग्रीस यांच्यात इ.स.१९२० करार होऊन डॉडेकनीज बेटाचा ताबा इटालीला मिळाला. पण ग्रीसने नकार दिला. मुसोलोनीने योग्य संधी साधून हे बेट १९२३ ताब्यात घेतले. त्यावर व भूमध्य समुद्रात प्रभुत्व प्रस्थापित करण्यासाठी भक्कम नाविक तळ उभारले.

**३) फ्यूम बंदराचा ताबा (इ.स. १९२४) :**

इ.स. १९२२ च्या रोपोलोच्या तहात जानेवारी इ.स. १७२४ ला दुरुस्ती युगोस्लाव्हियाकडून फ्यूम बंदराचा ताबा घेतला. शेजारी प्रदेश पाटोबारोस युगोस्लाव्हियाला दिला. त्याचप्रमाणे उत्तर आफ्रिकेतील ज्युबा लँड व केनियाचा काही भाग इटालीला मिळाला.

**४) रशियाबरोबर मैत्री करार -१९३३ :**

जर्मनी-इटाली एकमेकांच्या सरहद्दीवरील राष्ट्रे होती. जर्मनीत हिटलरचा उदय झाल्यामुळे मुसोलिनीला भीती वाटू लागली. म्हणून रशियाशी मैत्रीचे संबंध जोडण्याचा विचार होता. पण युरोपियन राष्ट्रांनी रशियावर बहिष्कार टाकल्याने सर्व युरोपियन राष्ट्राजवळ आली. यातून रशियाशी इ.स. १९३३ मैत्री करार केला.

**५) फ्रान्सबरोबर मैत्री – ७ जाने १९३५ :**

फ्रान्सला जर्मनीची सदैव भीती वाटत असल्याने व्हर्साय तहामध्ये जर्मन आक्रमण थोपवण्याची तरतुदी केल्या. तरी पण आपणाला जर्मनीविरुद्ध मित्र मिळवण्याचा फ्रांस प्रयत्न करत होता. यातून जवळीक निर्माण झाली. जर्मनीत हिटलरचा उदय झाल्याने इटलीला भीती वाटत होती. व ॲविर्सिनिया मिळवण्याचा प्रयत्न करत असताना राष्ट्रसंघाचा विरोध होईल. यावेळी मित्र असावा म्हणून मुसोलोनीने फ्रान्सबरोबर इ.स.१९३५ करार केला.

munotes.in

**६) इथियोपिया (ॲबिसिनिया) ताबा मिळवला – १९३६ :**

मुसोलिनीने ॲबिसिनियावर हल्ला करण्याची कारणे :

१) इ.स. १९१३ च्या अडोवाच्या लढाईतील पराभवाचा कलंक इटालीला दूर करावयाचा होता.

२) तेथे कच्चा माल भरपूर प्रमाणात उपलब्ध होता. मैत्रीतील साधनसामुग्री अतिशय समृध्द होता. तो प्रदेश मिळाला तर इटालीत पैशाचा पूर वाढू लागेल.

३) वाढत्या लोकसंख्येत उत्तम व साहसी लायक वसाहत होती.

४) स्थान राजनैतिकदृष्ट्या अतिशय महत्वाचे होते. एका बाजूने सोमाली लँड तर दुसऱ्या बाजूने इरिडीया वसाहत होती.

५) कोणत्याही पाश्चात्य देशाच्या वर्चस्वाखाली नव्हता.

६) इथिओपियाशी पूर्वापार संबंधाचे धागेदोरे होते.

इ.स. १९३१ ला जपानने मांचुरियावर आक्रमण केले. तरी राष्ट्रसंघकाही करू शकत नाही. याचा अंदाज घेऊन मुसोलिनीने १९३२ मध्ये आपले हेर ॲबिसिनियात पाठवले. सर्व चौकशी करून स्वत: युद्धसज्ज झाला. ५ डिसेंबर १९३५ दोघांच्या लष्करात वाल्बाल भागाजवळ सशस्त्र चकमकी झाल्या. यात सैनिक मारले गेल्याने इटालीने माफीची मागणी करून नुकसान भरपाई मागितली तेव्हा ॲबिसिनियाने १३ डिसेंबर १९३४ राष्ट्रसंघाकडे तक्रार नोंदवली. या वेली फ्रान्सने त्याचा दोष दिला. त्यामुळे मुसोलिनीने मार्च १९३५ ला इरिट्रीया व सोमाली लँडमध्ये सैन्य जमा करून हल्ला केला. इ.स. १९३६ ॲबिसिनियाच्या राजधानीजवळ सैन्य आले. राजा हेले सेलासी हा पळून गेला. इटालीने ताबा मिळवला.

राष्ट्रसंघाने या कृतीचा निषेध करून इटालीची आर्थिक नाकेबंदी केली. पण ही कोणत्याही राष्ट्राने मनापासून पाळली नाही.

**७) स्पॅनिश प्रश्नात हस्तक्षेप -१९३४-३८ :**

ॲबिसिनियच्या यशामुळेच मुसोलिनीने स्पॅनिश प्रश्नात हस्तक्षेप करण्याचे धैर्य प्राप्त झाले. इ.स.१९३४ पासून स्पेन प्रश्नात ढवळाढवळीस प्रारंभ केला. राजाला विरोध करणारी चळवळ दडपून टाकण्यास राजाला मदत केली. इ.स.१९३६ निवडणुकीत प्रजासत्ताकवाद्यांना रशियाने तर जनरल फँकोला मुसोलिनीने मदत केली. त्यामुळे यादवी निर्माण झाली. शेवटी जनरल फँकोचा विजय होऊन प्रजासत्ताक नष्ट केले.

**८) रोम-बर्लिन-टोकिओ अक्ष करार -१९३७ :**

२३ सप्टेंबर १९३७ रोजी मुसोलिनीने बर्लिनला भेट दिली. हिटलरचे व्यक्तिमत्व व जर्मनीची प्रगती पाहून प्रभावित झाला. हिटलरच्या मैत्रीने मुसोलिनीने आंतरराष्ट्रीय

प्रतिष्ठा वाढणार होती. इ.स. १९३६ मध्ये जर्मनी-जपान यांच्यात करार झाला होता. त्यामुळे संभाव्य युद्ध हिटलरच जिंकणार ही कल्पना मुसोलिनीची होऊन इ.स. १९३७ करारात सामील झाला.

### ९) इंग्लंड-इटाली मैत्री करार -१६ ए १९३८ :

स्पॅनिश हस्तक्षेपामुळे पाश्चात्य राष्ट्रांची सहानुभूती गमावली होती. ऑस्ट्रिया-जर्मनी दुखावला होता. आंतरराष्ट्रीय राजकारणात एकटे पाडू नये म्हणून १६ एप्रिल १९३८ मध्ये इंग्लंडशी मैत्री करार केला. पण फारसा उपयोग झालाच नाही. या युद्धाच्या वेळी हा करार पाळला नाही.

### १०) अल्बेनियावर कब्जा -१९३९ :

इ.स. १९२६ टीरानचा तह करून इटालीने संरक्षणाची भूमिका केली. या करारानुसार इटालीच्या सहकार्याने आर्थिक, व्यापारी सुधारणा अल्बेनिया केल्या. आधुनिकीकरणाच्या नावाखाली लष्कर घुसवले आणि अल्बानिया पूर्णत: गिळंकृत केले. जग उघड्या डोळ्याने पाहत असूनही ब्र सुध्दा काढला नाही.

### ११) दुसऱ्या महायुद्धात प्रवेश – १९४० :

इ.स. १९३९ रोजी दुसऱ्या महायुद्धाला सुरुवात झाली. पूर्वनियोजित कार्यक्रमाप्रमाणे हिटलरने युद्ध पेटवले व मुसोलिनीने कार्यक्रमाप्रमाणे तटस्थता स्वीकारली. पण पुढे इ.स.१९४० मध्ये युद्धात उडी घेतली. शेवटी दोस्तांपुढे जर्मनीला शरणागती पत्करावी लागल्याने इटालीचा पराभव झाला. मुसोलिनीला युद्ध गुन्हेगार जाहीर केले तेव्हा तो पळून जात असताना इ.स.१९४५ ला लोकांनी मुसोलिनीला ठार मारले आणि हुकुमशाहीचा शेवट झाला.

**आपली प्रगती तपासा:**

**प्र.१.** मुसोलीनीचे परराष्ट्रीय धोरण सांगा.

## ४.३. सारांश

पहिल्या महायुद्धाच्या वेळी इटली दोस्तांच्या बाजूने युद्धात उतरली, परंतु ज्या अपेक्षा होत्या त्या दोस्त राष्ट्रांनी पूर्ण केल्या नाहीत. त्यामुळे इटलीत दोस्तांच्या बद्दल नाराजी निर्माण झाली. यातून मुसोलिनीचा उदय झाला. त्याने आपल्या अंतर्गत आणि परराष्ट्र धोरणांतर्गत इटलीला शक्तिशाली बनवले.

## ४.४. प्रश्न

प्र. १. मुसोलिनीच्या उदयची करणे सांगा.

प्र. २. मुसोलीनीचे अंतर्गत धोरण स्पष्ट करा.

प्र. ३. मुसोलिनीच्या परराष्ट्रीय धोरणाचा आढावा घ्या.

## ४.५ संदर्भ

१) डॉ. अनिल कठारे -विसाव्या शतकातील जगाचा इतिहास

२) डॉ. अनिल कठारे- आधुनिक जगाचा इतिहास

३) पी.जि.जोशी - आधुनिक जगाचा इतिहास

४) डॉ.सुमन वैद्य, डॉ. शांता कोठेकर- विसाव्या शतकातील जग (१९१४-१९४५) भाग-१

५) डॉ.सुमन वैद्य, डॉ. शांता कोठेकर- विसाव्या शतकातील जग (१९४६- २०००) भाग-२

६) डॉ. अनिरुद्ध , प्रा. गजानन भिडे-आधुनिक जगाचा इतिहास

७) जैन हुकूमचंद आणि कृष्णा माथुर- आधुनिक जगाचा इतिहास

८) कदम य.न. - विसाव्या शतकातील जगाचा इतिहास

९) कुलकर्णी अ.र. आणि देशपांडे-आधुनिक जगाचा इतिहास- भाग-1 & २

१०) साकुरे विजयानंद, अनिल कठारे-जागतिक इतिहासातील स्थित्यंतरे

११) उदगावकर म.न. आणि गणेश राउत- आधुनिक जग

❖❖❖❖

# ५

# नाझिझम

**घटक रचना**

५.०.उद्दिष्ट्ये

५.१. प्रस्तावना

५.२. अडॉल्फ हिटलरचे जीवन व कार्य

५.२.१. अडॉल्फ हिटलचा परिचय

५.२.२. हिटलरच्या उदयाची कारणे

५.२.३. हिटलरचे अंतर्गत धोरण

५.२.४. हिटलरचे परराष्ट्रीय धोरण

५.३. सारांश

५.४. प्रश्न

५.५ संदर्भ

## ५.०.उद्दिष्ट्ये

- अडॉल्फ हिटलरच्या जीवनवृतांची माहिती घेणे.
- हिटलरच्या उदयास कारणीभूत झालेल्या परिस्थितीचा अभ्यास करणे.
- जर्मनीच्या विकासासाठी व शक्तीशाली बनण्यासाठी केलेल्या उपायांची माहिती मिळविणे.
- युरोपमध्ये जर्मनी सामर्थ्यशील असल्याने सिद्ध करण्यासाठी परराष्ट्रीय धोरणातून केलेल्या ध्येयधोरणांचा अभ्यास करणे.

## ५.१ प्रस्तावना

जर्मनीचा पंतप्रधान बिस्मार्कने जर्मनीला सामर्थ्यशाली व सर्वश्रेष्ठ बनवण्याच्या प्रयत्नातून युरोपमध्ये गुंतागुंतीचे अनेक करार केले होते. त्यातूनच पहिले महायुद्ध सुरु झाले.या महायुद्धात जर्मनीचा प्रचंड पराभव होऊन अपमानकारक व्हर्सायचा तह लादला. ह्या तहाच्या माध्यमातून जर्मनीचे प्रादेशिक, आर्थिक, लष्करी खच्चीकरण केले. याचा सूड घेण्याचा प्रयत्न हिटलरने केले. त्यादृष्टीने अंतर्गत धोरणातून अनेक उपाययोजना केल्या.जर्मनीचे पूर्वीचे वैभव प्राप्त करण्याच्या प्रयत्नातून अनेक भूप्रदेश मिळवण्याचा प्रयत्न केला. यातून दुसरे महायुद्ध घडून आले. जर्मनीचा पराभव झाला.

# ५.२. अडॉल्फ हिटलरचे जीवन व कार्य



## ५.२.१. अडॉल्फ हिटलचा परिचय

हिटलरचा जन्म २० एप्रिल १८८९ रोजी ऑस्ट्रिलीयातील ब्रुनो गावी दासी पत्नीच्या पोटी झाला. दारिद्रयामुळे उच्च शिक्षण झाले नाही. चित्रकला, शिल्पकलेची आवड होती. व्हींएना शहरात रंगाऱ्याचा व्यवसाय करत असे. व्हीएना इम्पिरियल आर्ट ॲकॅडमी संस्थेत शिक्षण घेताना मार्क्स ग्रंथाबरोबर अनेक विषयांचे वाचन, चिंतन केले. जर्मनी प्रभावी नेतृत्व झाल्यास हालअपेष्ठा नष्ट होतील, असे मत होते. महायुद्धाच्यावेळी तो सैन्यात भरती झाला. दोस्त राष्ट्रांनी अपमानकारक तह लादला. अस्थिर परिस्थिती दूर करण्यासाठी प्रभावी पक्षाची गरज आहे.त्यामुळे हिटलरने नाझी पक्षाची स्थापना केली.

## ५.२.२. हिटलरच्या उदयाची कारणे

### १) व्हर्सायचा अपमानकारक तह :

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष विल्सनच्या ८ नोव्हेंबर १९१८ च्या १४ तत्वानुसार जर्मनीने शरणागती पत्करली. परंतु विजेत्या राष्ट्रांनी व्हर्साय तहाच्या वेळी जर्मनीची बाजू लक्षात घेतली नाही. जर्मनीला कायम खच्ची करण्यासाठी तिच्यावर प्रचंड नुकसान भरपाई लादली. लष्कर कपात केली.सर्व वसाहती ताब्यात घेतल्या. युद्धास जबाबदार जर्मनी असे घोषित केले. या अपमानाचा सूड घेण्यासाठी जर्मनीने प्रतिज्ञा केली. हिटलरने विजेत्या राष्ट्रांवर टीका केल्याने त्याची लोकप्रियता वाढली.

### २) वायमर प्रजासत्ताकाची लोकप्रियता ओहटीस :

वायमर प्रजासात्ताकाने प्रारंभीच अपमानकारक व्हर्सायच्या तहावर सही केली. त्यामुळे प्रत्यक्ष नागरिकांच्या मनात चीड निर्माण झाली. वायमरने जर्मनीच्या सही करून विश्वासघात केला, अशी धारणा झाली. जर्मनीत लोकशाहीची परंपरा नसल्याने जनतेचा विश्वास वायमरने संपादन केला नाही.

### ३) आर्थिक पेचप्रसंगावर उपाययोजना:

पाहिल्या महायुद्धामुळे अर्थव्यवस्था पूर्ण कोलमडली. उत्पादनात खंड पडला. आंतरराष्ट्रीय कर्ज वाढले, नुकसान भरपाईची प्रश्न डोकेदुखी बनला होता. इ.स.१९२१ मध्ये युद्धखंडणी ६ अब्ज ६० कोटी पौंड जर्मनीवर लादली. सारा प्रांत १५ वर्षासाठी फ्रान्सला दिला. कर्ज परत करत नाही असा आरोप करून फ्रांसने व्हूरचा औद्योगिकप्रदेश ताब्यात घेतला. या प्रदेशात ८० टक्के लोखंड-पोलाद असल्याने जर्मनीचे सर्व कारखाने बंद पडले. त्यामुळे सर्वत्र नाराजी निर्माण झाली.

### ४) युद्धातील प्रचंड हानीचे दुःख :

पहिल्या महायुद्धापूर्वी जगातील प्रमुख, बडया राष्ट्राचा दर्जा जर्मनीला होता. विद्यापीठे, तत्त्वज्ञान, कला, व्यापार, कारखाने, सैन्य यांचा जगभर लौकिक होता. युद्धामुळे हे सर्व नष्ट झाले. लाखो सैनिक ठार झाले. रोगराई वाढली. अन्नपाण्याविना लोक मरत होते. हिटलरने या सर्वांचा सूड घेण्याची भाषा केली.

### ५) आर्थिक मंदीचा जिव्हारी फटका :

जर्मनीतील आर्थिक प्रश्न सोडवण्यासाठी डॉस समिती स्थापन केली.तिच्या शिफारशीनुसार थोडासा दिलासा मिळाला. जर्मनीत उत्पादन वाढूनही फायदा झाला नाही. कारण कर्ज बरेचसे वाढले होते. परत यंग कमिशननुसार दोस्तांचे सैन्य परत आपल्या देशात गेले. जर्मनीत आर्थिक भरभराट होऊ लागली.तोच इ .स.१९२९ मध्ये जागतिक मंदीची लाट पसरली. त्यामुळे परकीय कर्जफेड अशयक्य झाली, दुष्काळामुळे जनतेचे हाल झाले. यातूनच नाझीचा उदय झाला.

### ६) कम्युनिझमची भीती :

जर्मनी आर्थिक संकटात असताना काम्युनिस्टानी आपले बाल वाढवण्यासाठी संप मोर्चे, टाळेबंदी, इ. चा वापर केला. लोकशाही परिस्थितीवर मात करण्यास असमर्थ आहे असे हिटलरने जाहीर केले.

### ७) नाझी संघटनेचा सर्वकष प्रयत्न :

ड्रेक्सलर  नावाच्या कामगाराने इ.स.१९१८-१९ मध्ये कामगार संघटना स्थापन केली. इ.स.१९१० ला हिटलरने राष्ट्रीय समाजवादी जर्मन कामगार पक्षाची स्थापना केली.पक्षाचे राष्ट्रीय धोरण म्हणजे सर्व जर्मन वंशियांचे विशाल जर्मन राष्ट्र बनवणे, व्हर्सायचा तह रद्द करणे,वाढत्या लोकांसाठी वसाहती प्राप्त करणे. यासाठी ३ ऑगस्ट १९२१ मध्ये निमलष्करी संघटना म्युनिच येथे स्थापण केली.ब्व्हेरियात उठावामुळे ५ वर्षासाठी तुरुंगवासाची शिक्षा झाली. तुरुंगात असतना माझा लढा हे आत्मचरित्र लिहिले. त्यामध्ये नाझी पक्षाचे तत्वज्ञान, उद्दिष्टे मांडली आहेत.माझा लढा हे नाझींच बायबल होय.

**८) नाझी पक्षाचे तत्वज्ञान:**

**१) राज्यसंस्था सर्वश्रेष्ठ संस्था :** सर्व संस्थांपेक्षा राज्यसंस्था श्रेष्ठ आहे. राजाची सत्ता सार्वभौम, अनियंत्रित असते. राजकीय, सामाजिक, आर्थिक क्षेत्रात राजाचा मुक्त संचार असून सर्व क्षेत्रांवर नियंत्रण ठेवण्याची गरज आहे. राज्यासाठी व्यक्ती असते. व्यक्तीसाठी राज्य नाही.

**२) लोकशाहीस प्रखर विरोध :** संसदीय संस्थाना राज्यात स्थान नव्हते. ससंद ठेवायची असेल तर नाझी पक्षास एकमुखी पाठींबा दिला पाहिजे. अन्यथा बरखास्त केले पाहिजे. विरोधकांना नेस्तनाबूत करणे हे राज्याचे ध्येय आहे. नाझी शिवाय दुसरा पक्ष नसावा.

**३)आर्थिक तत्वज्ञान :** राज्यहीतास आवश्यक वाटल्यास खासगी मालमत्तेचा हक्क ठेवण्यात येईल. उद्धयोगधंदे, शेतीसुधारणा करून आर्थिक गोंधळ नष्ट करण्यासाठी नियोजन करणे.

**४) जगातील सर्वश्रेष्ठ आर्यवंश :** सर्व जगावर प्रभुत्व गाजविण्याचा नैसर्गिक अधिकार जर्मन वंशाला आहे. ज्यू जमात जर्मन जनतेचे रक्तशोषण करणारी असून तिच्या स्वार्थी आणि राष्ट्रद्रोही कारणांमुळे जर्मनी आर्थिक संकटात सापडली आहे.

**५) साम्राज्यवादी वृत्ती:** व्हर्सायच्या तहाने गमावलेला प्रदेश प्राप्त करणे आणि साम्राज्याची प्रतिस्थापना करणे यासाठी आपल्या हाती शस्त्रे घेतली पाहिजेत. जर्मनी शस्त्रसज्ज झाली पाहिजे.

**६) साम्यावादास विरोध:** राष्ट्राच्या हिताआड जे कारखाने येतील ते सर्व सामाजिक मालकीचे करणे म्हणजे साम्यवाद होय.कामगारांना राजकारणापासून अलिप्त ठेवले पाहिजे.त्यांचा लढा पैशाचा नसून सत्तेसाठी आहे,तो मोडून काढला पाहिजे.

**७) सामाजिक तत्वज्ञान:** जर्मन लोकांचे राहणीमान, व्यापार, कारखाने वाढवले पाहिजेत. प्रत्येकाला रोजगार मिळाला पाहिजे. शेतीचा विकास झाला पाहिजे.

**९) नाझी क्रांती आणि हिटलरचा उदय :**

इ.स.१९१८ मध्ये तुरुंगातून सुटल्यानंतर नाझी पक्षाच्या मदतीने राजकीय क्षेत्रात दरारा निर्माण केला. इ. स.१९२० च्या निवडणुकीत ३२ ऐवजी १४ जागा मिळाल्या. इ. स. १९२५ मध्ये २७ हजार, इ.स.१९२८ मध्ये १ लाख ८ जहर एवढे नाझीचे सभासद झाले. १९३०च्या निवडणुकीत नाझी पक्षाचे कायदेमंडळात १०७ सभासद होते. इ. स. १९३२ च्या निवडणुकीत नाझी पक्षाला बहुमत प्राप्त झाले. परंतु अध्यक्षपदाच्या निवडणुकीत हिटलरचा पराभव झाला. हिंडेनबर्गने चॅन्सेलर बनवले.३० जानेवारी १९३३ रोजी नित्य्क्ती केली. २ ऑगस्ट १९३३ रोजी अध्यक्ष हिंडेनबर्गचा मृत्यू झाला. हिटलरने अध्यक्ष वं चॅन्सेलरपद एकत्र करण्याचा ठराव पास केला. वायमर प्रजासत्ताकाचा राष्ट्रीय ध्वज खाली घेऊन त्या ठिकाणी नाझी पक्षाचे प्रतीक असलेला

स्वस्तिक चिन्हाकित ध्वज फडकवला.सर्वांचा हिटलर प्रमुख बनून स्वतःस ''फ्युरर''पदवी घेतली.

### ५.२.३. हिटलरचे अंतर्गत धोरण :

सत्तेवर येण्यापुर्वीच राजकिय सत्तेचे स्वरूप केंद्राला सर्वोच्च सत्ता असे हिटलरने जाहीर केले होते. इ.स.१९२३ पासून जर्मनीची सत्ता मिळवण्याचा प्रयत्न केला तो इ.स.१९३३ ला पूर्ण झाला. घटक राज्यांची सत्ता नष्ट करून राजकीय पक्षावर बंदी घातली. वायमर राज्यघटना स्थगित केली. अध्यक्ष हिडेनबुर्गच्या मृत्यूनंतर स्थगित केली. अध्यक्ष हिडेनबुर्गच्या मृत्यूनंतर सर्व सत्ता हातात घेतली. अंतर्गत कार्य सुरु केले.

#### १) तुफानी दल आणि गेस्टॅपो यंत्रणेद्वारे विरोधकांचे समूळ उच्चाटन :

विरोधक गुप्तपणे कारवाया, सत्ताधीशाविरोधात कट-कारस्थाने करतात म्हणून तुफानी दल आणि गेस्टॅपो गुप्तहेर यंत्रणेद्वारे त्याचा नाश केला. हिटलर व नाझीविरुद्धचा सुगावा लागताच कडक कारवाई करत असे. सरकार विरोधकांना विनाचौकशी तुरुंगात संशयित गुन्हेगारसं शिक्षा केली जात असे.

#### २) कोटयावधी ज्यूंची निर्दयपणे हत्त्या :

हिटलर आर्यवंशाचा ज्वलंत अभिमानी होता. जगाच्या पाठीवर सर्वश्रेष्ठ वंश आर्यवंश होय.ज्यूंना जर्मनीत राहण्याचा अधिकार नाही. भूतलावर मानवजातीचे रक्तशोषण करणारी ज्यूजमत आहे असे जाहीरकेले. डॉक्टर, वकील, इंजिनीअर, उद्योगपती, प्राध्यापक, शास्त्रज्ञ, शिक्षकइ. ज्यू लोकच काम करत असत. जर्मनीच्या पराभवास ज्यू जबाबदार आहेत म्हणून जर्मनीतून हद्दपार केले. नागरिकत्व, सरकारी नोकरीस बंदी घातली. विवाहबंदी केली. जाहीरपणे कत्तल केली. सामुदायिक हत्त्या करण्यासाठीच गॅस चेंबर नावाचे साधन निर्माण केले. ४० लाख ज्यूंची हत्त्या केली.

#### ३) शैक्षणिक क्षेत्रातील बदल :

हिटलरने आपली हुकुमत सर्वत्र चिरस्थायी होण्यासाठी शिक्षणात बदल केला. नाझी तत्वज्ञानावर आधारित अभ्यासक्रम तयार केला. नाझी मूल्यांचे स्तुतिपाठ, हिटलरचे राष्ट्रीय जीवनातील अद्वितीय स्थान, ज्यूंचा निषेध इ.चा पाठ्यपुस्तकामध्ये समावेश केला. शिक्षक, प्राध्यापक नाझी पक्षाचे, नाझीशी निष्ठा असलेले नेमले. जर्मन संशोधक, विद्वान, विचारवंत यांनी देशत्याग करू नये असे जाहीर केले. देशाबाहेर असलेल्या जर्मन बुद्धिवाद्यांना देशात परत बोलावले. आज्ञेचा भंग केल्यास सर्व मालमत्ता जप्त केली जात असे.

#### ४) लष्करी सुधारणा:

जर्मनीचे तिसरे साम्राज्य प्रस्तापित करणे हिटलरचे महान ध्येय होते, यासाठी सक्तीचे लष्करी शिक्षण सुरु केले. लढाऊ संघटना, तुफानी दल, निमलष्करी दल यांचा सत्ताप्राप्तीसाठी उपयोग केला. सत्तेवर येताच युथ संघटनेस शस्त्रास्त्रे, लष्करी शिक्षण

पुरवले. तरुणास युद्धपिपासू बनवण्यासाठी योग्य वयोमर्यादेनंतर सेनेत भारती केली. वयाच्या १० व्या वर्षापासून लष्करी शिक्षण दिले. आक्रमक साम्राज्यवाद हाच जर्मन जनतेचा मुलभूत हक्क आहे असे शिकवले.

**५) आर्थिक धोरण :**

**१) कामगार-उद्योगपतीचा समन्वय साधण्याचा प्रयत्न :**

पहिल्या महायुद्धानंतर युरोपात बेकारीचा प्रश्न निर्माण झाला स्टेसमनने बेकारीवर विविध योजना तयार केल्या; परंतु त्याच्या मृत्यूमुळे त्या अपयशी ठरल्या. हिटलरने कामगार संघटना नाझीप्रणीत केल्या. साम्यवादी नेत्यांना अटक केले.हिटलरचे आर्थिक धोरण भांडवलशाहीधार्जिणे होते. उद्योगधंद्याचे राष्ट्रीयीकरण, संपावर बंदी, टाळेबंदी बेकायदेशीर अधिकाऱ्यांचे कारखान्यात गैरप्रकार, कामगारांचे गैरवर्तन इ. संदर्भात ''माझा लढा'' यामध्ये माहिती मांडली आहे. कामगार – मालक वाद मिटवण्यासाठी कार्टेस्स याची निर्मिती केली.

**२) बेकारी-निर्मुलानासाठी उपाययोजना :**

उधोगधंदे, कारखाने पूर्ण वेगाने सुरु करून बेकारांना काम दिले.कामाचे तास कमी केले. करमणुकीची साधने उपलब्ध केली. व्हूर प्रदेशातील कोळसा खाणीवर मजूर पाठवले. साम्यवादी ज्यूंना हाकललेले आणि उच्च अधिकाऱ्यांच्या जागी नाझी लोकांची नेमणूक केली. ७० टक्के बेकारांना रोजगार दिला.

**३) परराष्ट्रीय आर्थिक गंगाजळी वृद्धिंगत :**

जर्मनी स्वावलंबी बनवण्यासाठी परावलंबित्व कमी केले. जर्मनीतील माल कमीतकमी वापरून निर्यातीस प्रोत्साहन दिले. मोठया प्रमाणात निर्यात केली व परकीय चलन उपलब्ध केले.

**४) लोकसंखेच्या भस्मासुरास प्रोत्साहन:**

स्त्रियांनी उद्योगधंद्यात काम करणे अयोग्य आहे. त्यांनी बाहेरच्या क्षेत्रात पुरुषांशी स्पर्धा करू नये. गृहकृत्ये करून गृहआघाडी सांभाळावी. देशाच्या प्रगतीला मनुष्यबळाची कमतरता नको म्हणून मुलांना जन्म देण्याचे काम करावे. अनेक मुलांना जन्म देणाऱ्या स्त्रीचा शासनातर्फे सन्मान केला जात असे. अविवाहीतांवर कर ठेवला, संमिश्र विविहास बंदी केली.

**५) शेतीची उज्ज्वलता प्रफुल्लित करण्यात प्रयत्न:**

हिटलरने अन्नधान्यात स्वावलंबी होण्यासाठी उपयोजना केल्या. महायुद्धात पराभवाचे कारण म्हणजे लोकांना अन्नधान्य मिळाले नाही. जर्मनीचा इंचभर तुकडा देखील लागवडीखाली यावा याची काळजी घेतली. रासायनिक खते, तांत्रिक उपाय इ.चा

उपयोग करून शेती उत्पादन दिडपटीने वाढवले. जमिनीची मालकी मोठया प्रमाणात जमीनदाराकडे दिली, त्यामुळे जमिनदरानी हिटलरला पाठींबा दिला.

**६) औद्योगिक क्षेत्रातील उत्कर्ष :**

हिटलरने उद्योगधंद्यातही स्वयंपूर्ण होण्यासाठी दोन योजना तयार केल्या.शास्त्रीय संशोधनाच्या सहाय्याने युध्योपयोगी साहित्याची निर्मिती करणे. अल्सेस-लॉरेन्स प्रदेश फ्रान्सकडे असल्याने कच्चा माल कमी झाला. यावर उपाय म्हणून लोह खनिजांच्या खाणीतून उत्पादनास प्रारंभ केला. शास्त्रीय प्रक्रिया करून उत्पादन वाढवण्याचे आदेश दिले. देशभर पक्के रस्ते, रेल्वेमार्ग, जलमार्ग, समुद्रामार्ग, हवाईमार्ग इ. वाहतूक योग्य होण्यासाठी यंत्रसामग्रीचा वापर केला.

**७) युद्धकलेस अनुकूल वातावरण :**

व्हर्सायच्या तहामुळे अपमानाच्या सुडासाठी युद्ध ही आत्यंतिक व अपरिहार्य गोष्ट आहे.यासाठी शस्त्रास्त्रनिर्मितीचे कारखाने,सक्तीचे लष्करी शिक्षण, निमलष्करी संघटना, क्रीडामंडळे, रायफल क्लब्स इ. साठी युवकांना आव्हान देणाऱ्या संघटना स्थापन केल्या. दुबळे, अपंग, परावलंबी लोक म्हणजे राष्ट्रशरीरास लागलेली व्याधी आहे, असे समजून गोळ्या घालून ठार मारले. वधू –वरांची विवाहापूर्वी वैद्यकीय तपासणी केली जात असे. जर्मनीला कोणत्याही क्षणी युद्ध लढण्यास सज्ज बनवली.

**८) धार्मिक धोरण :**

हिटलरने सर्व विरोधकांचा नायनाट केला. पण ख्रिश्चन धर्मातील कॅथॉलिक व प्रोटेस्टन्ट पंथीयांपुढे नमते घेतले. स्वतः येशूने ज्यूंच्या जुलमांपासून जनतेला मुक्त करण्यासाठी बलिदान केले. हे करणारा येशू संत होता असे हिटलरने प्रतिपादन केले.हिटलर आर्यावंशाचा अभिमानी असल्याने कॅथॉलिकांनी तीव्र विरोध केला. हिटलरने बिशपाना, धर्मप्रचारक इ.ना तुरुंगात टाकले. त्यांचा छळ केला. प्रार्थना, मिरवणुकांवर बंदी घातली पण फारसे यश आले नाही. शेवटी हिटलरने पोंशी करार केला. त्यानुसार १) धर्मगुरूंनी राजकारणात भाग घेऊ नये.

२) धर्मगुरुना सरकारी नोकर समजण्यात यावे .

३) नाझी तत्वज्ञानास विरोध करू नये. केल्यास शिक्षा केली जाईल असे ठरविण्यात आले.

**९) नाझी पक्षाचे शुद्धीकरण :**

राजकीय विरोधकांना नष्ट करून सर्व सत्ता हाती घेतली. लष्करी सेनापतीशी वाटाघाटी करून पाठींबा मिळवला. यामुळे सैन्यात नाराजी निर्माण झाली. ही गोष्ट नाझी संघटनेला आवडली नाही, त्यामुळे हिटलर म्युनिचला गेला. ७२ तासांत ४०० लोकांना गोळ्या घालून आपल्या सहकारी मंडळींची हत्या केली व जर्मनी सैन्याचा रोष दूर केला.

**१०) सत्तेचे वेकेंद्रीकरण :**

हिटलरने वायमर प्रजासत्ताक, संसद, राज्यसंघटना नष्ट केली. त्याचप्रमाणे घटक राज्याचे अस्तित्व नष्ट केले. सर्व सत्ता आपल्या हाती घेऊन सत्तेचे केंद्रीकरण केले.

### ५.२.५ हिटलरचे परराष्ट्रीय धोरण

व्हर्सायच्या तहामध्ये दोस्त राष्ट्रांनी स्वतःचा स्वार्थ साधला होता. स्वतःची युद्धातील हानी भरून काढण्यासाठी पराभूत राष्ट्रांकडून जास्तीत जास्त नुकसान भरपाई घेतली. त्यामुळे दोस्तांबद्दल द्वेष, सुडाची भावना निर्माण झाली. इ.स.१९१३ मध्ये हिटलर सत्तेवर आल्यानंतर व्हर्साय तहविरोधी धोरण स्वीकारले.

हिटलरचे परराष्ट्रीय धोरणाचे स्वरूप व ध्येय : राष्ट्र म्हणजे परमेश्वर ही नाझीच्या तत्वज्ञानाची शिकवण. राष्ट्राकरिता व्यक्तीने त्याग केला पाहिजे ही अपेक्षा होती. आंतरराष्ट्रीय प्रश्न शेवटी पाशवी बळानेच सुटतात हा सिद्धांत मांडला. सर्व वंशात आर्यवंश सर्वश्रेष्ठ असल्याने जग जिंकण्याचा व राज्य करण्याचा अधिकार आर्यवंशाला आहे ही श्रद्धा.

**हिटलरचे प्रमुख ध्येय:**

अ) व्हर्सायतहाची राखरांगोळी करणे.

ब) जर्मन वंश सर्वश्रेष्ठ असून त्याचे एकीकरण करूनच बडया राष्ट्राचा दर्जा प्राप्त करून देणे.

क) दोस्तांनी घेतलेल्या वसाहती परत मिळवणे.

ड) फ्रांस कायमचा शत्रू असल्याने ते कायमचे नष्ट केले पाहिजे.

**१) व्हर्साय तहाच्या चिंधड्या केल्या:**

नाझीने सत्ता घेतल्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणास धोका निर्माण झाला. व्हर्सायच्या तहाने जर्मनीची अवहेलना झाली म्हणून तो तह नष्ट केला पाहिजे, हे हिटलरने जाहीर केले.जराम्न राष्ट्राच्या सीमा माणसांनी तयार केल्या आहेत. त्या माणसांनाच बदलण्याचा अधिकार आहे असे जाहीर करून राष्ट्र संघांची सामुदायिक सुरक्षित पद्धत दुबळी आहे हे दाखवून दिले. व्हर्सायचा तह पायाखाली तुडवून जर्मनीला आक्रमक बनवले.

**२) ऑस्ट्रीयाचे विलीनीकरण (१२ मार्च १९३८):**

व्हर्साय तहाने ऑस्ट्रीया- हंगेरीचे साम्राज्य नष्ट करून दुबळे बनवले. आर्थिक मंदीमुळे अधिक फटका बसला. फ्रान्सचा जर्मन- ऑस्ट्रीया एकीकरणास विरोध होता. युद्धानंतर ख्रिश्चन सोशॅलिस्ट पक्षाचा नेता डॉ.एंगलबर्ड डॉल्फस याचे इ.स.१९३२ मध्ये सरकार स्थापन झाले. नाझी पक्षाच्या पाठींब्यामुळे नॅशनल सोशॅलिस्ट पक्षाने डॉ. डॉल्फसवर दडपण आणले. ऑस्ट्रीयात नाझी पक्षाने २५ जुलै १९३४ रोजी व्हिएन्नात उठाव केला.

डॉ.डॉल्फसचा खुन झाला. अपुऱ्या लष्करामुळे उठाव अपयशी झाला.१२ मार्च १९३८ रोजी हिटलरने सैन्य पाठवून ऑस्ट्रीयाचा जर्मन साम्राज्यात समावेश केला.

### ३) सार प्रांताचे विलीनीकरण (१३ जाने.१९३५) :

व्हर्सायच्या तहानुसार सारा खोऱ्यात सार्वमत घेऊन साराचे भवितव्य ठरवणे असे ठरले होते. साराचे विलीनीकरणाच्या उद्दिशाने हिटलरने वातावरण तयार केले.१३ जानेवारी १९३५ रोजी सार्वमत घेतले व ९० टक्के जर्मनीच्या बाजुने जनतेने कौल दिला आणि सारा प्रांताचे विलीनीकरण केले.

### ४) जर्मनीचे पुनर्लष्करीकरण (१६ मार्च १९३५) :

शांतता तहावर स्वाक्षऱ्या करणाऱ्या व्यक्ती वेगळ्या असल्याने तहातील अटींचे बंधन आपण मानणार नाही, असे हिटलरने जाहीर केले. तहामुळे आमच्या भूमीवर अन्याय झाला आहे ते प्राणपणाने दूर करण्यात येतील. त्यानुसार ऑक्टोबर १९३३ ला जागतिक निःशस्त्रीकरण परिषदेतून जर्मनीने त्याग केला.राष्ट्रसंघाचा राजीनामा दिला. जर्मनीएवढीच इंग्लंड-फ्रान्सला शस्त्रवाढीची परवानगी द्यावी, परंतु हिटलर ने त्यास नकार दिला. १६ मार्च १९३५ रोजी घोषित केले की शांतता तहातील निःशस्त्रीकरणाची कलमे धुडकावून लावून जर्मनी पुन्हा लष्करीकरण करील. इंग्लंड, फ्रान्स, इटली यांना स्ट्रेसापरिषदेत जर्मनीला दोषी ठरवले. जर्मनीच्या धोरणासाठी फ्रांको-रशिया आणि रशिया-झेकोस्लोव्हाकिया तह करण्यात आला.

### ५) अँग्लो-जर्मन नाविक करार (१८ जुन १९३५ ) :

जर्मनीविरुद्ध फ्रान्स, रशिया, झेकोस्लोव्हाकिया यांच्यात करार झाला. इंग्लंडशी सागरी श्रेष्ठत्वाबद्दल स्पर्धा न करण्याची हिटलरने जाहीर केले. त्यामुळे १८ जून १९३५ रोजी इंग्लंड-जर्मनी यांच्यात नाविक करार झाला. इंग्लंडच्या ३५ टक्के जर्मनीची नाविक दलाची संख्या असावी असे ठरले.

### ६) पोलंड-जर्मनी करार (२६ जानेवारी १९३४) :

पोलंडमधील जर्मन अल्पसंख्याकांवर पोलिश सरकार अन्याय करीत असल्याची तक्रार राष्ट्रसंघाकडे केली होती. हिटलरने पोलिश सरकारशी स्नेहाचे धोरण स्वीकारले. कारण राष्ट्रसंघाच्या संनदेवर १९३३ मध्ये विश्वास व्यक्त केला होता, जर्मनीला लष्कारीकरणाची परवानगी मिळाली होती. इंग्लंड-फ्रान्सशी संबंध बिघडल्यास राजकारणात एकटे पडू नये म्हणून मैत्रीची गरज होती. ज्यूंच्या कत्तलीमुळे रशियाचे संबंध खराब झाले होते. यामुळे जर्मनीने पोलंडशी १० वर्षाचा अनाक्रमणाचा करार २६ जानेवारी १९३४ मध्ये केला.

### ७) ऱ्हाईनलँडवर ताबा (७ मार्च १९३६) :

अँग्लो-जर्मन नाविक करारानंतर शस्त्रोत्पादानात प्रचंड वाढ केली. भूदल, हवाईदल, आरमार सुसंघटित केले. व्हर्सायच्या तहाने ऱ्हाईनलँडनिर्लष्करी टापू बनवला होता.

लोकांनी तहात या प्रदेशात लष्करीकरणास मान्यता मिळाली. हिटलरने ७ मार्च १९३६ रोजी ऱ्हाईनलँडमध्येसैन्य पाठवून त्याचा ताबा घेतला. या कृत्याचा राष्ट्रसंघाने निषेध केला.

**८) इटली-जर्मनी समेट (२५ ऑक्टोबर १९३६) :**

फ्रान्स-रशियाचे स्नेहसबंध अशक्य होते. इंग्लंडच्या मैत्रीचा विश्वास नव्हता. युद्ध परिस्थितीत विश्वासू मित्र म्हणून इटलीची निवड केली. मुसोलिनीला जर्मनीची भीती होती. कारण इटलीच्या बाल्कन प्रदेशात जर्मन प्रवेश करेल. याचप्रमाणे राष्ट्रसंघाने इटलीला दोषी ठरवले. यातून मैत्री समेत झाला. व्हर्साय तहाने इटलीची फसवणूक झाली होती. लंडन तहानुसार इटलीला बळकावलेला प्रदेश देण्यास दोस्तानी विरोध केला. हिटलर-मुसोलिनी यांची तात्विक भूमिका एक होती, त्यामुळे त्यांच्यात समेट झाला.

**९) जनरल फ्रँकोच्या यादवीला पाठींबा (१९३९):**

स्पेनमध्ये लोकशाही राजवटीमुळे सत्तेसाठी यादवी सुरु झाली. रशियाने आर्थिक मदत साम्यवाद्यांना केली तर जनरल फ्रँकोच्या यादवीत भाग घेतल्याने इटली, जर्मनीने त्याला मदत केली. इ.स.१९३९ मध्ये जनरल फ्रँकोचा विजय झाला व तो स्पेनचा प्रमुख बनला.

**१०) ॲन्टिकॉमिन्टर्न करार व रोम–बर्लिन-टोकियो अक्ष (१९३६) :**

हिटलरने साम्यवादाला विरोध करून पाश्चिमात्य राष्ट्रांची सहानुभूती मिळवली.जनरल फ्रँकोला मदत केली, त्यावेळी इटलीशी घनिष्ट संबंध आला. रोम-बर्लिन एकजूट निर्माण झाली. जपान साम्यवादाचा कट्टर विरोधक असल्याने हिटलरने २५ नोव्हेंबर १९३६ रोजी जपानबरोबर करार केला. इटलीने या करारात इ.स.१९३६मध्येप्रवेश केला. त्यामुळे रोम-बर्लिन-टोकियोअक्ष/ॲन्टिकॉमिन्टर्स साम्यावादाविरोधी करार झाला.

**११) सुडेटन प्रदेशाचा ताबा (३० सप्टेंबर १९३८) :**

युरोपातील युद्ध टाळण्यासाठी इंग्लंड, फ्रान्स यांनी मध्यस्थीचे धोरण स्वीकारले.५० टक्के जर्मन वंशीय प्रदेश जर्मनीला द्यावा असे इंग्लंड, फ्रान्स नेत्यांनी सांगितले; परंतु झेक सरकारने त्याला विरोध केला. हिटलरने १० दिवसांची मुदतवाढ दिली. झेक सरकारने लक्ष दिले नाही.फ्रॅंकलिन-डी-रूझवेल्टने तोडगा म्हणून वाटाघाटीतून शांतता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यातून म्युनिच करार ३० सप्टेंबर १९३८ रोजी झाला. फ्रेंच पंतप्रधान उलाडीयर, मुसोलिनी, चेंबरलेन, हिटलर यांची २९ सप्टेंबर १९३८ रोजी म्युनिच येथे भेट झाली व करार झाला. त्या काराराला नुसार म्युनिच करार म्हणतात.तो पुढीलप्रमाणे -

१) स्थलांतर १ ऑक्टोबरपासून सुरु होईल.

२) १० ऑक्टोबरपर्यंत स्थलांतर करण्यास परवानगी, इमारती, यंत्रणा नष्ट करू नये असे करारात ठरले.

३) जर्मनी, ब्रिटन, फ्रान्स, इटली, झेकोस्लोव्हाकियाचे आंतरराष्ट्रीय मंडळ स्थापन करावे.

४) मंडळाकडून सीमारेषा ठरवाव्यात.

५) चार सप्ताहांच्या आत सुडेटन मुक्त करावा. म्युनिच कराराचे झेक सरकारवर दबाव आणला व १ ऑक्टोबरला जर्मन सेना सुडेटनमध्ये घुसल्या आणि सुडेटन प्रांताचा पूर्ण ताबा घेतला.

**१२) झेकोस्लोव्हाकियाचा संपूर्ण ताबा (२३ मार्च १९३९) :**

हिटलरने जर्मन वंशाचे एक साम्राज्य निर्माण करण्यासाठी ऑस्ट्रिया, सुडेटन प्रांत ताब्यात घेतला. त्यानंतर झेकोस्लोव्हाकियाच्या अंतर्गत अशांतता निर्माण केली. १५ मार्च १९३९ रोजी हिटलर स्वतः प्रागमध्ये हजर होता. बोहेमिया, मोरेव्हिया, स्लोव्हाकिया जर्मनीकडे रुथेनिया हंगेरीस जोडला. झेकोस्लोव्हाकिया २३ मार्च १९३९ रोजी जर्मनीच्या अंकित केल्याचे जाहीर केले.

**१३) मेमेल बंदराची प्राप्ती (२३ मार्च १९३९) :**

हिटलर पूर्व प्रशियाच्या उत्तर सीमेवर मेमेलच्या पट्ट्याकडे लक्ष वळवले. २० मार्च १९३९ रोजी हिटलर रिबेनट्रॉपला लिथुनियात पाठवून मेमेल प्रदेश हस्तांतरित करण्याचा आदेश दिला. त्यानंतर विनातक्रार २३ मार्च १९३९ रोजी मेमेल बंदर हिटलरला दिले.

**१४)रशिया-जर्मनी अनाक्रमाणाचा करार (२४ ऑगस्ट १९३९) :**

हिटलरने रशियाच्या स्टॅलिनशी गुप्त संधान बांधून प्रथम जर्मनी-रशिया व्यापारी करार केला. पुढे अनाक्रमाणाचा करार १० वर्षासाठी करून जगाला आश्चर्याचा जबर धक्का दिला. त्यानुसार (१) दोघांपैकी एकावर हल्ला झाल्यास दुसऱ्याने तटस्थ राहावे. (२) परस्परांवर आक्रमण करू नये. या करारामुळे साम्यवादीविरोधी कराराचा शेवट झाला.

**१५) पोलंडवर आक्रमण व दुसऱ्या महायुद्धाची सुरुवात:**

पोलंडशी इ.स.१९३४ मध्ये अनाक्रमाणाचा तह केला. हिटलरने पोलंडकडे अनेक मागण्या केल्या. त्यामध्ये डॅझिंग बंदर जर्मनीला द्यावे. पूर्व प्रशियाला जाण्यासाठी कॉरिडॉरमधून प्रवेश द्यावा. डॅझिंग बंदर मुक्त ठेवले जाऊन पोलंडचे आर्थिक हितसंबंध सुरक्षित ठेवू, या त्या मागण्या होत्या. जर्मन अल्पसंख्याकावर पोलिश सरकार अत्याचार करत आहे, असा आरोप हिटलरने केला. पोलंडने हिटलरच्या मागण्यांना नकार दिला. अखेर २९ ऑगस्ट १९३९ रोजी संपूर्ण पोलांडची मागणी हिटलरने केली. पोलंडने त्यालाही नकार दिला. त्यामुळे हिटलरने १ सप्टेंबर १९३९ रोजी पोलंडमध्ये सैन्य पाठवले. हिटलरला या कृत्यामुळे ३ सप्टेंबर १९३९ रोजी इंग्लंड, फ्रान्स जर्मनीशी युद्ध पुकारले आणि दुसऱ्या महायुद्धाला प्रारंभ झाला.

**आपली प्रगती तपासा :**

प्र.१ हिटलरचे परराष्ट्रीय धोरण दुसऱ्या महायुद्धास जबाबदार होते का?

## ५.३ सारांश

पहिल्या महायुद्धानंतर जर्मनीवर व्हर्सायचा तह लादला गेला.तो तह नष्ट करण्याचा जर्मनीने प्रयत्न केला. त्यामुळे जर्मनीबरोबर इटालीतही हुकुमशाही उदयास आली. त्यांनी आपला देश सामर्थ्यशाली बनण्यासाठी अंतर्गत व परदेशी धोरण आक्रमक स्वरूपाचे राबवले.त्यातूनच दुसरे महायुद्ध सुरु झाले.

## ५.४ प्रश्न

प्र.१ हिटलरचे अंतर्गत धोरण स्पष्ट करा.

प्र.२ हिटलरच्या परराष्ट्रीय धोरणाचे टीकात्मक परीक्षण करा.

## ५.५ संदर्भ

१) डॉ. अनिल कठारे -विसाव्या शतकातील जगाचा इतिहास
२) डॉ. अनिल कठारे- आधुनिक जगाचा इतिहास
३) पी.जि. जोशी - आधुनिक जगाचा इतिहास
४) डॉ. सुमन वैद्य, डॉ. शांता कोठेकर- विसाव्या शतकातील जग (१९१४-१९४५) भाग-१
५) डॉ. सुमन वैद्य, डॉ. शांता कोठेकर- विसाव्या शतकातील जग (१९४६- २०००) भाग-२
६) डॉ. अनिरुद्ध , प्रा. गजानन भिडे-आधुनिक जगाचा इतिहास
७) जैन हुकूमचंद आणि कृष्णा माथुर- आधुनिक जगाचा इतिहास
८) कदम य.न. - विसाव्या शतकातील जगाचा इतिहास
९) कुलकर्णी अ.र. आणि देशपांडे-आधुनिक जगाचा इतिहास- भाग-1 & २
१०) साकुरे विजयानंद, अनिल कठारे-जागतिक इतिहासातील स्थित्यंतरे
११) उदगावकर म.न. आणि गणेश राउत- आधुनिक जग

❖❖❖❖

# ६

## जपानमधील लष्करवाद

**घटक रचना**

६.० उद्दिष्ट्ये

६.१ प्रस्तावना

६.२ जपानमधील लष्करवादाचा उदय व विकास

६.३ जपानच्या लष्करवादाच्या काळातील घटना

६.४ प्रश्न

६.५ संदर्भ

### ६.०. उद्दिष्ट्ये

- जपानमधील लष्करवादाच्या उदयाची कारणे अभ्यासणे.
- लष्करवादाच्या काळातील घटना.

### ६.१ प्रस्तावना

हिटलरच्या आक्रमक धोरणामुळे दुसरे महायुद्ध सुरु झाले. याच वेळी महायुद्धात अनेक घटक जबाबदार होते. त्यातूनच महायुद्ध सुरु झाले. युद्ध सुरु झाल्यापासून युद्ध आघाडी व राजनैतिक पातळीवर लढले गेले. त्यामुळे जर्मनीचा व तिच्या गटाचा पराभव झाला. या युद्धामुळे संपूर्ण जगावर परिणाम झाले.त्याचा एक भाग म्हणून राष्ट्रसंघ नष्ट करून जागतिक शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी संयुक्त राष्ट्संघटना स्थापन करण्यात आली. या संघटनेच्या माध्यमातून अनेक राजकीय व अराजकीय स्वरूपाचे कार्य करण्यात आले. अजूनही ही संघटना कार्य करत आहे.

### ६.२. जपानमधील लष्करवादाचा उदय व विकास

जगाच्या इतिहासाचा अभ्यास करताना इतिहासकार जपानच्या इतिहासाला महत्वाचे स्थान देतात कारण मेईजी क्रांतीपासून ते आधुनिक काळापर्यंत जपानने वेळोवेळी अनेक संकटात आपली प्रगती घडवून आणली. आशियातील या लहानशा राष्ट्राने अतिशय कमी वेळात केलेले प्रचंड भरभराट ही खरोखर आश्चर्याची गोष्ट होती. या प्रगतीचे श्रेय जपानी लोक धाडशी, पराक्रमी, महत्वाकांक्षी, काटक व प्रचंड राष्ट्रवादी असल्याने राष्ट्रासाठी कायम त्याग करण्याची भावना त्यांनी ठेवली. देशाच्या सार्वभौमत्वाबद्दल कधीही तडजोड स्वीकारली नाही.आपल्या अंतर्गत प्रगतीसाठी पाश्चात्य राष्ट्रांची कोणतीही मदत स्वीकारली नाही. तसेच पाश्चात्यांच्या राजकीय तत्वज्ञानाचाही स्वीकार

केला नाही.त्यामुळेच जपानवर कोणतेही युरोपियन राष्ट्र आपला हक्क बजावू शकले नाही.

सम्राट मेईजीच्या मृत्युनंतर जपानच्या राजकारणात सम्राट जन्रो, राजकीय पक्ष, लष्कर, प्रशासन झैबस्तू ही महत्वाची सत्ताकेंद्रे होती. सम्राट घटनाप्रमुख होता व इतर सत्ताकेंद्रे प्रभावगट प्रयत्नशील होता. जन्रो नेते पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीपर्यंत प्रभावी होते. जन्रोकडे प्रशासनाची, राजकीय पक्षांची तसेच समाप्तीबरोबर नियंत्रणाची सूत्रे होती. पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीबरोबरच राजकीय पक्ष व प्रशासन यांच्या सहकार्याचा काळ सुरु झाला आणि जन्रोचे महत्व कमी झाले.

इ.स.१९३० नंतर जपानमधील राजकारणाचा सत्तासमतोल लष्कराच्या बाजूने झुकू लागला. सम्राटाबरोबर प्रत्यक्ष संपर्क साधण्याची परवानगी लष्करातील सर्वोच्च अधिकाऱ्यांना होती. मंत्री मंडळ बनवण्यामध्येही ते साक्रिय असत. जपानी लष्कराची स्वतःची प्रशिक्षण यंत्रणा होती.या लष्कराने आंतरराष्ट्रीय क्षेत्रात महत्वाच्या कामगिऱ्या पार पाडलेल्या असल्याने सर्वसामान्य जनतेत लष्कराबद्दल सहानुभूती होती.त्यामुळे हळूहळू जपानमध्ये लष्कराचे महत्व वाढू लागले,१९३१ ते १९४१ या काळात लष्कराचा मोठा दबदबा जपान मध्ये निर्माण झाला.

### ६.२.१. लष्करवादाच्या उदयाची कारणे

#### १) मेईजी क्रांती:

१८६८ मध्ये शोगुनशाहीचा आणत होऊन सम्राट मुत्सोहीतांच्या कारकिर्दीला सुरुवात झाली. त्याच्याच काळात मेईजी क्रांतीला प्रारंभ झाला. सम्राटाच्या प्रभावी नेतृत्वामुळे जमीनदार, सरंजामदार, सामुराई या सर्वांनी आपले परंपरागत अधिकाराच्या दोरार व जपानी लोकांच्या सहकार्याने जपानची आर्थिक, राजकीय व सामाजिक क्षेत्रात प्रचंड प्रगती घडून आणली. पुढील ३० वर्षाच्या काळात जपानची औद्योगिक,शैक्षणिक लष्करी प्रगती ही युरोपियन राष्ट्रांच्या वर्चाद झाली. जपानमधील कारखान्यात प्रत्येक वस्तूंचे उत्पादन होऊ लागले, दळणवळण वाढले, आरमाराचीताकद वाढली. हे सर्व करताना पाश्च्यात्य राष्ट्रांकडून कर्ज किंवा इतर साहय्य जपानने घेतले नाही,आपली संस्कृती परंपरा, चालीरीती, धर्म कायम ठेवून जपानने आधुनिकीकरण घडवून आणले.याच काळात संपूर्ण आशिया व आफ्रिका खंडात पाश्चिमात्यांची वसाहतवादी स्पर्धा वाढलेली होती. शक्तिशाली बनलेल्या जपानला देखील या स्पर्धेत उतरावेसे वाटू लागले.जपानचा विस्तार घडवून आणावा असा साम्राज्यवादी विचार प्रसिद्ध होऊ लागला.त्यातूनच जपानने आक्रमकवाद स्वीकारला. या आक्रमक धोरणात तर त्यांना प्रमाणापेक्षा जास्त यश मिळत गेले म्हणून जपानची महत्वाकांक्षा वाढत गेली व काही काळातच जपान लष्करवादी वृत्तीचा बनला.

#### २) लष्कराचे आधुनिकीकरण :

मेईजी युगातच लष्कराकडे अधिक अधिक लक्ष पुरवले गेले होते. जपानमध्ये पूर्वीपासून सामुराई वर्ग लष्करी वर्गात कार्य करीत असे परंतु सम्राटाने सरंजामशाही नष्ट करून सामुराई वर्गाचे पुनर्वसंन घडवून आणले. त्यामुळे लष्करात आमुलाग्र बदल घडून

आले.इ.स.१८७३ मध्ये सैन्याची द्वारे सर्वांकरिता उघडण्यात आली. सामुराई लोकांना दूर न करता पायदळ, नाविकदलात व पोलीस दलात त्यांना महत्वाची पडे दिली. सामुराईना योग्य जागा मिळाल्यामुळे त्यांनी प्रामाणिकपणे देशाच्या विकासाला हातभार लावला.सम्राटाने सक्तीची लष्करभरती करून राष्ट्रीय सेना उभारली.या सैन्याला युरोपियन आधुनिक शिक्षण देण्याची तरतूद केली. त्यासाठी जर्मन व फ्रेंच लष्करी अधिकाऱ्यांच्या नेमणुका केल्या अनेक शस्त्रास्त्रांचे व दारूगोळ्याचे कारखाने काढले. समुद्राचा उपयोग करून भव्य आरमार उभारले.जपानमध्ये आधीपासूनच लष्कराबद्दल आदर असल्याने अनेक धाडशी तरुण लष्करात भरती झाले. प्रबळ लष्कर निर्मितीमुळे लष्करवादाला चालना मिळाली.

**३) जपानचे विजय व राष्ट्रनिष्ठेत वाढ :**

मेईजीच्या क्रांतीमुळे आधुनिक बनलेल्या व प्रबळ लष्करी ताकद निर्माण झालेल्या जपानने कोरियासारखा समृद्ध प्रदेश मिळवण्यासाठी चीनविरुद्ध १ ऑगस्ट १८९४ रोजी युद्ध पुकारले. आकाराने व विस्ताराने बलाढय असलेल्या चीनवर आक्रमण करण्याचे धैर्य जपानने दाखवल्याने जगालाही आश्चर्य वाटले. जपानने या युद्धाला चीनचा प्रभाव करून सर्वांना मोठा धक्का दिला. या विजयामुळे जपानला पार्टऑर्थर, ला ओतुंग द्विपकल्प, फार्मोसा, पेस्काडोर्स ही महत्वाची बंदरे व युद्धखंडणीही मिळाली.या विजयामुळे जपानी जनतेला व लष्कराचा आत्मविश्वास मोठ्या प्रमाणात वाढला. जपानच्या अंतर्गत राजकारणात लष्करी नेत्यांना महत्व प्राप्त झाले.आशियात जपानने विस्तारवादी धोरणाचा पाया घातला.

जपानच्या या विजयाची दखल बडया बडया युरोपियन राष्ट्रांनी घेतली. आशिया खंडात रशियाने विस्तार करण्यास सुरुवात केली. जपानच्या विजयामुळे रशियाला राग आला होता त्यामुळे त्याने फ्रान्स व जर्मनीच्या साहाय्याने जपानवर दबाव आणून पोर्टऑर्थर व लाओतुंग व्दिप्कल्प चीनला परत देण्यास भाग पाडले. या घटनेमुळे जपानमध्ये रशियाविरुद्ध असंतोषाची लाट पसरली. आपल्या सैनिकांनी विजय मिळवून प्रदेश जिंकायचे पण आंतरराष्ट्रीय दबावाने ते परत करायचे याला जपानने विरोध केला. रशियाचा धोका इंग्लंडच्या आशियातील वसाहतींना निर्माण झाल्यामुळे रशियाविरुद्ध इंग्लंड जपान यांच्यात १९०२ मध्ये मैत्री तह झाला. तहामुळे जपानच्या आक्रमकवादास बळकटी मिळाली व जपानने १९०४-०५ मध्ये रशियाचा पराभव करून आपल्या अपमानाचा पुरेपुर बदला घेतला. पोर्टस्माउथच्या तहाने जपानच्या कोरियातील हितसंबंधाना रशियाने मान्यता दिली. साखळीत बेट जपानला मिळाली. या युद्धात जपानी लष्कराच्या ऐक्यामुळे व प्रबळ राष्ट्रंभावनेमुळे विजय मिळाला होता. लष्करी विजयामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात जपानचे महत्व वाढले. जपानचे आरमार इंग्लडच्या खालोखाल महत्वाचे मानले जाऊ लागले. या घटनेमुळे जपानी लष्करवादास खतपाणीच मिळाले.

इ.स. १९१० मध्ये जपानने कोरियाचा ताबा घेतला व पाहिल्या महायुद्धात मोठ्या आत्मविश्वासाने दोस्त राष्ट्रांच्या बाजूने प्रवेश केला. दोस्त राष्ट्रांनाही जपानचे महत्त्व पटले आहे. पाहिल्या महायुद्धाचा फायदा घेऊन जपानने जर्मनीचे अनेक प्रदेश जिंकले.

चीनवर वर्चस्व निर्माण करण्यासाठी २१ मागण्या चीनकडे पाठविल्या. त्यातील काही मागण्या चीनने मान्य केल्या. या महायुद्धात जपानचे काहीही नुकसान झाले नाही व त्याची ताकद अधिक वृद्धिंगत झाली. जपानने वरील विजयांमध्ये मिळालेल्या आर्थिक फायद्याचा उपयोग लष्करी ताकद वाढवण्यासाठी केला. युद्धानंतर पॅरीस शांतता परिषदेत जपानला पाहिल्या पाच महासत्तांमध्ये स्थान मिळाले. त्यामुळे अधिकच आक्रमक बनला गेला.

**४) जपानची राजकीय स्थिती :**

जपानमध्ये लोकशाहीचा स्वीकार केला गेलेला होता. इ.स.१९१८ ते १९३२ या १५ वर्षाच्या काळात १२ मंत्रीमंडळे सत्तेवर आली होती. निरनिराळ्या राजकीय पक्षांनी आपली मंत्रिमंडळ स्थापन केली होती. ही मंत्रीमंडळे कधी अल्पमतातील तर कधी सयुंक्त होती.या मंत्रिमंडळानी उदारमतवादी धोरणाचा स्वीकार केला.लोकशाही व्यवस्था बळकट करण्याचा प्रयत्न केला या लोकांना लष्करी नेत्यांचे वर्चस्व नको होते.लोकशाही व्यवस्था बळकट नको होते त्यामुळे लष्करी सत्तेला राजकीय क्षेत्रापासून दूर ठेवण्याचा त्यांना वेळोवेळी प्रतत्न केला. त्यातून संघर्षमय स्थिती निर्माण झाली.

पहिल्या महायुद्धानंतर लोकशाहीचा प्रयोग जपानमध्ये उत्साहाने सुरु झाला.हाराताकाशी या सेसुकाई पक्षाच्या नेत्यांचे सरकार १९१६ ते २१ या काळात स्थापना झाले परंतु झेबत्सू या धनीक संघाच्या कृपाछत्रामुळे व आर्थिक गैरव्यवहारामुळे हे मंत्रिमंडळ बदनाम झाले. १९२२ ते २४ या काळात तीन मंत्रिमंडळ आरमारी अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली कशीबशी टिकली.त्यानंतर कातोमेकाई या केनासिकाई पक्षाचा नेता पंतप्रधान झाला. त्याने सैन्यादालाची कपात व सरकारी खर्चात काटकसर करण्याचे धोरण स्वीकारल्याने लष्करात असंतोष पसरला.१९२७ मध्ये जनरल तनाका अधिकारावर आला पण त्याला राजीनामा द्यावा लागला.१९२९ मध्ये थामागुची ओसाची हा पंतप्रधान बनला, त्याच्या मंत्रिमंडळाने आरमाराचे बळ कमी करण्याचा निर्णय घेतल्याने त्याचा खुन झाला.

या सर्व घटनांचा अर्थ इतकाच होता की जपानमध्ये लोकशाहीला अपयश येत चालले होते.जपानी लोकांनी सुरवातीपासून लोकशाहीला पाठींबा दिला नाही. मंत्रीमंडळाच्या अपयशामुळे त्यामध्ये भर पडत गेली.आंतरराष्ट्रीय दबावापुढे लोकशाही सरकार अनेकवेळा झुकल्याने सतत विजय मिळवीत असलेल्या लष्कराच्या लोकांनी अधिक पाठींबा दिला. त्यावेळी जपानमध्ये Fox and lion चे तत्त्वज्ञान प्रसिद्ध झाले. लष्करातील विजय मिळवणारे नेते व सैनिक सिह आहेत आंतराष्ट्रीय दबावापुढे झुकणारे लोकशाहीचे नेते कोल्हे आहेत. प्रचार सुरु होऊन १९३० नंतर लष्करशाहीची वाढ होत गेली.

**५) झैबत्सू गटाचे कार्य :**

जपानच्या इतिहासात झैबत्स्तूहे नाव महत्वाचे मानले जाते. या गटाची निर्मिती मेईजी क्रांतीपासून झाली. मेईजी क्रांतीत सामुराई गटाचे महत्व कमी झाले. त्यामुळे या वर्गाने उद्धयोगधंद्यांच्या क्षेत्रात प्रवेश केला. सामुराई गटाचे महत्व कमी झाले. त्यामुळे या वर्गाने उद्योगधंद्याच्या क्षेत्रात प्रवेश केला. सामुराई जमात मुळातच हुशार असल्याने त्यांनी

आर्थिक क्षेत्राला नेतृत्व देऊन योग्य शिस्त लावली.देशाच्या राजकारणात पूर्वीपासूनच या जमातीला महत्त्व असल्याने त्यांचा आर्थिक व राजकीय क्षेत्रातील उच्चपदस्थांशी जवळचे संबंध निर्माण झाले. त्यातूनच झैबत्सू या उद्घोगसमूहांचा उदय झाला. या झैबत्सू गटाने स्वतःच्या मालकीचे औद्धोगिक संस्थांचे जाळे संपूर्ण देशभर निर्माण केले. या उद्योगसमूहामध्ये जपानमध्ये कोट्याधीश २० कुटुंबाचा समावेश होता. यापैकी मित्सुई, मित्सुबिशी, सुमितोमा, ही सुध्दा चार कुटूंब अतिशय महत्वाची होती. त्यांनी निर्माण केलेले उद्योगसमूह प्रचंड होते. या संघटनेतील घटकांनी उच्च नेत्यांचे राजकीय वर्चस्व वाढवण्याचे काम केले. या वर्गाच्या कामगिरीमुळे जपानने औद्योगिकरण, दळणवळण, शेतीची प्रगती, कापड व्यवसाय, वीजनिर्मिती, खनिज उद्योग, बँका या सर्व क्षेत्रात प्रचंड प्रगती घडून आली. या प्रगतीमुळेच लष्करी ताकदही वाढली.

१) **जपानची आर्थिक स्थिती:**

१९२७ मध्ये जपानी आर्थिक स्थिती समाधानकारक नव्हती. बडे उद्योगपती व व्यापारी मोठ्या प्रमाणात नफा कमवीत होते. परंतु सर्व साधारण जनतेला राष्ट्रीय संपत्तीचा योग्य वाटा मिळत नव्हता.१९२९ मध्ये आलेल्या जागतिक मंदीने जपानला भयाचे आर्थिक संकटाला तोंड द्यावे लागले. जपानी निर्यातीत ५० टक्के घट झाली.देशात बेकारी वाढली,तांदुळाचे भाव कमी होत गेले.जपानच्या उत्तर पूर्व भागात अन्नधान्याची टंचाई निर्माण झाली. शेकडो लोक उपासमारीने मेले.१९३१ मध्ये सरकारने सुवर्णमुद्रा रद्द केल्याने थोडीफार परिस्थिती बदलली. निर्यातीत वाढ झाली असली तरी परकीय गंगाजळी आटल्याने आर्थिक व औद्योगिक क्षेत्रावर वाईट परिणाम झाले. आंतरराष्ट्रीय सहकार्याची भावना कमी होत असल्याने जपानी नेत्यांना साम्राज्यवादाचा पुरस्कार करण्याची गारच वाटू लागली.

एका बाजूला आर्थिक परिस्थिती बिघडलेली असताना दुसऱ्या बाजूला जपानची लोकसंख्या वाढत चालली होती. पाश्चत्य राष्ट्रांनी स्थलांतरण कायदे केलेल्या जपानी लोकांना परकीय प्रवेश बंद झाला.त्यामुळे अतिरिक्त लोकसख्येची समस्या निर्माण झाली. यातून सुटण्यासाठी जपानसमोर तीन मार्ग होते आणि ते म्हणजे परदेशगमन जागतिक बाजारपेठेत शिरकाव व प्रादेशिक विस्तार. परकीयांना जपानच्या परदेश वास्तव्यावर बंधने घातल्यामुळे पहिला मार्ग शक्य नव्हता, जकातीचे दर वाढल्यामुळे व जागतिक व्यापारी करार रद्द झाल्याने जागतिक बाजारपेठेत टिकाव धरणे कठीण होते.त्यामुळे जपानने तिसरा मार्ग म्हणजेच विस्तारवादी धोरण स्वीकारावे अशी मागणी होऊ लागली.या धोरणातून लष्करशाहीला चालना मिळाली.

**७) लष्करी तत्त्वज्ञानाचा प्रसार:**

पहिले महायुद्ध ते दुसरे महायुद्ध या काळात हुकुमशहाचा कालखंड निर्माण झाला होता. रशियात साम्यवादी, इटलीत फॅसीस्ट व जर्मनीत नाझी या हुकुमशाही सत्ता निर्माण झाल्या.या सर्वाचे स्वरूप आक्रमक होते.अशाच स्वरुपाची लष्करी हुकुमशाही जपानमध्ये उदयास होऊन नवे राष्ट्रीय तत्त्वज्ञान निर्माण केले.पाश्चिमात्य किराणामुळे जपानच्या नागरी जीवनात बदल झाले पण राजकीय पक्ष बदनाम झाले. त्यामुळे नवे

राष्ट्रीय तत्त्वज्ञान प्रभावी ठरले. जपानमध्ये सामुराई व शेतकरी यांना महत्वाचे स्थान होते. औद्योगिकरणामुळे इंग्लंड अमेरिकेसारख्या राष्ट्रात नवीन वर्ग तयार झाला होता.तसे जपानमध्ये घडले नाही. झैबत्सू गटाबद्दल नागरिकामध्ये द्वेष निर्माण झाला होता व लष्कराची समाजात प्रतिष्ठा वाढली होती.

जपानमध्ये किताइक्की, गोडोसैक्यो व ओकावा शुमेई यांनी लष्करी तत्वज्ञानाचा प्रसार केला.तिघांच्या प्रेरणा भिन्न होत्या पण ध्येय एकच होते. किताइक्कीचे तत्त्वज्ञान समाजवादावर आधारित होते. उद्योगधंद्यावर आधारित समाजव्यवस्था निर्माण करून प्रबळ अशा केंद्रसत्तेकडे सत्ता सोपवावी. या सत्तेने कठोरपणे अर्थव्यवस्थेचे नियंत्रण करावे.अशी केंद्रीय सत्ता निर्माण करण्यासाठी लष्करी बंड करावे असे त्याने सांगितले. गोदोसैक्योने पाश्चात्यकिरणला विरोध केला. भांडवलशाहीचा तो द्वेष्टा होता.त्याने आक्रमक राष्ट्रवादी चळवळीला खतपाणी घातले. ओकावा शुमेई यानेही साम्राज्यवादाचा प्रसार केला. लष्करातील अधिकाऱ्याबरोबर त्याचे चांगले संबंध होते. या लष्करवादी विचारवंतानी लष्कराची शिस्त, निष्ठा यांचा उपयोग करून जपानी प्रतिमा प्रतिमा निर्माण करण्याचा प्रयत्न केला.शासनावर लष्कराचे नियंत्रण असावे. राष्ट्रवादाला आक्रमक स्वरूप देऊन जपानचे साम्राज्य वृद्धिंगत करावे या विचारांचा प्रचार केला.

### ८) राष्ट्रवादी क्रांतिकारी संघटना:

या काळात जपानमध्ये अनेक उग्र राष्ट्रवादी संघटनांनी लष्करवाद जोपासण्याचे कार्य केले.त्यापैकी कोकू युकाई या संघटनेने १९३० मध्ये पाचसूत्री योजना करावे, विदेशात जपानचा प्रभाव वाढवावा, सैनिक व नाविक दलात लष्करी भावना वाढवावी,पाश्चात्य शिक्षणाऐवजी राष्ट्रीय शिक्षण द्यावे, घटनात्मक सरकार अधिक कार्यक्षम बनवावे या मागण्या केल्या,ही संघटना विरोधकांनी हत्या करणे आपले पवित्र कर्तव्य मानीत असे.

सरकारविरुद्ध असंतोष वाढलेल्या बेकार तरुणांनी सोकुराकाई संघटना स्थापन केल्या.या संघटनांनी खुण करणे, दहशत बसविणे, सरकारी खाजीन्यांवर दरोडे टाकणे यासारख्या कारवाया केल्या. त्यांनी लष्करी अधिकाऱ्यांचे साहाय्य होऊन संघटनेत शिस्त आणली.

जपानमध्ये ब्ल्यॅक ड्रेगन सोसायटी ब ब्लड लीग या क्रांतिकारी संघटनांनी आक्रमक राष्ट्रवादाचा पुरस्कार केला. ब्ल्यॅक ड्रेग सोसायटीचे ध्येय जपानी साम्राज्य वाढवायचे होते.तर ब्लड लीगचे ध्येय जपानची जीवनपद्धती वाचविण्याचे होते.या संघटनेत भूसैनिक, नौसैनिक, शेतकरी, बेकार तरुण सामील झाले. याच संघटनांनी लोकशाही सरकार उलटवण्यासाठी १५ मे १९३२ मध्ये अनेक राजकीय पुढारी व धनिकांच्या हत्या केल्या. त्यामुळे लष्करवादाला चालना मिळाली.

### आपली प्रगती तपासा:

प्र.१ जपान मधील लष्करवादाच्या उदयाची कारणे सांगा.

## ६.३.जपानच्या लष्करवादाच्या काळातील घटना

### १) वॉशिंगटन परिषद (१९२१) :

जपानने आपल्या विस्तारवादी धोरणाला चालना मिळण्यासाठी प्रचंड शस्त्रास्त्रनिर्मिती व नाविक दलात वाढ करण्यास सुरुवात केली.पॅसीफिक महासागरात जपानने मोठी मुसंडी मारली यावेळी अमेरेकेचेही हितसंबंध या समुद्रात गुंतलेले असल्याने अमेरिका व जपानमध्ये नावीक स्पर्धा सुरु झाली. भविष्यकाळात जपान हा आपला मोठा स्पर्धक होईल ही भीती अमेरेकीला वाटू लागली म्हणूनच जपानच्या आक्रमकवादाला पायबंद बसावा व आरमाराची ताकद कमी व्हावी यासाठी वॉशिंग्टन येथे इथे एक आंतरराष्ट्रीय परिषद ११ नोव्हेंबर १९२१ रोजी भरविण्यात आली.या परिषदेत ब्रिटन, फ्रान्स, इटली, जपान व अमेरिका ही पाच राष्ट्रे सहभागी झाली.यावेळी जपानवर नावकिदलाबाबत पुढील निर्णय लादण्यात आले.

१) अमेरिका, इंग्लंड व जपान यांच्या नौदलातील एकूण जहाजांचे व पाणबुड्यांचे वजन ५-५-३ (टनेज) या प्रमाणात राहील.

२) मॅरियाना, मार्शल, कॅरोलीया, क्युराईल या प्रशांत महासागरातील बेटांवर जपानने किल्ले बांधू नयेत.

३) शांटूग प्रांतवार चीनचे प्रभुत्व मान्य करण्यात आले.

४) १९०२ मध्ये झालेला इंग्लंड जपान तह रद्द केला. भविष्यात या दोन्ही राष्ट्रात वाद निर्माण झाल्यास अमेरिका, इंग्लंड, जपान यांनी आपसात विचारविनिमय करून निर्णय घ्यावा.

५) १० वर्षे कोणत्याही राष्ट्राला मोठ्या युद्धनौका बांधता येणार नाही.

या परिषदेतील वरील निर्णयामुळे जपानमध्ये प्रचंड असंतोष पसरला. त्यातच अमेरिकेने १९२४ मध्ये अमेरिकेत जपानी लोकांना वास्तव्याचे निर्बंध घालणारा कायदा पास केल्याने जपानचा स्वाभिमान दुखावला गेला. अमेरिकेबद्दल सुडाची भावना निर्माण झाली. लष्करीवादी वृत्ती कमी होण्याऐवजी आणखीनच उफाळून आली.

### २) मांचुरिया प्रकरण :

जपानच्या इतिहासात मांचुरिया प्रकरण हे महत्त्वाचे ठरले.कारण या घटनेपासूनच जपानमध्ये लष्करशाहीला सुरुवात झाली. इ.स.१९३१ पर्यंत जपान जबरदस्त आक्रमक बनला होता.त्यातून त्याने मांचुरियावर आक्रमण केले. खरे तर मांचुरिया हा प्रांत चीनचा अविभाज्य घटक होता.पण या ठिकाणी युरोपियन राष्ट्रांनी प्रवेश करून गोंधळाची स्थिती निर्माण केली होती. इ.स.१९९४ मध्ये चीन जपान यांच्यात युद्ध होऊन त्यात जपानचा विजय झाला.यावेळी जपानला लओतुंगद्विकल्प, पोर्टऑर्थर व डेरीयन ताबा मिळाला होता तसेच मांचुरियात प्रवेश करण्याची संधी मिळाली.

रशियाने मात्र फ्रान्स व जर्मनीच्या मदतीने जपानवर दबाव आणून चीनचे प्रदेश सोडण्यास भाग पाडले व १९९६ मध्ये चीनकडून पोर्टऑर्थर व डेरीयन ही बंदरे दिर्घमुदतीच्या कराराने घेतलीलगेच १८९८ मध्ये लाओतुंगाचा प्रदेश दिर्घमुदतीसाठी भाडेपट्टी मिळविला, तेथे रेल्वेमार्ग बांधण्याचा अधिकारही मिळवला,कोरिया व मांचुरियात आपले हितसंबध वाढवले.जपानमध्ये रशियाविरुद्ध वातावरण तापू लागले.१९०२ च्या इंग्लंड जपान तहानंतर मांचुरियातून फौज कडून घेण्याचे मान्य केले पण हे वाचन पाळले नाही त्यामुळे जपानच्या कोरियातील हितसंबंधाना रशियाने मान्यता द्यावी व त्याबदल्यात रशियाच्या मांचुरीयातील हितसंबंधाना जपान मान्यता देईल अशी मागणी केली.पण रशियाने दुर्लक्ष केल्याने १९०४-०५ मध्ये उभयतात युद्ध घडून आले.या युद्धात रशियाचा पराभव होऊन जपानला लाओतुंग,पोर्टऑर्थर व डेरीयन बंदरे परत मिळाली.मांचूरियन रेल्वेचा दक्षिण भाग मिळाला.या अधिकाराला चीनची मान्यता आवश्यक होती म्हणून २२ डिसेंबर १९०५ रोजी जपानने चीनशी करार केला.या करारानुसार जपानला प्रादेशिक व व्यापारी हक्क मिळाले,कोरियाच्या सीमेवर लाओतुंगपासून मांचुरियात रशियाचा व दक्षिण मांचुरियात जपानचा प्रभाव वाढला.जपानने दक्षिण मांचुरिया "द साउथ मांचुरियन रेल्वे कंपनी "स्थापना करून दक्षिण मांचुरीयाचा वेगाने विकास केला.१९०७ मध्ये मात्र चीनने एका ब्रिटीश कंपनीशी रेल्वेसंबंधी करार केल्याने जपानच्या हितसंबंधाना बाधा निर्माण झाली. त्यामुळे जपानने १९०७ मध्येचं रशियाशी करार करून दक्षिण मांचुरीयातील आपल्या हितसंबंधांना मान्यता मिळवली उत्तर मांचुरियात रशियाचे प्रभुत्व मान्य केले.येथील मांचुरिया प्रश्न बिकट बनत गेला.

**३) मांचुरियाचे महत्त्व व जपानचा विस्तार :**

सुमारे ३,८२,००० चौरस मैलाचा मांचुरीयाचा विस्तृत प्रदेश अतिशय सुपीक व खनिजसंपत्तीने समृद्ध असा होता.शेतीमध्ये गेहू,डाळी,सोयाबीन, मेलेट यांचे प्रचंड पिक येत असे.तसेच इमारती लाकुडही मोठया प्रमाणात होते.या भूभागात कोळसा व लोखंडाच्या खाणीशिवाय सोन्याच्याही खाणी होत्या. नैसर्गिक वरदान लाभलेला हा प्रांत राजकीय व लष्कारीदृष्ट्याही तितकाच महत्त्वाचा होता. चीनच्या ईशान्येला सैबेरिया व कोरिया यांच्याजवळ असलेल्या मांचुरिया म्हणजे चीनच्या संरक्षणाची पहिली फळी होती, मांचुरियात व्यापारासाठी अत्यंत फायदेशीर अशी बंदरे होती.

जपानने मांचुरियात १९३० सालापर्यंत मोठया प्रमाणात भांडवल गुंतवले. जपानला हवा असलेला कच्चा माल मांचुरियातून मिळू लागला. या प्रदेशात पूर्ण वर्चस्व निर्माण करण्यासाठी जपानने कोरियन व जपानी नागरिकांना येथे स्थायिक होण्यास प्रोत्साहन दिले.मांचुरियाच्या एकूण लोकसंख्येपैकी दोन लक्ष आठ हजार लोक जपानी होते. या लोकांनी येथील खाण उद्धयोगात प्रवेश केला. जपानने दक्षिण मांचुरियन रेल्वेच्या संरक्षणातील आपले लष्कर ठेवले.जपानच्या कारवायामुळे दक्षिण मांचुरियात जपानने पूर्ण वर्चस्व निर्माण झाले.

### ४) जपानचे आर्थिक प्रश्न :

इ.स.१९२९ मध्ये जागतिक महामंदी सुरु होऊन त्याचा तडाखा जपानलाही बसला. जपानमध्ये आर्थिक समस्या वाढल्या, अनेक उद्योग बंद पडून बेकारी वाढली. तसेच जपानची लोकसंख्याही प्रचंड वाढली होती.त्यांना लागणारे अन्नधान्य कमी पडू लागले त्यामुळे जपानची कोलमडणारी अर्थव्यवस्था सावरण्यासाठी जपानने संपूर्ण मांचुरियावर ताबा मिळवावा असे साम्राज्यावादी गटाला वाटू लागले.तसे केल्यास मान्च्युरीयातील कच्चा मालाचा वापर करता येईल.जपानी पक्क्या मालाला मांचूरियाची हुकमी बाजारपेठ मिळेल,जपानी नागरिकांना मांचुरियात वस्तीसाठी जागा मिळून वाढत्या लोकसंख्येचा प्रश्न सुटेल तसेच चीन व रशियाला शह देता येईल असे त्याचे मत होते.जपानच्या राजकारणात या गटाचा प्रभाव वाढल्याने मांचुरिया गिळंकृत करण्यासाठी जपानने हालचाली सुरु केल्या.

### ५) मुकडेन प्रकरण :

मांचुरियावरील वर्चस्वासाठी चीन व जपानमध्ये रस्सीखेच सुरु झाली व त्यातून लहान मोठे संघर्ष होऊ लागले.त्यामुळे मांचुरियात तणाव वाढत गेला. जपान मांचुरीयाचा ताबा मिळविण्यासाठी संधी शोधत होता. याच दरम्यान महत्त्वाची घटना घडली टी म्हणजे जपानी लष्करी अधिकारी कॅप्टन नाकामुराचा खुन झाला. या खुनाची जबाबदारी जपानने चीनवर टाकली यानंतर १८ सप्टेंबर १९३१ रोजी मुकडेन शहराजवळील साउथ मांचुरियन रेल्वेमार्गावर बॉम्बस्फोटाने रेल्वे मार्गाचे फारसे नुकसान झाले नव्हते. तरीही जपानने आक्रमक भूमिका घेऊन आपले सैन्य मुकडेनला नेले. तेथील चीनी लष्करी ठाण्यावर हल्ले करून मुकडेन शहराचा ताबा मिळवला. यानंतर जपानी लष्करी अधिकारी दोईहारा याची मुकडेनचा प्रशासक म्हणून नियुक्ती केली. जपानच्या या अनपेक्षित आक्रमणामुळे चीनी जनता खवळली. शांघाय येथील विद्यार्थ्यांनी जपानी मालावर बहिष्कार घातला. जपानी व किलातीपुढे निर्देशन केली.चीनच्या कानाकोपऱ्यातून प्रतिकार करण्याची मागणी होऊ लागली. जपानचे हे आक्रमण आंतरराष्ट्रीय कराराचे उल्लंघन असल्याने चीनने याविरुद्ध राष्ट्रसंघाकडे तक्रार केली.

### ६) राष्ट्रसंघाची भूमीका व लिटन समिती :

चीनने ज्यावेळी जपानच्या विरोधात राष्ट्रसंघाकडे तक्रार केली त्यावेळी इंग्लंड व फ्रान्ससारख्या राष्ट्रांनी या तक्रारीकडे दुर्लक्ष केले. परंतु चीनने अनेकवेळा तक्रारी केल्याने राष्ट्रसंघाने याची दखल घेतली. राष्ट्रसंघाने दोन्ही राष्ट्रांना युद्ध थांबवून दक्षिण मांचुरीयातील सैन्य काढून घेण्याचा आदेश दिला. परंतु जपानने प्रश्न जपानचा अंतर्गत राष्ट्रसंघाने मध्यस्थी करू नये असे सांगितले.

मांचुरीचा प्रश्न सुटत नाही हे पाहून राष्ट्रसंघाने नोव्हेंबर १९३१ मध्ये लॉर्ड लिटन यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली व मांचुरीयातील परिस्थितीची पाहणीचे काम करीत असतानाच फेब्रुवारी १९३२ मध्ये जपानने जपानव्याप्त मांचुरियन प्रदेशात “मांचूकुओ'' या स्वतंत्र राज्याची घोषणा करून लिटन समितीलाच अक्षता लावल्या.

लिटन समितीने सर्व परिस्थितीचा अभ्यास करून ऑक्टोबर १९३२ मध्ये आपला अहवाल राष्ट्रसंघाला सादर केला त्यानुसार मांचूकुओ हे स्वतंत्र राज्य नसून ते पूर्णपणे जपानच्या वर्चस्वाखाली असल्याचे सांगितले. चीनच्या सार्वभौमत्वाखाली स्वतंत्र मोंचूरिया निर्माण करण्यात यावा व राष्ट्रसंघाच्या मार्गदर्शनाखाली चीन-जपान यांनी वाटाघाटी करून तह करावा अशी शिफारसही या समितीने केली. राष्ट्रसंघाने या अहवालाला मंजुरी दिली परंतु जपानने मात्र दुर्लक्ष केले.राष्ट्रसंघाने लिटन अहवालास मंजुरी देताच एका महिन्याने जपानने राष्ट्रसंघाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला.

### ७) मांचुकूओची स्थापना व प्रगती :

जपानने मांचुरियात मांचुकूओ या राज्याची स्थापना करण्याचे फेब्रुवारी १९३२ मध्ये घोषित केले. चीनमध्ये पदभ्रष्ट सम्राट पुन्यी याला मांचुरीयाचा प्रशासक म्हणून नेमले. जनतेने स्थापन केलेले हे स्वतंत्र सार्वभौम राज्य आहे असा जपानने दावा केला. जपानने स्थापन केलेले हे कळसूत्री सरकार होते.या राज्याची सर्व सूत्रे जपानकडेच होती. लिटन अहवालानुसार या राज्याला विरोध केला असला तरी जपानने त्याकडे दुर्लक्ष केले.

जपानला कच्चा माल,अन्नधान्य औद्योगिक साधनसामुग्री यांच्या उपलब्धतेसाठी वसाहतीची गरज होती. म्हणूनच जपानने मांचुकूओच्या विकासाकडे अधिक लक्ष दिले.येथील महत्त्वाच्या सर्व पदांवर जपानी अधिकारी नेमले. १ मार्च १९३४ रोजी पुन्यी याला मांचुकूओचा सम्राट म्हणून घोषित करण्यात येईल. त्याची स्वातंत्र संघटना बनवण्यात आली. सम्राटाला कार्यकारी व कायदेविषयक अधिकार देण्यात आले पण खरी सत्ता जपानच्या हाती होती, तेथील सैन्यही जपानीच होते. पंचवार्षिक योजना राबवून रेल्वेमार्ग वाढविले. विविध उत्पादने वाढवली, सोयाबीन, गहू, साखर, तंबाखू, कोळसा, लोखंड, पोलाद यांचे उत्पादन वाढविण्यात आले. जपानी कारखान्यांना लागणारा कच्चा माल मांचुकूओतून वापरला जात होता. मांचुरीयातील नद्यांवर मोठे धरण बांधून जलविद्युत निर्मितीच्या योजना हाती घेतल्या, एकसंघ चलनव्यवस्थानिर्माण करण्यात आली. चीनी विरोधकांचा नाश करण्यात आला. १९३३ पासून चीन जपान व मांचुकूओ यांचा एकसंघ बनवून त्यात आर्थिक व राजकिय सहकार्य वाढविण्याचे उद्दिष्ट जपानने घोषित केले. १९३४ मध्ये ''आशियाई राष्ट्रांसाठी आशिया'' ही घोषणा करून परकीय राष्ट्रांचा हस्तक्षेप जपान सहन करणार नाही असा इशारा जपानने दिला.

### ८) अमेरिकेची भूमिका :

राष्ट्रासंघाप्रमाणे चीनने अमेरिकेतही जपानविरुद्ध मदत मागितली होती. अमेरिकेने जपानशी बोलणी करण्याचा प्रयत्न केला. परंतु जपान आपले आक्रमक धोरण सोडत नाही हे पाहून चीनच्या सार्वभौमत्वाला धक्का लावणारा व चीनमधील परकियांच्या अधिकारावर अतिक्रमण करणारा कोणताही करार अमेरिका मान्य करणार नाही असे अमेरिकेने जपानला व राष्ट्रसंघना कळवले. जपानने मात्र या इशाऱ्याची किंचितही दखल घेतली नाही तसेच जपानविरुद्ध राष्ट्रसंघाने कडक भूमिका घेतली नाही.

जपानच्या आक्रमणाला राष्ट्रासंघाकडून किंवा अमेरिकेकडून पायबंद घातला जाईल ही चीनी सरकारची अशा फोल ठरली. जपानी लष्कर पेकिंग्जवळ येऊन ठेपले त्यामुळे जपानशी तह करण्याशिवाय दुसरा पर्याय चीन समोर राहिला नाही. अखेर मजबुरीने ३१ मे १९३३ रोजी चीनने युद्धबंदीची याचना करून जपानच्या जेहोल प्रदेशापर्यंतच्या वर्चस्वाला मान्यता देण्यासारखेच होते.

मांचुरिया प्रकरणात अमेरिकेची उदासीनता, राष्ट्रसंघांची निष्क्रियता व जपानचे उद्दाम वर्तनाच्यामुळे जागतिक राजकारणाला वाईट वळण लागले. अतिपूर्वेकडे जपानशी लढण्यास अमेरिका तयार नव्हती. इंग्लंडला रशियाचा प्रमुख अडथळा असल्याने त्याला शह देण्यासाठी जपानला प्रोत्साहन देण्यात आले. रशियानेदेखील १९३१ मध्ये जपान पुढे अनाक्रमण करायचा प्रस्ताव मांडला. पण जपानने तो धुडकावला एवाढेच नव्हेतर १९३२ मध्ये हार्बिन बेटावर हल्ला करून रशियाला विरोध केलातरीही रशियाने काहीही कारवाई केली नाही.या सर्व गोष्टीमुळे जपानच्या आक्रमक कारवायांना खतपाणी मिळाले.राष्ट्रसंघाची मदत न मिळाल्याने चीनची अवस्था वाईट झाली. राष्ट्रसंघाची दुर्लब्ध्ता जगासमोर उघडी पडली.या प्रकरणामुळे इतर आक्रमक राष्ट्रांना प्रेरणा मिळावी. हिटलर व मुसोलिनी यांनी साम्राज्याविस्तार बेधडकपणे सुरु केला.संपूर्ण जागतिक वातावरन ढवळून निघाले आणि लवकरच संपूर्ण जग महायुद्धाच्या उंबरठ्यावर जाऊन पोहोचले.

## ९) लष्करशाहीची स्थापना :

जागतिक महामंदीचा इतर देशाप्रमाणे जपानलाही जबरदस्त धक्का बसला होता. निर्यातीचे प्रमाण घसरले, महागाई, गरिबी, बेकारी या समस्या वाढून सर्वसामान्य जनतेची जीवन हलाखीचे बनले. या परिस्थितीमुळे राष्ट्रवाद व लष्करवाद अधिकच वाढला. या सर्व परिस्थितीचा दोष जपानमधील प्रागतिक पक्ष्याच्या मावळ धोरणाला देण्यात आला आणि अंतर्गत आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी आक्रमक व विस्तारवादी धोरणाचा अवलंब करण्याची मागणी जोर लागली. प्रागतिक पक्षाला होणारा विरोध इतका वाढला कि १९३० नंतर या पक्षातील अनेक पुढाऱ्यांची हत्या करण्यात आली.१९३० च्या लंडन नावी प्रांतप्रदेश सरकारने आरमारावरील निर्बंध मान्य केल्यामुळे जपानी लोकमत भडकले. त्यातून प्रधानमंत्री हामागुची यांच्यावर एका माथेफिरू तरुणाने गोळी झाडली. १९३२ मध्ये पूर्व वित्तमंत्रांचे निवासस्थान व प्रमुख पोलीस कार्यालय ताब्यात घेतले. हे बंड मोडून काढण्यात आले असले तरी जपानमध्ये लष्करी गटाला मोठया प्रमाणात प्रतिसाद मिळून लष्करशाही गटाकडे जपानची सत्ता गेली. सैनिकांनी केलेले हे बंड भयंकर होते. यात राजकीय व अन्य पुढाऱ्यांच्या कत्तलीचे हुकुम देण्यात आले होते. भूतपूर्व पंतप्रधान ॲडमिरल सैटो, वित्तमंत्री टाकाहाशी, जनरल वाहनाके या लष्करी मंत्र्याची हत्या करण्यात आली.विद्यमान पंतप्रधान ॲडमिरल ओकुडा मात्र निसटला.हे बंड चिरडून टाकण्यात आले. बंडखोरांपैकी अधिकाऱ्यांना मृत्युदंड देण्यात आला. ब्लॅक ड्रॅगन सोसायटीचा पुढारी किटाइक्कीला मृत्युदंड दिला गेला. डिसेंबर १९३६ मध्ये संसद बरखास्त झाली. त्यानंतर झालेल्या निवडणुकांमध्ये मीनसैटो पक्षास बहुमत मिळाले. प्रिन्स सायोजनी याने ओकाडा मंत्रिमंडळातील

हिरोटाला पंतप्रधान नेमले. या सरकारने लष्करी नेत्यांच्या धोरणानुसार प्रशासन चालवण्यास सुरुवात केली.

### १०) रोम - बर्लिन - टोकीओ करार : (अॅन्टी कॉमिन्टर्न करार) :

पहिल्या महायुद्धानंतर पराभूत जर्मनीवर व्हर्सायचा तह लादण्यात आला होता. जर्मनीला युद्धखोर गुन्हेगार ठरवण्यात आले त्यामुळे जर्मनीत दोस्त राष्ट्रांबद्दल प्रचंड असंतोष होता. १९३३ मध्ये हिटलरचा उदय होऊन त्याने याचा बदला घेण्याचे ठरवले. जर्मनीप्रमाणे इटलीतही मुसोलिनीने हुकुमशाही स्थापन केली. जर्मनी व इटलीचा प्रभाव जपानवर पडून जपानमध्ये लष्करी हुकुमशाही गट प्रबळ बनत गेला. जपानने मांचुरिया गिळंकृत केल्याने सर्व युरोपियन सत्ता नाराज होऊन त्यांनी जपानला एकाकी पाडले. त्यामुळेच जपान जर्मनी व इटलीकडे झुकला. नोव्हेंबर १९३६ मध्ये जपान,इटली व जर्मनी या तीन राष्ट्रात मैत्री करार झाला या करारालाच अॅन्टी-कॉमिन्टर्न करार असेही म्हणतात व या गटाला अक्षयगट म्हणतात. हा करार प्रामुख्याने रशियाच्या विरोधात होता. रशियम साम्यवादाचा जर्मनी कट्टर विरोधक होता. तसेच जपानला विस्तारवादी धोरणात रशियाचा अडथळा येत होता. या करारामुळे जपानला प्रबळ मित्र मिळून लष्करवाद्यांचा आत्मविश्वास वाढला.

### ११) चीन जपान अघोषित युद्ध (१९३७):

चीन यामध्ये या काळात कोमींगटांग व कम्युनिस्ट पक्षात यादवी युद्ध सुरु होते.या युद्धामुळे चीनची अर्थव्यवस्था मोडकळीस आली होती.या अस्तिर परिस्थितीचा जपानने फायदा घेण्याचे ठरविले.जपानच्या धोक्यामुळे मात्र चीनमध्ये कोमिंगटांग व कम्युनिस्ट युती घडून आली. ७ जुलै १९३७ रोजी पेकिंगजवळ असलेल्या मार्कोपोलो पुलावर जपानच्या एका लष्करी तुकडीत व चीनी सैनिकात चकमक झाली. जपानच्या या हल्ल्यामुळे चीन लोकमत खवळले. चीनी राष्ट्रवाद्यांनी जपानविरुद्ध निदर्शने केली, जपानी नागरिकावर हल्ला केला त्यामुळे जपानने पेकिंगवर हल्ला चढवून २७ जुलै रोजी ते ताब्यात घेतले. ही बातमी चीनमध्ये पसरताच प्रक्षुब्ध चीनी लोकांनी जपानी कंपन्यावर व नागरिकावर हल्ले सुरु केले ही चळवळ दडपून टाकण्याच्या हेतूने जपानने शांघायजवळ सैन्य उतरवले या शहरावर बॉम्बवर्षाव सुरु केला. अशा प्रकारे चीन – जपान यांच्या युद्धाला सुरुवात झाली. कोणतीही अधिकृत घोषणा न करता हे युद्ध सुरु झाल्याने या युद्धाला जपानचे अघोषित युद्ध म्हणतात.

या युद्धात चीनी सैन्याची पिछेहाट होत गेली.जपानने नोव्हेंबरमध्ये शांघाय व डिसेंबरमध्ये नानकिंग जिंकले. चॅग कै शेकणे आपली राजधानी चुंगकिंग शहरात नेली. सेन्सी व शान्सी प्रांतात मात्र जपानी फौजेला मान्युनिस्टाच्या लाल सेनेने रोखले. काम्युनिस्टानी गनिमी काव्याने जपानी फौजांना हैराण केले. त्यामुळे वायव्य चीन घेण्याचा जपानचा प्रयत्न फसला.

यानंतर एक दिड वर्षात जपानने चीनच्या किनारपट्टीवरील प्रदेशावर व चांगत्सेच्या खोऱ्यावर ताबा मिळवला. हँको, कॅटान ही मोठी शहरे, औद्योगिक व व्यापारी केंद्रे ताब्यात घेतली, हाती आलेल्या प्रदेशातून आसपासच्या भागावर बॉम्बवर्षाव सुरु ठेवला.

संपूर्ण चीन जिंकून जपानच्या स्वामित्वाखाली आणणे अशक्य असल्याचे जपानला दिसून आले. चीनने दिलेला अंतर्गत लढा, अमेरिका व पाश्च्यात्यांचा विरोध यामुळे जपानचे स्वप्न भंग पावले होते. तरीसुद्धा ताब्यात आलेल्या चीनी प्रदेशाला मांचुकूओ प्रमाणे वेगळे सरकार देण्याची योजना जपानने आखली व त्यानुसार डिसेंबर १९३७ मध्ये पेकींग येथे वांग चिंग वा याच्या नेतृत्वाखाली चीनने नवे सरकार स्थापन केल्याची घोषणा करण्यात आली. नानकिंग ताब्यात आल्यानंतर ही राजधानी नानकिंगला हलवण्यात आली. जपानच्या मित्र राष्ट्रांनी या सरकारला चीनचे सरकार म्हणून मान्यता दिली. या शासनाकडून जपानने मांचुकूओला मान्यता मिळवून घेतली.

इ.स.१९४१ सालापर्यंत चीनच्या किनाऱ्यालगतचा प्रदेश व अनेक मोठी शहरे जपानच्या हाती पडली होती. त्या पलीकडचा प्रदेश पर्वतमय असल्यामुळे तेथील आतील भागात जपानने सतत बॉम्बहल्ले सुरु ठेवले पण तेथे जपानी लष्कराला पुढे सरकता आले नाही. कोमीगटांग व कम्युनिस्टाचाही प्रखर विरोध सुरु होता.१९४१ पर्यंत युद्धाची धुश्मचक्री सुरु होती परंतु याचवेळी जपानचा अमेरिकेबरोबर संघर्ष सुरु झाल्याने चीन-जपान युद्धाची व्याप्ती काही प्रमाणात कमी झाली.

## ६.४ प्रश्न

१) जपानमधील लष्करवादाच्या उदयाची कारणे सांगा.

२) जपानमधील लष्करवादाच्या काळातील मुख्य घटनांचा आढावा घ्या.

## ६.५ संदर्भ


१) डॉ. अनिल कठारे -विसाव्या शतकातील जगाचा इतिहास

२) डॉ. अनिल कठारे- आधुनिक जगाचा इतिहास

३) पी.जि.जोशी - आधुनिक जगाचा इतिहास

४) डॉ.सुमन वैद्य, डॉ. शांता कोठेकर- विसाव्या शतकातील जग (१९१४-१९४५) भाग-१

५) डॉ.सुमन वैद्य, डॉ. शांता कोठेकर- विसाव्या शतकातील जग (१९४६- २०००) भाग-२

६) डॉ. अनिरुद्ध , प्रा. गजानन भिडे-आधुनिक जगाचा इतिहास

७) जैन हुकूमचंद आणि कृष्णा माथुर- आधुनिक जगाचा इतिहास

८) कदम य. न. - विसाव्या शतकातील जगाचा इतिहास

९) कुलकर्णी अ.र. आणि देशपांडे-आधुनिक जगाचा इतिहास- भाग-1 & २

१०) साकुरे विजयानंद, अनिल कठारे-जागतिक इतिहासातील स्थित्यंतरे

११) उदगावकर म.न. आणि गणेश राउत- आधुनिक जग


❖❖❖❖

# ७

## दुसरे महायुद्ध

**घटक रचना**

७.०. उद्दिष्ट्ये

७.१. प्रस्तावना

७.२. दुसरे महायुद्ध

  ७.२.१. दुसऱ्या महायुद्धाची कारणे

  ७.२.२. दुसऱ्या महायुद्ध काळातील घटना

  ७.२.३ दुसऱ्या महायुद्धकाळातील राजनैतिक घडामोडी

  ७.२.४. दुसऱ्या महायुद्धाचे परिणाम

७.३. सारांश

७.४. प्रश्न

७.५ संदर्भ

### ७.०. उद्दिष्ट्ये

- दुसऱ्या महायुद्धाच्या कारणांचा अभ्यास करणे .
- महायुद्धाचे तत्कालीन कारण आणि युद्धास कशी सुरुवात झाली? कोणकोणती राष्ट्रे युद्धामध्ये सहभागी झाली याची माहिती मिळवणे.
- दुसऱ्या महायुद्धाच्या परिणामांची माहिती घेणे.
- दुसऱ्या महायुद्धाची वैशिष्टये/स्वरुप /तंत्रपद्धती याचा अभ्यास करणे.
- दुसऱ्या महायुद्धाच्या अवस्था जाऊन घेणे.
- दुसरे महायुद्ध प्रत्यक्षात कसे व कोणाकोणामुळे घडवले याचे कथन करणे.
- युद्धाच्या वेळी आपल्या गटात अनेक राष्ट्रांना समाविष्ट करून घेण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची माहिती घेणे.
- युद्धाची ध्येयेधोरणे व राजकीय डावपेचांसाठी झालेल्या विविध करारांची माहिती सांगणे.

munotes.in

## ७.१. प्रस्तावना

हिटलरच्या आक्रमक धोरणामुळे दुसरे महायुद्ध सुरु झाले. याच वेळी महायुद्धात अनेक घटक जबाबदार होते. याच वेळी महायुद्धात अनेक घटक जबाबदार होते.त्यातूनच महायुद्ध सुरु झाले. युद्ध सुरु झाल्यापासून युद्ध आघाडी व राजनैतिक पातळीवर लढले गेले.त्यामुळे जर्मनीचा व तिच्या गटाचा पराभव झाला. या युद्धामुळे संपूर्ण जगावर परिणाम झाले. त्याचा एक भाग म्हणून राष्ट्रसंघ नष्ट करून जागतिक शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी संयुक्त राष्ट्रासंघटना स्थापन करण्यात आली. या संघटनेच्या माध्यमातून अनेक राजकीय व अराजकीय स्वरूपाचे कार्य करण्यात आले. अजूनही ही संघटना कार्य करत आहे.

## ७.२.दुसरे महायुद्ध

व्हर्सायच्या तहाने दोस्त राष्ट्रांनी स्वतःचा स्वार्थ साधला तर पराभूत राष्ट्रे दुखावली. यामुळे युरोपच्या राजकारणात हुकुमशहाचा उदय झाला. पहिल्या महायुद्धातील पराभव आणि अपमानकारक व्हर्सायचा तह याचा सूड घेण्यासाठी शस्त्रवाढ व वसाहतवाढ याला प्राधान्य दिले. त्यातून स्पर्धा, संघर्ष सुरु झाला. परिणामी दुसरे महायुद्ध पेटले. या युद्धात जगाला फार मोठी किंमत मोजावी लागली. इ.स.१९१९ ते ३९ या कालखंडात कोणाचाच कोणावर विश्वास उरला नव्हता. सर्व वातावरण सुडाने पेटले होते.स्वतःची सुरक्षितता टिकविण्यासाठी शस्त्रसज्ज स्पर्धा निर्माण होऊन सर्व जगात युद्धखोर हुकूमशाहीचे वर्चस्व निर्माण झाले. पहिल्या महायुद्धानंतर अशी भयानक युद्धे कधीही पुन्हा होवू नयेत म्हणून विड्रो विल्सन सारख्या शांतताप्रिय नेत्यांनी प्रामाणिकपणे प्रयत्न केला.व्हर्सायच्या तहाचा सूड हिटलरने घेण्यास प्रारंभ केल्याने युद्धात सारे जग ओढले गेले, असे दुसरे महायुद्ध ३ सप्टेंबर १९३९ रोजी सुरु झाले.

### ७.२.१.दुसऱ्या महायुद्धाची कारणे

#### १) व्हर्सायच्या तहातच दुसऱ्या महायुद्धाची बीजे पेरली –

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष विड्रो विल्सनच्या चौदा तत्वावर आधारित व्हर्सायचा तह केला. व्हर्सायचा तह जास्त अन्याय करणारा व राष्ट्रांचा अपमान करणारा होता. इंग्लंडने फ्रान्सला तह करताना साथ दिली. व्हर्सायच्या तहाने जर्मनीच्या वसाहती नष्ट केल्या. जर्मनीचा प्रदेश तोडून दुसऱ्या राष्ट्रस दिला. त्यामुळे जर्मनीची प्रादेशिक मर्यादा अत्यंत संकुचित करण्यात आली. व्हाईन प्रदेशात दोस्तांचे सैन्य, सारा प्रांत फ्रान्सला, पोलंडला सागरी प्रदेशासाठी वाट, लष्करी सामर्थ्य नष्ट, नुकसान भरपाई प्रचंड लादली. यामुळे तह लवकर मोडून राष्ट्रीय स्वाभिमान जागृत करणे, आर्थिक स्थैर्य निर्माण करणे, नेत्यांनी बळकावलेला प्रदेश परत मिळवण्यासाठी जर्मनी सतत प्रयत्नशील राहिली.योग्य संधी येताच युद्धास तयार झाली म्हणून दुसरे महायुद्ध पेटले.

**२) युरोपच्या राजकारणात हुकुमशहाचा उदय -**

जर्मनीत नाझी पक्षाचा उदय होऊन हिटलर त्याचा नेता होता.व्हर्सायच्या तहाच्या अपमानाचा बदला घेण्यासाठी तो सदैव तयार झाला.एक पक्ष –एक नेता –एक राष्ट्र निर्माण करणे हे तत्व त्याने आणि जनतेने मान्य केलेले. इटालीत मुसोलिनीच्या नेतृत्वाखाली फॅसिस्ट पक्षाची हुकुमशाही स्थापन झाली.व्हर्सायच्या तहामुळे प्रादेशिक आकांक्षा पूर्ण झाली नाही. मुसोलिनीने व्यवसायनिष्ट राज्य उभारले. राज्य व्यक्तीपेक्षा श्रेष्ठ आहे. व्यक्तीने राज्यासाठी सर्वस्वाचा त्याग केला पाहिजे ही विचारसरणी लोकांत तयार केली. युद्ध हा हुकुमशाहीचा अविभाज्य भाग आहे. हिटलर मुसोलिनीने युद्धजन्य परिस्थिती निर्माण करून जनतेला युद्धप्रवृत्त केले. तुर्कस्थानावर सेव्हरेसच्या तहाने अन्याय झाला. तो दूर करण्यासाठी केमाल पाशाने संघर्ष केला. त्यामुळे लॉसेनचा तह पुन्हा केला.साम्राज्याला आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा पुन्हा प्राप्त करण्यासाठी कल्याणकारी हुकुमशाही केमालने निर्माण केली.रशियात स्टॅलिनची हुकुमशाही होती. वैभव प्राप्त करण्यासाठी जगातील साम्यवादी राष्ट्रांना प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी स्टॅलिनने प्रयत्न केले.स्पेनमध्ये जनरल फ्रॉंकोची हुकुमशाही होती.

**३) जागतिक साम्राज्यवादाची वाढ -**

जर्मनीने परदेशातील वसाहत प्राप्त करण्याचा बेत जाहीर केला. इटलीने आफ्रिकेतील वसाहती जिंकण्याचा डाव रचला.यामुळे साम्राज्यवादाला प्रतिष्ठा प्राप्त झाली.हिटलरने जर्मन साम्राज्याची घोषणा केली. जपानने चीनचा प्रदेश बळकावण्याची मोहीम जाहीर केली.प्रत्येक राष्ट्राने साम्राज्याची वाढ करताना साम्राज्यवादीची सुसंगत तत्त्वे जाहीर केली. औद्योगिक वाढीसाठी कच्चा माल, पक्क्या मालासाठी बाजारपेठ, वाढत्या लोकसंख्येसाठी जड प्रवेश इ. हेतूने वसाहती जिंकण्याची स्पर्धा सुरु झाली.

**४) राष्ट्रसंघाचे अपयश –**

आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता स्थापन करण्यासाठी राष्ट्रसंघ ही आंतरराष्ट्रीय संघटना १० जानेवारी १९२० रोजी जन्माला आली. भव्य, उदात्त तत्त्वावर स्थापना झाली. इंग्लंड, फ्रान्सने राष्ट्रसंघाला हाताचे बाहुले बनवून त्याचे महत्त्व कमी केले. राष्ट्रसंघाच्या केवळ स्वार्थी हेतूने दुरुपयोग फ्रान्सने केला. रशिया-जर्मनीला प्रारंभी सभासदत्व देण्याची टाळाटाळ केली. जपानाचे मांचुरियावर इ.स. १९३९चे आक्रमण, इटालीचा ॲबिसिनीयावर इ.स. १९३६ चा हल्ला यावरून राष्ट्रसंघाने निर्णायक भूमिका घेतली नाही. जपान-इटलीने राष्ट्रसंघाचा राजीनामा इ.स. १९३४ मध्ये दिला.

**५) अमेरिकेचे अलीप्ततेचे धोरण –**

पाहिल्या महायुद्धानंतर ज्या घटना घडल्या त्यात अमेरिकेने रस घेतला नाही. राष्ट्रसंघाचे सदस्यत्व नाकारून जागतिक शांततेच्या दुष्टीने मोठी घोडचूक केली. जागतिक राजकारणात फारसा संबंध नाही. अध्यक्ष हर्डीन्ज ते हुवरपर्यंत अलिप्तवादी धोरण स्वीकारले. राष्ट्रातील संघर्षात नि:पक्षपाती भूमिकेतून भाग घेतला असता,

राष्ट्रसंघाच्या तात्त्विक भूमिकेला पाठींबा दिला असता तर जागतिक राजकारणात युद्धखोर वातावरण तयार झाले असते.

**६) युरोपमध्ये लष्करवादाचा विरोध –**

जर्मनी-इटलीने राष्ट्राच्या सर्व समस्या युद्धानेच सोडविता येतात, हे तत्त्व गृहीत धरले. सक्तीचे लष्करी शिक्षण सुरु केले. शस्त्रांची वाढ केली. जुन्या शस्त्रांच्या जागी नवीन अद्ययावत, महाभयंकर, संहारक शस्त्रे जर्मनी-जपान-इटलीने शोधून काढली. याचा धोका ओळखून फ्रान्स, इंग्लंडने त्याकडे लक्ष देवून शस्त्रवाढ केली. यामुळे दोन्ही गटांत शस्त्रस्पर्धा सुरु झाली.

**७) आत्यंतिक राष्ट्रवाद –**

जर्मनीत नाझी पक्षाने राष्ट्रवाद उदयास आणला. सर्व जगात जर्मन हेच शुद्ध आर्यवंशाचे आहेत. त्यांना जगावर राज्य करण्याचा अधिकार आहे. त्यामुळे इतर वंशाचा द्वेष केला. ज्यूंची कत्तल, आर्थिक शोषण केले. इंग्लंडने जर्मनीची नाकेबंदी केल्याने अर्थव्यवस्था ढासळली आणि महायुद्धात पराभव झाला. याचे दु:ख जर्मनीला होते. आपल्या देशावर प्रेम, दुसऱ्या देशाचा द्वेष करणे, त्यातून लोकशाही-हुकुमशाही संघर्ष सुरु झाला.

**८)लोकशाही विरुद्ध हुकुमशाही यांच्यातील संघर्ष -**

विल्सनच्या चौदा तत्त्वानुसार पहिले महायुद्ध संपले. शस्त्रसंधी करारावर सह्या करणारी राष्ट्रे प्रजासत्ताक असली पाहिजेत ही विल्सनने अट घातली. जर्मनी, ऑस्ट्रिया, हंगेरी. बल्गेरिया येथे प्रजासत्ताक स्थापन केले; परंतु आर्थिक व्यवस्था कोसळल्याने प्रजासत्ताक नष्ट झाले. चलनवाढ, बेकारी यातून हुकुमशहाचा उदय झाला.

**९) आहे रे - नाही रे गटांत संघर्ष –**

जगाची दोन गटांत विभागणी झाली, त्यातून संघर्ष निर्माण झाला. आहे रे गटात इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका, रशिया होते. इंग्लंडच्या राज्यात सूर्य मावळत नव्हता एवढे म्हणजे पृथ्वीवरील १/४ भूभागावर साम्राज्य होते. मेरिका, रशिया यांना स्वत:चा प्रदेश प्रचंड होता. नाही रे गटात जर्मनी, इटली, जपान हे असून त्यांच्याकडे भूमी नव्हती. त्यामुळे साम्राज्यवादाची स्पर्धा सुरु झाली. त्यातून युद्ध घडले.

**१०) तात्कालिक कारण आणि महायुद्धास प्रारंभ –**

इ.स. १९३९ पर्यंत युरोपात दोन गट निर्माण झाले. जर्मनी, इटली, जपान विरुद्ध फ्रान्स, इंग्लंड अशी विभागणी होती. इ.स. १९२९ च्या आर्थिक मंदीनंतर अमेरिकेने आंतरराष्ट्रीय राजकारणात भाग घेऊन इंग्लंड-फ्रान्सला पाठींबा दिला. इ.स. १९३८ मध्ये म्युनिच करार करून हिटलरने ब्रिटन फ्रान्सच्या अनुयायाच्या धोरणाचा फायदा घेतला व झेकोस्लोव्हेकियाचा ताबा घेतला. पोलंडकडे डॉझिंग बंदराची व पूर्व प्रशियात जाण्यासाठी पोलंडमधून वाट द्यावी ही मागणी केली. पोलंड सरकारने नकार दिला. राष्ट्रसंघ मध्यस्थी करण्यास अपयशी ठरला. हिटलरने २९ ऑगस्ट १९३९ रोजी पूर्ण

पोलंडची मागणी केली. नकार येताच १ सप्टेंबर १९३९ रोजी जर्मनीने पोलंडवर हाल चढवला. इंग्लंड, फ्रान्सने जर्मनीविरुद्ध ३ सप्टेंबर १९३९ रोजी जाहीर केले. आणि दुसर्या जागतिक महायुद्धास प्रारंभ झाला.

**आपली प्रगती तपासा :**

प्र.१. दुसऱ्या महायुद्धाची करणे द्या.

**७.२.२.दुसऱ्या महायुद्ध काळातील घटना**

हिटलरच्या आदेशानुसार जर्मन फौजांनी १ सप्टेंबर १९३९ रोजी पोलंडवर आक्रमण केले. त्याच्या विरोधात ३ सप्टेंबर १९३९ रोजी इंग्लंड, फ्रान्स राष्ट्रांनी युद्ध घोषणा करून दुसऱ्या महायुद्धाला प्रारंभ झाला. ३ सप्टेंबर १९३९ ते १४ ऑगस्ट १९४५ रोजी जपानने शरणागती स्वीकारेपर्यंत दोन गटात युद्ध झाले. या युद्धकाळात आणि युद्धानंतरची भूमिका याबाबत अनेक करार झाले.

**दुसऱ्या महायुद्धाच्या लष्करीदृष्ट्या पाच अवस्था :**

**पहिली अवस्था (३ सप्टेंबर १९३९ ते २२ जून १९४१) –** हिटलरन या काळात जलदगतीने पोलंड, नॉर्वे, डेन्मार्क, निदरलँडस, बेल्जिअम, फ्रान्स, ग्रीस क्रीटबेल इत्यादींवर विजय प्राप्त करून ताब्यात घेतले. इटलीने तटस्थता सोडून जर्मनीच्या बाजूने युद्धात प्रवेश केला. रशिया-जर्मनी यांच्यात मतभेद मोठ्या प्रमाणावर वाढले.

**ब) दुसरी अवस्था (२२ जून ते ७ डिसेंबर १९४१) -**जर्मनी व मित्र राष्ट्रांनी आफ्रिकेवर हाल केला. जपानने हवाई बेट पर्ल हार्बरवर हल्ला केला.

**तिसरी अवस्था (७ डिसेंबर १९४१ ते ८ नोव्हेंबर १९४२) –**दोस्त राष्ट्र व शत्रू राष्ट्र या दोघानाही प्रसंगी विजय व पराभव स्वीकारावा लागत असे. जपान व जर्मनीने मलेशिया, निदरलँडस, ईस्ट इंडीज आणि कॉकेशस जिंकून घेतले.

**ड) चौथी अवस्था (८ नोव्हेंबर १९४२ ते ७ मे १९४५) –** अमेरिकेने उत्तर आफ्रिकेवर हल्ला केला. ७ मे १९४५ रोजी जर्मनीने शरणागती स्वीकारली.

**इ) पाचवी अवस्था (७ मे १९४५ ते २ सप्टेंबर १९४५) –** जपानची शरणागती व दुसऱ्या महायुद्धाचा शेवट.

**२) जर्मनीचे पोलंडवर आक्रमण :**

जर्मनीने १ सप्टेंबर १९३९ रोजी पोलंडवर आक्रमण केले. पोलिश सरकारने प्रखर विरोध केला. अखेर शरणागती स्वीकारली. याच वेळी रशियाने पुर्वीकडील पोलंडवर हल्ला केला. जर्मनी-रशिया यांनी पोलंडची वाटणी करून घेतली. जर्मनीने एप्रिल १९४० मध्ये डेन्मार्कचा ताबा घेतला. प्रखर विरोधानंतर जर्मनीने नॉर्वेवर विजय मिळवला. मे १९४० पर्यंत हॉलंड, बेल्जिअम जर्मनीने ताब्यात घेतले.

munotes.in

**३) रशियाने अनेक देश ताब्यात घेतले :**

रशियाने इ.स. १९३९ च्या हिवाळ्यातील वसंत ऋतूत फिनलंडवर हल्ला केला व ताब्यात घेतला. त्यानंतर बाल्टिक प्रदेशातील लटाव्हिया, इस्टोनिया, लिथूयानिया ही छोटी राष्ट्रे जिंकून घेतली.


**४) जर्मनीने फ्रान्सचा ताबा (१४ जून १९४०) :**

फ्रान्सच्या संरक्षणासाठी मॅजिनो तटबंदीवर भरवसा होता. जर्मनीने बेल्जियम जिंकल्यानंतर फ्रान्समध्ये प्रवेश केला. इंग्लंडचा पंतप्रधान विन्स्टन चर्चिलने सर्व युरोपमधून ब्रिटीश सैन्य परत मायदेशी बोलवले. जर्मनीने फ्रान्सवर चढाई करून १४ जून १९४० रोजी ताबा मिळवला. त्यानंतर ॲटलांटिक किनाऱ्यावर वर्चस्व स्थापन केले.

**५) जर्मनी-इटली यांची संयुक्त आघाडी :**

फ्रान्सच्या पराभवानंतर इटलीने दुसऱ्या महायुद्धात प्रवेश केला. उत्तर आफ्रिकेमध्ये इटाली-इंग्लंड यांच्यात लढा सुरु झाला. इटलीने ग्रीस ताब्यात घेतले. या वेळी जर्मनीने युगोस्लाव्हिया व क्रिट जिंकले.

**६) इंग्लंड-जर्मनीची पहिली सलामी :**



इंग्लंड हवाईदल गुणवत्तेच्या जगात प्रथम क्रमांकाचे होते. तरी पण हिटलरचे जून १९४० मध्ये इंग्लंडवर हल्ला केला असता तर कदाचित इंग्लंडचा पराभव झाला असता: परंतु इटली ही हिटलरची घोडचूक त्याच्या पराभवास कारणीभूत ठरली. इंग्लंडच्या पंतप्रधानाची सूत्रे चर्चिल याने घेतली. त्याने जनतेचा विश्वास मिळवला. जर्मनीने ८ ऑगस्ट १९४० रोजी विमानाने इंग्लंडवर हल्ले सुरु केले. रात्रंदिवस बॉम्ब लंडन शहरावर फेकले. त्यामुळे प्रचंड नुकसान झाले. लोकांनी या संकटाला धैर्याने तोंड दिले. इंग्लंडच्या हवाईदलाने जर्मन प्रदेशावर मोठ्या प्रमाणात हल्ले केले.

**७) दोस्त राष्ट्रांना अमेरिकेचे सहाय्य :**

जून १९४० मध्ये आरमार जर्मनीच्या हाती पडू नये म्हणून इंग्लंडने फ्रेंच नाविक दल युद्धनौका, शस्त्रास्त्रे, उधारी व उसनवारीने इंग्लंडला दिले. चर्चिल-रूझवेल्ट यांची अटलांटिक महासागरातील जहाजावर भेट झाली. आपण युद्ध कशाकरिता लढवीत आहोत, यासंदर्भात चर्चा झाली. 'अटलांटिक जाहीरनामा' प्रसिद्ध केला.

**८) जर्मनीकडून रशियाचा विश्वासघात (ऑगस्ट १९४१) :**

जर्मनी-रशिया यांच्यात ऑगस्ट १९३९ मध्ये १० वर्षांसाठी अनाक्रमणाच करार झाला. हिटलरने रशियावर अचानक ऑगस्ट १९४१ मध्ये हल्ला केला. कारण रशियानंतर युक्रेन, कॉकेशस प्रदेशातून अन्नधान्य, तेल साठा मिळवून इंग्लंडवर हल्ला लार्ता येईल, या अपेक्षेने रशियावर हल्ला केला. याला रशियाने प्रत्युत्तर दिले. याच वेळी क्रिप्स मंडळाने रशिया-इंग्लंड यांच्यात मैत्री करार घडवून आणला. या युद्धात हिटलरचा अपेक्षाभंग झाल्याने त्याचा धीर खचू लागला.

**९) जपानचा पर्ल हार्बरवर हल्ला (६ डिसेंबर १९४१) :**

चीन प्रदेशात आपले वर्चस्व प्रशतापित केले. अमेरिकेचे पॅसिफिक महासागरातील वर्चस्व नष्ट करून साम्राज्याची वाढ करावयाच्या हेतूने हल्ला केला. या वेळी अमेरिकन सरकारबरोबर बोलणी सुरु होती; परंतु जर्मनीला रशियात विजय मिळतो आहे हे पाहून जपानने पर्ल हार्बरवर हल्ला चढवला. अमेरिकन आरमाराचे प्रचंड नुकसान झाले. अमेरिकेने जपानविरुद्ध युद्ध पुकारले. पर्ल हार्बरनंतर जपानने आग्नेय आशियात मुसंडी मारून भारताच्या पूर्व सीमेपर्यंत जपान पोहोचले. इ.स.१९४२ पर्यंत जर्मनी, इटाली, जपान यांचा सतत विजय होत होता, तर इंग्लंड,. अमेरिका, रशिया यांची सर्व आघाडीवर पीछेहाट होत होती.

**१०) दोस्त राष्ट्रांचे प्रतिहल्ले :**

दोस्त राष्ट्रांनी नियोजनबद्ध युद्ध मोहिमेची आखणी केली. पॅसिफिक प्रदेशातील लढाईचे नेतृत्व अमेरिकेने जनरल मॅथ ऑर्थर यांच्याकडे दिले. आग्नेय आशियाचे नेतृत्व इंग्लंडने लॉर्ड माउंटबॅटन कडे दिले. फ्रेंच भूमीवरील जर्मन आक्रमण उधळून लावण्यासाठी जनरल आयसेन हॉवरकडे नेतृत्व इ.स. दिले. इ.स. १९४२ पासून युद्धाचे स्वरूप हळूहळू बदलत गेले. भूमध्य समुद्र इटालीच्या मालकीचा आहे असे मुसोलिनी म्हणत असत. त्यास 'माझा सागर' असे म्हणत. इ.स. १९४३ मध्ये मुसोलिनीचा पराभव झाला व अटक केली. अटकेतून निसटून जर्मनीच्या आश्रयास गेला. पुन्हा अटक केली; परंतु देशबांधवांनी मुसोलिनीला गोळ्या घालून ठार मारले.

जर्मनीच्या ताब्यातून फ्रान्सची सुटका करण्यासाठी जनरल अलेक्झांडरने दक्षिणेकडून तर ऱ्हाईन नदीच्या काठी जनरल आयसेन हॉवरने मोहीम हाती घेतली. दोघांची एकत्र भेट झाली. जर्मनीची ताकद नष्ट करण्यसाठी सतत बॉम्ब वर्षाव केले. हूर प्रांत बेचिराख केला. रशियाने पूर्वेकडील पोलंड. रुमानिया, बल्गेरिया, युगोस्लाव्हिया, हंगेरी इ. जिंकून

जर्मनीवर हाल चढविला. दोस्तांनी बर्लिनकडे मोर्चा वळवला. सर्व बाजूने जर्मनीचा पराभव होत आहे हे समजताच हिटलरने ७ मे १९४५ रोजी आत्महत्या केली. जर्मनीने बिनशर्त शरणागती स्वीकारली.

**११) जपानवर अणुबॉम्ब :**

जर्मनी, इटालीने शरणागती स्वीकारली. जपानचे इंग्लंडबरोबर युद्ध सुरु होते. अमेरिकेने जपानच्या पॅसिफिक महासागरावरील आरमारावर हल्ले चढवले. सॉबोमन, मारियाना, ओकिनावा बेट जिंकून घेतले. 'सर्वस्व नाशास तयार व्हावे' असा दोस्तांनी जपानला इशारा दिला. त्यास जपानने शरणागतीस नकार दिला. अमेरिकेने दोन छोटे अणुबॉम्ब ६ ऑगस्ट १९४५ रोजी हिरोशिमा शहरावर टाकले. १ लाख लोक ठार झाले.९ ऑगस्ट १९४५ रोजी दुसरा अणुबॉम्ब नाकासाकी शहरावर टाकला. ४२ हजार लोक ठार झाले. जनरल मॅथ ऑर्थरच्या नेतृत्वाखाली दोस्तांनी जपानचा ताबा घेतला. १४ ऑगस्ट १९४५ रोजी जपानने शरणागती स्वीकारली आणि दुसऱ्या महायुद्धाचा शेवट झाला.

**आपली प्रगती तपासा :**

प्र.१. दुसऱ्या महायुद्धाची काळातील घटनांचा आढावा घ्या.

**७.२.३ दुसऱ्या महायुद्धकाळातील राजनैतिक घडामोडी**

अमेरिका, ब्रिटन, रशिया यांच्या सैन्याने व लष्करी अधिकाऱ्यांनी शत्रू राष्ट्रांवर विजय मिळवण्यासाठी रणांगणावर प्राणाची बाजी लावून लढा सुरु ठेवला. याच राष्ट्राचे नेते रूझवेल्ट, स्टॅलिन यांनी राजनैतिक आघाडीवर डावपेच लढवले. यासाठी अनेक बैठका झाल्या. त्यातून चर्चा होऊन पत्रके, सनदा, करार इ. प्रसिद्ध झाले.

**अटलांटिक सनद (१४ ऑगस्ट ४७४१) :**

दुसरे महायुद्ध सुरु असताना राजनैतिक क्षेत्रातील पहिली घटना म्हणजे ॲटलांटिक सनद होय. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष फॅन्कालिन रूझवेल्ट आणि इंग्लंडचे पंतप्रधान विन्स्टन चर्चिल यांच्यात महायुद्धोत्तर जगाचे स्वरूप कसे असावे. आणि दोस्त राष्ट्रांची भूमिका कोणती असेल हे ठरविण्यासाठी मध्य ॲटलांटिक महासागरात अमेरीकन युद्धनौकेवर बैठक झाली. विचारविनिमय होऊन १४ ऑगस्ट १९४१ रोजी ॲटलांटिक सनद जाहीर केली.

१. दोस्त राष्ट्रे प्रादेशिक अथवा अन्य स्वरूपाचे आक्रमण करणार नाही.

२. लोकांच्या अपेक्षांना जे प्रादेशिक बदल मंजूर नसतील ते प्रादेशिक बदल केले जाणार नाही.

३. लोकांनी मर्जीनुसार निवडलेल्या प्रशासन व्यवस्थेचा दोस्त राष्ट्र आदर करतील.

४. आर्थिक विकासासाठी आवश्यक व्यापार व कच्चा माल मिळविण्यासाठी छोट्या–मोठ्या राष्ट्रांना समान हक्क दोस्त राष्ट्रांना मंजूर असतील.

munotes.in

५. आर्थिक क्षेत्रासंदर्भात जगातील सर्व राष्ट्रांमध्ये संपूर्ण सहकार्य असेल.

६. नाझी हुकुमाशहाचा पूर्ण नायनाट झाल्यावर दोस्त रास्त्र शांततामय जग निर्माण करण्याचा प्रयत्न करतील.

**संयुक्त राष्ट्रसंघाचा जाहीरनामा (१ जानेवारी १९४२) :**

राष्ट्रसंघाचे पुनरुज्जीवन करून आंतरराष्ट्रीय संघटना उभारावी याची प्रेरणा ॲटलांटिक सनदेमुळे मिळाली. वाशिंग्टनमध्ये २६ राष्ट्रांनी १ जानेवारी १९४२ रोजी संयुक्त राष्ट्रसंघाच्या जाहीरनाम्यावर सह्या केल्या. त्यातील तरतुदी.

१. जाहीरनाम्यावर सही करणाऱ्या सर्व राष्ट्रांनी शत्रुराष्ट्रांच्या पराभवासाठी आपली आर्थिक, लष्करी साधनसामग्री पूर्ण वेळ उपयोगात आणली.

२. जाहीरनाम्यावर सही करणारे प्रत्येक राष्ट्र एकमेकांना मदत करेल. तसेच शत्रू राष्ट्रांशी कोणत्याही प्रकारचा तह किंवा करार करणार नाही, अशी प्रतिज्ञा घ्यावी.

३. जाहीरनाम्यावर सही करणारे राष्ट्र ॲटलांटिक सनदेतील तत्त्वांचा आदर करतील.

**कॅसब्लॅका परिषद (१४ ते २६ जानेवारी १९४३) :**

दोस्त राष्ट्रांनी उत्तर आफ्रिकेमध्ये कॅसब्लॅका जिंकले. तेथे दोस्त राष्ट्रांचे नेते एकत्र जमले. पुढील युद्धासंदर्भात विचार करण्यात आला. रूझवेल्ट, चर्चिल, फ्रान्सचे द गॉल हे १४ ते २६ जानेवारी १९४३ या काळात चर्चा केली. त्यातील ठराव पुढीलप्रमाणे.

१. दोस्त लष्कराने सिसिलो व इटालीवर चाल करावी.

२. युद्ध संपल्यानंतर शांतता तहाच्या अटी कोणत्या स्वरूपाच्या असाव्यात.

३. युद्धानंतर दोस्तांचे धोरण कोणते असावे.

**१) मॉस्को जाहीरनामा (१ नोव्हेंबर १९४३) :**

कॅसब्लॅकानंतरची महत्वाची परिषद म्हणजे मॉस्को परिषद होय. १९ ते ३० ऑक्टोबर १९४३ रोजी मॉस्कोमध्ये परिषद भरली. अमेरिकेचे परराष्ट्रीय मंत्री कॉर्डेल हल, ब्रिटीश परराष्ट्रीय मंत्री ॲथनी ईडन, रशियाचे परराष्ट्रीय मंत्री एम. गोलेटोव्ह यांच्यात १४.. दिवस प्रदीर्घ चर्चा झाली. १ नोव्हेंबर १९४३ संयुक्त जाहीरनामा जाहीर केला. त्यास मॉस्को जाहीरनामा म्हणतात. त्यातील तरतुदी पुढीलप्रमाणे..

१. शत्रू राष्ट्राकडून बिनशर्त शरणागती मिळेपर्यंत युद्ध सुरु ठेवणे.

२. शक्य तितक्या लवकर आंतरराष्ट्रीय संघटना स्थापन करण्यात येईल.

३. इटालियन जनतेला लोकशाही सरकार स्थापन करण्याचा हक्क देण्यात येईल.

४. ऑस्ट्रिया हा जर्मनीचा भाग नसल्याने जर्मनीच्या नियंत्रणातून मुक्त करण्यासाठी ऑस्ट्रिया सरकारला सर्व प्रकारचे सर्व सहकार्य देऊन

५. दोस्त राष्ट्रांच्या सैनिकांवर व जनतेवर नाझी सैन्याने केलेल्या अत्याचाराबद्दल नाझी गुन्हेगारांना कडक शासन देणे.

**१) कैरो पत्रक (२६ नोव्हेंबर १९४३) :**

अतिपुर्वीकडील युद्ध परिस्थितीचा विचार करण्यासाठी रूझवेल्ट, चर्चिल चीनचे अध्यक्ष चँग-कै-शेक यांची कैरो येथे भेट झाली. २२ ते २५ नोव्हेंबर १९४३ दरम्यान चर्चा झाली. अतिपूर्वेकडील जपानचा पराभव कसा करता येईल, याचा आराखडा २६ नोव्हेंबर रोजी संयुक्त पत्रक जाहीर केले.

१. जपानने बिनशर्त शरणागती स्वीकारावी.

२. जपानने साम्राज्यवादी धोरणाचा त्याग करावा.

३. दोन महायुद्धाच्या दरम्यान जिंकलेला प्रदेश जपानकडून काढून घ्यावा.

४. जपानने चीनचा बळकावलेला प्रदेश परत चीनला करावा.

५. योग्य वेळी कोरियास स्वतंत्र राष्ट्र म्हणून मान्यता देण्यात येईल.

**२) तेहरान पत्रक (१ डिसेंबर १९४३) :**

कैरो बैठकीनंतर रूझवेल्ट व चर्चिल दोघेही इराणची राजधानी तेहरानला पोहोचले. स्टॅलिनला बोलावून घेतले. २८ नोव्हेंबर ते १ डिसेंबर १९४३ पर्यंत विचारविनिमय झाला. जर्मनीवर अंतिम विजय कसा मिळवता येईल, यावर चर्चा केली. गुप्त लष्करी करार करण्यात आला.

**३) याल्टा करार (११ फेब्रुवारी १९४५) :**

युद्धासंदर्भात विचार करण्यासाठी रूझवेल्ट, चर्चिल, स्टॅलिन आणि त्यांचे परराष्ट्रीय मंत्री व राजनैतिक अधिकारी यांची परिषद २ ते ११ फेब्रुवारीदरम्यान क्रिमियात याल्टा येथे आयोजित करण्यात आली. ११ फेब्रुवारी १९४५ रोजी याल्टा करारावर सह्या करण्यात आल्या.

१. संयुक्त राष्ट्रसंघाच्या स्थापनेसाठी संयुक्त राष्ट्रांची परिषद अमेरिकेत २५ एप्रिल १९४५ रोजी बोलावली. या वेळी संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेचा मसुदा निमंत्रक राष्ट्राची यादी आणि मतदानाची पद्धत इ. संदर्भात महत्वाचे निर्णय घ्यावेत.

२. नाझी व फॅसिस्ट नष्ट करण्यासाठी उ[पाययोजना करण्यात आली.

३. जर्मनीने शरणागती पत्करल्यानंतर त्यांच्याबरोबर तहाच्या अटी निश्चित करण्यात आल्या.

४. जर्मन जनतेला स्वत:चे सरकार निवडण्याचा अधिकार देण्यात आला. तसेच जर्मनीचे सार्वभौमत्व व स्वयं प्रशासन मान्य करून त्यांना मदत करावी.

५. अमेरिका-इंग्लंड-रशिया यांचे मध्यवर्ती नियंत्रक मंडळ जर्मनीवर नियंत्रण ठेवेल. मंडळाने शांतता–सुव्यवस्थेचा विचार करावा.

६. जर्मनीतील लष्करी व्यवस्था विसर्जित करणे, नाझी गुन्हेगारांना कठोर शिक्षा करणे. समाजव्यवस्था व न्यायव्यवस्थेतील नाझी प्रभाव नष्ट करणे.

७. जर्मनीचे विभाजन करताना अमेरिका-ब्रिटन यांना मिळालेल्या प्रदेशातून फ्रान्स एक पट्टा द्यावा. तसेच फ्रान्सला मध्यवर्ती मंडळात समावेश कराव.

८. युद्धातील नुकसान भरपाई दोस्त राष्ट्रांना वस्तूच्या स्वरुपात मिळावी.

९. पोलंडमध्ये लोकशाही प्रातिनिधिक सरकार स्थापन करण्यासाठी प्रौढ मतदान खुल्या पद्धतीने घ्यावे. राजकीय पक्षांना निवडणुकीत भाग घेता येईल.

१०. जर्मनी शरण आल्यानंतर रशियाने दोन-तीन महिन्यांनी जपानशी युद्ध करावे. रशियाला साखलिन बेट द्यावे. दारिएन बंदर आंतरराष्ट्रीय मालकीचे असावे. रशियाला नाविक तळासाठी पोर्ट ऑर्थर द्यावे. पूर्व चीन, रेल्वे, दक्षिण मांचुरिया रेल्वे रशिया-चीन यांच्या संयुक्त कंपनीकडे द्यावे. क्युराईट बेट रशियाला द्यावे.

**८) बर्लिन परिषद -पॉटसडॅम करार (२ ऑगस्ट १९४५) :**

७ मे १९४५ रोजी जर्मनीचा पराभव झाला. जर्मनीसाठी शांतता तहाचा मसुदा करण्यासाठी अमेरिकेचे अध्यक्ष ट्रुमन, इंग्लंडचे पंतप्रधान चर्चिल (नंतर क्लमेंट ॲटली), रशियाचे स्टॅलिन आणि त्यांचे परराष्ट्रीय मंत्री यांची बर्लिन येथे १७ जुलै ते २ ऑक्टोबर १९४५ रोजी परिषद भरली. मसुदा तयार करण्यासाठी परराष्ट्रीय मंत्र्यांचे संयुक्त मंडळ स्थापन केले. या मंडळाचे मुख्य कार्यालय लंडन येथे होत होते. मंडळाचे मुख्य काम म्हणजे इटाली, रुमानिया, बल्गेरिया, हंगेरी फिनलँड यांच्याशी शांतता तह करून युनोच्या कार्यालयाला सादर करणे. जर्मनीबरोबर ही शांतता तह करणे.

**अ) राजकीय तत्त्वे :**

१. शक्यतो सर्व जर्मन लोकांना सन्मानाची वागणूक द्यावी.

२. जर्मनीचे नि:शस्त्रीकरण, निर्लष्कीकरण करण्यात येऊन लोकशाही तत्त्वावर आधारित राजकीय व्यवस्था स्थापन करावी.

३. जर्मनीतील कार्यालयातून / प्रशासनातून सर्व नाझी कार्यकर्त्यांना दूर करावे.

४. नाझी राजवटीतील सर्व युद्ध साहित्य व निर्मितीची साधने नष्ट करावी अथवा दोस्तांच्या ताब्यात द्यावीत.

५. शिक्षण व्यवस्थेतील नाझी तत्त्वज्ञान व लष्करी तत्त्वज्ञान नष्ट करावे. तसेच लोकशाही तत्त्वावर आधारित शिक्षण व्यवस्था अमलात आणावी.

६. न्याय व समान संधी यावर आधारीत्न लोकशाही आणि वंश, धर्म, राष्ट्रीयता याचा भेदभाव न करता न्यायव्यवस्था स्थापन करावी.

७. राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरण करून स्थानिक प्रशासन जास्त जबाबदारी असणारी व्यवस्था निर्माण करावी.

**ब) आर्थिक तत्त्वे :**

१) जर्मनीची युद्धाशक्ती नष्ट करण्यासाठी शस्त्रे, दारुगोळा, युद्धसाहित्य, विमाने, आगबोटी यांच्या निर्मितीवर बंधने घालावीत.

२) आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण असणारी विश्वस्त मांडले, मक्तेदारी मांडले नष्ट करावी. जर्मनीची अर्थव्यवस्था विकेंद्रित असावी.

३) जर्मनीच्या अर्थव्यवस्थेची पुनर्रचना करताना कृषी व लघुउद्योगावर भर द्यावा.

४) आर्थिक पुनर्रचना करताना जर्मनी एकसंध समजण्यात यावा. त्यानुसार (१) खाण व औद्योगिक निर्मिती (२) कृषी, वन, मच्छीमारी (३) ववेतन, किंमत, शिधावाटप ४) चलन व बँक उद्योग (५) संपूर्ण जर्मनीसाठी आयात-निर्यात (६) वाहतूक व दळणवळण अशी स्वतंत्र व्यवस्था करावी.

**क) नौदल व व्यापारी बोटींची अवस्था :**

१) औद्योगिक प्रकल्प विस्थापित करून त्या स्वरुपात दोस्तांना नुकसान द्यावे.

२) जनतेला गरजेपुरतीच साधनसंपत्ती ठेवावी.

३) रशियाला हिस्सा हा रशिया व्याप्त जर्मन प्रदेशातून व देशाबाहेरही इतर साधनसंपत्तीतून मिळावा.

४) अमेरिका, इंग्लंड व इतर देशांचा हिस्सा पश्चिम जर्मनीतून व देशाबाहेरील साधन संपत्तीतून मिळावा.

**ड) नौदल व व्यापारी बोटींची व्यवस्था :**

१) जर्मनीमध्ये सध्या अस्तित्वात असलेल्या नाविक बोटी, गोदीत तयार होत असलेल्या बोटी, दुरुस्त बोटी यांची समान वाटणी अमेरिका, इंग्लंड, रशिया यांच्यात करावी.

२) पाणबुड्यांचा मोठा विभाग नष्ट करावा. ३० पाणबुड्या केवळ तंत्रज्ञान व प्रयोग याकरिता राखून ठेवाव्यात. अमेरिका, इंग्लंड, रशिया यांना प्रत्येकी १० पाणबुड्या द्याव्यात.

३) जर्मनीच्या व्यापारी बोटी दोस्त राष्ट्रांच्या ताब्यात द्याव्यात. त्याची अमेरिका, इंग्लंड, रशिया यांच्यात समान वाटणी करावी.

**इ) युद्ध गुन्हेगारांची चौकशी :**

युद्ध गुन्हेगारांवर खटले चालवण्यासाठी आंतरराष्ट्रीय लष्करी न्यायालयाची १८ ऑक्टोबर १९४५ रोजी स्थापना केली. हिटलरने मानवता व जागतिक शांतता भंग करण्याचा प्रयत्न केला. या कटात सहभागी झालेल्या २४ नेत्यांवर आरोप ठेवण्यात आला. न्युरेनबर्ग येथे इ.स. १९४६ मध्ये खटले चालवले. १२ गुन्हेगारांना देहदंड, ३ गुन्हेगार्राना जन्मठेप व इतरांना १० वर्षांचा तुरुंगवास शिक्षा देण्यात आली.

पॉटसडॅम करार निश्चित केल्यानंतर दोस्तांचे परराष्ट्रीय मंत्र्यांची पहिली बैठक सप्टेंबर-ऑक्टोबर १९४५ मध्ये लंडन, डिसेंबर १९४५ मध्ये मास्कोत बैठक झाली. एप्रिल, ने, जून, जुलै १९४६ मध्ये पॅरिसला बैठक झाली. अंतिम एकमत होणे कठीण झाले. शेवटी इटाली, बल्गेरिया, हंगेरी, फिनलंड, रुमानिया यासाठी मसुदा तयार केला. २१ राष्ट्रांच्या परिषदेत अंतिम मान्हुरी डिसेंबर १९४६ मध्ये मिळाली. इ.स. १९४६ च्या न्यूयॉर्कच्या परिषदेने ५ राष्ट्रांची शांतता थास मान्यता दिली. १० फेब्रुवारी १९४७ रोजी उभय देशांच्या प्रतिनिधींनी स्वाक्षऱ्या केल्या.

**४) जपानबरोबर शांतता तह :**

अमेरिकेने जपानवर विजय प्राप्त केल्यानंतर तह झाला.

१. जपानने साम्राज्य नष्ट करणे.

२. जपानचे निर्लष्करीकरण करून लोकशाही व्यवस्था स्थापन करावी.

३. जपान संदर्भात अमेरिकेने ठरविलेल्या धोरणात दोस्तांनी हस्तक्षेप हस्त्ख्सेप करू नये.

स्टॅलिनने तिसत्य तत्त्वाला विरोध केला. १४ ते २६ डिसेंबर १९४५ या काळात दोस्तांची मास्कोमध्ये बैठकीत चर्चा झाली. ११ राष्ट्रांचे एक अतिपूर्व मंडळ तयार करण्यात आले. जपांसाठी तयार केलेल्या असुद्यावर ४ ते ८ सप्टेंबर १९५१ रोजी सॅनफ्रान्सिको येथील परिषदेत चर्चा झाली. ८ सप्टेंबर रोजी अमेरिका-जपान यांनी तहावर स्वाक्षऱ्या केल्या.

**आपली प्रगती तपासा :**

प्र.१. बर्लिन करारावर थोडक्यात माहिती लिहा.

### ७.२.४. दुसऱ्या महायुद्धाचे परिणाम

युरोपमध्ये हिटलर, मुसोलीनिसारख्या आक्रमक साम्राज्यवादी हुकुमशहाचा उदय झाला. त्याच्या साम्राज्यविस्ताराच्या धोरणातून दुसरे महायुद्ध सुरु झाले. या युद्धात दोन्ही

पक्षाची/गटाची आर्थिक, औद्योगिक जीवित हानी मोठ्या प्रमाणात झाली. या युद्धाचे परिणाम मोठ्या संपूर्ण जगावर झाले.

### १) प्रचंड प्रमाणात विनाशकारक –

पाहिल्या महायुद्धापेक्षा दुसरे महायुद्ध जास्त विनाशकारक ठरले. दुसऱ्या महायुद्धात १४० लक्ष माणसे मृत्यू पावली. ४५० दश लक्ष माणसे जायबंदी झाली. दीड कोटी प्रत्यक्ष प्रत्यक्ष युद्धात सैनिक ठार झाले. युद्धात सर्व राष्ट्रांचा एकूण १०० लक्ष रुपयांचा खर्च झाला. जर्मनीच्या हल्ल्याने ब्रिटनची २००० कोटींची संपत्ती नष्ट झाली. रशियाच्या संपूर्ण राष्ट्रीय संपत्तीचा १/४ भाग नष्ट झाला. सार्वजनिक बांधकामे, घरेदारे, चांगल्या व श्रेष्ठ कलाकृती, कारखाने, धरणे, दवाखाने, बागा इत्यादींचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

### २) मानवाच्या जीवनाची घडी संपूर्ण विस्कटली –

दुसऱ्या महायुद्धाचा मानवी जीवनावर दूरगामी परिणाम झाला. युद्धामुळे मानव समाजाची आर्थिक, सामाजिक, संस्कृतीक व राजकीय घडी विस्कटली. सामान्य माणसाच्या जीवनात आणत अडचणी निर्माण झाल्या. अन्नधान्याची टंचाई, रोगराई, महागाई. काळाबाजार, कापड, औषधे, रॉकेल. कोळसा इ. तुटवडा वाढला. चलनवाढ, महागाई यामुळे सामान्य माणसाचे जीवन अतिशय कठीण झाले.

### ३) साम्राज्यवाद आणि वसाहतवाद यांना धक्का –

दुसऱ्या महायुद्धाने साम्राज्यवाद व वसाहतवाद यांना मोठा हादरा दिला. ऑस्ट्रिया, हंगेरीचे साम्राज्य पाहिल्या महायुद्धानंतर नष्ट झाले. त्याप्रमाणे दुसर्या महायुद्धाने जर्मनी, जपान, इटाली यांचे साम्राज्य उद्ध्वस्त झाले. इंग्लंडलाही महायुद्धानंतर हिंदुस्थान सोडवा लागला. परिणामी दुसऱ्या महायुद्धानंतर साम्राज्यवाद नष्ट झाला.

### ४) जागतिक शांततेसाठी संयुक्त राष्ट्रसंघ –

दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी अमेरिकेने ॲटमबॉम्बचा वापर केला. त्यामुळे काही सेकंदातच १ लक्ष ७० हजार लोक ठार झाले. ॲटमबॉम्बच्या संहारक शक्तीची कल्पना जगाला आली. या घटनेने जगातील राजकारणी लोकांना जाणीव झाली. भावी पिढ्यांना युद्धाची झळ पोपोहोचू नये म्हणून आंतरराष्ट्रीय प्रश्न, वादविवाद सोडवण्यासाठी युद्ध हा एकच मार्ग नाही. कोणतेही प्रश्न शांततेनेही सोडवता येतात. यासाठी २५ एप्रिल १९४५ रोजी राष्ट्रसंघाची स्थापन केली.

### ५) जागतिक राजकारणात नेतृत्वात बदल –

दुसरे महायुद्ध सुरु होईपर्यंत जागतिक राजकारणाचे नेतृत्व इंग्लंड-फ्रान्स यांच्याकडे होते. परंतु अमेरिकेच्या महायुद्धात प्रवेशाने दोस्त राष्ट्रांना विजय मिळवला. त्यामुळे महायुद्धाचे व युद्धानंतर जगाच्या राजकारणाचे नेतृत्व अमेरिका, रशिया या दोन राष्ट्रांकडे आले.

munotes.in

**६) आशिया व आफ्रिका खंडात मोठी जागृती –**

महायुद्धातील घटनांचा परिणाम आशिया-आफ्रिका खंडावर मोठ्या प्रमाणात झाला. या खंडात प्रचंड लीक्जागृती घडून आली. त्यांनी स्वातंत्र्यासाठी अधिक आक्रमण व व्यापक लढे सुरु केले. त्यामुळे अनेक राष्ट्रांना स्वातंत्र्य मिळाले. इजिप्त, सुदान, लिबिया, मोरक्को, ट्युनिशिया, गोलकोट, टोगोलँड इ. स्वतंत्र राष्ट्रे झाली. पश्चिम आशियात तेल पुरवठा असल्याने इंग्लंड-फ्रान्सने आपले वर्चस्व कायम ठेवण्याचा प्रयत्न केला. परिणामी या प्रदेशात राष्ट्रवाद जागृत होऊन अरब संघ स्थापन झाला.

**७) दुसऱ्या महायुद्धानंतर शीत युद्धाला प्रारंभ –**

दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी अमेरिका, इंग्लंडने रशियाच्या मदतीने हिटलरचा पराभव केला. हिटलरचा पाडाव होताच अमेरिका-रशिया एकमेकांच्या विरोधी दिशेने वाटचाल करू लागले. जगातील करू लागले. जगातील अनेक राष्ट्र आपल्या गटात खेचण्याचा प्रयत्न सुरु झाला. त्यामुळे दोन्ही राष्ट्रांमध्ये तणाव निर्माण झाला. विविध क्षेत्रात स्पर्धा सुरु झाली. यालाच शीतयुद्ध म्हटले आहे.रशियाच्या वर्चस्वाखाली असलेल्या प्रदेशाबाहेर प्रभावक्षेत्र वाढविण्यास अमेरिका-इंग्लंड यांनी १९४७ मध्ये विरोध केला. या शीतयुद्धाचे रुपांतर प्रत्यक्ष युद्धात केव्हा होईल याचा भरवसा नव्हता. परंतु स्टॅलिनच्या मृत्युनंतर शीतयुद्ध संपले.

**८) मानवाचे नैतिक अध:पतन –**

दुसऱ्या महायुद्धामुळे माणसाचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला. देव, धर्म, स्त्रिया यांना वेगळ्या भूमिकेतून पहिले जाऊ लागले. विधवा, अनाथ, अपंगांचे प्रश्न वाढले. घरातील कर्ते पुरुष मारले. त्यामुळे कुटुंबावर अनेक संकटे कोसळली. सर्वच नागरिकांना महायुद्धाचे चटके बसले. त्यामुळे मानवाचा नैतिक अध:पत झाला.

**९) ज्यूंची सुटका व युद्ध गुन्हेगारांची चौकशी –**

हिटलरने आर्यांचे श्रेष्ठत्वासाठी लाखो ज्यू लोकांची हत्या व हकालपट्टी केली. हजारो ज्यू लोकांना कैदेत ठेवले. हिटलरच्या पराभवानंतर दोस्त राष्ट्रांनी त्यांची सुटका केली. युद्ध गुन्हेगार म्हणून नाझी नेत्यांची चौकशी करण्यात आली. शांतता व मानवतेच्या विरुद्ध कटकारस्थानांची चौकशीसाठी आंतरराष्ट्रीय लष्करी न्यायालयाची तरतूद करण्यात आली. चौकशीसाठी न्युरेनबर्ग येथे न्यायालय स्थापन केले. गुन्हेगारांना शिक्षा देण्यात आल्या.

**१०) आंतरराष्ट्रीय सहकार्य –**

राष्ट्रवादाने वसाहतवादाचा अंत करून ज्जागाच्या क्षितिजावर अनेक नवीन राष्ट्रे उदयास आली; परंतु महायुद्धाने अनेक समस्या निर्माण केल्या. युद्धात विकास नष्ट झालेला असून त्याचा पुन्हा विकास करण्यासाठी युरोपियन राष्ट्रांना परस्परांच्या सहकार्याची गरज गोती. त्यातूनच आर्थिक समिती स्थापन केल्या. युरोपियांसाठी



munotes.in

सामायिक बाजारपेठ स्थापन केली. अर्थ-व्यवहारासाठी अनेक नव्या संस्था स्थापन झाल्या. आंतरराष्ट्रीय सहकार्य करून आयात-निर्यात व्यापार वाढला. आर्थिक विकास झाला.

**आपली प्रगती तपासा :**

प्र.१. दुसऱ्या महायुद्धाचे परिणाम सांगा.

## ७.३. सारांश

पाहिल्या महायुद्धानंतर पराभूत राष्ट्रांवर जे तह लादले त्यातून सुडाचे राजकारण सुरु झाले. त्यातून जगात हुकुमशहांचा उदय झाला. त्यांनी वंशद्वेष, साम्राज्यवाद यातून दुसरे महायुद्ध सुरु झाले. ते युद्ध जिंकण्यासाठी लष्करी व राजनैतिक कारवाया सुरु झाल्या. युद्धाचा शेवट झाल्यानंतर महायुद्धानंतर जागतिक शांततेसाठी युनोची स्थापना करण्यात आली. युनोने राजकीय व अराजकीय स्वरूपाचे कार्य केले आहे.

## ७.४. प्रश्न

१) दुसऱ्या महायुद्धाची करणे व परिणाम सांगा.

२) दुसऱ्या महायुद्धाच्या काळातील राजनैतिक घटनांचा आढावा घ्या.

## ७.५ संदर्भ


१) डॉ. अनिल कठारे -विसाव्या शतकातील जगाचा इतिहास
२) डॉ. अनिल कठारे- आधुनिक जगाचा इतिहास
३) पी.जि.जोशी - आधुनिक जगाचा इतिहास
४) डॉ.सुमन वैद्य, डॉ. शांता कोठेकर- विसाव्या शतकातील जग (१९१४-१९४५) भाग-१
५) डॉ.सुमन वैद्य, डॉ. शांता कोठेकर- विसाव्या शतकातील जग (१९४६- २०००) भाग-२
६) डॉ. अनिरुद्ध , प्रा. गजानन भिडे-आधुनिक जगाचा इतिहास
७) जैन हुकूमचंद आणि कृष्णा माथुर- आधुनिक जगाचा इतिहास
८) कदम य.न. - विसाव्या शतकातील जगाचा इतिहास
९) कुलकर्णी अ.र. आणि देशपांडे-आधुनिक जगाचा इतिहास- भाग-1 & २
१०) साकुरे विजयानंद, अनिल कठारे-जागतिक इतिहासातील स्थित्यंतरे
११) उदगावकर म.न. आणि गणेश राउत- आधुनिक जग


❖❖❖❖

# ८

# संयुक्त राष्ट्रसंघटना (UNO)

**घटक रचना**


८ .०. उद्दिष्ट्ये

८.१. प्रस्तावना

८.२. संयुक्त राष्ट्रसंघटना

  ८.२.१ अटलांटिक सनद

  ८.२.२. संयुक्त राष्ट्रसंघटनेचा निर्मितीचा इतिहास

  ८.२.३.युनोची तत्त्वे

  ८.२.४. युनोचे सभासदत्व

  ८.२.५. संयुक्त राष्ट्रसंघटनेचे प्रमुख घटक

  ८.२.६. युनोचे कार्य

८.३. सारांश

८.४. प्रश्न

८.५ संदर्भ


## ८.०. उद्दिष्ट्ये

- जगामध्ये कायमची शांतता व सुरक्षितता राखणे.
- राष्ट्रा-राष्ट्रांमध्ये मैत्रीचे संबंध निर्माण करणे.
- सभासद राष्ट्रांतील सामाजिक, आर्थिक आणि इतर प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करणे, प्रसंगी सहकार्य करणे.
- जात, वंश, रंग, भाषा, धर्म याचा विचार न करता सर्वांना मुलभूत स्वातंत्र्य मिळणे आणि मानवी हक्काचा आदर करणे.
- अंतर्गत प्रश्नांमध्ये हस्तक्षेप ना करणे.

## ८.१. प्रस्तावना

मानवाच्या राजकीय जीवनाची सुरुवात संघर्षाने, युद्धानेच झाली. जगाच्या इतिहासात इ.स. १९१४-१९१९ या काळात पहिले जागतिक महायुद्ध झाले. त्यात मोठ्या प्रमाणात

विनाश झाला. अशा घटना पुन्हा होऊ नये म्हणून राष्ट्रसंघाची स्थापना केली. अनेक देशांच्या आक्रमक धोरणामुळे राष्ट्रसंघाला अपयश आले. त्यातून दुसरे महायुद्ध सुरु झाले. युद्ध समाप्तीनंतर शांततेवर गंभीरपणे विचार झाला. जगात युद्ध कायमचे नको यासाठी राष्ट्रसंघातील दोष दूर करून २५ एप्रिल १९४५ रोजी संयुक्त राष्ट्रसंघाच्या (युनो) स्थापन करण्यात आली.

## ८.२ संयुक्त राष्ट्रसंघटना

**अटलांटिक सनद :**

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात मित्र राष्ट्रांनी आपल्या लष्करी हालचालींमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी अनेक परिषदा घेतल्या होत्या. या परिषदांमध्ये जागतिक शांतता कायमची प्रस्थापित करण्यासाठी तसेच युद्धोत्तर जगाची पुनर्रचना करण्यासाठी प्रयत्न केले गेले. यासाठी अमेरिकन राष्ट्राध्यक्ष फ्रँकलीन रूझवेल्ट आणि इंग्लंडचा पंतप्रधान विन्स्टन चर्चिल यांची भेट व्हावी अशी योजना उधार-उसनवार योजनेचा व्यवस्थापक हॅरी हॉपकिन्स हा जुलै १९४१ मध्ये चर्चिलच्या भेटीसाठी इंग्लंडला गेला असताना त्याने आखली. १९४१ पर्यंत सर्व युद्ध आघाड्यावर जर्मनीची आगेकूच सुरु असल्यामुळे संपूर्ण युरोपवर जर्मनीचे वर्चस्व प्रस्थापित होण्याचा धोका निर्माण झाला होता. अशा परिस्थितीत जर्मनीला यशस्वीरीत्या प्रतिकार करण्याच्या दृष्टीने इंग्लंडचे सामर्थ्य कसे वाढविता येईल याबाबत रूझवेल्ट व चर्चिल या दोन राष्ट्रप्रमुखामध्ये समक्ष चर्चा होणे आवश्यक वाटल्यावरून त्यांची भेट न्यू फाउंडलंट किनाऱ्यानजीक आयोजित करण्यात आली. ९ ते १२ ऑगस्ट १९४१ पर्यंत ही बैठक सुरु होती. दोन राष्ट्रप्रमुखांच्या या बैठकीमध्ये इंग्लंडला कोणते युद्धसाहित्य पुरविल्या जावे आणि जपानबाबत कोणती भूमिका घ्यावी या विषयांवर मनमोकळी सविस्तर चर्चा झाली. याच ऐतिहासिक बैठकीत या दोन राष्ट्रप्रमुखांची प्रस्तुत युद्धाबाबतची आणि युद्धोत्तर जगबाबतची उद्दिष्ट्ये स्पष्ट करणारे निवेदन – 'अटलांटिक सनद' तयार करण्यात आले. १४ ऑगस्ट १७४१ रोजी प्रसिद्ध झालेल्या अटलांटिक सानादेमुळे अमेरिका इंग्लंडच्या पाठीशी खंबीरपणे उभी असल्याबद्दल जर्मनीशी खात्री झाली.

अंतिम विजयाच्या दृष्टीने जास्तीत जास्त राष्ट्रांची व त्या राष्ट्रांमधील जनतेची सहानुभूती व पाठींबा प्राप्त करून घेण्याच्या उद्देशाने, तसेच युद्धोत्तर जगाची व्यवस्था व स्वरूप याबाबतचे इंग्लंड व अमेरिकेचे आदर्श, तत्त्वे व कल्पना 'अटलांटिक चार्टर' मध्ये घोषित करण्यात आल्या.

१) इंग्लंड व अमेरिका या राष्ट्रांची भूमिका आक्रमकाची माही. त्यांना कुठल्याही प्रकारच्या प्रादेशिक विस्ताराची अथवा अन्य कोणत्याही अतिरिक्त लाभाची अपेक्षा नाही.

२) युद्धानंतर संबधित देशातील जनतेच्या इच्छा खुल्या पद्धतीने जाणून घेतल्याशिवाय कोणत्याही प्रकारचा प्रादेशिक बदल करण्यात येणार नाही.

३) आपल्या देशात कोणत्या प्रकारची शासनपद्धती असावी हे ठरविण्याचा अधिकार त्या देशातील नागरिकांना आहे आणि बळजबरीने ज्या लोकांचे स्वातंत्र्य हिरावून घेतले गेले असेल त्यांना त्यांचा सार्वभौमत्वाचा व स्वयंशासनाचा हक्क अमान्य करण्यात येईल.

४) सर्व राष्ट्रांना मग ती लहान असोत वा मोठी, विजयी असोत अथवा पराभूत, त्यांच्या औद्योगिक भरभराटीचीसाठी आवश्यक असणारा कच्चा माल मिळवून देण्याचा प्रयत्न करण्यात येईल आणि सर्व राष्ट्रांना समान भूमिकेवर व्यापार करण्याचा हक्क मिळेल असा प्रयत्न प्रचलित जबाबदाऱ्या सांभाळून केला जाईल.

५) मजुर वर्गाचे राहणीमान सुधारणे, त्यांची आर्थिक प्रगती घडवून आणणे आणि त्याच्या सामाजिक सुरक्षिततेसाठी जगातील सर्व राष्ट्रांच्या आर्थिक व्यवहारांमध्ये जास्तीत जास्त सहकार्य निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

६) नाझींच्या जुलुमी हुकुमशाहीचा नाश केल्यानंतर जगात शांतता प्रस्थापित करण्यात येईल. सर्व राष्ट्रांना स्वातंत्र्य, शांतता व सुरक्षितता यांची हमी मिळेल. सर्व राष्ट्रांच्या सीमा सुरक्षित राहाव्यात आणि जगातील सर्व लोकांना जीवनावश्यक वस्तूंच्या अभावापासून, आर्थिक दैन्यापासून व भयापासून मुक्त असे सुखी जीवन निर्वेधपणे जगता येईल. अशा प्रकारची व्यवस्था शांतता प्रस्थापित करताना करण्यात येईल.

७) जगातील सर्व लोकांनी सागरी संचाराचे स्वातंत्र्य अप्रतिबंधपणे उपभोगता येईल.

८) आंतरराष्ट्रीय राजकारणात शक्ती सामर्थ्याचा प्रयोग अत्यंत हानिकारक ठरतो याचा प्रत्यय सर्वच राष्ट्रांना आलेला असल्यामुळे लष्करीसामर्थ्याचा वापर त्याज्य ठरविला पाहिजे. युद्धामार्गाचा अवलंब व शस्त्रास्त्रस्पर्धा चालू राहिल्यास भविष्यात आक्रमणाला पायबंद घालणे व शांतता प्रस्थापित करणे अशक्य असल्यामुळे चिरकालीन शांतता व सुरक्षितता प्रस्थापित करण्यासाठी शस्त्रास्त्रकपातीची तीव्र निकड आहे. शांततेचा पुरस्कार करणाऱ्या जनतेच्या मनातील शस्त्रास्त्रांची भीती नष्ट होण्यासाठी शस्त्रकपातीच्या ज्या उपाययोजना केल्या जातील त्या व्यवहार्य प्रयत्नांना सर्वतोपरी उत्तेजन दिले जाईल.

जर्मनीविरुद्ध लढणाऱ्या दोस्त राष्ट्रांचे युद्धहेतू अटलांटिक सनदेद्वारा विशद करण्यात आले. रूझवेल्ट व चर्चिल या दोन राष्ट्रप्रमुखांनी संयुक्तरीत्या काढलेल्या या आले. रूझवेल्ट व चर्चिल या दोन राष्ट्रप्रमुखांनी संयुक्तरीत्या काढलेल्या या निवेदनामुळे इंग्लंड व अमेरिका यांच्या युद्धविषयक वैचारिक भूमिकेत एकवाक्यता असल्याचे स्पष्ट झाले.

**आपली प्रगती तपासा :**

**प्र.** १. अटलांटिक सनदवर थोडक्यात माहिती लिहा.

### ८.२.१. संयुक्त राष्ट्रसंघटनेचा निर्मितीचा इतिहास

हिटलरच्या आक्रमणाने दुसऱ्या महायुद्धाला सुरुवात झाली. इंग्लंड आणि तिच्या दोस्तांनी युद्धात प्रवेश केला. प्रारंभीच्या काळात हिटलरच्या विजयाची घोडदौड सुरु होती तर दोस्तांना पराभवाला सामोरे जावे लागत होते याच वेळी लष्करी हालचालींमध्ये एकसूत्रता व विजय प्राप्तीसाठी दोस्तांच्या हालचाली सुरु झाल्या. रूझवेल्ट, चर्चिल यांची ॲटलांटिक महासागरात, न्यू फौडलंड देशाजवळ बैठक झाली. आपण का लढतो त्याची ध्येयधोरणे काय, यासंदर्भात चर्चा झाली. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या निर्मितीशी वैचारिक भूमिका तयार झाली. १ जानेवारी १९४२ रोजी वॉशिंग्टन परिषदेतील ५६ राष्ट्रांनी अटलांटिक सनदेला पाठींबा दिला. तेहरानच्या बैठकीत घटनेचा तरव मंजूर करण्यात आला. सॅनफ्रान्सिस्को येथे ५० राष्ट्रांच्या परिषदेत संयुक्त राष्ट्रसंघटना स्थापन करण्यात आली. २५ एप्रिल १९४५ रोजी जगातील ३६ राष्ट्रांच्या निर्णयाच्या आधारे संयुक्त राष्ट्रसंघटनेची अधिकृतरीत्या स्थापना केली.

### ८.२.२.युनोची तत्त्वे

युनोच्या सनदेचे १९ भाग असून १११ कलमे आहेत. युनोच्या सनदेच्या सुरुवातीस युनोचे उद्दिष्ट्ये व तत्त्वे मांडलेली आहेत. ती तत्त्वे पुढीलप्रमाणे –

१. सर्व सभासद राष्ट्रांचे सार्वभौमत्व समान आहे.

२. युनोच्या सनदेप्रमाणे जी बंधने /अटीसभासदांनी स्वीकारली असतील तिचे प्रामाणिकपणे पालन करणे.

३. युनोच्या प्रत्येक कार्यास सहकार्य करणे.

४. युनोचे सभासद नसलेली राष्ट्रे शांतता व सुरक्षिततेच्या धोका निर्माण नाही याबाबत लक्ष ठेवणे.

५. सभासदांनी स्वत:चे आंतरराष्ट्रीय तंटे सामोपचाराने सोडवणे.

### ८.२.३. युनोचे सभासदत्व

सॅनफ्रान्सिस्को परिषदेत भाग घेतलेल्या 50 राष्ट्रांना सभासदत्व देण्यात आले. नवीन राष्ट्राला सभासदत्व मिळवण्यासाठी २/३ बहुमताने मान्यता देत असतात. त्याबरोबर बड्या सत्तांचे एकमत व एकूण सभासदांचे २/३ बहुमत याआधारे सभासदत्व दिले जात. याच पद्धतीने एखाद्या राष्ट्राचे सभासदत्व रद्द करता येत असत. आज जगातील सुमारे १५२ राष्ट्रे १५२ राष्ट्रे युनोचे सभासद आहेत. आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता निर्माण करण्याच्या कार्याला प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे सहकार्य करणे ही सभासद राष्ट्रांची जबाबदारी आहे.

### ८.२.३. संयुक्त राष्ट्रसंघटनेचे प्रमुख घटक

संयुक्त राष्ट्रसंघटनेचा कार्यभार सांभाळण्यासाठी विविध घटक आहेत. त्यामध्ये महासभा, सुरक्षा समिती, आर्थिक व सामाजिक समिती, विश्वस्त समिती, आंतरराष्ट्रीय न्यायालय, सचिवालय, युनोच्या इतर खास समित्या इ. समावेश होतो.

#### १) महासभा :-

युनोमधील सर्वात मोठा व महत्वाचा घटक म्हणजे महासभा होय. सर्व सभासद राष्ट्र महासभेचे प्रतिनिधी असत. प्रत्येक राष्ट्राला जास्तीत जास्त पाच सभासद पाठविता येत असे; परंतु त्या सर्वांचे एकाच मत असे. आपल्या प्रतिनिधींचा सर्व खर्च संबंधित देशानेच करावयाचा असतो. महासभेचे अधिवेशन वर्षातून एकच असे. आपल्या प्रतिनिधींचा सर्व खर्च संबंधित देशानेच करावयाचा असतो. महासभेचे अधिवेशन वर्षातून एकच असे. साधारण सप्टेंबर महिन्याच्या तिसऱ्या गुरुवारी बैठकीला सुरुवात होत असे.सेक्रेटरी जनरल आमसभेचे खास अधिवेशन बोलावत असे. महासभेचे सर्व निर्णय सभासद राष्ट्रांना कायदेशीर बंधनकारक असे. महासभेचे कार्य पुढीलप्रमाणे –

१. आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता टिकविण्यासाठी उपाययोजना करणे.

२. सभासद राष्ट्रांना आर्थिक व सामाजिक सहकार्य करणे आणि त्यावर देखरेख करणे.

३. विश्वस्त समितीच्या कामकाजावर नियंत्रण ठेवणे.

४. संयुक्त राष्ट्रसंघटनेचा अर्थसंकल्प मंजूर करणे.

५. राष्ट्रांना सभासदत्व देणे, तहकूब करणे किंवा संघटनेतून काढून टाकणे, याबाबत निर्णय घेणे.

६. नि:शस्त्रीकरण, शस्त्र नियंत्रण, आंतरराष्ट्रीय कायद्याची अंमलबजावणी करणे. संघटनेच्या निरनिराळ्या उपसमित्यांच्या सभासदांची निवड करणे.

७. युनोच्या घटनेत दुरुस्ती बहुमताने करणे.

युनोची मुख्य कचोरी न्यूयॉर्कमध्ये असून युरोप खंडात उपकचेरी जिनेव्हा येथे आहे. मुख्य कचेरी अमेरिकेत असती तरी तिचे नियंत्रण त्यावर नाही. नॉर्वेचे ट्रीग्वेलीए युनोचे पहिले जनरल सेक्रेटरी होते.

#### २) सुरक्षा समिती :-

युनोच्या सदस्य राष्ट्रांचे कार्यकारी मंडळ म्हणजे सुरक्षा समिती होय. आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता राखण्याची जबाबदारी या समितीकडे आहे. या समितीमध्ये जगातील बड्या राष्ट्रांचे महत्वाचे स्थान आहे. अमेरिका, इंग्लंड, रशिया, चीन ही कायम राष्ट्रे आहेत इ.स. १९४५ सॅनफ्रान्सिस्को परिषदेत फ्रान्सला स्थानला स्थान दिले. इ.स. १९४९ चीमध्ये क्रांती क्रांती होऊन कम्युनिस्ट सरकारने राष्ट्रीय सरकारला

फॉर्मोसा बेटावरून हाकलून दिले. त्यामुळे अमेरिकेने चीनऐवजी फॉर्मोसाला प्रतिनिधित्व दिले. त्यामुळे अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, फॉर्मोसा, रशिया या पाच राष्ट्रांना कायम सभासद इतर राष्ट्रांतून हंगामी ६ सभासद असे एकूण ११ सभासद झाले. १७ डिसेंबर, १९६३ ठरावानुसार हंगामी सभासदांची संख्या ६ ऐवजी १० केली व फॉर्मोसीऐवजी कम्युनिस्ट चीनला प्रतिनिधित्व दिले. त्यामुळे एकूण १५ सभासद झाले.

समितीची बैठक आठवड्यातून किमान एकदा घ्यावी. बड्या राष्ट्रांचे स्थान कायमचे असून त्यांच्या निर्णयाला महत्व असे. कोणत्याही निर्णयासाठी ८ मतांची गरज त्यामध्ये ५ राष्ट्रांचे एकाच मत असे. एखाद्या राष्ट्राने नकारार्थी मत मांडले तर त्याला व्हेटो म्हणतात. सुरक्षा समितीची कामे पुढीलप्रमाणे –

१. महासभेला सुरक्षा समितीच्या कार्याचा अहवाल सादर करणे.

२. सभासद राष्ट्रांच्या शस्त्रवाढीवर नियंत्रण घालण्यासाठी निरनिराळ्या योजना महासभेला सादर करणे.

३. विश्वस्त राष्ट्रांच्या ताब्यातील प्रदेशातील नियंत्रण ठेवणे.

४. शांततेचा भंग करणाऱ्या राष्ट्राला सामोपचाराचा सल्ला देणे. त्याचा उपयोग झाला नाही तर सैन्य पाठवून कारवाई करणे.

५. सभासद राष्ट्रांपैकी कोणी दुसऱ्या राष्ट्राविरुद्ध तक्रार केल्यास ती समजावून घेणे. बंडखोर राष्ट्राची आर्थिक नाकेबंदी करणे, बहिष्कार टाकणे, लष्करी कारवाई करणे.

### ३) विश्वस्त समिती :-

पाहिल्या महायुद्धानंतर राष्ट्रसंघाने जी मॅडेट पद्धत अस्तित्वात आणली होती. त्या पद्धतीमध्ये सुधारणा करून विश्वस्त समिती स्थापन केली. जर्मन, जपान, इटाली यांच्या वसाहती मुक्त केल्या. त्या प्रदेशावर देखरेख ठेवणे, त्याची प्रगती करणे तेथील लोकांना अंतर्गत स्वायतत्ता व स्वातंत्र्य देणे, यासाठी युनोने विश्वस्त समितीची स्थापना केली. कामरूड, टोगोलँड, सोमालीलँड, पश्चिम सामोआ, टांगनिक, रुआंडा, मार्शलबेट इ. प्रदेश विश्वस्त प्रदेश म्हणून समजण्यात आले. व्यवस्थेसाठी समित्या स्थापन केल्या.

१. विश्वस्त म्हणून ज्यांच्याकडे वसाहती सोपविलेल्या आहेत, अशी राष्ट्रे उदा. बेल्जियम, इंग्लंड, फ्रान्स, न्यूझीलंड, अमेरिका इटाली इ.

२. ज्यांच्याकडे वसाहती नाही परंतु जे सुरक्षा समितीचे कायमचे सदस्य आहेत अशी राष्ट्रे – रशिया, चीन.

३. आमसभा काही सभासदांची तीन वर्षांसाठी निवड करत असे ते ५ सभासदांचे मंडळ असे.

**विश्वस्त समितीचे कार्य /कामे पुढीलप्रमाणे –**

१. विश्वस्त प्रदेशाची जबाबदारी सोपविलेल्या राष्ट्रांकडून आलेल्या अहवालावर चर्चा करणे.

२. विश्वस्त प्रदेशाकडून आलेल्या अर्जावर विचार करून उपययोजना करणे.

३. विश्वस्त प्रदेशात सतत भेटी देऊन लोकप्रगतीची पाहणी करणे.

४. विश्वस्त प्रदेशातील राजकीय, आर्थिक, सामाजिक प्रगतीची माहिती गोळा करणे.

**४) सचिवालय :-**

युनोच्या शासन यंत्रणेचा केंद्रबिंदू म्हणजे सचिवालय होय. यामध्ये चार हजार नोकरवर्ग आहे. सचिवालयाच्या प्रमुखास सेक्रेटरी जनरल असे म्हणतात. त्याची नेमणूक सुरक्षा समितीकडून होते. यास पाच कायम सदस्यांची मंजुरी मिळाल्यानंतर आमसभेकडून बहुमताने त्याची निवड केली जाते. युनोच्या सर्व समितीच्या बैठकीला हजर राहण्याचा अधिकार सेक्रेटरीला असतो. सचिवालयाची कामे पुढीलप्रमाणे –

१. आंतरराष्ट्रीय शांततेस धोका होत असल्यास सुरक्षा समितीला सांगणे.

२. सर्व उपसमित्यांच प्रमुख सचिव म्हणून काम पाहणे.

३. युनोचे वार्षिक अहवाल तयार करणे.

४. सभासदांच्या मागणीनुसार खास अधिवेशन बोलणे.

५. न्यायाधीशांच्या नेमणुकीसाठी सभासद राष्ट्राकडून नावे मागवणे.

६. आमसभेने काही खास कामे सोपवली तर ती पार पडणे.

७. आवश्यक तो नोकरवर्ग भरती करणे.

८. सभासद राष्ट्रांची वर्गणी ठरवणे व ती गोळा करणे.

**आंतरराष्ट्रीय न्यायालय :-**

आंतरराष्ट्रीय वादग्रस्त सोडविण्यासाठी युनोने आंतरराष्ट्रीय न्यायालय स्थापन केले. त्याची मुख्य कचेरी हॉलंडमधील हेग या ठिकाणी आहे. सुरक्षा समितीच्या शिफारसीनुसार महासभा १५ न्यायाधीशांची निवड करते. त्यांची मुदत ९ वर्षांची असते. १५ न्यायाधिशांकडून तीन वर्षांसाठी अध्यक्ष, उपाध्यक्ष यांची निवड केली जाते. आंतरराष्ट्रीय न्यायालयाकडे प्रामुख्याने पुढील जबाबदाऱ्या असतात.

१. राष्ट्राराष्ट्रातील संघर्ष व वाद मिटवणे.

२. न्यायालय आंतरराष्ट्रीय कायदा, रूढी कायाद्याची मुलभूत तत्त्वे याच्या साहाय्याने तंट्याबाबत निर्णय घेत असतात. या वेळी युनोच्या सनदेचे पालन, नैतिक जबाबदारी त्याचप्रमाणे न्यायालयाचे निर्णय संबंधित राष्ट्रांना बंधनकारक आहे.

निर्णयाची अंमलबजावणी केली नाही तर संबंधित दुसऱ्या राष्ट्राने सुरक्षा समितीकडे धाव घ्यावी.

**६) आर्थिक व सामाजिक समिती :-**

मानवाच्या दु:खाचे मूळ कारण म्हणजे सामाजिक व आर्थिक विषमता होय. राष्ट्राराष्ट्रातील राजकीय, सामाजिक, आर्थिक विषमता हेच महायुद्धाचे कारण आहे. ही विषमता नष्ट करण्याच्या हेतूने आर्थिक व सामाजिक समितीची स्थापना करण्यात आली. या समितीत एकूण २७ सभासद आहेत. आरोग्य, शिक्षण, मजुरांचे प्रश्न, व्यापार इ. अनेक प्रश्नांसदर्भात कार्य करणे. कार्य करण्यासाठी अनेक उपसमित्या स्थापन केली, त्यास युनोस्को असे म्हणतात. या समितीच्या सदस्यांची निवड तीन वर्षांसाठी आमसाभेकडून केली जाते. दरवर्षी १/३ सदस्य निवृत्त होतात.

**७) युनोच्या इतर खास समित्या :-**

१. आंतरराष्ट्रीय मजूर संघटना

२. अन्न व शेती संघटना

३. ३)आंतरराष्ट्रीय शैक्षणिक, शास्त्रीय व सांस्कृतिक योजना

४. आंतरराष्ट्रीय नागरी हवाई वाहतूक संघटना

५. आंतरराष्ट्रीय आर्थिक निधी (I.M.F.)

६. जागतिक आरोग्य संघटना (W.H.O.)

७. विश्व डक संघ (I.P.U.)

८. आंतरराष्ट्रीय व्यापार संघटना (I.T.O.)

९. आंतरराष्ट्रीय निधी (UNICEF)

**आपली प्रगती तपासा :**

प्र.१. महासभा यावर टीप लिहा.

## ८.२.४. युनोचे कार्य

इ.स. १९४५ मध्ये युनोची स्थापना झाली. युनोच्या अंतर्गत अनेक समित्या, उपसमित्या स्थापन करण्यात आल्या. त्या समितीच्या माध्यमातून युनोने राजकीय व अराजकीय स्वरूपाचे कार्य केले.

१) **सामाजिक कार्य :** युनोने युरो, लॅटिन अमेरिका खंडामध्ये आर्थिक पाहणी करून अनेक उपाययोजना सुचवल्या. आर्थिक पुनर्रचना, लोकसंख्या, अन्नधान्य, प्रादेशिक अडचणी, यासंदर्भात अनेक सूचना केल्या. प्रसंगी आर्थिक मदत केली.

मानवजातीचे आरोग्य, वैज्ञानिक संशोधन याची आकडेवारी गोळा करून ती प्रसिद्ध केली.

२) **आर्थिक सुधारणा :** आंतरराष्ट्रीय बँक, आंतरराष्ट्रीय नाणेविधी संघटनेची स्थापना केली. या संघटनेच्या माध्यमातून गरीब राष्ट्रांना आर्थिक मदत केली. पूरनियंत्रण, रोगनिवारण, दळणवळण टपाल व्यवस्था इ. कामे करण्यात आली. राष्ट्राराष्ट्रांतील सहकार्य वाढवणे.

३) **शैक्षणिक सुधारणा :** युनोस्को या संघटनेच्या तर्फे अनेक विद्यार्थ्यांना, शैक्षणिक संस्थांना शिष्यवृत्या, पुस्तके, माहितीपट याची मदत करणे. सभा, संमेलन, भारावून शैक्षणिक जागृती निर्माण करण्याच्या प्रयत्न केला. फिल्मद्वारा जगातील माणसांच्या अडचणी समजावून घेणे.

४) **आरोग्य सुधारणा :** युनोच्या सभासद राष्ट्रांना रोगांच्या मोफत लसी पुरवणे. फुकट औषधे देणे. दूध, इतर पदार्थांचे गरिबांना वाटप करणे. मोफत पुरवठा करून आरोग्याचा विकास करण्याचा प्रयत्न करणे. दारु, अफू, गांज्या यासारख्या मादक पदार्थांच्या व्यवसायावर बंदी घालणे. समाजाला व्यसनापासून दूर करणे. स्त्रियांचे प्रश्न सोडवणे.

५) **कामगारविषयक सुधारणा :** विविध देशांमध्ये मजुरांच्या परिषदा, सभा घेऊन मजुरांची जागृती करणे. त्यांच्या संखेत वाढ करणे, वेतन व त्यांच्या अडचणींसंदर्भात विचार करून ते सोडविण्याचे प्रयत्न करणे. बालकांचे आरोग्य सुधारणे. बालकांना मोफत अन्न आणि शैक्षणिक साधने पुरवणे. मजुरांना पगार, विमा, पेन्शन व सोयी पुरवणे.

६) **शेती सुधारणा :** शेती उत्पादन वाढविण्यासाठी युनोतर्फे अनेक उपाययोजना केल्या जातात. पिकांची वाढ, पूस, जंगलसंवर्धन यासाठी उपाय करण्यात आले. आधुनिक तांत्रिक शेतीविषयक ज्ञान पुरवणे.

७) **युद्धाची भावना कमी करणे :** जागतिक पातळीवर युद्धाची भावना कमी करण्यासाठी रेड क्रॉस संघटनेची स्थापना करण्यात आली. युद्धानंतर जखमी लोकांची देखभाल करणे. युद्धकैद्यांना संरक्षण देणे. खेळ संघटनेस मदत करणे. सर समाजाला एकत्र आणणे. त्यांच्या मनातून युद्धाची भावना कमी करणे.

८) **संस्कृतीचा प्रसार :** देशादेशातील सांस्कृतिक संबंध वाढविण्यासाठी साहित्य, कला व सांस्कृतिक मंडळातर्फे अनेक प्रकारचे उपक्रम राबवणे. साहित्याचे निरनिराळ्या भाषेमध्ये भाषांतर करणे. विद्वानांना एकत्र आणून संस्कृतीचा प्रसार करणे.

९) **मानवी हक्कांची घोषणा :** युनोकडे जानेवारी १९४६ मध्ये पहिली तक्रार इराणने रशियाविरुद्ध केली. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात रशियन फौजा इराणमध्ये होत्या. त्या मागे घेण्यास रशियाने नकार दिला. त्यामुळे एरनने आपली तक्रार युनोकडे

नोंदवली. युनोच्या मध्यस्थीचे रशियाने फौजा मागे घेतल्या. हा युनोचा पहिला विजय होय.

१०) **अरब-इस्त्रायल प्रकरण :** पाहिल्या महायुद्धानंतर पॅलेस्टाईनचा प्रदेश मॅडेटपद्धतीनुसार इंग्लंडच्या ताब्यात दिला. इंग्लंडने जाहीर केले की, जगातील सर्व ज्युंसाठी पॅलेस्टाईनचा प्रदेश दिला जाईल. त्यानुसार मे १९४८ मध्ये इस्त्रायल हे ज्युंसाठी स्वतंत्र राष्ट्र निर्माण केले. त्यामुळे ज्यू-अरब यांच्यात संघर्ष सुरु झाला. युनोला समाधानकारक उपाययोजना करता आल्या नाहीत.

११) **भारत-पाकीस्तान यांच्यातील वाद :** युनोमध्ये सर्वात जास्त गाजलेला आणि अद्यापि न सुटलेला वाद म्हणजे भारत-पाकिस्तानवाद होय. इ.स. १९४७ मध्ये काश्मीरचा प्रदेश भारतात समाविष्ट करण्यात आला. पाकिस्तानने टोळीवाल्यांच्या स्वरुपात लष्कर काश्मीरमध्ये पाठवले. दोन्ही देशांत युद्ध सुरु झाले. भारतीय लष्कराकडून हा प्रदेश मुक्त होत असतानाच युद्ध बंदीचे आदेश दिले. त्यामुळे तो प्रश्न अद्यापि सुटला नाही.

१२) **जपान-कोरिया संघर्ष :** युनोमध्ये अत्यंत गाजलेला दुसरा संघर्ष म्हणजे जपान-कोरिया संघर्ष होय. महायुद्धांच्या वेळी जपानने ल्प्रिया जिंकून घेतला.कोरियाच्या मुक्ती लढ्याच्या वेळी अमेरिका-रशिया यांच्या कोरियात आल्या होत्या. कोरियाच्या स्वातंत्र्यासंदर्भात एक कमिशन पाठवले: परंतु रशियाने त्याच्या प्रदेशात येण्यास नकार  १९५० मध्ये उत्तर कोरियाने दक्षिण कोरियावर हल्ला केला. म्हणजे एक प्रकरे रशियाने अमेरिकेबरोबर युद्ध पुकारले. दक्षिण कोरियाने युनोकडे तक्रार केली. त्यामुळे रशियाने अमितीच्या कामकाजावर बहिष्कार टाकला. शेवटी समझोता होऊन हे प्रकरण मिटले.

**आपली प्रगती तपासा :**

प्र.१. युनोचे कार्य सांगा .

## ८.३. सारांश

पहिल्या महायुद्धानंतर पराभूत जे तह लादले होते, त्यातूनच सुडाचे राजकारण सुरु झाले. त्यातून हुकुमशहाचा उदय झाला. त्यांनी वंशद्वेष, साम्राज्यवाद यातून दुसरे महायुद्ध सुरु झाले. ते युद्ध जिंकण्यासाठी लष्करी व राजनैतिक कारवाया सुरु झाल्या. युनोने राजकीय व अराजकीय स्वरूपाचे कार्य केले आहे.

जर्मनीच्या पराभवाने पाहिल्या महायुद्धाचा शेवट झाला. जागतिक शांततेसाठी फ्रान्समधील पॅरिस या ठिकाणी शांतता परिषद भरवण्यात आली. या परिषदेमध्ये शत्रू गटातील प्रतिनिधीला बोलावण्यात आले. दोस्त राष्ट्रांनी सर्व युद्धाची जबाबदारी जर्मनी आणि तिच्या दोस्त राष्ट्रांवर टाकली. या शांतता परिषदेमध्ये व्हर्सायचा तह, सेंट जार्मेनचा तह, न्युलीचा तह करण्यात आला त्याबरोबर राष्ट्रसंघाची स्थापनाही केली. राष्ट्रसंघाने राजकीय व अराजकीय कार्य मोठ्या प्रमाणात केले.

## ८.४. प्रश्न

प्र.१. राष्ट्रसंघाच्या कार्याचे मूल्यमापन करा.

प्र.२. राष्ट्रसंघाच्या अपयशाची करणे सांगा.

प्र.३. संयुक्त संघटनेच्या विविध घटनांची माहिती द्या.

प्र.४. युनोच्या कार्याचा आढावा घ्या.

## ८ .५ संदर्भ

१) डॉ. अनिल कठारे -विसाव्या शतकातील जगाचा इतिहास
२) डॉ. अनिल कठारे- आधुनिक जगाचा इतिहास
३) पी.जि.जोशी - आधुनिक जगाचा इतिहास
४) डॉ.सुमन वैद्य, डॉ. शांता कोठेकर- विसाव्या शतकातील जग (१९१४-१९४५) भाग-१
५) डॉ.सुमन वैद्य, डॉ. शांता कोठेकर- विसाव्या शतकातील जग (१९४६- २०००) भाग-२
६) डॉ. अनिरुद्ध , प्रा. गजानन भिडे-आधुनिक जगाचा इतिहास
७) जैन हुकूमचंद आणि कृष्णा माथुर- आधुनिक जगाचा इतिहास
८) कदम य.न. - विसाव्या शतकातील जगाचा इतिहास
९) कुलकर्णी अ.र. आणि देशपांडे-आधुनिक जगाचा इतिहास- भाग-1 & २
१०) साकुरे विजयानंद, अनिल कठारे-जागतिक इतिहासातील स्थित्यंतरे
११) उदगावकर म.न. आणि गणेश राउत- आधुनिक जग

❖❖❖❖

# ९

# डॉ. सन येत सेन आणि चीन

**घटक रचना**


९.०. उद्दिष्ट्ये

९.१. प्रस्तावना

९.२. चीनमधील राष्ट्रवादी चळवळी

९.२.१. बॉक्सर बंडाची कारणे व परिणाम

९.२.२. बॉक्सर बंडाची कारणे

९.२.३. बॉक्सर बंडाचे कारणे

९.३. १९११ च्या चिनी राज्यक्रांतीची कारणे व परिणाम

९.३.१. चीन राज्यक्रांतीची कारणे

९.३.२. इ.स. १९११ च्या राज्यक्रांतीचे परिणाम

९.४. डॉ. सन-येत-सेनचे कार्य

९.५. सारांश

९.६. प्रश्न

९.७ संदर्भ


## ९.०. उद्दिष्ट्ये

या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थ्यांस

- बॉक्सर बंडाविषयी चर्चा करणे,
- चीनच्या राज्यक्रांतीच्या कारणाविषयी माहिती सांगणे.
- डॉ.सन-येत-सन यांचे जीवन कार्य याचा आढाव घेणे.
- युआन-शि-काईच्या कार्याचा आढावा घेणे.
- चीनमधील कोमिंगटांग (राष्ट्रीय सरकार) याची माहिती घेणे.
- चीनमधील कोमिंगटांग व कम्युनिस्ट यांच्यातील संघर्षाचा अभ्यास करणे.

## ९.१. प्रस्तावना

परकियांच्या विरुद्ध चीनमध्ये राष्ट्रवाद जागृत होऊन त्यातूनच स्वातंत्र्य चळवळ सुरु झाली. यातून अफू युद्ध, तायपिंग बंड, बॉक्सर बंड इ. महत्त्वपूर्ण घटना घडल्या. इ.स. १९११ मध्ये डॉ.सेनच्या नेतृत्वाखाली चीनमध्ये प्रजासत्ताक स्थापन झाले; परंतु युआन शिकाई याने प्रजासत्ताक नष्ट करून पुन्हा राजेशाही प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. प्रजासत्ताकाचे नेतृत्व चँग-कै-शेक यांनी केले. त्यांनी कम्युनिस्टांना दडपशाहीच्या मार्गाने संपविण्याचा प्रयत्न केला. त्याला माओने प्रखर विरोध केला. त्यातून चीनमध्ये यादवी युद्ध सुरु झाले.

## ९.२. चीनमधील राष्ट्रवादी चळवळी

राष्ट्रीय सरकारचे (कोमिंगटांग पक्षाचे) नेतृत्व चँग-कै-शेक केले. याच वेळी इ.स. १९२१ मध्ये कम्युनिस्ट पक्षाची स्थापना चीनमध्ये झाली. या पक्षाने माओच्या नेतृत्वाखाली सत्ताप्राप्तीचा संघर्ष सुरु केला. कम्युनिस्ट पक्षाचा उदय झाला. त्याने पक्षासाठी लाल सेनेची स्थापना केली. लालसेनेची स्थापना करताना उद्देश, संघटन याचा विचार केला. कोमिंगटांग पक्षाचा उदय डॉ.सेनच्या नेतृत्वाखाली झाला तर अस्त चँग-कै-शेकच्या नेतृत्वाखाली झाला. चँग-कै-शेक अनेक धोरणांमुळे राष्ट्रीय सरकारला अपयश आले.

### ९.२.१. बॉक्सर बंडाची कारणे

इ.स. १८९८ मध्ये कुआंग हा राजा होता. याचा मंत्री कांग-यु-वी हा होता. याचा प्रभाव राजावर होता. कांगने ११ जून ते १३ सप्टेंबर अशा शंभर दिवसांच्या सुधारणा केल्या. मांचू सत्तेमध्ये मांडारीन जमात अत्यंत प्रभावशाली होती. ती जमात नष्ट करायची त्यासाठी नवीन तरुणांना राज्यकारभारात वाव दिला. त्यामुळे कुआंगने सर्व सुधारणा रद्द करून सत्ता अटळ करण्याच्या प्रयत्न केला. व कांग-यु-वी व चेन-फू यांनी सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. चेन-फूने इंग्रजी ग्रंथाचे चीनी भाषेत रुपांतर करून त्या ग्रंथाचे ज्ञान समाजात पोहचविण्याचा प्रयत्न केला. कांग याने समाजात बदल घडविले. यामुळे लोकजागृतीचे काम झाले व याच पार्श्वभूमीवर बॉक्सर बंड झाले.

### ९.२.२. बॉक्सर बंडाची कारणे

#### १) आर्थिक कारणे

#### अ) साम्राज्यवाद्यांच्या विरोधी असंतोष –

चीनच्या दुबळेपणाचा फायदा घेऊन परकीय राष्ट्रांनी प्रथम व्यापारी सवलती मिळविल्या व नंतर चीनमध्ये आपली प्रभावक्षेत्रे निर्माण करण्यास सुरुवात केली. साम्राज्यवादी राष्ट्रांनी चीनचे आर्थिक शोषण करण्यास सुरुवात केली. इ. स. १८६० मध्ये पेकिंग करार, इ.स. १८५८ टीएन्स्टीनचा करार झाला. यामध्ये चीनवर मोठ्या प्रमाणात आर्थिक खंडणी लादली गेली. परकीय सत्तांना विरोध करण्याची स्थिती चीनची नव्हती. त्यामुळे परकीय सत्तांची अरेरावी चीनला सहन करावी लागली होती. परकीय लोक चीनी

जनतेला तुच्छतेने वागवत होते. अर्थव्यवस्थाही दुबळी झाली होती. तसेच ख्रिस्ती धर्मप्रसारकांनी धर्मप्रसार सुरु केला. चीनी जनतेला धर्मप्रसाराच्या अटी दूर करणे शक्य झाले नाही. कारण युरोपियन लोकांचे वर्चस्व वाढले होते. या सर्व घटनांना मांचू सत्ता जबाबदार आहे असे लोकांचे मत निर्माण झाले. इंग्रजांनी दळणवळणाच्या सुविधा निर्मास्न केल्या. रेल्वेमार्ग, रेल्वेस्थानक, रस्ते, पोस्ट ऑफिस, कालवे काढले. अशा अनेक सुधारणा केल्या. चिनी लोकांचा व्यापार नदी, कालवे यांच्यामार्फत चाले, पण जेव्हा इंग्रजांनी दळणवळणाची साधने ताब्यात घेतली तेव्हा त्यांच्यावर जकात लादण्यात आली. त्यामुळे दळणवळण करणे चीनला तोटयाचे वाटू लागले. त्यामुळे चीनी लोकांनी व्यापार बंद केला. यामुळे जनतेत उठाव निर्माण झाला.

### २) राजकीय करणे

चिनी जनता रूढी, परंपरा, अंधश्रद्धा यात गुरफटलेली होती. चिनी लोक मागासलेले होते. तो प्रदेश अप्रगत होता. निसर्गात ज्या घटना घडतात त्या घटना ईश्वर घडवितो असे त्यांचे मत होते. तसेच आधुनिक शस्त्रसामग्री, तंत्रज्ञान हे चीनजवळ नव्हते. मांचू सत्ता ही ईश्वराच्या कृपेने आहे अशी विचारसरणी या लोकांची होती. परंतु मांचू सत्ता ही कमकुवत झाली व त्या सत्तेवर इंग्रजांचे वर्चस्व निर्माण झाले. भ्रष्ट, प्रतिगामी व अकार्यक्षम मांचू घराण्याविषयी लोकांच्या मनात राग, द्वेष, घृणा निर्माण झाली. म्हणून त्यांनी मांचू सत्तेचा शेवट करण्यासाठी उठाव केला.

### ३) धार्मिक कारणे

ख्रिश्चन मिशनऱ्यानी ख्रिश्चन धर्माचा प्रसार मोठ्या प्रमाणत सुरु केला. धर्मप्रसारकांना धर्मप्रसार करण्यास परवानगी दिली. चर्च बांधणे, त्यांना जमिनी देणे यामुळे चिनी जनता संतप्त झाली. (१) चिनी लोकांचा गट (२) ख्रिश्चन गट, हे दोन्ही गट आपला धर्म श्रेष्ठ मनात होते. दोघांनी एकमेकांना टीका करण्यास सुरुवात केली. चिनी लोकांच्या मते – ख्रिस्ती लोक हे रानटी आहेत, ते चिनी लोकांच्या स्त्रिया व मुले पळवून नेतात व नंतर त्यांचे डोळे, हृदय काढतात व त्यापासून औषधे बनवतात. तेच औषध चीनमध्ये आणून विकतात. त्यामुळे चिनी लोक संतप्त झाले व त्यातून त्यांनी परकियांच्या विरोधात उठाव केला.

### ४) राष्ट्रवादाचा उदय

ख्रिश्चन लोकांनी धर्मप्रसार करण्यास सुरुवात केली. परंतु चिनी लोकांना हा धर्मप्रसार नको होता. कारण चिनी संस्कृती ही सर्वश्रेष्ठ संस्कृती आहे. तिची जपणूक केली पाहिजे असा राष्ट्रवाद चीनमध्ये निर्माण झाला. जर चिनी लोकांना धर्म, जात, संस्कृती टिकवायची असेल तर ख्रिश्चन लोकांना नष्ट केले पाहिजे, तरच संस्कृती टिकून राहील. त्यामुळे एक संघर्ष निर्माण झाला व इ.स. १९०० मध्ये बॉक्सर बंड झाले.

munotes.in

### ५) युद्धाला सुरुवात

युद्धाला सुरुवात शाटुंग प्रांतात झाली. त्याचप्रमाणे शान्सी, पाली इ. प्रांतात उठाव झालेला दिसून येतो. जून १९०० मध्ये जर्मन राजदूताच खून व त्यानंतर २० जून १९०० रोजी युद्धाला सुरुवात झाली. परकीयांनी संयुक्त मोहिमेने टिनस्टीया शहरावर हल्ला चढविला व ते शहर ताब्तात घेतले. नंतर पेकिंगवर हल्ला चढविला. १४ ऑगस्ट रोजी परकीयांनी पेकिंग शहरामध्ये प्रवेश केला. २४ डिसेंबरला परकीयांनी मांचू राजाकडे १२ कलमी योजना पाठविली व शेवटी दोघांच्यात ७ सप्टेंबर १९०१ मध्ये वाटाघाटी झाल्या. त्यातूनच बॉक्सर करार झाला. परकीयांनी १७ सप्टेंबर १९०१ मध्ये आपले लष्कर पाठीमागे घेतले.

### ९.२.३ . बॉक्सर बंडाचे परिणाम

### १) बंडाची प्रचंड किंमत मोजावी लागली –

७ सप्टेंबर १९०१ मध्ये करार झाला. या करारामध्ये चीनचे सार्वभौमत्व नष्ट केले होते. उठावाच्या प्रांतातील कामगारांना कामावरून कमी केले. ३३ कोटी खंडणी लादण्यात आली. त्यावर ४ टक्के व्याज आकारले. ही खंडणी चीनला दुबळी करणारी होती. अमाप संपत्ती परकीयांनी नेली.

### २) मांचू सत्तेवर बंधने व अपमानित जीवन –

करवसुलीचा अधिकार नष्ट झाला होता. जे परकीय वकील होते त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी, राजाचे सार्वभौमत्व नष्ट केले. परकीय अधिकाऱ्यांचे वर्चस्व निर्माण झाले. म्हणजेच मांचू सत्तेचे गुलामगीरीसारखे जीवन झाले होते. लष्कर नष्ट केले म्हणजेच सर्व बाजूंनी चिनी सरकारवर बंधने लादली.

### ३) मुक्त व्यापार धोरण –

अमेरिकेने हे धोरण स्वीकारले. चीनमध्ये व्यापारी पेठ निर्माण करण्यासाठी मुक्त व्यापार धोरण स्वीकारले, चीनमध्ये साम्राज्यविस्तार झाला होता. इ.स. १८९९ च्या आर्थिक मंदीमुळे अमेरिकेला तोटा झाला. त्यामुळे १९०१ मध्ये चीनमध्ये मुक्त व्यापार करण्यात येईल, सर्वांना कर सारखाच असेल. जॉन हेल्थ या अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्र्याने परिपत्रके काढली. त्यानुसार सर्वांना समान कर लादण्यात आले.

**आपली प्रगती तपासा :**

**प्र.१**. बॉक्सर बंडाची कारणे व परिणाम सांगा.

## ९.३. १९११ च्या चिनी राज्यक्रांतीची कारणे व परिणाम

इ.स. १८४२-६० या काळात अफू युद्धे झाली त्यात चीनचा पराभव झाला. परकीयांचे वर्चस्व चीनमध्ये निर्माण झाले. चिनी लोक हे आपली संस्कृती, आपली जमात, जात ही

इतरांच्या पेक्षा श्रेष्ठ मानणारे होते. व त्याच प्रकारे परकीयही आपली संस्कृती श्रेष्ठ मानणारे होते. यावरून वाद सुरु होता. इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका व जपान यांनी आपले वर्चस्व चीनमध्ये निर्माण करण्यास सुरुवात केली.याला जबाबदार मांचू सत्ता आहे. त्या सत्तेच्या विरोधात तायपिंग बंड, इ.स. १९०० चे बॉक्सर बंड, १०० दिवसांच्या सुधारणा इत्यादी घटनांच्या माध्यमातून जनतेने उठाव केला. इ.स. १९०५ मध्ये परकीय शिक्षण घेण्यास सुरुवात केली. त्यामुळे परकीयांचा लोकशाही राज्यकारभार अभ्यासाला गेला. या नव्या गटानेच मांचूची सत्ता नष्ट करण्याची भूमिका घेतली. मांचू सत्ता नष्ट करण्यासाठी व लोकशाही राज्य निर्माण करण्यासाठी लोकांनी एक झाले पाहिजे, यासाठी शाटुंग प्रांतात कुआंग या ठिकाणी १० ऑक्टोबर इ.स. १९११ रोजी उठाव झाला. तो उठाव म्हणजे इ.स. १९११ ची राज्यक्रांती होय. या क्रांतीची कारणे पुढीलप्रमाणे –

**अ) चीनी राज्यक्रांतीची कारणे**

**१) अकार्यक्षम व दुर्बल मांचू सत्ता –**

राज्यकारभारात ज्या वेळी गोंधळ निर्माण होत असतो त्या वेळी त्याला जबाबदार ती सत्ता असते. चीनमध्ये जे मांचू घराणे होते त्या घराण्याचे राजे अकार्यक्षम व दुर्बळ होते. त्यांचे राज्यकारभारात लक्ष नव्हते. ते चैन, विलासात दंग होते. त्यामुळे राज्ययंत्रणेत गोंधळ निर्माण झाला. करवसुलीच्या पद्धतीला राजा व जनता यांच्यात भेद निर्माण करण्यास अधिकारी वर्ग जबाबदार होता. मन मानेल तेवढा कर वसूल करत असत. म्हणून जनता त्रस्त झाली होती. यासाठी मांचू सत्तेचा शेवट झाला पाहिजे या विचारातून राष्ट्रवाद निर्माण झाला व याचा फायद अ डॉ. सेन घेतला व प्रजासत्ताक राज्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

**२) सुसज्ज लष्कराचा अभाव –**

राज्यकारभारात राजाचे लक्ष नव्हते. त्यामुळे सर्वत्र भ्रष्टाचार निर्माण झाला. लष्करी अधिकारी चैनी व विलासी जीवन जगू लागले. राजाचे सैन्य, लष्करी अधिकारी कशा प्रकारचे आहेत याची माहिती राजाला नव्हती. त्याचप्रमाणे लष्करावर लक्ष केंद्रित नव्हते. त्याचप्रमाणे लष्कराला प्रशिक्षणही नव्हते. चीनमध्ये प्रचंड लोकसंख्या होती. याचा उपयोग राजाला करता आला नाही. लष्कर हे अकार्यक्षम असल्याने इ.स. १८४२ ते ६० या काळात झालेल्या अफूच्या युद्धात चीनचा पराभव झाला. त्याचप्रमाणे इ.स. १८९४-९५ चीन-जपान युद्धात पराभव झाला. या पराभवाचे जनतेला प्रचंड दु:ख झाले होते. इ.स. १९०० मध्ये बॉक्सर बंडाचा पराभव झाला. याला मांचू लोकांच्या मनात अंधश्रद्धेमुळे असा समज झाला की, देवानेच हा कोप घडवून आणला आहे. देवालाच मांचू सत्ता नको आहे. त्यातूनच राज्यक्रांती झाली.

munotes.in

**३)आरोग्य व जाचक कर –**

चीनमधील वाढत्या लोकसंख्येला आल घालण्यासाठी सरकारकडे कोणत्याही उपययोजना नव्हत्या. त्यामुळे प्रचंड प्रमाणात आरोग्यात बिघाड झाला. तसेच रोगराई निर्माण झाली. याकडे मांचू सरकारने लक्ष दिले नाही. परकियांच्या वर्चस्वामुळे लोकांना प्रचंड प्रमाणात कर द्यावा लागत असे. करामध्ये वाढ झाली. त्यामुळे राज्यकारभारात व जनतेत गोंधळ निर्माण झाला. नवे कर सक्तीने घेट असत. त्यासाठी लोकांनी शेती, घरे विकली, कर्ज काढले तरी कर आहेतच यासाठी मांचू सत्तेचा शेवट करणेच योग्य आहे ही विचारसरणी निर्माण झाली,

**१) पाश्चात्य विचारांची ओळख –**

कांग-यु-वीने मोठ्या प्रमाणत सामाजिक सुधारणा आणल्या. तसेच शिक्षणासाठी नवीन सुधारणा केल्या. तरुण पिढीला एकत्र आणले व त्यांना परकीय ज्ञानाबरोबर भौतिक ज्ञानाची ओळख करून दिली. त्यामुळे आधुनिक, ज्ञान व लोकशाहीवादी तत्त्व त्यांना मिळाले. परकीय शिक्षण घेण्यासाठी जो वर्ग परदेशात गेला होता त्याने तेथील राज्यकारभार, कोलाशाही पद्धत पाहिली व ते ज्ञान आत्मसात करून ते पुन्हा चीनमध्ये आले. मांडारीन जमातीला राज्यकारभारात जास्त स्थान होते. या वर्गाला राज्काराभारातून कमी केले व मांचू सत्तेने तरुण पिढीला राज्यकारभारात स्थान दिले. या वर्गाने समाज-एकरूप राज्यकारभाराची पद्धत अवलंबिली व समाजात बदल घडविला.

**२) स्थलांतरित चिनी तरुणांचा प्रभाव –**

चीनची आर्थिक परिस्थिती बिकट होऊ लागली. तेचा चिनी लोक मोठ्या प्रमाणात परदेशात जाऊन राहू लागले. स्थलांतराचा कायदा करून परकीयांनी चिनी लोकांना पुन्हा चीनमध्ये पाठविले. व जेव्हा परदेशातून चिनी नागरिक चीनमध्ये आले तेव्हा हे लोक क्रांतिकारी विचाराने प्रेतीत झाले. परदेशातील परिस्थिती त्यांना योग्य वाटत होती. त्यांनी चीनमध्ये येऊन आपले विचार आपल्या मित्रमंडळींना सांगितले व चीनमधील समाजामध्ये क्रांतीचे बीज पेरले गेले. त्यांचा प्रभाव चीनमध्ये निर्माण झाला.

**३) चीनची आर्थिक दुरवस्था –**

जे परकीय चीनमध्ये आले होते ते संपत्ती प्राप्त करण्यासाठी आलेले होते व त्यांनी चीनमध्ये आपले वर्चस्व निर्माण केले. त्यामुळेच बंड, उठाव हे घडून आले. हे बंड परकीयांनी मोडून काढले. जी युद्धे झाली त्यात चीनचा पराभव झाल्याने चीनवर खंडणी लादण्यात आली व त्यामुळे चीनची अर्थव्यवस्था ढासळली. तसेच परकीयांनी जाचक कर जनतेवर लादले. त्यातच चीनमध्ये दुष्काळ पडला. त्यामुळे गरिबी वाढली व अर्थव्यवस्था पूर्णपणे ढासळली. त्यामुळे लोकांच्यात असंतोष निर्माण झाला व त्यांनी बंड पुकारले.

### ४) तुंग-मिंग-हुई संघटनेचे कार्य –

या संघटनेची स्थापना डॉ.सेन यांनी चीनमध्ये लोकशाहीचे राज्य निर्माण करावयाचे होते. सर्वांनी मदत केली. म्हणजेच तरुण वर्ग, राज्यकारभारातील अधिकारी वर्ग, माजी सैनिक वर्ग इत्यादी चिनी बांधव परदेशात होते, त्यांच्याकडून डॉ.सेन यांनी आर्थिक मदत मिळविली. इ.स. १९०५, इ.स. १९०६, इ.स. १९०७, इ.स. १९०८, इ.स. १९०९ व इ.स. १९१० या काळामध्ये संघटनेचे उठाव केले, पण याला अपयश आले. या पराभवाची कारणे शोधून त्यावर उपाय योजले. त्यामुळे त्यानंतर इ.स. १९११ च्या राज्यक्रांतीचा विजय झाला.

### ब) सन १९११ च्या राज्यक्रांतीचे परिणाम

१) सन १९११ च्या राज्यक्रांतीने इ.स. १६४४ पासून चालत आलेली घराण्याची राजवट संपुष्टात आणली.

२) चीनमध्ये प्रजासत्ताकाची स्थापना झाली. चीन हे आशिया खंडातील पहिले १ जानेवारी १९१२ प्रजासत्ताक राष्ट्र बनले. परंपरागत राज्यव्यवस्थेचा त्याग करून जनतेने पाश्चात्य नवी प्रजासत्ताक शासनव्यवस्था स्वीकारली.

३) उत्तर चीनमधील राजकीय व्यवस्थेत विस्कळीतपणा आला होता. तेथील बहुतेक प्रांतात लष्करी नेत्यांनी आपली स्वतंत्र राजवट स्थापन केली. डॉ.सन-यत-सेनने दक्षिणेकडील राज्यात ऐक्य टिकविले.

४) डॉ. सेनचे गणराज्याची राजधानी नानकिंग व्हावी असे म्हणणे होते. पण युआन-शि-काईने गणराज्याची राजधानी पेकिंगमध्ये ठेवली.

**आपली प्रगती तपासा :**

**प्र. १.** १९११ च्या तीन राज्यक्रांतीची करणे सांगा.

## ९.४. डॉ. सन-येत-सेनचे कार्य

इ.स. १९१९ च्या चिनी राज्यक्रांतीचे जनक डॉ.सन-यत-सेन हे होय. डॉ. सेनने परकियांच्या व मांचू राजवटीच्या विरोधात संघर्ष करून प्रजासत्ताक राजवट स्थापन केली. डॉ. सेनचे विचार राजकीय सामाजिक परिवर्तनाचे होते. त्यांनी आपल्या जीवनात तीन तत्त्वे मांडली होती. डॉ. सेनने क्रांतीसाठी जे कार्य केले त्यांचे क्रांतीपूर्व, क्रांतीकाळातील व क्रांतीनंतरचे कार्य हे महत्वाचे कार्य होय. यासाठी विविध देशात असणाऱ्या चिनी लोकांकडून आर्थिक मदत घेऊन त्याच्या आधारे क्रांती घडवून आणली.

munotes.in

**१) डॉ.सेनचा परिचय :**

इ.स. १९११ च्या क्रांतीचा जनक व राष्ट्रवादाचा निर्माता डॉ.सन-यात-सेन होय. त्यांनी मांचू सत्तेचे ३०० वर्षे असणारे अस्तित्व नष्ट केले. चीनमध्ये प्रजासत्ताक, राष्ट्रवाद याचा प्रसार प्रयत्न केला. तसेच लोकशाहीचा जनक. चीनला परिपूर्ण करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला. क्वांगटुंग प्रांतातील शिऑबशान या खेड्यामध्ये ताई-जिआंगचा जन्म सन १८६६ मध्ये झाला. सन-यत-सेनचे वडील सना ताओ कुआंग हे आपल्या (गरीब) परिस्थितीमुळे सेनला शिक्षण प्राप्त करण्याची संधी देऊ शकले नाहीत. परंतु सन-यत-सेनचा मोठा भाऊ हवाई बेटावर नोकरी करत होता. म्हणून १४ वर्षाच्या सेनला तिकडे पाठविण्यात आले. इ.स. १८८२ ला परत आल्यावर हाँगकाँग व कॅन्टोनमध्ये उच्च शिक्षण पूर्ण झाले. इ.स. १८८६-८७ मध्ये वैद्यकशास्त्राचा अभ्यास हाँगकाँग येथे पूर्ण केला.

डॉ. सेन यांनी मकाव या बेटावर वैद्यकीय व्यवसाय सुरु केला. गोरगरीब व्यक्तींना मोफत औषधोपचार करत असत. त्याचबरोबर लोकशाही विचारांचा प्रसार केला. त्यांनी अनेक संघटना तयार केल्या व क्रांतीला प्रारंभ केला. इ.स. १८९५ मध्ये क्रांतीच्या कार्याला सुरुवात केली. इ.स. १८९४ ला चिनी-पुनरुत्थान समिती स्थापन केली. (शिंग-च्युंग-हुई) सन १८९५ मध्ये कॅन्टोन सरकार आपल्या ताब्यात घेण्याचा कट रचला पण तो फसला. त्यामुळे काही काळ देशत्याग करावा लागला. तेथून ते जपानला गेले. नंतर अमेरिका व तेथून युरोपात जाऊन वास्तव्य केले. तेथे त्यांना पकडण्यात आले पण त्यांच्या भूतपूर्व शिक्षकाच्या मदतीने सुटका झाली. सेन परदेशी असले तरी चीनमधील भूतपूर्व चळवळींशी त्यांनी सतत संबंध ठेवला व संघर्ष हा चालूच ठेवला.

**२) डॉ. सेनची क्रांती कार्याला सुरुवात**

डॉ. सेन यांनी इ.स. १८९५ मध्ये कार्याला सुरुवात केली. त्यांनी अनेक क्रांतिकारी संघटना स्थापन केल्या. क्रांतीला सुरुवात करायची असेल तर राष्ट्रवाद हा निर्माण झाला पाहिजे. राष्ट्रवादाचा प्रसार करायचा असेल तर शिक्षा संघटना या निर्माण झाल्या पाहिजेत म्हणून ख्रिस्ती मिशनऱ्यांनी शाळा सुरु केल्या व ख्रिश्चन धर्माचा प्रसार करण्यास सुरुवात केली. तेव्हा सेनसमोर पहिली अडचण मांचू सत्ता ही होती. त्यामुळे मांचू सत्तेचा शेवट करण्यासाठी त्याने तुंग-मिंग-हुई या संगतानेची स्थापना केली.

सन १८९५ मध्ये क्रांती करून कॅन्टोन हे शहर ताब्यात घेतले व प्रमुख ठिकाण नेमले. इ.स. १८९४-९५ मध्ये चीन-जपान युद्ध झाले. या युद्धात चीनचा पराभव झाला. या सर्वाला मांचू सत्ता हीच जबाबदार आहे. त्यामुळे मांचू सत्ता हीच नष्ट केली पाहिजे. मांचू सत्तेच्या विरोधात हालचाली सुरु केल्या. त्यामुळे डॉ. सेनला देशातून हद्दपार केले. त्यांची जपान, अमेरिका, युरोप या देशात भ्रमंती केली. डॉ. सेनने युद्धासाठी आवश्यक असणारा आर्थिक निधी हा परदेशात जे चिनी लोक स्थायिक झाले होते, त्यांच्याकडून गोळा केला. युद्धसाहित्य गोळा केले व यातूनच क्रांतीची वाटचाल केली.

जपानमध्ये जेव्हा डॉ. सेन गेले तेव्हा त्यांनी वेषांतर केले व स्वत:चे सेन हे नाव बदलून नकायामा या नावाने वास्तव्य केले व जपानमधून तंत्रज्ञानाचे शिक्षण घेतले. ते अमेरिकेत राहून युद्धाची सूत्रे हलवत होते. नंतर त्यांना अमेरिकेतून चीनमध्ये बोलविले. चीनमध्ये क्रांतीसाठी तंत्रज्ञान शिक्षण शाळा सुरूर केल्या व क्रांतीची वाटचाल सुरु केली.

### ३) डॉ. सेनची तीन राजकीय तत्त्वे (विचार)

डॉ. सेन यांचे जीवन भ्रमंतीचे होते. ज्या प्रांतात ते जात त्या प्रांतातील राज्यकारभाराची पद्धत ते बघत. तसेच राजेशाही व लोकशाही या पद्धती कशा प्रकारे वेगळ्या आहेत यासाठी त्यांनी तीन तत्त्वांचा मोठ्या प्रमाणात विचार केला : १) राष्ट्रप्रेम २) प्रजासत्ताक ३) साम्यवाद. लोकशाही राजसत्ता ही असली पाहिजे असे डॉ. सेन यांना वाटत होते. हेच विचार चिनी जनतेला समजावले पाहिजेत. यासाठी पाश्चात्य विचारसरणी, ग्रंथलेखन व शिक्षण यांचा प्रसार केला. त्याचा प्रभाव जनतेवर पडला . राजकीय तत्त्वे जी निर्माण झाली ती समाजापर्यंत पोहचविली पाहिजेत.

१) **राष्ट्रवाद :** या तत्त्वाला महत्वाचे स्थान देण्यात येते. जर व्यक्तीमध्ये राष्ट्रप्रेम/ राष्ट्रवाद निर्माण झाला, तर देशाची उभारणी करू शकते. मांचू सत्तेविरुद्ध लोकांच्या मनात द्वेष, तिरस्कार, राग, घृणा, असंतोष निर्माण झाला. याचा फायदा डॉ. सेननी घेतला. राष्ट्रवाद निर्माण केला तर आपण देशाची उभारणी करू शकू. भ्रमंतीच्या वेळी त्यांनी पहिले की, युरोप हा राष्ट्रवादामुळे बदलला होता तर आपला देश का बदलू नये व यातूनच देशात राष्ट्रवाद निर्माण केला आणि लोकांना क्रांतीकडे झुकवले.

२) **लोकशाही :** चीनची राजसत्ता हे चीनच्या दुरवस्थेचे मुख्य कारण आहे. त्यामुळे डॉ. सेन यांनी चीनमधील राजसत्ता नष्ट करून लोकशाही निर्माण करण्यचे ठरविले व त्यासाठी लोकांचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहभाग असावा. तसेच सर्व सत्ता लोकांच्या हाती देण्याचे ठरविले. पण ते लोकांच्या मनावर ठसविण्याची;लोकशाही राजवटीसाठी काही टप्पे निर्माण करावे लागले.

१) लष्करी शासनव्यवस्था निर्माण केली.

२) लोकशाही शिक्षण देण्यास प्रारंभ केला.

३) लोकशाहीचे वातावरण लोकांच्या मनात निर्माण करावयाचे असे डॉ. सेन यांचे मत आहे.

४) राज्यकारभाराचे बहुसंख्य लोकांना स्थान दिले.

५) लोकशाहीचा प्रसार करणे असे ठरविले होते.

३) **समाजवाद :** लोकांच्या जीवनमानात सुधारण घडविणे. जी समाजात संपत्ती आहे ती सर्वांना सारखी आली पाहिजे. प्रत्येकाला सारख्याच स्वरुपाची शेतीची वाटणी करावी.



munotes.in

गरीब-श्रीमंत हा भेट नष्ट केला. सर्वांना समान वागविले पण मांचू सत्तेमध्ये उच्च अधिकारी वर्ग होता, म्हणजेच मांडारीन वर्गाचे लोक होते. राज्यकारभारात त्याच लोकांचे वर्चस्व होते त्यामुळे संपत्तीचे केंद्रीकरण त्य लोकांकडे झाले होते. तो वर्ग समृद्ध होता व समाजात दुसरा वर्ग होता तो गरीब-दरिद्री लोकांचा होता. समाजात मुठभर लोकांच्या हातात सत्ता होती व बहुसंख्य लोक हे सामान्य होते. डॉ. सेन यांनी समाजातील दुरवस्था नष्ट केली व सर्वांना सारख्याच प्रकारचे अधिकार दिले. सारख्या प्रमाणात संपत्तीचे वाटप केले.

**४) डॉ. सन-यत-सेनचे कार्य**

१) डॉ. सेन यांनी प्रथम समाजाचे परिवर्तन /प्रबोधन करण्यास सुरुवात केली. लोकांच्या मनातील रूढी, परंपरा, अंधश्रद्धा या गोष्टी काढून टाकून नवीन विचार समाजास आत्मसात करावयास लावले.

२) कुशल संघटनांसाठी प्रशिक्षण केंद्रे उभारण्यात आली. कारण अशा संघटनेचा अभाव होता. डॉ. सेन यांनी कुशल संघटना ही निर्माण केली.

३) डॉ. सेन यांचा आर्थिक उभारणीत महत्त्वाचा वाटा होता. डॉ. सेन जेव्हा भ्रमंती करत होते तेव्हा तेथील स्थायिक चिनी तरुणांकडून त्यांनी आर्थिक निधी गोळा केला. याचा फायदा क्रांती करण्यास झाला.

४) दक्षिणेत युआन-शि-काई याला राष्ट्राध्यक्षपद दिले. आपापसात वैर नको म्हणून डॉ. सेन यांनी राष्ट्राध्यक्षपद युआन-शि-काईला दिले.

५) कॅन्टोन येथे कोमिंगटांग पक्षाची स्थापना केली.

**आपली प्रगती तपासा :**

**प्र.१.** डॉ. सेनच्या कार्याचे मूल्यमापन करा.

## ९.५. सारांश

इ.स. १९११ मध्ये डॉ. सेनच्या नेतृत्वाखाली प्रजासत्ताकाची निर्मिती झाली; परंतु स्वार्थी युआन-शि- काई आपल्या हाती सर्व सूत्रे घेतली. प्रजासत्ताकाचा शेवट करून पुन्हा चीनमध्ये राजेशाही सुरु केली. या वेळी जगात पहिले महायुद्ध सुरु झाले. या संधीचा फायदा घेऊन जपानने आपले वर्चस्व चीनमध्ये निर्माण करण्याचा प्रयत्न केला. जर्मनीचे सर्व अधिकार मिळावेत व चीनमध्ये अनेक सवलती प्राप्त करून घेण्यासाठी जपानने चीनकडे २१ मागण्या सादर केल्या . युआन-शि-काईने त्या मान्य केल्या. पाश्चिमात्यांच्या वर्चस्वामुळे आपल्या देशाची आर्थिक प्रगती होऊ शकत नाही. चीनमध्ये वैज्ञानिक व वैचारिक नवविचार निर्माण झाला. त्याचा परिणाम म्हणजे ४ मे १९१९ ची चळवळ झाली. त्याबरोबर चीनमधील मांचू सत्तेचा शेवट झाला.

## ९.६. प्रश्न

प्र.१. सन-यत-सेनचे १९११ च्या क्रांतीतील योगदान सांगा ?

प्र.२. १९११ च्या क्रांतीची करणे व परिणाम सांगा ?

प्र.३. कोमिंगटांग व कम्युनिस्ट पक्षातील यादवी स्पष्ट करा ?

## ८.७ संदर्भ


१) डॉ. अनिल कठारे -विसाव्या शतकातील जगाचा इतिहास

२) डॉ. अनिल कठारे- आधुनिक जगाचा इतिहास

३) पी.जि.जोशी - आधुनिक जगाचा इतिहास

४) डॉ.सुमन वैद्य, डॉ. शांता कोठेकर- विसाव्या शतकातील जग (१९१४-१९४५) भाग-१

५) डॉ.सुमन वैद्य, डॉ. शांता कोठेकर- विसाव्या शतकातील जग (१९४६- २०००) भाग-२

६) डॉ. अनिरुद्ध , प्रा. गजानन भिडे-आधुनिक जगाचा इतिहास

७) जैन हुकूमचंद आणि कृष्णा माथुर- आधुनिक जगाचा इतिहास

८) कदम य.न. - विसाव्या शतकातील जगाचा इतिहास

९) कुलकर्णी अ.र. आणि देशपांडे-आधुनिक जगाचा इतिहास- भाग-1 & २

१०) साकुरे विजयानंद, अनिल कठारे-जागतिक इतिहासातील स्थित्यंतरे

११) उदगावकर म.न. आणि गणेश राउत- आधुनिक जग


❖❖❖❖

munotes.in

# १०

## महात्मा गांधी आणि भारत

**घटक रचना**

१०.० उद्दिष्ट्ये

१०.१ प्रस्तावना

१०.२ भारतीय राजकारणातील गांधीजींचा उदय

अ.गांधीजींचे प्रारंभिक सत्याग्रह

ब.अहिंसा

क.चंपारण्य

ड.अहमदाबाद गिरणी संप

इ) खेडा सत्याग्रह

१0.३ १९२० ची असहकार चळवळ

अ) रॉलेट ॲक्ट

ब) जालियानवाला बाग हत्याकांड

क) खिलाफत चळवळ

ड) असहकाराचा ठरावअसहकार चळवळीचे महत्व

१0.४ स्वराज्य पक्षाची स्थापना व कार्य

१0.५ सायमन कमिशन

१0.६ नेहरू रिपोर्ट

१0.७ कॉंग्रेसची संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी

१0.८ सविनय कायदेभंग चळवळ (१९३०-३४)

अ) सविनय कायदेभंग चळवळीचा कार्यक्रम

ब) दांडी यात्रा

क) आंदोलनाचा दुसरा टप्पा

ड) पहिली गोलमेज परिषद

इ) गांधी-आयर्विन करार

ई) दुसरी गोलमेज परिषद

munotes.in

उ) पुणे करार

ऊ) सविनय कायदेभंग चळवळीचा शेवट

१0.९ १९३५ चा कायदा

१0.१० दुसऱ्या महायुद्धाच्या काळातील स्वातंत्र्य चळवळ : क्रिप्स योजना

१0.११ चले जाव चळवळ (१९४२)

अ) १९४२ व्या चळवळीचे स्वरूप

ब) वर्धा प्रस्ताव

क) सी.आर. फॉर्म्युला ३० जून १९४४

ड) वेव्हेल योजना १९४५

इ) कॅबिनेटमिशन १९४६

ई) हंगामी सरकार

उ) लॉर्ड माउंटबॅटन योजना ३ जून १९४७

१0.१२ सारांश

१0.१३ प्रश्न

१0.१४ संदर्भ

## १0.0 उद्दिष्ट्ये

- महात्मा गांधी यांची अहिंसात्मक चळवळ समजून घेणे.
- महात्मा गांधी यांची भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील भूमिका समजून घेणे.

## १0.१ प्रस्तावना

भारतातील राष्ट्रीय चळवळीतील १९२० ते १९४७ हा कालखंड गांधीयुग म्हणून ओळखला जातो. पहिले महायुद्ध संपल्यानंतर भारतीय राजकारणात कॉंग्रेसमध्ये मवाळवादी विचारसरणीचा प्रभाव कमी झाला होता. १९०५ मधील बंगालच्या फाळणीनंतर जहाल मतवादी प्रभाव वाढला. परंतु इंग्रज सरकारच्या दडपशाहीच्या धोरणामुळे जहाल मतवादी विचारसरणीचा प्रभाव कमी झाला होता. त्यात जहाल गटाचे नेते लोकमान्य टिळक या महान नेत्यांचा मृत्यू झाला व सरकारने केलेल्या दडपशाहीमुळे जहालवादी चळवळीचे खच्चीकरण झाले होते. अशा बिकट परिस्थितीत भारतीय लोकांच्या आकांक्षा व इच्छांना वळण देणारा कणखर नेता आवश्यक होता व होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी त्यांनी स्वातंत्र्यलढ्याला व्यापकता प्रदान केली. इ.स. १९२० पासून स्वातंत्र्यलढा सुरु झाला. या स्वातंत्र्य लढ्याच्या कालखंडाला गांधीयुग असे म्हणतात.

## १० .२ भारतीय राजकारणातील गांधीजींचा उदय

मोहनदास करमचंद गांधी यांचा जन्म ०२ ऑक्टोबर १८६९ रोजी गुजरात मधील पोरबंदर येथे काठीयावाड संस्थानच्या दिवाण घराण्यात जन्मलेल्या गांधीजींवर चांगले संस्कार झाले व त्यातून अहिंसा व सत्याग्रह मार्गाची कल्पना सुचली. इ.स. १८८७ साली ते मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. महाविद्यालयातील शिक्षणासाठी ते मुंबईला आले. त्यानंतर त्यांनी आपले शिक्षण इंग्लंडला जाऊन घेतले आणि बॅरिस्टर झाले. १८९१ साली ते हिंदुस्थानात परत आले. त्यानंतर त्यांनी काठीयावाडला वकिली सुरु केली.

वकिलीच्या व्यवसायानिमित्त एक खटल्यांसंबंधात १८९३ मध्ये ते दक्षिण आफ्रिकेतील ब्रिटीश वसाहत नातल येथे गेले असता त्यांचा प्रभावी नेता म्हणून उदय झाला. दक्षिण आफ्रिकेच्या वास्तव्यात वर्णभेदाचा भयंकर अनुभव त्यांना मिळाला. निग्रो लोकांप्रमाणे तेथे स्थायिक झालेल्या भारतीयांची स्थितीही वाईट होती. या घटनेमुळे विचारमग्न झालेल्या गांधीजींनी आफ्रिकेतील आपल्या भारतीय बांधवांना न्याय मिळवून द्यावयाचे ठरविले. गोऱ्या लोकांविरुद्ध चळवळ सुरु केली. १९०६ ते १९१४ या लकात त्यांनी आफ्रिकेत इंग्रज सरकारविरुद्ध चळवळ उभी केली. शेवटी सरकारने नमते घेऊन हिंदी लोकांवरील बंधने दूर करणारे काही कायदे केले. त्यांच्या सत्याग्रहाचा पहिला मोठा विजय मिळाला होता.

### अ) गांधीजींचे प्रारंभिक सत्याग्रह

**सत्याग्रह**

दक्षिण आफ्रिकेत पदार्पण करताच गांधीजींना तेथील वर्णभेदाचा अनुभव आला. यामुळे गांधीमध्ये विलक्षण परिवर्तना आले. पाशवी बाळाच्या आधारे अत्याचार करणाऱ्या संबंधाच्या विरुद्ध सामान्य जनतेने हिंसाचार करून आपले प्रश्न सोडवण्याच्या पद्धतीच्या मर्यादा त्यांनी जाणल्या. समाजातील थोड्या प्रतिभावान व त्यागी देशभक्तांनी लष्करी प्रबळ सत्तेविरुद्ध रोमहर्षक लढा दिला असला तरी त्याला सामान्य लोकांची पूर्ण साथ मिळत नव्हती. हे जाणून त्यांनी सत्याग्रहाच्या सहाय्याने देशभक्ती जागृत केली. समोरील ब्रिटीश शासना विरुद्ध लढा देताना सत्याची कास पकडूनच यश मिळेल यावर त्यांचा गाढ विश्वास होता. सत्याग्रह म्हणजे प्रेमाचा मार्ग अथवा आत्म्याची शक्ती असा होता. सत्याग्रह म्हणजे सत्याचा आग्रह धरणे. कोणत्याही परिस्थितीत शत्रूला अथवा शत्रूच्या दुर्गुणांना शरण न जाता सत्याचा आधारे लढा देणे म्हणजे सत्याग्रह. सत्याग्रह म्हणजे दुर्बलता नसून जनसामान्यांची शक्ती व्यक्त करण्याचे साधन होते. गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेत आपल्या वृत्तपत्रातून त्यांच्या चळवळींसाठी वाचकांना नाव सुचवण्याचे आवाहन केले. त्यावर एक वाचक मगनलाल गांधी यांनी सदआग्रह हे नाव सुचवले. गांधीजींनी त्याआधारे सत्याग्रह हे नाव स्विकारले. यशस्वी होण्यासाठी सत्याग्रही सदाचाराचा मार्ग सोडून अन्य कोणत्याही मार्गाने जात नाही. सत्याग्रह ही एक अद्भुत परंतु वास्तववादी विचारसरणी आहे. सत्याग्रह ही एक धार्मिक राजकीय सामाजिक व

अध्यात्मवादी चळवळ होती. सत्याग्रह ही चळवळ व विचार तत्कालीन धर्म, जात इत्यादी बंधने तोडून विश्वव्यापी आली होती म्हणून दक्षिण आफ्रिकेत नेल्सन मंडेला व अमेरिकन मार्टिन ल्युथर किंग यांनी जुलमी यंत्रणेविरुद्ध या पद्धतीचा वापर केला. सत्याग्रहाचे वर्णन गांधींनी शांततामय बंड असेही केले आहे. अन्याय, जीलीम व शोषण यांच्या विरोधात लढण्यासाठी सत्याग्रह हे एक प्रभावी साधन आहे असे गांधीजी म्हणत. सत्याग्रहीच्या अंगी पुढील गुण असावेत.

१. सत्याग्रही व्यक्तीचा सत्य व अहिंसा या दोन गुणांवर असीम विश्वास असावा.

२. सत्याग्रहीचे चारित्र्य निष्कलंक असावे.

३. सत्याग्रहीने रागाला प्रेमाने व असत्याला सत्याने जिंकावे.

४. सत्याग्रहीने स्वदेशी वस्तूंचा वापर करावा.

५. त्याने समानतेच्या भावनेतून सर्वांकडे पहावे.

६. सत्याग्रही व्यक्ती धर्माविषयी आस्था बाळगते मात्र कोणत्याही धर्माबाबत द्वेष बाळगत नाही.

७. सत्याग्रहीने विरोधकांवर विश्वास व प्रेम ठेवावे.

८. सत्याग्रहीने कोणत्याही परिस्थितीत संयम सोडू नये.

९. सत्याग्रहीने मद्य व इतर अमली पदार्थांपासून दूर रहावे.

१०. सत्याग्रही व्यक्तीमध्ये अखंड काम करण्याची शक्ती असावी. त्याने निराशावाद टाळावा.

११. त्याचे जीवन त्यागमय असावे.

महात्मा गांधींनी सत्याग्रह करताना काही नियमांचे पालन करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. ते नियम पुढीलप्रमाणे आहेत.

सत्याग्रहीने नेहमी सनदशीर मार्गाने प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करावा. आक्रस्ताळेपणा व हिंसा टाळावी. त्याने केवळ साध्य महत्त्वाचे न मानता साधनाची शुद्धता अर्थात साधनसुचीत्व जपले पाहिजे. सत्याग्रही तडजोड करतो मग त्यात कोणत्याही प्रकारचा दबाव नसतो, लाचारी नसते. सत्याग्रहीने प्रतिपक्षाचा अपमान करू नये तसेच जाणूनबुजून त्यास अडचणीमध्ये आणू नये. तसेच विरोधकाची निंदा करू नये. सत्याग्रह हा वैयक्तिक फायद्यासाठी करू नये. तो केवळ सार्वजनिक हितासाठी केला जावा. गांधीजींच्या मते सत्याग्रह खडतर साधना असून शरीर व मनाने उंची गाठल्याशिवाय त्याला यश मिळू शकणार नाही. सत्याग्रह हा सत्य व अहिंसा या तत्त्वावर आधारित असल्याने सत्याबरोबरच अहिंसा या तत्त्वाचाही त्यांनी हिरीरीने पुरस्कार केला.

**ब) अहिंसा**

गांधीजींनी अहिंसा तत्त्वाच्या आधारे लाखो भारतीयांना ब्रिटीशांविरुद्ध लढण्यास उदयुक्त केले. सत्याग्रह व अहिंसा या तत्त्वांसोबत सच्चा सत्याग्रह लढा देत असत. अहिंसा या



munotes.in

तत्त्वामागे गांधीजींनी एक प्रकारचा धीरोदात्तपणा व निर्भयता अभिप्रेत होती. भारतीय स्वातंत्र्यलढा हा शक्तिशाली ब्रिटीशांविरुद्धचा लढा होता. असा वेळेस संपूर्ण लोकांना स्वातंत्र्यलढ्यात सहभागी करून घ्यायचे असेल तर त्यांना पेलवणाऱ्या व झेपणाऱ्या पद्धतीचा अवलंब केला पाहिजे. हे गांधीजींना उमगले होते. अहिंसा या तत्त्वाचा खरा अर्थ केवळ शारीरिक हिंसेशी फारकत एवढाच नसून, अहिंसा ही सर्वार्थाने जीवनशैली बनली पाहिजे. असा त्याचा आग्रह होता. अहिंसेमुळे विरोध शक्तीच्या मनात परिवर्तन होऊ शकते. यावर त्यांचा गाढ विश्वास होता. ध्येय प्राप्तीसाठी हिंसेचा वापर केल्याने प्रतिकाराच्या मनात दीर्घकाळ कटूता व वैरभावना राहू शकते. त्याऐवजी अहिंसेच्या तत्त्वामुळे प्रतिपक्षाच्या मनात कटुतेची भावना राहत नाही. अर्थात अहिंसा म्हणजे केवळ निष्क्रिय प्रतिकार नसून सक्रीय शांततामय मार्गाने विरोध असा होतो. सत्याग्रहीला अभिप्रेत असलेल्या मागण्या या शांततामय मार्गाने पूर्ण होऊ शकतात. त्यासाठी त्यांना आपल्या मतांवर ठाम असणे गरजेचे असते. आपल्याला अपेक्षित ध्येय प्राप्तीसाठी हिंसेचा मार्ग योग्य नाही. हिंसेमुळे कोणतेही प्रश्न सुटत नाही उलट त्यामुळे दोन गटांमध्ये कायमचे वितुष्ट येते. अहिंसा व सत्य या गुणांमुळे प्रतिपक्षाला प्रेमाने जिंकणे अपेक्षित असते. सदाचार, अहिंसा, निर्भयपणा या गुणांच्या आधारे भारतीय लोकांनी स्वातंत्र्य लढ्यामध्ये भरीव असे योगदान दिले. गांधीजींच्या आगमनापूर्वी स्वातंत्र्यलढ्यात मोजकेच लोक सहभागी झाले होते. भारतीय स्वातंत्र्यासाठी त्यांनी घरादाराचा त्याग केला होता. मात्र अशा प्रकारचा ध्येयवाद व सर्वस्वाचा त्याग करणे सर्वसामान्य जनतेला अवघड असते. त्यांच्या सहनशीलतेला व त्रास सहन करण्याच्या प्रयत्नांना मर्यादा असतात. हे ध्यानात ठेवूनच गांधीजींनी अहिंसा व सत्याग्रह या तत्त्वांना मार्गदर्शक तत्त्वे म्हणून स्वीकारले. या तत्त्वांवर लढ्याची उभारणी केल्यामुळे सर्वसामान्य जनतेला त्यामध्ये भाग घेणे सोपे गेले. अहिंसा या तत्त्वाला त्यांच्या विचार प्रणालीमध्ये महत्वाचे स्थान होते. त्याच्या मते जीवनातील प्रत्येक क्षेत्रात अहिंसेच्या तत्त्वाचे पालन केले पाहिजे. सत्त्य व अहिंसा या एका नाण्याच्या दोन बाजू आहेत. कोणत्याही प्राण्याला विचार, उच्चार व आचार या तीनही दृष्टीने हानी पोहचवणे म्हणजेच अहिंसा होय. हिंसा म्हणजे केवळ शारीरिक इजा नसून दुसर्याला फसवणे, लुबाडणे ब खोटे बोलले इत्यादी बाबी एक प्रकारची हिंसाच आहे. अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी अहिंसात्मक मार्गाने प्रतिकार करावा. मात्र तसे करताना निर्भयपणा दाखवाव. भ्याडपणा ही हिंसेपेक्षा वाईट गोष्ट आहे. अहिंसेवर श्रद्धा म्हणजे प्रत्यक्ष देवावरच श्रद्धा होय. सत्य व अहिंसा या दोन तत्त्वांना वेगळे करता येत नाही. अहिंसेत द्वेष, सूड, प्रतिकार, डावपेच यांना स्थान नसते. भारतीय संस्कृतीचे एक महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे अहिंसा होय. अहिंसा हे सर्वश्रेष्ठ तत्त्व असून हिंसेचा वापर कोणत्याही प्रमाणात अयोग्य आहे. जीवनातील सर्व क्षेत्रात अहिंसेचा वापर केला पाहिजे. भारतीय समाजातील सामाजिक विषमतेचे प्रश्न सुटू शकतात अशी त्यांची धारणा होती. गांधीजींना अभिप्रेत असलेल्या अहिंसेत पुढील गोष्टी होत्या.

१. अहिंसेत आत्मशुद्धीला महत्त्व असते.

२. अहिंसा हे तत्त्व सर्वश्रेष्ठ होय.

३. अहिंसेचे पालन करणाऱ्याचा कधीही पराभव होत नाही.

अ) अंतिम समयी अहिंसेचाच विजय होतो.

ब) अहिंसेचा वापर जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी झाला पाहिजे.

क) अहिंसा विनम्रतेशी संबंधित आहे.

गांधीजींनी ब्रिटीशांविरुद्ध लढा देताना सत्याग्रहाचा वापर केला. असहकार, सविनय कायदेभंग, उपोषण, संप, हरताळ व बहिष्कार ही सत्याग्रहाची साधने वेळ व परिस्थितीनुसार गांधीजींनी उपयोगात आणली. असहकाराच्या मार्गाचा अवलंब करून शासनाच्या विरोधी काम करता येते व शासनाचे मन वळवता येते अशी गांधीजींची खात्री होती. सविनय कायदेभंगातून जुलमी व अन्यायकारक कायद्याला विरोध करणे हे गांधीजींना अभिप्रेत होते. भरतोय राजकारणात सक्रीय होण्याआधी त्यांनी संपूर्ण भारतभ्रमण केले व भारतातील समस्या जाणून घेतल्या. बिहारमधील चंपारण्य, अहमदाबाद गिरणी संप व खांदा सत्याग्रह या घटनांमध्ये सत्याग्रहाच्या तंत्राचा यशस्वीपणे वापर केला. या तीनही घटना प्रसंगी त्यांना यश मिळाले. त्यामुळे सत्याग्रह हे अन्यायाविरुद्ध लढण्याचे साधन म्हणून त्याची उपयुक्तता सिद्ध झाली.

**क) चंपारण्य सत्याग्रह**

चंपारण्य सत्याग्रह ही सत्याग्रहावर सुधारित पहिली कायदेभंग चळवळ होती. बिहारमधील चंपारण्य येथे नीळ पिकवणाऱ्या शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायावर लढा देण्याची विनंती केली गेली. गांधीजींनी सत्याग्रहाचा हा प्रसंग धोरणीपणे हाताळला. अखेर ब्रिटीश शासनाला गांधीजींच्या व शेतकऱ्यांच्या मानाग्या मान्य कराव्या लागल्या. ब्रिटीश शासनाने एक चौकशी आयोग नेमला व शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यास प्राधान्य दिले.

**ड) अहमदाबाद गिरणी संप (१९१८) –** अहमदाबाद येथील गिरणी मालक व कामगार यांच्यातील वादामध्ये गांधीजींनी पहिल्यांदा उपोषणाचे हत्यार उपसले. अखेर गिरणी मालकांनी माघार घेतली.

**इ) खेडा सत्याग्रह (१९१८) –** गुजरातमध्ये १९१८ मध्ये मोठ्या प्रमाणात दुष्काळ पडला होता. तेथील शेतकरी हवालदिल झाला होता. अशा वेळेस शेतकऱ्यांना मदत करण्याऐवजी ब्रिटीश शासनाने जमीन महसूलाची सक्ती केली. या वेळेस गांधीजी शेतकऱ्यांच्या मदतीला धावून गेले. अखेर प्रदीर्घ लढ्यानंतर ब्रिटीश सरकारने खेडा परिसरातील शेतकऱ्यांना शेतसारा देण्याबाबत सवलत दिली.

या तीनही प्रसंगातून गांधीजींनी सत्याग्रह तंत्राची उपयुक्तता सिद्ध केली. सत्याग्रहामध्ये शेतकरी व कामगार यांचा सहभाग वाढल्यामुळे सर्वसामान्य जनतेचा उत्साहदेखील वाढला.

## १0.३ १९२० ची असहकार चळवळ

इंग्रजांच्या अन्यायकारक धोरणांविरुद्ध गांधीजींनी सत्याग्रह करून आफ्रिका लोकांना न्याय मिळवून दिला. त्याच धर्तीवर भारतात इंग्रजांच्या विरोधात असहकार चळवळ सुरु केली. ही असहकार चळवळ सुरु करण्यास इंग्रजांचे भारतातील राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक धोरण जबाबदार असल्याचे आढळून आले. इ.स. १९२० साली कलकत्ता भरलेल्या कॉंग्रेसच्या अधिवेशनात सरकारशी असहकार करण्याचा ठराव पास करण्यात आला. त्यातच १९१९ च्या कायद्यान्वये होणाऱ्या निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचे ठरविण्यात आले. हे ठराव गांधीजींच्या नेतृत्वाखाली करण्यात आले.

### अ) रॉलेट ॲक्ट

भारतातील क्रांतिकारी कारवायांना आला घालण्यासाठी व त्यावर उपाययोजना सुचवण्यासाठी ब्रिटिशांनी रॉलेट यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली. या समितीच्या अहवालानुसार ब्रिटिशांनी १९१९ मध्ये रॉलेट ॲक्ट किंवा काळा कायदा पास केला. या कायद्यान्वये भारतीयांच्या स्वातंत्र्याची पायमल्ली करणऱ्या शिफारसी केल्यामुळे हिंदी समाजात सरकार विरोधी असंतोषाचे वातावरण निर्माण झाले होते. महात्मा गांधीजींनी लोकांच्या स्वातंत्र्यावर गदा आणणाऱ्या या कायद्याचा निषेध केला.

### ब) जालियानवाला बाग हत्याकांड

भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासात एक अत्यंत निर्दयी व क्रूर प्रकरण म्हणून जालियानवाला बाग हत्याकांड ओळखले जाते. या हत्याकांडाच्या स्मृती हिंदी जनता सदैव स्मरणात ठेवतील, ठरल्याप्रमाणे म. गांधीच्या आदेशानुसार ०६ एप्रिल रोजी मोठ्या प्रमाणात हडताळ पाळण्यात आला. पंजाबमध्ये मोठ्या प्रमाणत हडताळ पाळण्यात आला. म.गांधींना पंजाबमध्ये येण्यास बंदी घातल्यामुळे पंजाबमधील वातावरण अधिक तापले गेले. पंजाबमधील चळवळ दडपून टाकण्यासाठी ओडवायरने पंजाबचे नेते डॉ. किचलू व डॉ. सत्यपाल यांन अटक केली. त्यांच्या सुटकेसाठी लोकांनी मोर्चा काढला त्या वेळी गोळीबारात १५ लोक ठार झाले. ब्रिटीश सरकारच्या जुलमाचा निषेध करण्यासाठी १३ एप्रिल १९१९ रोजी अमृतसर शहरामध्ये जालियानवाला बाग येथे सभा आयोजित करण्यात आली. सभा सुरु असताना जनरल डायर ५० ब्रिटीश व १०० भारतीय सौनिकांनी बागेत प्रवेश करून त्यांच्यावर गोळीबार केला. त्यामध्ये १००० लोक ठार झाले. त्यापेक्षा जादा लोक जखमी झाले. तरीपण ब्रिटीश सरकारे जनरल डायरचे कौतुक केले. कॉंग्रेसने या हत्याकांडाच्या चौकशीची मागणी केली. चौकशी करण्यासाठी हंटर यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिशन नियुक्त केले. त्याने दोषी अधिकाऱ्यांना माफी दिली त्यामुळे इंग्रजांच्या विरोधी वातावरण निर्माण झाले. त्यातून असहकार चळवळीचा उदय झाला.

### क) खिलाफत चळवळ

तुर्कस्थानचा खलिफा हा सर्व मुसलमानांचा प्रमुख मनाला जात होता. पहिले महायुद्ध सुरु झाले तेव्हा या खालीफाने जर्मनीच्या बाजूने इंग्लंड विरुद्ध युद्धात उडी घेतली. साहजिकच हिंदी मुसलमानांच्या मनात खलिफा निष्ठा व इंग्रज निष्ठा यांच्यातील संघर्ष उभा राहिला. हिंदी फौजांत मोठ्या प्रमाणत मुसलमान होते व ते तुर्की साम्राज्याचे विभाजन आम्ही करणार नाही असे आश्वासन दिले होते. परंतु प्रत्यक्षात जेव्हा युद्धसमाप्तीनंतर तुर्की साम्राज्याचे लचके युरोपियन राष्ट्रांनी तोडले. त्यांचे निरनिराळे प्रदेश आपसात वाटून घेतले. तुर्की साम्राज्याला हात लावणार नाही असे वचन दिलेले इंग्रजांनी मोडल्याने हिंदू मुसलमान संतप्त झाले. खलीफाची सत्ता पूर्ववत त्याला मिळावी म्हणून त्यांनी खिलाफत चळवळ सुरु केली.

### ड) असहकार चळवळ

पहिल्या महायुद्धात ब्रिटन अडकल्यामुळे त्यास भारतीय लोकांच्या सहकार्याची आवश्यकता होती. याउलट सरकारला सहकार्य केल्यास आपल्याला स्वराज्याचे अधिकार मिळतील असे भारतीय लोकांना वाटत होते. त्यामुळे ब्रिटनला युद्धकार्यात मदत केली. महायुद्धात ब्रिटन विजयी झाले आणि सरकारने भारतासाठी इ.स. १९१९ मध्ये सुधारणा कायदा पास केला. या सुधारणा कायद्याला विरोध केला. महात्मा गांधीजींनीही प्रारंभी या सुधारणा करण्याचे प्रतिपादन केले, परंतु अल्पावधीत त्यांनी सुधारणा कायद्याला विरोध केला. सरकारच्या दडपशाही धोरणामुळे ते सरकार विरोधक बनले, रौलेट ॲक्ट, पंजाबमधील सरकारची दडपशाही, जालियनवाला बाग हत्याकांडामुळे भारतीय लोकांत असंतोष पसरला आणि देशात स्फोटक परिस्थिती निर्माण झाली. त्यामुळे गांधीजी असहकार चळवळ करण्याचा विचार करू लागले.

### इ) असहकार आंदोलनाचा प्रस्ताव

देशातील स्फोटक परिस्थितीचा विचार ब्रिटीशविरोधी असहकार चळवळीचा निर्णय घेण्यासाठी येथे ४ सप्टेंबर १९२० रोजी कॉंग्रेसने खास अधिवेशन लाल लजपतराय यांच्या अध्यक्षतेखाली भरविण्यात आले. असहकाराच्या कार्यक्रमाचा स्वीकार राष्ट्रीय कार्यक्रम कार्यक्रम म्हणून स्वीकारावा यासाठी गांधींनी प्रयत्न सुरु केले होते. हिंदू मुस्लिम ऐक्याची सुवर्णसंधी साधून स्वातंत्र्य प्राप्तीसाठी असहकार आंदोलन ऑगस्ट पासून सुरु करण्यात येईल अशी घोषणा सरकारी शाळा व महाविद्यालयावर बहिष्कार टाकण्यात आल्यामुळे राष्ट्रीय विद्यालये स्थापन करणे आवश्यक होते. त्यामुळे देशात अनेक ठिकाणी शाळा व महाविद्यालये स्थापन केली. काशी आणि गुजरातमधील विद्यापीठे, बिहार विद्यापीठ, बंगालमधील राष्ट्रीय विद्यापीठे आणि महाराष्ट्रातील टिळक महाविद्यालय ही त्यापैकी विशेष उल्लेखनीय आहेत. असहकार चळवळीचा प्रचार करण्यासाठी कॉंग्रेसच्या नेत्यांनी भारतभर दौरे केले आणि सर्वसामान्य लोकांना चळवळीचे महत्त्व पटवून दिले. या काळात हिंदू-मुस्लीम ऐक्य असल्यामुळे कॉंग्रेस व खिलाफतच्या सदस्यांनी मिळून आंदोलनाला गती दिली. मुसलमानांनी सरकारी नोकरी, सैन्य व पोलीस दलातील नोकरी स्वीकारू नये असे आवाहन खिलाफत

परिषदेने केले होते. याकाळात टिळक फंडा मध्ये बराच निधी गोळा झाला होता. या फंडातून स्वयंसेवक दलाची स्थापना केली होती.

### ई) परदेशी कपड्यावर बहिष्कार

१ जुलै १९२१ कॉंग्रेसने परदेशी कपड्यावर बहिष्कार घालण्याची मोहीम हाती घेतली. गांधीजींनी मुंबईतील गिरणी मालकांची भेट घेतली आणि परदेशी कपड्यावर बहिष्कार टाकल्यावर कपड्याच्या किंमती वाढवून लोकांची लुट ते करणार नाहीत, असे अभिवचन त्यांनी त्याच्याकडून घेतले. पण याबाबत फार कमी गिरणीमालक व व्यापाऱ्यांनी गांधीजींना लेखी अभिवचन दिले. मुंबईत अखिल भारतीय कॉँग्रेस महासामितीची बैठक २८ ते ३० जुलै १९२१ रोजी घेण्यात आली. ३१ जुलै रोजी उमर सोमानीच्या मालकीच्या एल्फिन्स्टन मिलच्या पटांगणात गांधीजींनी परदेशी कपड्याची पहिली होळी केली. यावेळी अ.भा.कॉँग्रेस महासमितीच्या बैठकीस आलेले सर्व सदस्य उपस्थित होते. ९ ऑक्टोबर १९२१ रोजी पुन्हा याच ठिकाणी परदेशी कपड्याची होळी गांधीजींनी केली. यावेळेस मात्र गांधीजींनी काठेवाडी पद्धतीच्या पोशाखाऐवजी पंचा घातला होता. १७ नोव्हेंबर १९२१ रोजी ब्रिटनचे राजकुमार आठवे एडवर्ड मुंबईत आले होते. त्यावेळी गांधीजी एल्फिन्स्टन मिलजवळील पटांगणात परदेशी कपड्यांची होळी केलि त्यावेळी २५,००० लोक होते.

### उ) शाळा व कॉलेजवर बहिष्कार

सरकारी शाळा व कॉलेजवर बहिष्कार आणि राष्ट्रीय शाळा व कॉलेजची स्थापना करणे हा असहकार चळवळीच्या कार्यक्रमाचा एक भाग होता. शंकर जावडेकर, स.ज.भागवत, आण्णासाहेब सहस्त्रबुद्धे, काका कारखानीस, स.का.पाटील, वि.प्र.लिमये, गो.आ.देशपांडे यांनी इ.स. १९२०-२१ मध्ये शाळा कॉलेजवर बहिष्कार टाकले आणि त्यांनी राष्ट्रीय शाळा, कॉलेजात अध्ययन केले. पुढे कम्युनिस्ट चळवळीत सहभाग घेतलेल्या रघुनाथ निंबकर, शांताराम मिरजकर, श्रीपाद अमृत दंगे व देशपांडे मास्तर या सर्वांनी चळवळीत सहभाग घेतला. फेब्रुवारी १९२१ मध्ये त्यांनी मुंबई येथील मारवाडी विद्यालयात राष्ट्रीय कॉलेज सुरु केले. डिसेंबर १९२१ मध्ये पुणे येथे टिळक महाविद्यालय सुरु करण्यात आले. रत्नागिरी, वेंगुर्ला, मालवण, सातारा, येवला, अहमदनगर, अमळनेर, चिंचवड, यवतमाळ, अकोला, नागपूर, अमरावती, बुलढाणा व देवामगाव येथे राष्ट्रीय शाळा सुरु करण्यात आल्या. केळकर, बॅ. जयकर, बापुजी माणे व श्रीपाद मुंजे यांनी असहकार चळवळीच्या कार्यक्रमात फेरबदल करावा असा आग्रह धरला होता. पण गांधीजींचे नेतृत्व मान्य करणाऱ्या कॉँग्रेसजनांना हे मान्य नव्हते.

### असहकार चळवळीचा शेवट

गांधींनी गव्हर्नर जनरलला पत्र लिहून १ फेब्रुवारी १९२२ रोजी बारडोली व गुंटूर या ठिकाणी सविनय कायदेभंगाची चळवळ सुरु करत असल्याचे कळविले होते. परंतु सरकारकडे केलेल्या मागण्यांची सात दिवसात मुदत संपण्यापूर्वी अहिंसात्मक मार्गाने चालणाऱ्या असहकार चळवळीस हिंसक वळण लागले. गोरखपूर जिल्ह्यातील चौरीचौरा

येथे ५ फेब्रुवारी १९२२ रोजी ३००० च्या एका जमावाने दंगलीस प्रारंभ केला. त्यामध्ये त्यामध्ये वीस पोलीस व एक सब इन्स्पेक्टर यांना ठार करण्यात आले. या हिंसक घटनेची बातमी गांधींना समजल्यानंतर त्यांना अति दु:ख झाले. १२ फेब्रुवारी १९२२ रोजी बारडोलीच्या सत्याग्रहाची रूपरेषा निश्चित करण्यासाठी बोलाविलेल्या संमेलनातच गांधींनी असहकार चळवळ बंड करण्याचा प्रस्ताव मांडला आणि तो बहुमताने पास करण्यात आला. अशा रीतीने असहकार चळवळ बंड केल्याची गांधींनी घोषणा केली.

**असहकार चळवळीचे महत्त्व**

असहकार चळवळ अचानक बंड झाले असले तरी तिचे अनेक फायदे झालेले होते. या जनांडोलानामुळे शहरातच नव्हे तर ग्रामीण भागातही राजकीय जागृती घडून आली. राष्ट्रीय लढ्यात आपण सहभागी होऊ शकतो. या जाणीवेने सामान्य लोकांत प्रचंड उत्साह निर्माण झाला. त्यांच्यात आत्मविश्वास व आत्मसन्मानाची भावना निर्माण झाली आणि राष्ट्रहितासाठी हालअपेष्टा सोसणे, तुरुंगात जाने या गोष्टी अभिमानास्पद वाटू लागल्या. गांधीजींनी मात्र चळवळ रद्द केल्याने तरुणांचा गांधीजींच्या अहिंसक लढयावरील विश्वास उडू लागला व स्वराज्यप्राप्तीसाठी दुसरा मार्ग ते शोधू लागले. जनतेतील निर्माण झालेल्या हिंदू-मुस्लीम ऐक्यालाही तडा गेला.

**आपली प्रगती तपासा :**

**प्र.१.** असहकार चळवळीची माहिती सांगा.

## १०.४ स्वराज्य पक्षाची स्थापना व कार्य

असहकार आंदोलन स्थगित होताच ब्रिटिशांनी पुन्हा दडपशाहीचा अवलंब केला. मुस्लिमांनी आपले वेगळे संघटन बांधण्यास सुरुवात केली. याच वेळी कॉंग्रेसच्या एका समितीने देशभराचा दौरा करून जनमताचा अंदाज घेतला आणि जनमत देशव्यापी आंदोलनास अनुकूल नसल्याचा निष्कर्ष काढला. दरम्यान नोव्हेंबर १९२२ च्या कॉंग्रेस महासमितीच्या कलकत्ता येथील अधिवेशनात कौन्सिलमध्ये सहभाग घेण्याच्या प्रश्नावरून कॉंग्रेसमध्ये दोन गट पडले. कायदेमंडळ व कार्यकारी मंडळात प्रतिनिधित्व करून सरकारला आपले म्हणणे मान्य करायला लावावे, तात्त्विक पातळीवर सरकारला पेचात पकडावे अशा विचारांच्या गटास फेरवादी गट म्हटले जाऊ लागले; तर बहिष्काराचेच तंत्र चालू ठेवावे अशा विचाराच्या गटास नाफेरवादी गट म्हटले जाऊ लागले. यातील फेरवादी गटाने इतरांचा विरोध मोडून जानेवारी १९२३ मध्ये 'स्वराज्य पक्षाची' स्थापना केली. या पक्षामध्ये चित्तरंजन दास (अध्यक्ष), मोतीलाल नेहरू (सचिव), विठ्ठलभाई पटेल, डॉ. मुंजे, बॅ. जयकर, न.ची.केळकर हे अग्रणी नेते होते.

## १०.५ सायमन कमिशन

सायमन यांच्या अध्यक्षतेखाली ब्रिटीश सरकारने २६ नोव्हेंबर १९२७ रोजी सात सदस्य असलेली समिती नेमली. या समितीची नेमणूक ठरल्यापेक्षा दोन वर्षे आधीच

केली गेली. या समितीवरील सातही सदस्य ब्रिटीश होते. ब्रिटीश संसदेत २ भारतीय सदस्य असूनही त्यांचा समावेश या समिती मध्ये केला गेला नाही. याचा भारतीय जनतेला राग आला. सायमन कमिशनवर बहिष्कार घालण्याचे ठरले. जेथे जेथे त्यातील सदस्य जातील त्यांना तेथे काळी निशाणे दाखवण्यात आली. विरोधी घोषणा देण्यात आल्या. सायमन कमिशन ज्या दिवशी भारतात आले त्या दिवशी संपूर्ण भारतात हरताळ पाळण्यात आला. लाहोरला गंभीर आंदोलन झाले. त्यातच लाल लजपतराय हे लाठी हत्यात गंभीर जखमी झाले. त्यांचा मृत्यूही त्यामुळेच झाला. लोकांमध्ये द्वेष पसरला. सायमन विरोधी वातावरण पसरले. नेहरू, गोविंद वल्लभ पंत यांच्यावर लाठी हल्ला झाला. भगतसिंग, चंद्रशेखर आझाद यांनी साण्डर्स या अधिकाऱ्याचा खून केला. कारण त्यानेच लाल लजपतराय यांच्यावर लाठी हल्ला केला होता. या सर्व घटनांची १९३० च्या संघर्षाची पार्श्वभूमी तयार केली.

## १०.६ नेहरू रिपोर्ट

सायमन कमिशनला तीव्र विरोध करण्यात आला. त्यावेळी भारतमंत्री बर्केनहेड यांनी स्पष्ट केले की जर सर्वांना पटेल असे संविधान भारतीयांना तयार केले तर सरकार त्याचा विचार कारे. कॉंग्रेसने हे आव्हान स्वीकारले आणि नेहरू समिती स्थापन झाली. त्यात सर्व पंथाच्या, धर्माच्या लोकांना प्रतिनिधित्व दिले. त्या मागण्या १) वसाहतीचे स्वराज्य, २) संघराज्य, ३) केंद्रीय संसद ४) जबाबदार शासन पद्धती ५) संरक्षण व्यवस्था ६) मुलभूत अधिकार ७) सर्वोच्च न्यायलयाची स्थापना ८) नवीन प्रांताची निर्मिती इ. मागण्या करण्यात आल्या.

## १०.७ कॉंग्रेसची संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी

गोलमेज परिषदा घेऊन काहीच फायदा होणार नाही हे कॉंग्रेसने जाणले. सुभाषबाबूंची ही स्वराज्याची मागणी वाढत होती. आयर्विनने कोणतीच ठोस घोषणा केली नाही. त्यामुळे कॉंग्रेसने वसाहतीच्या स्वराज्याऐवजी संपूर्ण स्वातंत्र्याच्या मागणीवर लक्ष केंद्रित केले. त्यातच सविनय आंदोलन सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. २६ जानेवारी १९३० हा स्वातंत्र्यदिन म्हणून साजरा केला गेला. आणि एका महान आंदोलनाची सुरुवात झाली. ही सर्व त्याची पार्श्वभूमी होय. सविनय कायदेभंग करण्याआधी म. गांधींना हा एक प्रश्न वाटाघाटीद्वारे पूर्ण व्हावा असे वाटत होते. त्यासाठी सरकारला म. गांधींनी “यंग इंडिया” या वर्तमानपत्राद्वारे काही अटी कळवल्या. त्या मान्य झाल्यास सरकारबरोबर संघर्ष केला जाणार नाही असे जाहीर केले.

## १० .८ सविनय कायदेभंग चळवळ (१९३० ते ३४)

महात्मा गांधीजींनी १९२० पासून राष्ट्रीय कॉंग्रेसचे नेतृत्व करण्यास प्रारंभ केला. त्यांनी प्रथम १९२० ला असहकार चळवळ निर्माण करून इंग्रज सरकारला शह देण्याचा प्रयत्न केला. नंतर १९३० मध्ये सविनय कायदेभंग चळवळ निर्माण करून आपल्या हक्कासाठी संघर्ष उभा केला. या वेळी इंग्लंडमध्ये मजूर पक्षाची सत्ता निर्माण झाली.

असहकार चळवळीवर मत करण्यासाठी सायमन कमिशन राबवले. परंतु त्याला शह देण्यासाठी व आपल्या हक्काची मागणी करण्यासाठी मोतीलाल नेहरूंच्या समितीने नेहरू रिपोर्ट सरकारकडे सादर केला. या वेळी आयर्विन यांनी शांततेसाठी वसाहतीच्या स्वराज्याची घोषणा केली. परंतु संपूर्ण स्वराज्याची मागणी करणाऱ्या कॉंग्रेसने गांधीजींच्या नेतृत्वाखाली सविनय कायदेभंग चळवळ उभी केली.

**अ) सविनय कायदेभंग चळवळीचा कार्यक्रम :**

१) मिठाचा सत्याग्रह

२) परकीय मालावर बहिष्कार

३) राष्ट्रीय शिक्षणाचा पुरस्कार

४) संपूर्ण दारूबंदी

५) करबंदी

६) सरकारी नोकऱ्यांवर बहिष्कार

७) न्यायालयीन कामकाजावर बहिष्कार

८) जंगल कायद्याचा भंग

**ब) दांडी यात्रा**

मिठाचा सत्याग्रह हा प्रतिकात्मक स्वरूपाचा होता. १२ मार्च १९३० रोजी गांधीजी आपल्या ७८ कार्यकर्त्यांनिशी साबरमतीच्या आश्रमातून दांडीकडे मिठाच्या सत्याग्रहासाठी निघाले. दांडी हे समुद्रकिनाऱ्याजवळील साबरमतीपासून ३८५ की.मी. अंतरावर होते. या गावापासून गांधीजी गाव गांधीजी आपल्या अनुयायांसह ५ एप्रिल १९३० रोजी दांडी येथे पोहचले. व त्यांनी समुद्र किनाऱ्यावरील मीठ उचलून मिठाचा कायदा मोडला. आणि सर्व देशभर कायदेभंगाची चळवळ सुरु झाली. गांधीजींनी ब्रिटीश सरकारने अटक केली व ऐरवडयाला तुरुंगात रवाना केले. मात्र गांधीजींच्या कायदेभंग चळवळीला उधान आले. महाराष्ट्र, गुजरात, बंगाल, मद्रास इत्यादी ठिकाणी समुद्र किनारी दांडीप्रमाणेच सत्याग्रह झाले. जेथे समुद्र नव्हता तेथे समुद्र नव्हता तेथे जंगलाविषयक कायद्यांचा भंग करण्यात आला. उत्तरप्रदेश, गुजरात, कर्नाटक येथे साराबंदीने जोर धरला.

**क) आंदोलनाचा दुसरा टप्पा**

सविनय आंदोलनाचा दुसरा टप्पा म्हणजे बेकायदेशीर मीठ तयार करणे हा होता. गावोगावी लोकांनी बेकायदेशीरपणे मीठ तयार केले. ९ एप्रिल रोजी गांधीजींनी आपल्या अनुयायांसाठी एक कार्यक्रम जाहीर केला. त्यात कायदेशीर मीठ लोकांनी आणावे, अथवा तयार करावे, सुत घरोघरी काढावे, मादक अमली पदार्थांच्या दुकानावर धरणे, अस्पृश्यतेचा त्याग इ. कलमे घातली. तसेच शाळा महाविद्यालय यांचेवर बहिष्कार आणि सरकारी नोकऱ्यांचा त्याग लोकांनी करावा असे आवाहन केले.



munotes.in

**ड) पहिली गोलमेज परिषद**

पहिली गोलमेज परिषद नोव्हेंबर १९३० मध्ये भरली. लंडन येथे ती भरली. त्यात तिन्ही राजकीय पक्षाचे मिळून लंडन येथील १६ प्रतिनिधी होते. ६ भारतीय प्रतिनिधी आणि ५३ इतर प्रतिनिधी होते. यात अल्पसंख्यांक हरिजन च्या प्रतीनिधीनीही भाग घेतला. या परिषदेने मुळची संघराज्याची कल्पना प्रत्यक्षात ते असे वाटले. कारण १९१९ च्या कायद्यापेक्षा ही परिस्थिती बरी होती. सरकारने प्रांतात पूर्ण जबाबदार शासनपद्धती आणि केंद्रात अंशत: शासन पद्धती लागू करण्याचे ठरवले होते. आंबेडकरांची स्वतंत्र मतदार संघाची मागणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हरिजनांना स्वतंत्र मतदार संघ असावा अशी मागणी केली. ते त्या वर अडूनच राहिले. बॅरिस्टर  जिना यांनी सरकराला १४ अटी घातल्या होत्या. त्या मुस्लिम अल्पसंख्याकांसाठी होत्या. ते देखील त्यातील एकही अट सोडवावयास तयार होईनात. पूर्ण गोलमेज परिषदेवर सांप्रदायिकतेचे सावट होते. त्यातून निष्पन्न काहीच झाले नाही. मात्र भारतातील जातिय ताण तणावांची माहिती सर्व जगाला ज्ञात झाली.

**इ) गांधी-आयर्विन करार**

भारताच्या घटनात्मक बदलासंबंधीची कोणतीही योजना कॉंग्रेसच्या मान्यतेखेरीज यशस्वी होऊ शकणार नाही. हे ओळखून ब्रिटीश राज्यकर्त्यांनी कॉंग्रेसचे सहकार्य मिळविण्याचे प्रतत्न सुरु केले. तडजोडीला अनुकूल वातावरण तयार व्हावे म्हणून, सरकारने २६ जानेवारी १९३१ रोजी महात्मा गांधी व इतर काही कॉंग्रेस नेत्यांची अखेरीस गांधीजी व्हाईसरॉयची  भेट घेण्यास तयार झाले.

त्यानुसार व्हाईसरॉय लॉर्ड आयर्विन व महात्मा गांधी यांच्यात दिल्ली येथे सुमारे १५ दिवस चर्चा झाली. या चर्चेच्या अखेरीस त्यांच्यात ५ मार्च, १९३१ रोजी जो करार झाला. त्यास “गांधी – आयर्विन करार” असे म्हटले जाते.

**ई) दुसरी गोलमेज परिषद**

२१ ऑगस्ट, १९३१ रोजी दुसऱ्या गोलमेज परिषदेला उपस्थित राहण्यासाठी गांधीजी समुद्रमार्गे लंडनला रवाना झाले. लंडनला येथे इंग्लंडचे पंतप्रधान रॅम्से मामॅकडोनल्ड यांच्या अध्यक्षतेखाली ही परिषद भरली होती. या परिषदेला इंग्लंडमधील व भारतातील राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, संस्थानाचे प्रतिनिधी असे सुमारे १०७ प्रतिनिधी उपस्थित होते. या परिषदेत नव्या घटनेची रूपरेखा व अल्पसंख्याकांचे प्रतिनिधित्व या दोन प्रश्नांवर चर्चा घडून आली या परिषदेत बॅ. जिना व म. गांधी यांच्यामध्ये मतभेद झाले. तसेच ख्रिश्चन, दलित, अँग्लो – इंडियन यांच्या प्रतिनिधींनी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली. तर गांधीजींनी संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी केली. ब्रिटीश सरकारने ही मागणी पूर्णपणे नाकारली त्यामुळे परिषद अयशस्वी ठरली.

**उ) पुणे करार**

१६ ऑगस्ट १९३२ रोजी ब्रिटनचे पंतप्रधान रॅम्से मॅक्डोनाल्ड यांनी जातीय निवडा जाहीर केला. या निवाड्याच्या विरोधात गांधीजींनी येरवडा तुरुंगातच आमरण उपोषण सुरु केले. “फोडा व राज्य करा” नीतीने मुस्लीमांप्रमाणे हिंदूधर्मातही फूट पडण्याचा हा सरकारचा सरकारचा प्रयत्न असल्याचा आरोप त्यांनी केला. दुसऱ्या गोलमेज परिषदेत दलित समाजासाठी मतदार संघाची मागणी करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना शेवटी गांधीजींशी नाईलाजाने समझोता लारावा लागला. २५ सप्टेंबर १९३२ रोजी दोघांमध्ये झालेला हा समझोता करार म्हणजे ‘पुणे करार’ होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना दलितांसाठी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी सोडून देऊन राखीव जागांवरच समाधान मानावे लागले. प्रांतिक विधिमंडळात दलितांसाठी १४८ जागा व केंद्रामध्ये २० टक्के जागा राखीव असाव्यात, असे ठरले. सरकारने लवकरच पुणे करारास मान्यता दिली.

**ऊ) सविनय कायदेभंग चळवळीचा शेवट**

वरील घटना घडत असतानाच ब्रिटीश सरकारने तीन गोलमेज परिषदांमधील चर्चा व पुणे करार यावर आधारित एक प्रसिद्ध केली. त्यानुसार भारताला अंतर्गत स्वायत्तता देण्याची घोषणा करण्यात आली. त्यामुळे म. गांधीजींनी सविनय कायदेभंग चळवळ इ.स. १९३४ मध्ये बंड केली.

**आपली प्रगती तपासा.**

**प्र.१** सविनय कायदेभंग चळवळीची माहिती सांगा.

## १०.९ १९३५ चा कायदा

भारतातील राजकीय घटना सोडविण्यासाठी व भारतीय राज्यघटनेचा विचार करण्यासाठी इंग्लंडमध्ये गोलमेज परिषद घेण्यात आली होती या परिषदेच्या निर्णयाच्या आधारे सायमन कमिशनचा अहवाल, नेहरू रिपोर्ट, बॅ. जीनाची चौदा तत्त्वे या सर्वांच्या आधारे १९३३ मध्ये ब्रिटीश सरकारने श्वेतपत्रिका प्रकाशित केली, श्वेतपत्रिकेचा विचार करण्यासाठी व राज्यघटनेची रूपरेषा ठरविण्यासाठी लॉर्ड टी.नु.लिथ च्या अध्यक्षतेखाली एक कमिटी स्थापन केली. त्याने आपला अहवाल भारत मंत्र्याला सादर केला. त्याने तो पार्लमेंटमध्ये मांडला. २४ जुलै रोजी पार्लमेंट ने त्याला मान्यता दिली. २ ऑगस्ट १९३५ रोजी राजाने मान्यता दिली. ३ जुलै १९३५ ला भारतात हा कायदा लागू करण्यात आला.

## १० .१० दुसऱ्या महायुद्धाच्या काळातील स्वातंत्र्य चळवळ : क्रिप्स योजना

इ.स. १९३९ मध्ये दुसरे महायुद्ध सुरु झाले. या युद्धामध्ये भारताचा पाठींबा व सहकाऱ्यासाठी लॉर्ड लिनलिथगो याने ८ ऑगस्ट १९४० रोजी घोषणा केली. त्यानुसार भारताला वसाहतीचे स्वराज्य देणे, राज्यघटनेसाठी घटना परिषद स्थापन करणे.

अल्पसंख्याकांच्या हिताचे संरक्षण करणे. कॉंग्रेसने इ.स. १९४० च्या मुंबई अधिवेशनात ऑगस्ट प्रस्ताव फेटाळला. कारण त्यामध्ये भेदनीतीचा उपयोग आणि स्वातंत्र्याची मागणी नाकारली.

## १०.११ 'चले जाव' चळवळ (१९४२)

क्रिप्स मिशन परत गेल्यानंतर भारतात इंग्रजांच्या विरोधी सर्वत्र नाराजी पारली. ८ ऑगस्ट १९४२ च्या चळवळीला प्रारंभ झाला. या चळवळीची करणे म्हणजे क्रिप्स योजनेने कोणाचेही समाधान झाले नाही. भारतीयांची चर्चा ना करता भारत युद्धात सहभागी असल्याची घोषणा ग.ज.ने केली. राज्यघटनेत संघर्ष युद्धसमाप्तीनंतर निर्णय घेण्यात येई आणि जपानच्या आक्रमणाची भीती वाटत होती. यामुळे राष्ट्रीय कॉंग्रेसने छोडो भारत चळवळीचे नियोजन केले.

### अ) १९४२ च्या चळवळीचे स्वरूप

चळवळीची घोषणा करताच प्रमुख नेत्यांना कैद झाली. त्यामुळे समाजवादी गटांनी भूमिगत राहून आंदोलन सुरु केले. संप, मोर्चे, हरताळ, निदर्शन, सरकारी मालमत्तेचे नुकसान तसेच प्रतिसरकार स्थापन करणे इत्यादी मार्गाने चळवळ सुरु होती. अनेक शहरांमधील कामगारांनी कारखाने बंड केले. सरकारने आंदोलकांवर लाठीमार, गोळीबार केला त्यामध्ये नंदुरबारचा शिरीषकुमार आणि त्याचे चार मित्र ठार झाले. १० हजारांहून अधिक लोक ठार झाले. जयप्रकाश नारायण, राममनोहर लोहिया, अच्युतराव पटवर्धन,अरुणा असफअली इ. नेत्यांनी महत्त्वाची कामगिरी केली.

### ब) वर्धा प्रस्ताव

वर्धा येथे कॉंग्रेस वर्किंग कमिटीने चले जाव ठराव १४ जुलै १९४२ रोजी मंजूर केला. मुंबई अधिवेशनात ८ ऑगस्ट १९४२ रोजी ठराव मंजूर केला. त्यानुसार ब्रिटीश राजवट असणे भारताला अपमानास्पद आहे. भारतीय स्वातंत्र्यासाठी ब्रिटीश व संयुक्त राष्ट्राची परिषद होणार आहे. स्वतंत्र भारत आपली सर्व शक्ती खर्च करून हुकुमशाहीविरुद्ध लढा द्येईल.

### क) सी.आर.फॉर्म्युला (३० जून १९४४)

हिंदू-मुसलमान यांच्यातील मतभेद मिटल्याशिवाय स्वातंत्र्य मिळणार नाही असे व्हाईसरॉय लॉर्ड वेव्हेल यांनी सांगितले, तेव्हा चक्रवर्ती राजगोपालाचारी यांनी गांधीजींच्या संमत्तीने बॅ. जीनासमोर योजना मांडली, तिलाच 'सी.आर.फॉर्म्युला' किंवा 'रामगोपालाचारी योजना' म्हणतात. त्यातील तरतुदी, (१) स्वतंत्र

### ड) वेव्हेल योजना (१९ जून १९४५)

युरोपमध्ये युद्धाची समाप्ती झाली, तरीपण जपानच्या आक्रमणाची भीती होती. भारताच्या स्वातंत्र्यसंदर्भात मित्र राष्ट्रांचा चर्चिल यांच्यावर दबाव येत होता. आगामी निवडणुकीत मजूर पक्ष सत्तेवर आला, तर आपली राजवट बदनाम करतील. यामुळे भारतीयांसाठी योजना जाहीर केली. त्यातील तरतुदी –

१) हिंदी लोकांनी नवी राज्यघटना करावी.

२) जपान बरोबरच्या युद्धात भारतीयांनी सहकार्य करावे.

३) हिंदी गृहलोकांकडे परराष्ट्रीय खाते असेल.

सिमला संमेलन २५ जून ते १४ जुलै १९४१५ वेव्हेल योजना व जागा वाटप याची चर्चा करण्यासाठी सिमला येथे संमेलन आयोजित केले. वेगवेगळ्या पक्षांचे २२ प्रतिनिधी हजार झाले. कार्यकारी मंडळाच्या रचनेबाबत मतभेद झाल्याने संमेलन बरखास्त केले.

### इ) कॅबिनेट मिशन / त्रिमंत्री योजना (१६ मे १९४६)

पंतप्रधान ॲटली ने जाहीर केले की, भारताला स्वातंत्र्य दिले जाईल. यासाठी सर पेथिक लॉरेन्स, सर स्टॅफर्ड क्रिप्स, सर अलेक्झांडर या तीन कॅबिनेट मंत्र्यांचे मिशन नियुक्त केले. ते २० मार्च १९४६ कराची येथे आले. देशातील ४७२ नेत्यांशी क्ष=चर्चा करून १६ मे १९४६ योजना जाहीर केली. तरतुदी – अ) भारताला लवकर स्वातंत्र्य दिले जाईल. (ब) कॉँग्रेस-लीग यांच्यात एकमत होत नाही, तोपर्यंत पुढील योजना सादर करण्यात येत आहे. (१) ब्रिटीश प्रांत व संस्थाने यांचे संघराज्य तयार करावे . (२) लोकायुक्त संसद त्याचा कारभार करेल. (३) संघराज्याची व गटराज्याची घटना बनवून दर १० वर्षाने गरजेनुसार बदल करावे. (४) प्रशासनाच्या कामासाठी तीन विभाग: (i) मद्रास, मुंबई, संयुक्त प्रांत, बिहार, मध्य प्रांत, ओरिसा यांचे एकूण प्रतिनिधी १८७. (ii) पंजाब, सरहद्द प्रांत, सिंधचे प्रतिनिधी ३५. (iii) बंगाल, आसामचे ७० प्रतिनिधी असावेत. या योजनेत पाकिस्तानचे चित्र दिसत असल्याने लीगने मान्य केली तर कॉँग्रेसने नाकारली.

### ई) हंगामी सरकार

घटना समितीसाठी निवडणूक घेण्यात आली. २९२ पैकी २१२ जागा कॉग्रेसला मिळाल्या. घटना समितीचे पहिले अधिवेशन ९ डिसेंबर १९४६ रोजी दिल्लीत भरले. घटना समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ. राजेंद्र प्रसाद यांची निवड करण्यात आली.

### उ) लॉर्ड माउंटबॅटन योजना (३ जून १९४७)

प्रधानमंत्री ॲटली यांनी २० फेब्रुवारी १९४७ रोजी जाहीर केले की, जून १९४८ पूर्वी इंग्रज आपली सत्ता सोडेल. लॉर्ड माउंटबॅटन याने कॉँग्रेस – लीगच्या नेत्यांशी चर्चा करून आपली योजना जाहीर केली. ती पुढीलप्रमाणे-

१) हिंदुस्थानची फाळणी करून मुसलमानांसाठी स्वतंत्र घटना समिती स्थापन करावी.

२) बंगाल, आसाम, पंजाबचे विभाजन केले.

३) आसामच्या सिल्हेट जिल्ह्यात सर्वमत घ्यावे.

४) इंग्रज सरकार १५ ऑगस्ट रोजी हिंदुस्थान सोडून जातील. या योजनेला कॉँग्रेस लीगनेही मान्यता दिली.

भारतीय स्वातंत्र्याच्या कायद्यानुसार १४ ऑगस्ट १९४७ रोजी पाकिस्तान वेगळा झाला. त्याच रात्री १२ वाजता भारतीय पारतंत्र्य नष्ट झाले. १५ ऑगस्ट १९४७ ला देश स्वतंत्र झाला. हिंदुस्थानची फाळणी होऊन दोन राष्ट्र निर्माण झाली.

**आपली प्रगती तपासा :**

**प्र. १.** चलेजाव चळवळीचा आढावा घ्या.

## १०.१२ सारांश

महात्मा गांधी यांच्यावर सत्य व अहिंसा या तत्वांचा अनन्यसाधारण प्रभाव प्रभाव होता. महात्मा गांधी न्यांनी स्वातंत्र्य चळवळीला एक नवी दिशा दिली. स्वातंत्र्य चळवळ ही मूठभर लोकांनी यशस्वी होणार नाही. हे जाणले त्यासाठी गांधीजींनी सत्याग्रह या तत्वाच्या आधारे शेतमजूर, महिला कामगार, व विद्यार्थी यांस विविध घटकांना स्वातंत्र्य संग्रमात सामावून घेतले, असहकार, सविनय कायादेभंग चळवळ, चलेजाव चळवळ या माध्यमातून स्वातंत्र्यलढा उभारला व यशस्वी केला.

## १०.१३ प्रश्न

१) महात्मा गांधी यांचे भारतीय राष्ट्रीय चळवळीतील कार्य सांगा.

२) असहकार चळवळीवर थोडक्यात टीप लिहा.

३) पुणे कराराचे चिकित्सक मूल्यमापन करा.

## १०.१४ संदर्भ

१) डॉ. अनिल कठारे -विसाव्या शतकातील जगाचा इतिहास
२) डॉ. अनिल कठारे- आधुनिक जगाचा इतिहास
३) पी.जि.जोशी - आधुनिक जगाचा इतिहास
४) डॉ.सुमन वैद्य, डॉ. शांता कोठेकर- विसाव्या शतकातील जग (१९१४-१९४५) भाग-१
५) डॉ.सुमन वैद्य, डॉ. शांता कोठेकर- विसाव्या शतकातील जग (१९४६- २०००) भाग-२
६) डॉ. अनिरुद्ध , प्रा. गजानन भिडे-आधुनिक जगाचा इतिहास
७) जैन हुकूमचंद आणि कृष्णा माथुर- आधुनिक जगाचा इतिहास
८) कदम य.न. - विसाव्या शतकातील जगाचा इतिहास
९) कुलकर्णी अ.र. आणि देशपांडे-आधुनिक जगाचा इतिहास- भाग-1 & २
१०) साकुरे विजयानंद, अनिल कठारे-जागतिक इतिहासातील स्थित्यंतरे
११) उदगावकर म.न. आणि गणेश राउत- आधुनिक जग

❖❖❖❖

# ११

## डॉ.सुकार्णो आणि इंडोनेशिया

**घटक रचना**

११.० उद्दिष्ट्ये

११.१ प्रस्तावना

११.२ इंडोनेशियातील साम्राज्यविस्तार आणि राष्ट्रवादी चळवळ

१) इंडोनेशियाच्या प्रारंभीचा इतिहास

२) पोर्तुगिजांचा साम्राज्यविस्तार

३) इंडोनेशियात डच इस्ट इंडिया कंपनीचे वर्चस्व

११.४ डॉ. सुकार्णो व त्यांचे कार्य

११.५ सारांश

११.६ प्रश्न

११.७ संदर्भ

## ११.० उद्दिष्ट्ये

या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थ्यांस

- इंडोनेशियातील पोर्तुगीजांचा साम्राज्यवादाची माहिती घेणे.
- इंडोनेशियातील राजकीय जागृतीचा आढावा.
- डॉ. सुकार्णोच्या कार्याची माहिती मिळविणे.

## ११.१ प्रस्तावना

युरोपीय राष्ट्रांनी आशिया खंडात साम्राज्य विस्ताराचे धोरण स्वीकारले. भारतातून फ्रेंचांची हकालपट्टी झाल्यानंतर फ्रेंचांनी व्हिएतनाममध्ये वसाहती स्थापन केल्या. फ्रेंच इस्ट इंडिया कंपनीने स्वत:चे प्रशासन स्थापन करून राजकारण व अर्थकारण आपल्या हाती घेतले. ख्रिश्चन मिशनऱ्यांनी संघटना स्थापनझाल्या. त्यातून चळवळ सुरु झाली. या स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्व हो-ची-मिन्ह याने करून पोर्तुगीज, फ्रेंच, जपान, अमेरिका यांच्या वर्चस्वातून स्वातंत्र्य प्राप्त केले. आग्नेय आशिया खंडातील इंडोनेशिया देश महत्वाचा आहे. पोर्तुगीजांची सत्ता नष्ट झाल्याने या प्रदेशात डचांनी राजकीय सत्ता स्थापन केळी. डच इस्ट कंपनीच्या मार्फत राज्यकारभार सुरु होता. डचांच्या धोरणामुळे

munotes.in

राष्ट्रवादी संघटना स्थापन झाल्या. डॉ. सुकार्णो यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्याचा लढा होऊन स्वातंत्र्य प्राप्त झाले.

## ११.२ इंडोनेशियातील साम्राज्यविस्तार आणि राष्ट्रवादी चळवळ

आग्नेय आशियातील अतिशय महत्वाचा देश म्हणजे इंडोनेशिया होय. मलाया द्वीपकल्पापासून ते गिनीपर्यंत पसरलेला ३००० लहान-मोठ्या द्वीपकल्पसमूहाचा देश म्म्हणजे इंडोनेशिया असून आशिया व ऑस्ट्रेलिया खंडाच्या मध्ये ३००० मैलाचा परिसर आहे. जावा,सुमात्रा, बाली, बोर्निया, सेलेबीज, तिमोर आणि मोलुकास इ. बेटे महत्वाची आहेत. जावा व मानव या भावाने ज्या आदिमानवाला ओळखले जाते. तो जावा बेटावर राहत होता. तो स्वसंरक्षणार्थ अरण्याच्छादित प्रदेशात निघून गेल्यावर त्यानंतर पुढारलेल्या लोकांनी अधिक प्रगत जातीशी संबंध जोडून आपला विकास घडवून आणला.

### १. इंडोनेशियाचा प्रारंभिक इतिहास

पाश्चिमात्याच्या आगमनापूर्वी आंतरराष्ट्रीय जलवाहतुकीच्या मार्गावर असल्याने चिनी, भारत, अरब राष्ट्रातील व्यापाऱ्यांच्या या बेटावर परिचय होता. ७-८ व्या शतकात श्रीविजय साम्राज्याचा उदय हा इंडोनेशियाच्या राजकीय इतिहासातील अत्यंत महत्वाची घटना होती. १३ व्या शतकापर्यंत हा प्रदेश श्रीविजय साम्राज्याचा एक भाग होता. सुमात्रातील पालेमबॉग हे शहर समृद्ध व बाजारपेठ म्हणून प्रसिद्ध होते. भारतीय संस्कृतीच्या अनेक खुणा आहेत. महायानपंथी बौद्ध धर्माला राजमान्यता होती.

हिंदू-बौद्ध सत्तांच्या मजपहित साम्राज्याचा उदय झाला. १३ व्या शतकात मुस्लीम व्यापारी, धर्मप्रचारक व सुफी साधू यांच्या प्रयत्नांमुळे इंडोनेशियात इस्लाम धर्म व संस्कृतीचा प्रसार झाला. १६ व्या शतकात युरोपियन व्यापाऱ्यांनी या बेटामध्ये प्रवेश केला.

### २. पोर्तुगीजांचा साम्राज्य विस्तार

आग्नेय आशियातील मोक्याचे ठिकाण मल्लाका हे इ.स. १५११ मध्ये ॲल्ककर्कने जिंकून घेतले. पोर्तुगीजांनी धर्मांततेच्या नावाखाली अनेक मुसलमानांचा छळ केला. पोर्तुगीज व्यापारी या बेटाला 'मसाल्याची बेट' असे म्हणत असे. मसाल्याच्या पदार्थात व्यापारात आपली मक्तेदारी मोलुकास व बंडा बेटाचा जलमार्ग शोधण्यासाठी पाठवले. ब्रो आणि त्याचे सहकारी ॲम्बायना आणि टरनेट पोहोचले. इ.स. १५१४ मध्ये पोर्तुगीजांनी टरनेट येथेच आपली मुख्य वखार स्थापन केली. ॲम्बायनो, बंडा, सेलेवीज व टलमेहर या विभिन्न ठिकाणी वखारी स्थापन केल्या. स्थानिक मुस्लीम सुलतानाशी करार करून पाश्चिमात्यांना फोडा आणि झोड या नीतीचा सर्वप्रथम पोर्तुगीजांनी प्रयोग केला. इ.स. १५८० मध्ये पोर्तुगाल राजा निपुत्रिक मरण पावल्याने दुसरा फिलिप व पोर्तुगाल व स्पेन या दोन्ही देशांचा राजा बनला. सोळाव्या शतकात पोर्तुगीज सत्तेला ओहोटी लागली. तीचा ऱ्हास झाला.

## ३. इंडोनेशियात डच इस्ट इंडिया कंपनीचे वर्चस्व

अति पूर्वेकडील प्रदेशातील पोर्तुगीजांची व्यापारी मक्तेदारी मोडून काढण्याच्या उद्देशाने डचांनी इ.स. १६०२ मध्ये डच इस्ट इंडिया कंपनीची स्थापना केली. या कंपनीने इंडोनेशियातील अनेक सुलतानाला मदत देऊन व करार करून पोर्तुगीज व्यापाऱ्यांना शह दिला. इ.स. १६०५ मध्ये अबॉयनाचा ताबा घेतला. इ.स. १६११ मध्ये डचांनी मोल्युकासमधील मसाल्याच्या पदार्थांच्या व्यापाराची मक्तेदारी मिळवली. इ.स. १६१९ मध्ये जकार्तावर ताबा मिळवला. तसेच बटेव्हियामध्ये व्यापारी राजधानी वसवली. इ.स. १६२३ नंतर डचांनी सत्ता विस्तार करण्याचा प्रयत्न सुरु केला. स्थानिक राज्यकर्त्यांवर आपले वर्चस्व निर्माण करून अप्रत्यक्ष राज्यपद्धती हे तंत्र अमलात आणले. डचांनी सर्व शासनयंत्रणा अशा रीतीने संघटित केली की, ज्यामध्ये खालपासून वरपर्यंत व्यापाऱ्याच्या दृष्टीने उपयोगी असेल. त्यांच्या शासनयंत्रणेचा मूळ उद्देश राजकीय नसून व्यापारी होता. जॅन पिटर, झून कोएन या कंपनीच्या सर्वोच्च अधिकाऱ्याच्या नियंत्रणाखाली कंपनीने प्रगतीचे शिखर गाठले. इ.स. १६२९ मध्ये डचांनी इंग्रज व पोर्तुगीज यांना शह दिला.इ.स. १७०५ पर्यंत संपूर्ण इंडोनेशियात आपले वर्चस्व स्थापन केले. डच इस्ट इंडिया कंपनीचा कारभार ढासळू लागला. नेदरलँडच्या लोकांना डच असे म्हणतात. सध्याच्या इंडोनेशिया प्रदेशाला युरोपियन लोक इस्ट इंडीज म्हणतात. इ.स. १७९८ मध्ये नेदरलँडच्या डच सरकारने कंपनीचा कारभार स्वत:कडे घेतला. त्या वेळेपासून नेदरलँड्स इस्ट इंडिया म्हणून कंपनीला ओळखले जाते.

## १. इंडोनेशियाची दुसऱ्या महायुद्धानंतर स्वातंत्र्याकडे वाटचाल :

नेदरलँड्सची राणी विल्हेलमिनी हिने ६ डिसेंबर १९४२ रोजी घोषणा केली की, युद्धानंतर वसाहतींना संपूर्ण स्वातंत्र्य देऊ. जपानच्या पराभवानंतर ब्रिटीश व ऑस्ट्रेलियन सैन्य इंडोनेशियात होते. या दोस्त राष्ट्रांच्या सैनिकांनी जपानने कैद केलेल्या सर्व लोकांची, सैनिकांची सुटका केली. इंडोनेशियाच्या स्वातंत्र्याला ब्रिटीश सैन्याने पाठींबा दिला. इ.स. १९४८-४९ या काळात डच आणि इंडोनेशिया यांच्यात अनेक वेळा संघर्ष झाला. ब्रिटीश व अमेरिकन यांनी यांनी पुढाकार घेऊन इंडोनेशियाला स्वातंत्र्य देण्यास भाग पाडले. ब्रिटिशांनी डॉ.सुकार्णो व डच गव्हर्नर जनरल व्हॉन मक यांच्यात शांतता प्रस्थापित करण्यासाठी मध्यस्थी केली. त्यानुसार नोव्हेंबर १९४६ मध्ये लिंगड – जती करार झाला. त्यातील तरतुदी पुढीलप्रमाणे –

१) इंडोनेशियात स्वतंत्र सार्वभौम संघराज्य स्थापन करावे. जावा व सुमात्रा ही घटक राज्ये गणराज्याच्या अधिकार क्षेत्रात असावेत.

२) बोर्निओ स्वतंत्र राज्य निर्माण करावे.

३) पूर्वेकडील सर्व बेटांचे मिळून तिसरे घटक राज्य करावे.

अशा प्रकारे इंडोनेशियाचे विभाजन करून डच आपली सत्ता तीजावण्याचा प्रयत्न करत होते.

लिंगडजती करार कोणाच्याही दृष्टीने योग्य नसल्याने मुसलमान कम्युनिस्ट व राष्ट्रवाद्यांनी फेटाळून लावला. त्यामुळे डचांनी पाशवी अत्याचार सुरु केले. युनोने याची गंभीर दखल घेऊन सुरक्षा समितीने गुड ऑफिसेस कमिटी नियुक्त केली. त्यांनी डचांना युद्धबंदीचे आदेश दिले. वाटाघाटी आणि ऑगस्ट १९४९ मध्ये हेग परिषद भरली. वाटाघाटी यशस्वी होऊन डचांनी आपली सत्ता सोडली. २७ डिसेंबर १९४९ रोजी इंडोनेशिया स्वतंत्र झाली. इ.स. १९५० साली नवीन राज्यघटना तयार केली. इंडोनेशियन प्रजासत्ताक संघराज्य स्थापन होऊन अध्यक्ष डॉ. अहमद सुकार्णो तर उपाध्यक्ष डॉ. हाटा होता. इ.स. १९६३ साली वेस्ट न्युगिनी प्रदेश दाचांकडून डॉ. सुकार्णो यांनी प्राप्त केला.

**आपली प्रगती तपासा :**

१) इंडोनेशियाची दुसऱ्या महायुद्धानंतरची वाटचाल सांगा.

## ११.३ डॉ. सुकार्णो व त्यांचे कार्य

**डॉ. सुकार्णो :** आग्नेय आशियामध्ये साम्राज्यवादी शक्तीचा शक्तीचा वाढता प्रभाव नाहीसा करून आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय राजकारणात महत्वाची भूमिका बजावण्यात डॉ. सुकार्णो हो चिन मिन्ह व ऑनसॉग ह्यू की यांनी महत्वाची भूमिका बजावली. डॉ. सुकार्णो यांनी इंडोनेशियाच्या स्वातंत्र्यपूर्व व्ब स्वातंत्र्योत्तर काळात मोलाची कामगिरी बजावली. मागास असा देशास नवीन ओळख प्राप्त करून दिली. डॉ. सुकार्णो यांचा जन्म १९०१ मध्ये झाला. बांडुंग येथील अभियांत्रिकी महाविद्यालयात त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. सुकार्णो यांनी समन्वयवादी अर्थात सर्वांना सामावून घेणारे राजकारण केल्यामुळे परस्परविरुद्ध अशा राजकीय पक्षांचे अस्तित्व असलेल्या देशातही त्यांनी यशस्वीपणे राज्यकारभार केला. सामान्य जनतेत मिळून मिसळून त्यांनी आपल्या राजकारणाची दिशा पक्की केली. वयाच्या २५ व्या वर्षी त्यांनी इंडोनेशियन राष्ट्रीय पक्ष स्थापन केला. (परतीय नॅशनल इंडोनेशिया) हा पक्ष निधर्मी क्रांतिकारक व राष्ट्रीय स्तरावरील पक्ष होता. त्यांना डच राजवटीत अनेक वेळा तुरुंगात टाकले.

द्वितीय महायुद्धात जपानने इंडोनेशियावर आक्रमण केले व त्यास डचांच्या तावडीतून मुक्त केले. त्यांनी डॉ. सुकार्णो यांना कैदेतून मुक्त केले व इंडोनेशियन राष्ट्रीय पक्षाला राजकारणात नवे स्वतंत्र धोरण आखण्याची संधी मिळाली. सुकार्णो याने जपानला सहकार्य करण्याचे धोरण अंगिकारले. बदल्यात जपान इंडोनेशियाला स्वतंत्र देश म्हणून मान्यता देण्यास तयार नव्हता. पुढे जपानवर अमेरिकेने अणुबॉम्ब टाकल्यावर जपानने शरणागती पत्करली व इंडोनेशियाला आपोआपच स्वातंत्र्य मिळाले. अखेर डच, ब्रिटन व अमेरिका यांना इंडोनेशियाच्या स्वातंत्र्यप्राप्तीची ओढ समजून आली व त्यानुसार डच शासन व इंडोनेशिया यांच्यात लिंगडजती येथे १९४६ मध्ये करार संमत झाला. या करारानुसार इंडोनेशिया स्वतंत्र, सार्वभौम संघराज्य झाले. मात्र डच या करारावर समाधानी नव्हते. त्यांचा साम्राज्यवादी दृष्टीकोन पूर्णपणे मवाळ झाला नव्हता. त्यातच इंडोनेशियात कट्टर मुस्लीम गट व साम्यवादी गट यांचेही उठाव होत असत. या

पार्श्वभूमीवर इंडोनेशियामध्ये लोकशाही शासनप्रणाली राबवणे अवघड झाले होते. १९४८ पर्यंत इंडोनेशियात अशांततेची स्थिती होती. मात्र आपले सहकारी महंमद यांच्या सहकार्याने संपूर्ण परिस्थिती यशस्वीपणे हाताळली. अखेरीस १९४८ मध्ये रेनवील करारानुसार डचांनी इंडोनेशियाच्या स्वातंत्र्यास मान्यता दिली व इंडोनेशिया पूर्णपणे स्वतंत्र झाला. डॉ. सुकार्णो हे इंडोनेशियाचे राष्ट्राध्यक्ष तर डॉ. महंमद हट्टा हे पंतप्रधान बनले.

## मार्गदर्शित लोकशाही १९५९-६६

डॉ. सुकार्णो यांचा इंदोनेशोयन राष्ट्रीय पक्ष (PNI) याने १९५९-६६ या काळात मार्गदर्शित लोकशाहीचा प्रयोग हाती घेतला. १९४९ ते १९५८ कालावधीत इंडोनेशियात डॉ. सुकार्णो यांच्याच नेतृत्वाखाली पाश्चात्य लोकशाही अस्तित्वात होती. मात्र त्याने इंडोनेशियात हवा तेवढा विकास झाला. नाही म्हणून सुकार्णो यांनी पाश्चात्य लोकशाहीतील तत्त्वे इंडोनेशियाशी सुसंगत नसल्याचे प्रतिपादन केले. त्यांच्यामते पाश्चात्य लोकशाही सर्व समावेशक नाही. डॉ. सुकार्णो हे समन्वयवादी नेता होते. देशातील साम्यवादी विचारसरणीच्या लोकांशी मिळतेजुळते घेऊन शासनप्रणाली चालवावी असे त्यांचे मत होते. इंडोनेशियातील मार्गदर्शित लोकशाहीला साम्यवादी पक्षानेही पाठींबा दिला. कारण इंडोनेशिया राष्ट्रवादी पक्ष हा एकसंध होता. या पक्षाचे नेतृत्व डॉ. सुकार्णो यांच्या सारख्या ध्येयवादी निस्वार्थी व परिवर्तनवादी व्यक्तीकडे होते. PNI या पक्षास देशातील गरीब जनता, भूमिहीन शेतमजूर, बुद्दीमंत साऱ्यांचा पाठींबा होता. तसेच डॉ. सुकार्णो यांच्या नेतृत्वाखाली हा पक्ष सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करीत असे. त्यामुळे त्यांना कम्युनिस्ट पक्षाने पाठींबा दिला.

मार्गदर्शित लोकशाही ही डॉ. सुकार्णो यांच्या मते आदर्श व्यवस्था होती. या प्रकारास निम्यापेक्षा एक मत जास्त अशी बहुमताची ढोबळ कल्पना नव्हती. याउलट सर्वोच्च संमतीने निर्णय घेतला जाई. हाच निर्णय सर्वांच्या भिन्न भिन्न मतामधील शोधून काढलेली तडजोड असे. एकमताने घेतलेला निर्णय म्हणून घोषित केले जात असे. डॉ. सुकार्णो यांच्या मते पाश्चात्य लोकशाही ही जशीच्या तशी स्विकारणे फारसे व्यवहार्य नाही. म्हणून इंडोनेशियात त्यांनी मार्गदर्शित लोकशाही हा प्रयोग राबवला. मात्र या प्रकारामध्ये डॉ. सुकार्णो यांना राष्ट्राध्यक्ष म्हणून फार मोठे अधिकार प्राप्त झाले होते.

**सुकार्णो यांचे परराष्ट्र धोरण –** सुकार्णो यांचे परराष्ट्र धोरण खलील तत्वांवर आधारित होते. वसाहतवादास विरोध, शांततामय सहजीवन अलिप्ततावाद व वंशवादास विरोध. डॉ. सुकार्णो यांच्या नेतृत्वाखाली इंडोनेशियाने डचांकडून बेस्ट न्युमिनी प्रदेश हस्तगत केला. त्याने संपूर्ण जनमत उभे करून आंदोलन उभारले. अखेरीस अमेरिकेने मध्यस्थी करून हे प्रकरण यशस्वीपणे हाताळले. याशिवाय इंडोनेशियाचा मलेशियाविरुद्ध प्रदीर्घ काळ संघर्ष सुरु होता.

**मलेशियासोबत संघर्ष :**

मलेशिया देशामध्ये मलाया, सिंगापूर व सारावाज या प्रदेशांचे संघराज्य निर्माण व्हावे अशी मांडली गेली. मात्र सुकार्णो यांनी त्याला कडाडून विरोध केला. सुकार्णो यांनी मलेशियाला कोंडीत पकडण्याचे सर्वतोपरी प्रयत्न केले. मात्र आशिया खंडातील देशांनी त्याला फारसा पाठींबा दिला नाही. मलेशिया संघराज्य निर्माण झाले तर इंडोनेशियाच्या राजकीय स्थैर्यावर विपरीत परिणाम होईल असे सुकार्णो यांना वाटत होतं. असे असले तरीही १९६३ मध्ये मलेशियन संघराज्य १९६३ मध्ये अस्तित्वात आले.

**साम्राज्यवाद व वसाहतवादास विरोध**

डॉ. सुकार्णो यांनी वसाहत वादाचा अनुभव घेतला होता. अनेक वर्षे इंडोनेशिया हा हॉलंडच्या ताब्यात होता. तसेच द्वितीय महायुद्धानंतर अमेरिका प्रणित वसाहतवाद वाढीला लागलेला होता. यासाठी ब्रिटन व अमेरिका या वसाहतवादी देशांच्या धोरणाविरुद्ध भूमिका सुकार्णो यांनी जवळीक केली. त्यांनी अनेकदा रशियास भेटी दिल्या. त्या बदल्यात रशियानेदेखील इंडोनेशियाला आर्थिक मदत दिली होती.

**बांडुंग परिषद १९५५**

आफ्रिका व आशिया या खंडातील विकसनशील देशांची आफ्रो आशियाई परिषद १९५५ मध्ये इंडोनेशिया येथील बांडुंग येथे संपन्न झाली. या परिषदेत सुमारे ३० देशांनी भाग घेतला होता. सदर परिषदेत काही महत्वाचे ठराव पास झाले. काही महत्वाचे ठराव खालीलप्रमाणे आहेत.

१) सर्व देशांच्या सर्वभौमत्वाबद्दल आदर दाखवणे.

२) मोठ्या राष्ट्रांच्या विशिष्ट हितसंबंधासाठी लष्करी गटात सामील न होणे.

३) मुलभूत मानवी हक्काविषयी आदर ठेवणे.

४) दुसऱ्या देशाच्या राज्यकारभारात हस्तक्षेप न करणे.

५) संयुक्त राष्ट्रसंघाच्या तत्त्वांविरुद्ध भूमिका न घेणे.

६) न्याय व आंतरराष्ट्रीय जबाबदाऱ्या यांबद्दल आदर बाळगणे.

७) परस्परसहकार्य वाढवणे.

८) परस्पर राष्ट्राचा स्वसंरक्षणाचा हक्क मान्य करणे.

बांडुंग परिषद आपल्या देशात भारावून डॉ. सुकार्णो यांनी आग्नेय आशियात थोड्या काळातच चांगला प्रभाव निर्माण केला होता. बांडुंग परिषदेमध्ये पुढील पाच तत्वांना मान्यता दिली गेली. राष्ट्रवाद मानवतावाद, सामाजिक न्याय, लोकशाही व विचार स्वातंत्र्य आशिया खंडाच्या इतिहासामध्ये बांडुंग परिषद महत्वाची घटना होय.

munotes.in

**भारताविषयी धोरण –** सुकार्णो हा अलिप्तता चळवळीविषयी आदर बाळगत असला तरी भारताविषयी त्यांची भूमिका विरोधी असल्याचे दिसून येते. १९६५ च्या भारत पाकिस्तान युद्धादरम्यान त्यांनी पाकिस्तानची बाजू घेतली होती. तसेच चीनशी जास्त जवळीक असल्यानेही भारताला विरोध करणे त्यांना आवश्यक झाले होते.

**सुकार्णो आणि चीन –** इंडोनेशियात अनेक चीन लोक स्थायिक झाले होते. १९६० मध्ये पास झालेल्या कायद्यानुसार सुकार्णो यांनी इंडोनेशियातील सुमारे दीड कोटी चिनी लोकांना नागरिकत्व बहाल केले. माओ यांच्या नेतृत्वाखाली इंडोनेशिया रशियामध्ये अधिक प्रगती करत असल्याचा दाखला सुकार्णो यांनी दिला. चिनी साम्यवादी नेतृत्वाबद्दल सुकार्णो यांना आदर होता.

**सुकार्णो आणि अमेरिका –** १९५४ मध्ये संमत झालेल्या आग्नेय आशिया करार संघटनेत इंडोनेशिया सामील होता. मात्र सुकार्णो यांनी या लष्करी करार संघटनेचे सभासद होण्याचे नाकारले. अमेरिकेस अनुकूल अशी भूमिका घेणा त्यांना पसंत नव्हते. त्यांची जवळीक रशिया व चीन यांच्याशी जास्त होती. १९६५ नंतरच्या कालावधीत डॉ. सुकार्णो यांचा प्रभाव ओसरू लागला होता.

१९४५ साली सुकार्णो यांनी अस्तित्ववाद, मानवतावाद, राष्ट्रीयता, सामाजिक न्याय व लोकतंत्र या पाच सिद्धांतानुसार इंडोनेशियाचे भवितव्य घडवण्याचे ठरवले होते. मात्र त्यांनी सैन्याला अवाजवी महत्व दिले. त्यांचे विदेश दौरे दिखावूपणाचे ठरले. इंडोनेशियासारख्या गरीब देशाला ऑलिम्पिकसारखी उधळपट्टी झेपणारी नव्हती. यामुळे इंडोनेशियातील प्रश्न सुटले नाहीत. अखेर साम्यवादी पक्षांच्या वाढत्या कारवाया यांच्या अस्ताला कारणीभूत ठरल्या. १९६५ मध्ये साम्यवादी लोकांनी बंड केले. त्यास गेस्टापूबंड म्हटले जाऊ लागले. मात्र सुहार्तो या नेत्याने ते बंड मोडून काढले. लाखो साम्यवादी लोकांनी आपले प्राण गमावले. ता घटनेनंतर इंडोनेशियाची राज्यसत्ता जनरल सुहार्तो यांच्याकडे गेली.

**आपली प्रगती तपासा.**

१) सुकार्णोच्या कार्याचे महत्व सांगा.

## ११.४ सारांश

आग्नेय आशिया खंडातील व्हिएतनाम हा महत्वाचा देश असून या प्रदेशात पोर्तुगीज, फ्रेंच, अमेरिका या राष्ट्रांनी व जपानने आपले विस्तारवादी धोरण स्वीकारले. इंडोनेशियात परकीयांच्या विरोधात डॉ. सुकार्णो यांनी लढा देऊन स्वातंत्र्य प्राप्त केले.

इंडोनेशियाच्या राष्ट्रवादी चळवळीमध्ये डॉ. सुकार्णो यांनी महत्वाची भूमिका बजावली. अमेरिका व सोव्हिएत रशिया या तत्कालीन राष्ट्रांच्या पूर्णपणे आहारी न जाता आपल्या देशांतील नागरिकांना स्वयंपूर्णता व स्वावलंबी करण्यामागे या तिघांचा सिंहाचा वाटा होता. ऑग सन यांचे अपूर्ण राहिलेले कार्य त्यांची कन्या स्युबी पुढे  चालवत आहे. व्हिएतनामची डॉ. हो.चिन निव्ह यांच्या मनात ठेवून वेगाने प्रगतीकडे वाटचाल सुरु आहे.



munotes.in

## ११.५ प्रश्न

१) इंडोनेशियामधील राष्ट्रीय चळवळीतील डॉ. सुकार्णोच्या कार्याचे महत्व स्पष्ट करा.

## ११.६ संदर्भ

१) डॉ. अनिल कठारे -विसाव्या शतकातील जगाचा इतिहास
२) डॉ. अनिल कठारे- आधुनिक जगाचा इतिहास
३) पी.जि.जोशी - आधुनिक जगाचा इतिहास
४) डॉ.सुमन वैद्य, डॉ. शांता कोठेकर- विसाव्या शतकातील जग (१९१४-१९४५) भाग-१
५) डॉ.सुमन वैद्य, डॉ. शांता कोठेकर- विसाव्या शतकातील जग (१९४६- २०००) भाग-२
६) डॉ. अनिरुद्ध , प्रा. गजानन भिडे-आधुनिक जगाचा इतिहास
७) जैन हुकूमचंद आणि कृष्णा माथुर- आधुनिक जगाचा इतिहास
८) कदम य.न. - विसाव्या शतकातील जगाचा इतिहास
९) कुलकर्णी अ.र. आणि देशपांडे-आधुनिक जगाचा इतिहास- भाग-1 & २
१०) साकुरे विजयानंद, अनिल कठारे-जागतिक इतिहासातील स्थित्यंतरे
११) उदगावकर म.न. आणि गणेश राउत- आधुनिक जग

❖❖❖❖

munotes.in